१८२०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ४०९

REFBK-0001631

# अभिनव ग्रंथसंग्रह

| राष्ट्रीय वाङ्मय | किंमत | विविध संग्रह | किंमत |
|---|---|---|---|
| मराठे व इंग्रज | २ | तुलसी रामायण | ५ |
| जर्मनीची उत्क्रांति, | १।८ | विवेकवाणी | ८ |
| टिळकांची व्याख्यानें | ।८ | संसारशास्त्र | ।१२ |
| आयर्लंडचा इतिहास | १। | भारतमुक्ताहार | । ८ |
| स्वराज्याची मीमांसा | १ | जंगली माणूस | । ४ |
| साम्राज्यांतर्गतस्वराज्य | ।८ | संतकाव्यसूची | २। २ |
| स्वराज्याचा इतिहास | १।८ | ज्युबिली ग्रंथ | १ ४ |
| स्वराज्याची मोहीम | ।४ | सुदर्शन | । |
| स्वराज्य कथा | ।६। | चीनची माहिती | । |
| स्थानिक स्वराज्य | ।४ | योगवासिष्ठ | ।१८ |
| सेल्फगव्हर्नमेंट | ।८ | शेतकी व बागाईत | । ८ |
| टिळक-के. | ।१० | रंभा व शुक | । १ |

पत्ता— प्रिंटिंग एजन्सी पुणें

मुंबई एजंट— परचुरे पुराणिक मंडळी माधवबाग.

## अध्यात्म शास्त्रांतील नवीन ग्रंथ

किंमत दोन रुपये

# आत्मानुसंधान

व्हा. पी. ट. ख. शिवाय

लेखक

गोविंदसुत ऊर्फ परशुराम गोविंद चिंचाळकर

परमार्थविचारमाला, गीतारहस्यनिरीक्षण पुस्तकांचे कर्ते

संसारांत वावरणाऱ्या मनुष्य प्राण्यांना आपण कोण याची जाणीव न झाल्यानें सुखदुःखांचें चक्र तापदायक होतें; पण मानवी जीविताचें अंतिम साध्य परमार्थ मार्गानें मोक्ष प्राप्त करून घेणें हेंच आहे व त्याकरतां ' अहं ' कोण हें पटणें आवश्यक आहे. ' सोहं ' आत्मा तो मीच ही भावना जागृत करण्याकरतां आचरावयाच्या तपाची रूपरेखा दाखविणारा ग्रंथ ' आत्मानुसंधान ' त्या मार्गातील प्रवाशांना अत्यंत आवश्यक आहे, म्हणून आजच मागवा. सुबक बांधणी, मोहक छपाई व माफक किंमत.

पत्ता—परचुरे पुराणिक मंडळी, माधवबाग, मुंबई.

श्री.

# असहकारयोग

## प्रस्तावना

### लेखक—गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

बी. ए. एल्. एल्. बी. बेळगांव.

महात्मा गांधींनीं हिंदुस्थानच्या राजकारणांत पुढाकार घेतल्या-पासून आमच्या राजकीय चळवळीला एक निराळ्या प्रकारचें स्वरूप येऊं लागलें आहे. आतांपर्यंत एका विशिष्ट भावनेनें व विशिष्ट प्रकारानें आमची राजकीय चळवळ चालली होती. पूर्वीच्या चळवळींत चळवळ करणाऱ्यांचा आमच्या राज्यकर्त्यांवर विश्वास होता व चळवळीचे बहुतेक मार्ग पाश्चात्य धर्तीवर होते. सभा भरवणें, निषेधपर ठराव पास करणें, सरकारांना सूचना करणें, अर्ज व विनंत्या करणें, निषेधप्रदर्शन करणें, व प्रसंगविशेषीं सरकारशीं विरोध करणें इत्यादि सर्व मामुली प्रकरणांत सरकार असल्या उपायांनीं सुधारेल असा दृढ विश्वास होता व हा विश्वासच या चळवळीचें रहस्य होतें. या मार्गानें जाणाऱ्यांमध्यें देखील मवाळ जहाल इत्यादि बारीकसारीक पक्षभेद करण्याचा प्रकार होता; पण सर्व एकाच ध्येयानें उद्युक्त झाले असल्याकारणानें व सर्वांचे मार्ग प्रायः एकाच स्वरूपाचे असल्यानें अशा भेदाला फारशी जागा नव्हती. फार झालें तर थोड्याशा स्वभावभेदामुळें एका पक्षाची भाषा जास्ती जोरकस व तीव्र होती, इतकेंच म्हणतां येईल. महात्मा गांधी हे आतांपर्यंत हिंदी राजकारणांत प्रामुख्यानें पडत नसल्या कारणानें त्यांचा देखील अंतर्भाव यांतच होता असें

तथापि त्यांचा स्वभाव, त्यांचें शिक्षण, सत्यावरील त्यांचें प्रेम, कोणत्याहि प्रकारच्या हिंसेबद्दलचा त्यांचा तिटकारा, आतांपर्यंत त्यांच्यावर झालेले संस्कार, त्यांचा आलेला अनुभव, त्यांची तीव्र तपश्चर्या, त्यांच्या अंतःकरणाची शुद्धता, अपूर्व स्वार्थत्याग, काम करण्याची पद्धत व चिकाटी इत्यादि गुणांचें सूक्ष्म अवलोकन करणारांस महात्मा गांधींना पूर्वींचे मार्ग सर्वतोपरी पसंत होते असें म्हणतां येणार नाहीं. महात्मा गांधी जर हिंदी राजकारणांत प्रामुख्यानें पडतील तर ते त्याला निराळेंच वळण दिल्याखेरीज राहणार नाहींत, असेंच अनुमान त्यांच्या पूर्वचरित्रावरून काढावें लागेल. त्यांच्या मार्गाला अडवणुकीचा मार्ग असें म्हणण्याचा प्रघात आहे. पण तें सर्वांशीं खरें नाहीं. त्यांचा मार्ग अत्यंत पवित्र आहे. धर्माला धरून आहे. आपण सत्वस्थ राहून व दुःख सोसून आपल्या आत्मिक सामर्थ्याच्या जोरावर दुसऱ्यांच्या राजस अगर तामसिक गुणांना हटवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यांचा मार्ग दडपशाहीनें दाबून टाकणें अशक्य आहे. व त्या मार्गाचा योग्य प्रकारें अवलंब केल्यास अपयश येणेंहि असंभवनीय आहे.

गेल्या वर्षापर्यंत आमच्या राज्यकर्त्यांसंबंधानें महात्माजींची भावना विश्वासपूर्णच होती. म्हणून त्यांनीं बोअर युद्धाच्या प्रसंगीं व परवांच्या महायुद्धाच्या वेळीं सरकारशीं सहकारिताच केली. बोअर युद्धांत स्वतःच्या नेतृत्वाखालीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचें एक अँब्युलन्स पथक उभारून कित्येक वेळां स्वतःचा जीव देखील धोक्यांत घालून ब्रिटिश सरकारला त्यांनीं सहाय केलें. गेल्या महायुद्धाच्या प्रसंगीं. राष्ट्रांतील बहुतेक कर्तबगार पुढाऱ्यांनीं विरुद्ध होऊन लष्करभरतीच्या कामीं मनोभावानें सरकारला मदत केली. त्यावेळीं सरकारशीं त्यांचा कांहीं बाबतींत विरोध होताच. चंपारण प्रकरण, खेडा जिल्ह्यांतील दुष्काळ इत्यादी कामांत त्यांनीं सरकारच्या धोरणावर टीका करून कृतीनेंहि विरोध केलाच होता. तथापि महायुद्धात आलेल्या अनुभवानंतर सरकारच्या मनःस्थितीवर

इष्ट तो परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं, ही त्यांना आशा असल्याकारणानें त्यांनीं कोणत्याहि बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष न देतां सरकारशीं सहकारिता केली. महायुद्ध संपल्यानंतर रौलट कायद्यासंबंधाच्या चळवळींत त्यांनीं पुढाकार घेतला व सरकार कोणत्याहि अन्य उपायांनीं हार जात नाहीं असें त्यांना वाटल्यानंतर त्यांनीं आपलें निर्वाणीचें अस्त्र हातीं घेतलें, व सत्याग्रहाची मोहीम चालविली. हिंदी जनतेच्या स्वभावाचें त्यांचें आकलन चुकल्यामुळें कांहीं सरकारी अधिकाऱ्यांच्या चिथावणीनें व अविचारानें त्या चळवळीला भलतेंच स्वरूप प्राप्त झालें. म्हणून महात्माजींनीं त्या वेळीं ही चळवळ आवरून धरली. तथापि त्यांचा उद्योग कमी झाला नाहीं. हिंदी जनतेच्या अंतःस्थितीचें व सरकारच्या धोरणाचें त्यांनीं सूक्ष्म परिशीलन चालवलें व प्रसंग पडल्यास तीच चळवळ निराळ्या स्वरूपानें चालवण्याचा त्यांचा निश्चय झाला. जर्मनीबरोबर तह वगैरे होऊन महायुद्ध जरी संपलें तरी महायुद्धाचें शेंपूट म्हणून खिलाफत प्रकरण उपस्थित झालें. हिंदी मुसलमानांचे मनोविकार क्षुब्ध झाले. महात्माजींचा या प्रकरणाशीं संबंध आला. पंजाबांत ओडवायर व डायर प्रभृतींनीं अमानुष अत्याचार केलाच होता. त्यामुळें हिंदी जनतेच्या भावनेंत फरक पडून सरकारावरील विश्वास उडत चालला होता. महात्माजीदेखील या वावटळींत सांपडले नव्हते, असें म्हणतां येणार नाहीं. विश्वासघात, वचनभंग, दुष्ट अत्याचार, पश्चात्तापाचा अभाव इत्यादि गोष्टी त्यांना स्पष्ट दिसत होत्या. अशा ऐन आणीबाणीच्या प्रसंगीं लोकांमध्यें उत्पन्न झालेला असंतोष शमविण्याकरितां सरकारनीं एक युक्ति काढली. लोकांच्या क्षोभाची मजल असहकारितेपर्यंत जाईल व त्यांत हिंदुस्थानचे सर्व पुढारी सामील होतील अशी अटकळ सरकारला झाली. म्हणून त्यांनीं गेल्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत अमृतसर कांग्रेसच्या पूर्वी २।३ दिवस एक खुद्द बादशाहा सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध करविला व त्याच वेळीं पंजाबांतील अन्यायानें अटक केलेल्या कित्येक पुढाऱ्यांना सोडून

देण्यांत आलें व मागें झालेल्या गोष्टी विसरून हिंदी राष्ट्रानें येथील नोकरशाहीशीं सहकारितेनें पुढें वागावें अशी सरकारतर्फे इच्छा प्रदर्शित करण्यांत आली. हा एक राजकारणांतला डाव आहे असें कित्येक पुढाऱ्यांच्या लक्षांत तेव्हांच आलें. पण आयुष्यांतील निदान पंचवीस वर्षें तरी सरकारशीं मनोभावानें सहकारिता करण्यांत घालवलेल्या महात्माजींना तसें वाटलें नाहीं. पंजाबच्या पुढाऱ्यांना बंधमुक्त केल्याच्यायोगानें पंजाब प्रकरणाबद्दल सरकारची बुद्धि पालटली असावी असा महात्माजींचा तर्क झाला असावा व खुद्द बादशहांच्या शब्दाचा नोकरशाही असा दुरुपयोग करील ही कल्पना त्यांना त्या वेळीं नसावी. खिलाफत व पंजाब प्रकरणाचा अखेर निकाल न्यायाच्या व नीतीच्या तत्त्वांना अनुसरूनच लागेल अशी त्यांची त्या वेळीं भावना झाली. म्हणूनच त्यांनीं अमृतसरच्या काग्रेसमध्यें सरकारशीं सहकारिता करणेंच श्रेयस्कर आहे, असा आग्रह धरला, व सरकारबरोबर सहकारिता करणें अगर न करणें अथवा विरोध करणें हें सर्वस्वीं सरकारच्या वर्तनावर अवलंबून आहे, या मताचा कसून प्रतिकार केला. येवढ्यावरून सरकाऱ्यासंबधानें महात्माजींची भावना किती शुद्ध व विश्वासपूर्ण होती हें स्पष्ट दिसतें, व हल्लीं त्यांनीं जें धोरण स्वीकारलें आहे त्याला त्यांची सरकारसंबंधीं कोणत्याहि प्रकारची द्वेषबुद्धि कारण नसून स्वतः सरकारचें वर्तनच कारण आहे हेंहि स्पष्ट आहे. खिलाफत व पंजाब प्रकरणांचा निकाल न्यायाच्या व नीतीच्या तत्त्वाविरुद्ध लावण्यांत आला. मुख्य प्रधानांनीं तुर्कस्थानच्या बाबतींत दिलेलीं वचनें मोडण्यांत आलीं, व पंजाबातील अत्याचाराबद्दल पश्चात्तापबुद्धि न दाखवितां घडलेल्या अत्याचारांचें स्वरूप सौम्य करून अपराध्यांना योग्य शासन देखील दिलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, झालेल्या निकालावरून हिंदुस्थानांत पुनः अशा प्रकारचे अत्याचार होणार नाहींत अशी खात्री कोणासहि देतां येणार नाहीं. उलट हिंदी लोकांचें जीवित व त्यांची अब्रू आणि मालमत्ता सुरक्षित राहतील किंवा नाहीं याचाच नियम नाहीं, अशी स्थिति प्राप्त

झाली. पंजाब प्रकरणासंबंधानें त्यांनीं स्वतः कांहीं महिने पंजाबांत राहून पुष्कळ व विश्वासार्ह अशी माहिती व पुरावा मिळवला असल्या-कारणानें, सरकाराकडून झालेला निकाल कसा न्यायाला सोडून आहे याची त्यांना पूर्ण खात्री पटली. खिलाफतीच्या बाबतींत हिंदी मुसल-मानांची तक्रार न्याय्य आहे अशी त्यांची खात्री झाली. या सर्व गोष्टींचा त्यांच्या मनावर इतका तीव्र परिणाम झाला कीं, त्यांच्या-मध्यें सरकारसंबंधीं बहुत कालपर्यंत वसत असलेला विश्वास ढास-ळला. व इतःपर अशा सरकारशीं सहकारिता करणें म्हणजे अधर्मा-चरण होय, अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगूं लागली. तथापि कोणतीहि गोष्ट कोणाविरुद्ध करणें झाल्यास त्याबद्दलची पूर्व सूचना प्रतिपक्षास देण्याची महात्माजींची पद्धत आहे, असें दिसतें. त्याप्रमाणें या प्रकरणांच्या बाबतींत सरकारकडून योग्य निकाल न लागल्यास आपण असहयोग पुकारणार असा महात्माजींनीं निर्वाणीचा संदेश व्हाइसराय साहेबांस दिला. त्यांनीं लोकांना अहिंसेचें व शिस्तीचें शिक्षण देण्याचा सपाटा चालविला होता; व योग्य वेळ येतांच त्यांनीं असहयो-गाचें शिंग फुंकलें. कोणतीहि गोष्ट अधर्ममूलक अथवा पापमूलक आहे अशी खात्री झाल्यानंतर, तीच गोष्ट पुनःपुनः करीत राहणें हें महात्माजींसारख्या धर्मनिष्ठ व तेजस्वी पुरुषाला अशक्य आहे. तो आपलाच वर्तनक्रम बदलून स्वस्थ बसत नाहीं, तर आपल्या डोळ्या-देखत दुसऱ्याकडून घडत असलेल्या अधर्माला आळा घालणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें तो समजतो, व त्याचे उद्योग त्या दिशेनें सुरू होतात. या उद्योगांत असतांना आपल्या मार्गाचा इतर लोक अवलंब करतील तर किती लोक करतील, इष्ट परिणाम घडवून आणण्याइतपत लोकांची सहानुभूति मिळेल किंवा नाहीं, आपल्या मार्गानें येणाऱ्यांस ऐहिक आपत्ति व त्रास किती प्रमाणांत सोसावा लागेल इत्यादि अवांतर गोष्टी कमी महत्त्वाच्या असल्यानें त्या त्याच्या विचारांत फारशा येत नाहींत. अधर्मापासून लोकांना परावृत्त करून त्यांना धर्मपर बनवणें, या एकाच ध्येयानें तो उद्युक्त होतो. व त्याचें

स्वतःचें आचरण या ध्येयाला धरूनच असतें हें सांगावयास नकोच. अर्थात् अशा धार्मिक व पवित्र योगांत अहिंसा, सत्य, संयमन, स्वार्थत्याग इत्यादि गुणांचा अवश्य अंतर्भाव होतोच; तथापि ही गोष्ट स्पष्टपणें जनतेच्या दृष्टींत यावी म्हणून "अहिंसायुक्त" (Non-violent) या विशेषणाची जोड मुद्दाम देण्यांत आली आहे.

या योगाचें अवलंबन केलें असतां सरकारावर चांगला परिणाम होऊन सरकारच्या वर्तनांत बदल तरी पडेल अथवा आमची आत्मिक शक्ति वाढून आपली सर्व प्रकारें शुद्धता होईल व इष्टसिद्ध्यर्थ आवश्यक लागणारें सामर्थ्य आपल्या अंगीं पूर्णपणें बाणेल अशी महात्माजींची श्रद्धा आहे. या योगामुळें सरकारावर इष्ट परिणाम होईल ही गोष्ट खरी जरी असली तरी या योगाचें अवलंबन करण्यांत हाच मुख्य हेतु आहे असें नाहीं. सरकारच्या जबरदस्तीचें मुख्य कारण सरकारचें सामर्थ्य हें नसून, आमची दुर्बलता हें आहे. केवळ मनगटाच्या जोरावर कोणाचेंहि सामर्थ्य फार दिवस टिकून राहत नाहीं. दुसऱ्याच्या नैतिक दुर्बलतेवर मनगटाच्या जोराचा प्रभाव चालूं शकतो; पण दुसरा नैतिक दृष्ट्या श्रेष्ठ झाला कीं त्याच्यापुढें मनगटाचा जोर नमतो. म्हणून आमची दुर्बलता घालवावी कशी हा मुख्य प्रश्न आहे. आजपर्यंत राजकारणांत रूढ असलेल्या मार्गानें ही दुर्बलता लवकर जाईल, असें दिसत नाहींत. आज जी आमची थोडी-बहुत प्रगति झालेली दिसत आहे याला कारण सरकारनें येथें जी अस्वाभाविक परिस्थिति निर्माण केली आहे हीच आहे. अशा प्रकारची कोंडमारा जनावरांना देखील दुःसह झाला असता. त्यांत आमच्या प्रयत्नांची थोडीबहुत भर पडली नसेल असें नाहीं; पण तो भाग फार कमी आहे. उलट पुष्कळ वेळां आमच्या प्रयत्नांचा परिणाम सरकार जास्ती जबरदस्त होण्याकडेच झालेला आहे, असें दिसून येईल. असहयोगाच्या आचरणानें आमची अंतःशुद्धि होऊन सामर्थ्य वाढेल, निर्भयता बाणेल, व आत्मयज्ञ करण्याची पात्रता व प्रवृत्ति जास्ती प्रमाणांत येईल. त्यायोगानें आमच्या सामाजिक अड-

चर्गाचा देखील आपोआप परिहार होईल. सरकार जर शहाणें होईल, व सरकार लवकर शुद्धीवर येऊन शहाणें होईल अशी आशा आहे, तर या योगाचा परिणाम योग्य प्रकारें होऊन आमचें व त्यांचें दोघांचेंहि कल्याण होणार आहे. आणि जर हा योगायोग नसेल तर त्रिकालाबाधित सिद्धांतान्वयें असत्य, अन्याय, अनीति इत्यादि अवगुणांचा या झटापटींत नाश झाल्याखेरीज राहणार नाहीं.

या असहयोगाची व्याप्ति फार मोठी आहे. महात्माजींनीं त्याच्या पायऱ्या व त्या चढून जाण्याचा क्रम फार विचारपूर्वक ठरवला आहे. राष्ट्रीय सभेला या पायऱ्या व क्रम मान्य झाला असून, त्याप्रमाणे आचरण होण्याला प्रारंभ झाला आहे. अनभिज्ञ, अनभ्यस्त, व अश्रद्धावान अशा लोकांना हें कांहीं तरी गौड बंगाल आहे, महात्मा गांधी हा एक वेडापीर आहे व याच्या पायांत राष्ट्राचा नाश होणार असें वाटणें साहजिकच आहे; पण असहयोगाखेरीज इतर सर्व मार्ग कुंठित झाले आहेत याकरितां या मार्गाचा अवलंब करण्याची वेळ आली आहे असें मानणारे, व कांहीं दिवसांपूर्वी या पायऱ्या पर्यायानें पुरस्कार करणारे असे राष्ट्रीय पक्षांतील कांहीं लोक यांच मध्येंहि राष्ट्रीय सभेनें ठरवलेल्या पायऱ्या व काम या बाबतींत वाद सुरू आहे. कोणाला कौन्सिलवर बहिष्कार घालणें मूर्खपणाचें वाटतें तर कोणाला सरकारी कोर्टें ओस पाडणें असंभवनीय दिसतें; कित्येकांना सरकारच्या हुकमतीखालीं असणाऱ्या शिक्षणसंस्थांचा त्याग करणे आत्मघातकीपणाचें वाटतें तर दुसऱ्या कित्येकांना परदेशी माल वर्ज करण्यांत बालिशपणा दिसतो; कित्येकांना या सर्व पायऱ्या आवश्यक वाटतात; पण क्रम पसंत नाहीं. सर्व पायऱ्या चढण्याला एकदम सुरुवात करावी व ज्याला जसा वाव असेल व ज्याची जशी शक्ति असेल त्या मानानें तो मार्ग आक्रमिण्याकरितां कांहीं पायऱ्या आतां चढावयाच्या व कांहीं पायऱ्या मग चढावयाच्या असा भेद करूं नये, असें या पक्षाचें मत आहे. आणि राष्ट्राची आजमित्तीला इतकी तयारी नाहीं म्हणून ही तयारी करण्याकरितां कांहीं दिवस वाट पहावी,

असें हा पक्ष प्रतिपादन करतो. बहुजनसमाज कांग्रेसच्या ठरावाला प्रायः अनुकूल आहे; पण कांग्रेसचा ठराव ज्याला ज्या प्रमाणांत बाधक होतो त्या प्रमाणांत व त्या दिशेनें तो त्यावर वर सांगितल्याप्रमाणें दोषारोप करीत आहे. वस्तुतः इतर कोणत्याहि सिद्धीच्या मार्गाप्रमाणेंच या मार्गांतहि प्रथमारंभीं अडचणी येणारच. तात्पुरत्या सुखाचा त्याग करावा लागणारच. ज्यांना हा मार्ग पटला आहे त्यांना कोणत्याहि गोष्ट आड न येतां ते या मार्गाचें अवलंबनहि करूं लागले आहेत. त्यांच्या पूर्वीच्या व हल्लींच्या वृत्तींत बदल पडून त्यांच्यावर इष्ट परिणाम झाल्याचें स्पष्ट दिसत आहे. सर्व लोकांचा--निदान तत्त्व मान्य असणाऱ्या सर्वांचा—पूर्ण पाठिंबा नसल्यानें अद्यापि जितका परिणाम दिसावा तितका दिसत नाहीं हें खरें आहे. तथापि अशा अर्धवट स्थितींत देखील राष्ट्रांत विलक्षण तेज चमकूं लागलेलें दिसत आहे; सर्वसाधारण अज्ञ म्हणून समजल्या जाणाऱ्या मनुष्यापासून तों सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्यापर्यंत सर्वांच्या मनोवृत्तींत इष्ट बदल झालेला आहे. राष्ट्रांत स्पष्टवक्तेपणा जास्ती आलेला आहे व स्वार्थत्यागाची प्रवृत्ति जास्ती दिसत आहे. सरकारचा दृष्टिकोन अद्यापि किती बदललेला आहे हें स्पष्ट आतांच सांगतां येणार नाहीं. तरी लोकांचा " दृष्टिकोन " साफ बदलल्याचीं चिन्हें दिसत आहेत. अटकळीप्रमाणे दडपशाही अद्यापि जोरांत येत नाहीं, हा देखील या चळवळीचा एक विजय आहे. पूर्वीच्या वहिवाटीला अनुसरून आमच्यामध्यें दुही पाडून या चळवळीचा नायनाट करण्याचा जुनाच प्रयत्न सुरू आहे; व यांत यश न आलें तर दडपशाही जोरांत येणार नाहीं असें नाहीं. पण त्या सपाट्यांतून देखील ही चळवळ जिवंत राहील, एवढेंच नव्हे तर, जास्ती प्रभावशाली होऊन विजयी झाल्याशिवाय राहणार नाहीं, अशी या मार्गांत असणाऱ्यांची मनोदेवता त्यांना साक्ष देत आहे. आजपर्यंतचे मार्ग दडपशाहीच्या धक्क्यानें पूर्ण नाहींसे न झाले तरी दडपशाहीचा अंमल असेपर्यंत हतवीर्य होत असत; पण या चळवळीचें तसें होणें शक्य नाहीं. भाषणें बंद होतील, सभा-

कमी भरतील, वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी होईल, व कित्येकांना बंदिवास भोगावे लागतील. हे सर्व अनुभव जुनेच आहेत. पण या नवीन चळवळीचें बळ मात्र या दडपशाहीनें जास्त वाढेल. राजकारण हा एक मनुष्यामनुष्यामधला व्यवहार आहे, आणि इतर व्यवहारांत कानांत तुळशीपत्र घालून वागलें असतां व्यवहार बुडतो, याकरितां राजकारणांतसुद्धां सत्य, अहिंसा, इत्यादि केवळ सात्विक तत्त्वांचा अवलंब करून चालावयाचें नाहीं, असाहि आक्षेप कित्येकांचा असहयोगावर आहे. आणि ते आपल्या आक्षेपाच्या सिद्ध्यर्थ पुराण, इतिहास इत्यादिकांतून दाखले देत असतात. असत्याला असत्यानेंच हटवणें शक्य आहे, इतर सर्व मार्ग असत्यापुढें कुंठित होतात, याकरितां असत्याचरणच केलें पाहिजे, असा या आक्षेपाचा अर्थ असेल असें वाटत नाहीं. अशा अर्थानें वरील तत्त्व प्रतिपादन करणें म्हणजे जगांत सत्याची किंमत कांहीं नाहीं असेंच म्हटल्याप्रमाणें होणार आहे. अशा अर्थाचा व्यापक सिद्धांत जगाच्या स्थैर्याला बाधक होईल. फार झालें तर इतकें म्हणतां येईल कीं, कधीं कधीं सत्यप्रतिज्ञ मनुष्याला आपल्या व्रताचा त्याग करून असत्याचें निर्मूलन करण्याकरितांच व तेवढ्यापुरतेंच असत्याचा अवलंब करण्याचे प्रसंग कधीं कधीं येतात व तसें केल्यापासून त्याच्या सत्यधर्माला बाध येत नाहीं; पण हें म्हणणें तात्विक दृष्ट्या खरें आहे असें मानलें, तरी तें सर्वसाधारण लोकांना सर्वदा आचरणीय आहे असें म्हणतां येणार नाहीं. हा मार्ग अपवादात्मक असूं शकेल, आपद्धर्म म्हणून कित्येकांनीं आचरला असेल. पण त्याबद्दल त्यांना प्रायश्चित्त घ्यावें लागलें, असेहि दाखले देतां येतील; तथापि हाच सिद्धांतमार्ग आहे व सर्वांनीं सररास याचा अवलंब करण्यास कोणताहि प्रत्यवाय नाहीं असें प्रतिपादन करणें अविचाराचें व अधर्मकारक होईल. खऱ्या सामर्थ्याचा पाया असत्यावर केव्हांहि असूं शकणार नाहीं; व खरें सामर्थ्य असल्याखेरीज व्यक्तीचा किंवा राष्ट्राचा उद्धार होणें शक्य नाहीं. राष्ट्राच्या उद्धाराकरितां राष्ट्रांतील लोकांनीं आपल्या स्वार्थावर पाणी

सोडलें पाहिजे, हें तत्त्व तरी सर्वांना मान्यच आहे; पण स्वार्थत्यागाला सुद्धां पात्रता आणावी लागते. ही पात्रता शुद्ध चारित्र्याखेरीज येणें शक्य नाहीं. ही गोष्ट विसरतां कामा नये.

शिवाय. आम्हाला ज्यांच्याबरोबर राजकारणाचा व्यवहार करावयाचा आहे, ते इतके वस्ताद कपटपटू ( Intrignisus ) आहेत कीं, त्यांच्याच मार्गाचें अवलंबन करून त्यांना या खेळांत हरवूं अशी आशा धरणें व्यर्थ आहे. या कलेंत त्यांचा व्यासंग फार मोठा व फार दिवसांचा असल्यामुळें, ते त्यांत अगदीं निष्णात झाले आहेत. आज जगांतील मी मी म्हणाऱ्या सर्व राष्ट्रांनीं त्यांच्यापुढें हात टेंकले आहेत. या विद्येंत आम्हांला त्यांची बरोबरी करणें देखील अत्यंत कठीण आहे, मग वरचष्मा करण्याची गोष्ट तर दूरच. प्रयत्नांनीं ही गोष्ट शक्य आहे असें मानलें, तरी या प्रयत्नांत आमच्या सत्यनिष्ठ राष्ट्राला आपल्या किती तरी चांगल्या गुणांचा त्याग करावा लागेल, याची कल्पना देखील भयंकर आहे. याचा परिणाम आपल्याला हानिकारक होईल; इतकेंच नव्हे तर, सर्व जगाच्या भावी कल्याणाची हानि करण्याचें पातक आमच्या माथीं येईल. म्हणून असत्याला असत्यानेंच जिंकणें शक्य आहे या म्हणण्यांत कितीहि ग्राह्यांश असला, तरी आमच्या परिस्थितीला लागूं पडत नाहीं म्हणूनच तें त्याज्य आहे.

आज आमच्यावर होत असलेल्या जबरदस्तीचें समर्थन नैतिक दृष्ट्या करणें शक्य नाहीं. केवळ दंडुकेशाहीच्या जोरावर Brute force ती जबरदस्ती चालली आहे. याच जातीच्या जोरावर आम्हांला प्रतिकार करतां आला असता; पण ती शक्ति आमच्यांत येणे तूर्त तरी शक्य दिसत नाहीं. याचा बंदोबस्त यापूर्वीच आमच्या राज्यकर्त्यांनीं धूर्तपणानें करून ठेवला आहे. हा मार्ग शक्य नसल्यानें त्याच्या इष्टानिष्टतेच्या ऊहापोहांत पडणें व्यर्थ आहे.

जगांतील इतर राष्ट्रें आमच्या मदतीला धांवून येतील अशी आशा करणें मूर्खपणाचें आहे. ज्यांच्यामध्यें आम्हांला मदत करण्याचें

सामर्थ्य आहे असें सर्व राष्ट्र एकाच माळेंतील मण्याप्रमाणें आहेत. शिवाय स्वावलंबनाच्या सामर्थ्यानें कांहीं कर्तबगारी करून दाखवल्या-खेरीज आमच्याकडे कोणीसुद्धां पहाणार नाहीं. Experts in diplomacy असल्या अडचणीच्या परिस्थितींत असहयोगाखेरीज इतर मार्ग पंगु आहेत. व हाच मार्ग आपल्या स्वभावाला, शीलाला व पूर्वपरंपरेला धरून आहे. असहयोग पत्करून हिंदी राष्ट्रानें आपल्या आत्म्याची प्राप्ति करून घेतली असें लाला लजपतराय यांनीं कलकत्यास राष्ट्रीय-सभेचे अध्यक्ष या नात्यानें उद्गार काढले त्यांत पूर्ण सत्य आहे.

असहयोगाखेरीज इतर सर्व मार्ग आपल्याला खुले नाहींत व निरुपयोगी आहेत हें मान्य करून या मार्गाची पूर्वतयारी अद्यापि झालेली नसल्यानें, आतांचे प्रयत्न अर्धवट होणार व त्यामुळें जी प्रतिक्रिया घडेल तिचा परिणाम आपल्यावर फार भयंकर होईल अशी कित्येकांना भीति वाटत आहे. संपूर्ण व सांगोपांग असहयोगाला प्रारंभ करण्याची वेळ आली नाहीं ही गोष्ट महात्मा गांधींनाहि मान्य आहे. पूर्वतयारी चांगली व्हावी म्हणूनच शेवटच्या कांहीं पायऱ्या तूर्त सोडून द्याव्या लागत आहेत. पूर्ण असहयोगाला आवश्यक लागणारे गुण व शिस्त राष्ट्रांत येतांच, जर तोंपर्यंत आपला कार्यभाग झाला नाहीं तर, सर्व पायऱ्या आक्रमण्याचा संकल्प आहे. हा योग अहिंसा-युक्त आहे, या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष केल्यानें अशा प्रकारच्या शंकांना अवसर मिळतो.

जर या कार्यक्रमाला राष्ट्राचा पूर्ण पाठिंबा मिळून तो राष्ट्राच्या आचरणांत योग्य प्रकारें आला, तर एका वर्षाच्या अवधींत आपल्याला स्वराज्याची सिद्धि होईल अशी महात्मा गांधींची प्रतिज्ञा आहे. कित्येक अश्रद्धावान शहाण्यांनीं या प्रतिज्ञेची थट्टा करण्याचें आरंभिलें आहे; पण यांत थट्टा करण्यासारखें कांहीं नाहीं, असें विचारांतीं दिसून येईल. एक वर्ष हि मर्यादा अति अल्प आहे असें गृहीत धरून जास्ती कालपर्यंत प्रयत्न करावा लागला तरी तसें करण्यांत अकल्याण कोठें आहे हें समजणें समजणें फार कठिण आहे. असहयोग-

त्तासारखें त्रेत स्वराज्यप्राप्तीनंतर देखील आपल्याला पाळावें लागेल या गोष्टीचें विस्मरण होतें. राष्ट्रांतील जनतेंत आत्मविश्वास वाढणें. स्वावलंबनावर भिस्त ठेवून प्रयत्नाची शिकस्त करणें, आत्मबलाची वृद्धी होणें, राष्ट्र जास्तां पवित्र होणें, अन्यायाविषयीं सात्त्विक चीड येऊन धैर्यानें त्याचा प्रतिकार करण्याची सवय जडणें, आपल्या लोकांबद्दल जास्ती प्रेम वाढून त्यांच्याशीं सहकार्य करण्याची प्रवृत्ति जोरावणें, इत्यादि गोष्टींतच या मार्गांतील प्रयत्नाचें पर्यवसान होणार आहे. हा परिणाम राष्ट्राच्या हिताच्या दृष्टीनें हानिकारक आहे असें कोणीहि देशहितेच्छु म्हणणार नाहीं. एका वर्षाच्या अवधींत आपलें साध्य प्राप्त झालें नाहीं तर त्याचा दोष त्या उपायांत नसून त्या उपायाचा अंमल कृतींत उतरण्याच्या प्रयत्नांत आहे. अंमल योग्य प्रकारें न झाल्यास कित्येकांना दीर्घ व अनियमित कालपर्यंत स्वार्थत्याग करावा लागेल व संकटपरंपरेला तोंड द्यावें लागेल या गोष्टी खऱ्या आहेत. पण अशा स्थितींतून गेल्याखेरीज आपलें साध्य प्राप्त होणें शक्य असलें तरी तें टिकाऊ नसल्यानें इष्ट नाहीं.

असहयोगावर केल्या जाणाऱ्या सर्व आक्षेपांचें निरसन करण्याचें हें स्थळ नव्हे. महात्माजींनीं आपल्या प्रतिभासंपन्न भाषणांत व लेखांत या योगाची सिद्धी स्थापन करून सर्व आक्षेपांचें समाधान केलेंच आहे. या बाबतींत विशेष लिहावें असें नाहीं.

महाराष्ट्र हा राजकारणांत नावाजलेला व मुरलेला आहे. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांच्या पुण्याईनें व लो. टिळकांसारख्या निःसीम राष्ट्रकार्यधुरंधरांच्या कर्तबगारीनें महाराष्ट्र पुनीत झाला आहे. राजकारण हें महाराष्ट्रीयांचें बाळकडू आहे. अशा महाराष्ट्राला राजकारणांतील या मार्गाचा विचार नव्यानें सांगितला पाहिजे असांतील प्रकार नाहीं. तथापि, आजमित्तीला तरी या योगाचें आचार्यत्व गुजरातच्या महर्षीकडे गेलें आहे. महात्मा गांधी हे या मंत्राचे द्रष्टे नसले तरी आज तेच मुख्य प्रणेते आहेत ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. या आचार्यांनीं या योगाचें रहस्य, या महामंत्राचें बीज रुपाचा

प्रकार, त्यांचें महत्त्व व सामर्थ्य वगैरे महत्त्वाच्या बाबींचा विचार इंग्रजी, गुजराथी व हिंदी भाषणांच्या व लेखांच्या द्वारें केला आहे. याचा अनुवाद महाराष्ट्राकरितां मराठींतून होणें जरूर होतें. ही उणीव रा. शंकरराव देव यांनीं भरून काढली, याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे. रा. देव यांनीं चंपारण्यामध्यें कांहीं दिवस राहून महात्माजींच्या कामाच्या पद्धतीचा अनुभव मिळविला आहे. असहयोगाचें तत्त्व त्यांच्यामध्यें चांगल्या प्रकारें बाणलें आहे हें त्यांनीं महाराष्ट्रांत गेल्या दोन तीन महिन्यांत केलेल्या कामगिरीवरून स्पष्ट दिसत आहे. अशा गृहस्थांच्या मार्फत महात्मा गांधींच्या विचारांचा परिचय महाराष्ट्रीयांना होत आहे हें युक्तच आहे. अशा ग्रंथाला असहयोगाचें तत्त्व माझ्यापेक्षां जास्ती बाणलेल्या गृहस्थानें प्रस्तावना लिहिणें योग्य होतें. पण रा. देवयांनीं केलेली सूचना अमान्य करवेना. म्हणून मला जे दोन शब्द लिहावे असें वाटलें ते मीं लिहिले आहेत. वास्तविक पहातां, अशा ग्रंथाला प्रस्तावनेचचि जरूरी नाहीं. महात्माजींचा प्रत्येक विचार व तो ज्या वाक्यांत व शब्दांत ग्रथित झाला असे प्रत्येक वाक्य व प्रत्येक शब्द अर्थपूर्ण आहे. या पुस्तकाच्या द्वारें अशा विचारांचा परिचय महाराष्ट्रास नवीन दिशेनें होऊन महाराष्ट्राचें राजकारण जास्ती शुद्ध व पवित्र होईल व या उदयोन्मुख राष्ट्राच्या पारतंत्र्यशृंखला लवकर तोडण्यांत महाराष्ट्राच पुनः अग्रेसरत्व पटकावील अशी आशा करून ही प्रस्तावना आटोपतों.

# असहकारयोग !

# महात्मा गांधींचे लेख !

## अमृतसर तीर्थ

अमृतसरची काँग्रेस आमच्यांपैकीं पुष्कळांना पवित्र तीर्थाप्रमाणें वाटली. त्या राष्ट्रीय आठवड्यांत हजारों सभासदांनीं व प्रेक्षकांनीं यात्रेकरूंच्या भावनेनें जालियांवाला बागेचें दर्शन घेतलें; कांहींजणांनीं देशभक्तांच्या रक्तानें पवित्र झालेली मृत्तिका मस्तकावर धारण केली, तर कांहींनीं चिमूट चिमूट आपल्या देवघरांत पवित्र वस्तु म्हणून ठेवण्याकरितां आपल्याबरोबर नेली. कांहींनीं विभूति म्हणून ती आपल्या कपालाला लावली. प्रत्येकजण त्या बागेचें दर्शन घेणें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें समजत असे. आपण यंदा काँग्रेसला न जाऊं तर जे शेंकडों निर्दोषी लोक जालियांवाला बागेंत बळी पडले त्यांच्या ऋणांतून आपण मुक्त होणार नाहीं ह्या भावनेनेंच पुष्कळ लोक यंदा काँग्रेसला गेले.

—जानेवारी ७, १९२०

ग्रं. नं. १८-३१

# सहकारिता

हिंदुस्तान या घटकेला स्वराज्याला पात्र आहे त्याबद्दल मला शंका नाहीं; परंतु त्याकरितां श्रम केल्याशिवाय तें मिळणार नाहीं अशी माझी खात्री आहे. विरोधाचें धोरण ठेवून अगर सहकारिता करून दोन्ही दिशांनीं आपणांला प्रयत्न करतां येईल. जोमदार विरोध हा आपल्या जिवंतपणाची साक्ष आहे. असत्य, अन्याय व पाप ह्याला आपण सदैव विरोध केला पाहिजे. सुधारणा गर्ह्य अगर अन्यायी आहेत, असें मला वाटत नव्हतें व आजहि वाटत नाहीं. त्या आपल्याला जबाबदार राज्यपद्धतीच्या मार्गानें एक पाऊल पुढें नेतात असें मला वाटतें; म्हणून त्या कितीहि असमाधानकारक व अपुऱ्या असल्या, तरी त्या निराशाजनक आहेत असें म्हणण्याचें मी नाकारतों. ह्याचें कारण मी त्यांची आशाच केली नव्हती, हे पाल बावूचें म्हणणें मला कबूल आहे. सुधारणेचा कायदा ज्या वेळेस पास झाला त्या वेळेस, तो तसा पास होईल किंवा नाहीं ह्याबद्दल मला जबरदस्त शंका होती व जी योजना प्रथम प्रसिद्ध झाली त्यांत विशेष कांहीं फरक होतील अशी मला आशाहि नव्हती. ज्या वेळेस सहकारिता करण्यानें देशाचें हित साधेल त्या वेळेस आम्ही सहकारिता करूं व विरोधानेंच देशहित साधेल तेव्हां आम्ही विरोध करण्याला मागें पहाणार नाहीं, असें प्रतिपक्षानें कबूल केलें आहे. माझ्या सूचनेचा ह्राच अर्थ होता, त्याचा निराळा अर्थ असणेंच शक्य नव्हतें. विरुद्ध बाजूनें जोंपर्यंत शक्य होतें तोंपर्यंत सूचनेला विरोध केला. कारण बदलेल्या परिस्थितीतहि त्यांचा नोकरशाहीवर विश्वास नव्हता, हें त्यांनीं स्पष्ट कबूल केलें. असा हट्ट धरणें बरोबर नाहीं असें माझ्या अल्पमतीला वाटतें. बादशाही जाहीरनाम्याची भाषा अत्यंत उदारपणाची आहे, त्यांत सद्धेतु पूर्ण भरलेला आहे. बादशहांनीं सहकारिता करण्याकरितां जी विनंति केली तिला कॉंग्रेसनें मान न देणें अयोग्य झालें असतें. मनुष्यस्वभावावर माझा अनिर्वाय विश्वास असून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतहि इंग्लिश लोकांनीं समंजसपणा व विचारीपणा दाखवलेला मला माहीत आहे. जरी आपण अन्याय करीत असलों तरी जगामें आपणांला न्यायी म्हणावें अशी त्यांची सदैव इच्छा असल्यामुळें, इतर लोकांपेक्षां ह्यांना योग्य ती गोष्ट लोकलज्जेस्तव करावयाला लावणें जास्त सोपें असतें. जाहीरनाम्याच्या द्वारें पुढें केलेला मित्रत्वाचा हात आपण झिडकारणें आपल्या संस्कृतीस न शोभणारें व मूर्खपणाचें होईल. आपण बलवान् असलों तर

आपण होऊन सहकारिता करण्यांत आपलें कांहींच नुकसान नाहीं. लोककार्याकरितां जर आपण सहकारिता करण्यास प्रथम तयार होऊं, तर आपण नोकरशाहीला मानच खालीं घालावयास भाग पाडूं.

—जानेवारी ७, १९२०

# खिलाफत

आज अत्यंत महत्वाचा प्रश्न म्हटला म्हणजे खिलाफत किंवा तुर्की तहाच्या अटी हा होय. इतक्या उशिरां व विशेषतः निरनिराळ्या प्रांताधिकाऱ्यांच्या स्वागताच्या तयारीच्या गडबडींत असतांना, व्हाईसराय साहेबांनीं संयुक्त शिष्टमंडळाची मुलाखत घेतली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. शिष्टमंडळाचें स्वागत करतांना व त्याला उत्तर देतांना व्हाईसराय साहेबांनीं जें सौजन्य दाखविलें त्याबद्दलहि त्यांचे आभार मानले पाहिजेत. सौजन्य दाखविणें केव्हांहि चांगलें; परंतु अशा आणीबाणाच्या प्रसंगीं कोरडें सौजन्य व्यर्थ आहे. बोलेल तें करील काय व गर्जेल तें पडेल काय, ही म्हण ह्या ठिकाणीं अत्यंत लागू पडते. या सौजन्याच्या मागें तुर्कस्तानाला शिक्षा करण्याचा निश्चय स्पष्ट दिसतो. तुर्कस्तानला शिक्षा करणें, ही गोष्ट मुसलमान लोक एक पळभरहि सहन करणार नाहींत. युद्धांतील विजयाचें श्रेय इतर शिपायांइतकेंच मुसलमान सैनिकांनाहि आहे. मुसलमान शिपायांचें समाधान व्हावें म्हणूनच तुर्कस्तानने जेव्हां जर्मनीला जाऊन मिळण्याचें ठरविलें त्या वेळेला मि. ॲस्क्विथ यांनीं, ब्रिटिश सरकारला तुर्कस्तानपासून कांहींहि मिळवावयाचे नाहीं व तुर्कीकमिटांच्या अपराधाबद्दल सुलतानला शिक्षा करण्याचें ब्रिटिश सरकारच्या मनांत कदापिहि येणार नाहीं, असें जाहीर केलें. ही कसोटी जर व्हॉईसरॉय साहेबांच्या उत्तराला लावली तर तें समाधानकारक नाहीं: एवढेंच नव्हे तर सत्याला व न्यायाला सोडून आहे, असें ठरेल.

ब्रिटिश साम्राज्य तरी आहे काय ? तें जितकें ख्रिश्चन आहे तितकेंच मुसलमानी व हिंदु आहे. धार्मिक तटस्थवृत्ति हा त्याचा मुख्य सद्गुण नाहीं, व जर यदाकदाचित् असला तर तो स्वार्थी सद्गुण आहे. असलें बलाढ्य साम्राज्य दुसऱ्या कोणत्याहि अटीवर टिकविणें शक्य नाहीं. इतरांप्रमाणें मुसलमानांच्या हितालाहि दक्ष राहणें ब्रिटिश प्रधानमंडळाचें

कर्तव्य आहे. मुसलमान म्हणतात त्याप्रमाणें त्यांनी कार्य आपलेंच समजलें पाहिजे. व्हॉइसरॉय साहेबांनीं मुसलमानांचें म्हणणें परिषदेपुढें ठेवलें: पण येवढ्यानें काय होणार? जर खिलाफत प्रश्न नीट सोडवला जाणार नाहीं तर इंग्लंदनें आपलें कर्तव्य बजवलें नाहीं असें समजण्याला मुसलमान लोकांना अधिकार आहे. आणि व्हॉइसरॉय साहेबांचें उत्तर हीच समजूत दृढ करितें. जर्मनीला जाऊन मिळण्याबद्दल तुर्कस्थानला प्रायःश्चित्त मिळालेंच पाहिजे, असें जेव्हां व्हॉइसरॉय सांगतात तेव्हां ते ब्रिटिश मंत्र्यांचीच री ओढतात. तेव्हां बादशाहाचे मंत्री ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्या सुधारून व मुसलमान लोकांचें समाधान होईल अशा रीतीनें ह्या प्रश्नाचा निकाल लावतील अशी मुसलमानांप्रमाणें आम्हांलाहि आशा आहे.

जानेवारी २८, १९२०

---

# मुसलमानांची काय मागणी आहे?

तुर्की साम्राज्यांत रहात असलेल्या मुसलमानेतर जातींच्या हितांचें रक्षण करण्याकरितां, जरूर ती खबरदारी घेऊन खिलाफत कायम ठेवणें व जर अरबांची इच्छा असेल तरच त्यांना स्वराज्य देण्याची योग्य ती व्यवस्था केल्यावर, खलिफाचा अरबस्थानावर व मुसलमानी पवित्र स्थळांवर ताबा ठेवणें ही होय. ह्यापेक्षां मुसलमानांची मागणी जास्त सरळ रीतीनें मांडणें शक्य नाहीं. ही मागणी न्यायाला धरून असून तिला ब्रिटिश प्रधानांच्या वचनांचा व हिंदु-मुसलमानांच्या एकमताचा पाठिंबा आहे. अशातऱ्हेची मागणी मान्य न करणें केवळ खुळेपणाचें होय.

२८ जानेवारी १९२०

---

# जालियांवाला बाग

जालियांवाला बाग राष्ट्राच्या मालकीची झाली आहे. राष्ट्राच्या वतीनें हा बाग खरेदी करण्यांत विशेष काय? ह्याचा खुलासा करणें जरूर

आहे. कारण, कांहीं चांगल्या चांगल्या लोकांचींहि मनें त्याबद्दल थोडीं साशंक आहेत. कानपूरची विहीर डोळ्यापुढें असतां, असा विरोध झाला ही गोष्ट आश्चर्यकारक नाहीं. जर ही बाग आपल्याला विकत घेतां आली नसती, तर त्यांत राष्ट्राच्या अब्रूला कलंक लागला असता, असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं; त्याबद्दल मी ह्या गोष्टीच्या विरुद्ध असलेल्या लोकांची मनापासून माफी मागतों. नैतिक अगर कायदेशीर असा कोणताहि अपराध न करतां, ज्या ५०० लोकांचें प्राण तेथें खर्ची पडले त्यांना आपण विसरणें योग्य होईल काय? जर जाणूनबुजून व स्वखुषीनें त्यांनीं आपले प्राण दिले असते, आपण निष्पाप आहोंत हें जाणून आपल्या जागेवरून एक केंसभरही न हालतां जर त्यांनीं बंदुकीच्या गोळ्यांना आपल्या हृदयांत आश्रय दिला असता तर इतिहासांत,साधु, वीरपुरुष व देशभक्त म्हणून 'यावच्चन्द्रदिवाकरौ त्यांचें नांव उज्ज्वल' होऊन राहिलें असतें; परंतु तसें नसलें तरी तो भयंकर प्रसंग राष्ट्राच्या इतिहासांतील अत्यंत महत्वाच्या प्रसंगांपैकीं एक होय. प्रयत्नानें व कष्टानेंच परतंत्र राष्ट्रें स्वतंत्र होतात स्वराज्याच्या युद्धांत स्वतःचा दोष नसतां अगर परकीयांच्या अपराधामुळें जे लोक बळी पडतात किंवा यातना सोसतात, त्यांचें स्मरण जर आपण कायम ठेविलें नाहीं तर आपल्याला राष्ट्र म्हणवून घेण्याचा अधिकारच पोहोंचत नाहीं. निर्दयपणें जेव्हां त्यांची कत्तल होत होती, तेव्हां आपल्या असहाय बंधूंचें रक्षण करणें आपल्याला अशक्य होतें: आपल्याला वाटल्यास या कृत्याचा सूड घेणें नाकारतां येईल. त्यापासून राष्ट्राचें नुकसान होणार नाहीं, जालियांवाला बागेंत आमच्यांपैकीं प्रत्येकाचा जवळचा नातेवाईक पडला आहे. असें जगाला दाखविण्याकरितां त्या ठिकाणीं राष्ट्रीय स्मारक करून जालियांवाला बागेंतील मृतांच्या आमेष्टांना सर्व देश तुमच्या दुःखाचा वांटेकरी आहे हें दाखविण्याचें व त्याचें स्मरण निरंतर टिकविण्याचें नाकारणें आपल्याला उचित आहे काय? तसें करणें योग्य आहे काय? राष्ट्रीयत्वाचा दर्जा जर इतका मोठा नसेल तर मग मला त्यांची किंमत वाटत नाही. स्वातंत्र्याचा मार्ग आक्रमित असतां जालियांवाला बागेसारख्या कत्तलींच्या पुनरावृत्तींना आपण तयार असलें पाहिजे, असें भावी पिढ्यांना सांगणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे, असें मला वाटतें. त्याची पुनरावृत्ति होणार नाहीं अशी आपण व्यवस्था केली पाहिजे. आपण त्या कत्तली आपणावर ओढून घेतां कामा नये: पण त्या आल्या तर त्यांना तोंड देण्याला आपण तयार झालें पाहिजे.

राष्ट्रीय युद्धांत झगडण्यास आपण कचरावें हें मला खपणार नाहीं. अमृतसर कांग्रेसपासून आपणांस जो उत्तम धडा मिळाला तो हा कीं, पंजाबच्या यातनांनीं राष्ट्राला हताश केलें नाहीं. ह्या गोष्टी घडावयाच्याच असें राष्ट्रानें धरून चालावें. आम त्यांपैकीं कांहींजणांनीं अपराध केले व निर्दोषी लोकांना त्याचें प्रायश्चित्त भोगावें लागलें, अशा चुका फिरून होणार नाहींत अशी व्यवस्था आपण केली पाहिजे: परंतु आपण आपली कमाल केली तरीहि सगळे साधू बनणें शक्य नाहीं. निरपराध लोकांच्या यज्ञाला आपण तयार असलें पाहिजे. मात्र त्यांना व त्यांच्या कुटुंबाला आम्ही विसरणार नाहीं, उलट त्यांचें स्मरण ठेवणें आम्ही आपला धर्म समजूं व ज र त त्यांच्या आप्तेष्टांना, आपल्या पोटापाण्याची व्यवस्था राष्ट्रानें केली पाहिजे अशी मागणी करण्याला अधिकार आहे, असें देशाला सांग. स्मारकाचा मूळ अर्थ हा आहे; आणि मुसलमानांचें व हिंदूचें रक्त एकाच ठिकाणीं सांडलें नाहीं काय ? शिखांचें रक्त सनातनीयांच्या व समाजिष्टांच्या रक्तांत मिसळलें नाहीं काय? हें स्मारक हिंदुमुसलमानांची एकी साध्य करण्याकरितां केलेल्या प्रामाणिक व दीर्घ प्रयत्नांची खूण असावी.

दोन जातींतील वितुष्ट व तेढ हें स्मारक वाढविणार नाहीं काय, असा कांहींचा या स्मारकाविरुद्ध आक्षेप आहे. तें ट्रस्टीवर अवलंबून राहील. मला त्यांची जी माहिती आहे, त्यावरून त्यांचा हा उद्देश असणें शक्य नाहीं. स्मारकाच्या कल्पनेंत कोणताहि वाईट हेतु नाहीं. जनरल डायर व त्याचा उमन्तपणा विसरावा अशी लोकांची इच्छा आहे व त्यांत त्यांना उत्तेजन मिळालें पाहिजे. ज. डायरप्रमाणें जर आपण बेजबाबदार असतों व त्यास जशी संधि मिळाली तशी आपणाला मिळाली असती तर त्याच्याचप्रमाणें आपणहि वागलों असतों. चूक होणें मनुष्यस्वभावाला अनुसरून आहे. व आपल्या अपराधाबद्दल आपल्याला शिक्षा न होतां ते लोकांनीं विसरावें अशी जर आपली इच्छा असेल, तर आपण लोकांना क्षमा करणें तितकेंच मनुष्यस्वभावाला धरून आहे. ह्याचा अर्थ आपण ज. डायर बडतर्फ व्हावा अशी इच्छा करितां कामा नये, असा होत नाहीं. वेड्या मनुष्याला तो इतरांस ताप देईल अशा स्थितींत ठेवतां कामा नये; परंतु ज्याप्रमाणें आपण वेड्याचा द्वेष करीत नाहीं त्याप्रमाणें ज० डायरचाहि करूं नये. स्मारकाच्या कल्पनेंतून द्वेषाची भावना मी काढून टाकीन व पवित्र स्मरण ठेवीन, आणि धर्म, वर्ण, अगर जात या कशा–

च्याहि विचार न करितां प्रत्येकानें ही बाग तीर्थाप्रमाणें पवित्र समजावी अशी माझी इच्छा आहे.

—फेब्रुवारी १८,१९२०

# अमृतसर अपिलें

उत्तम कायदेपंडितांच्या सल्ल्याचा कांहींएक उपयोग न होतां अमृतसर अपिलें काढून टाकण्यांत आलीं. प्रिव्हि कौन्सिलानें बेकायदेशीर व्यवहाराला संमति दिली आहे. जरी अर्जदारांच्यातर्फे सर सॅमसन हे आपली बाजू कोर्टापुढें मांडितांना जज्जांनीं केलेल्या टीकेवरून अनुकूल निकाल लागेल असें वाटत होतें, तरी लागलेला निकाल मला अगदींच अनपेक्षित नाहीं ही गोष्ट कबूल केली पाहिजे. निकाल देतांना वरिष्ठ कोर्टांवरसुद्धां देशांतील नाजुक राजकीय प्रश्नांचा परिणाम होतो, असें राजकीय खटल्यांच्या निरीक्षणावरून माझें मत झालें आहे. न्यायदेवतेचे कट्टे उपासकसुद्धां अशा नाजुक प्रसंगीं भ्रष्ट होतात. शांततेच्या काळाकरितां निर्माण झालेल्या मानवी संस्थांच्या सार्वजनिक संकुचितपणाला प्रिव्हि कौन्सिल अपवाद असणें शक्य नाहीं. जर लोकांना अनुकूल असा निकाल मिळाला असता, तर हिंदुस्थान सरकारची अब्रू चव्हाट्यावर येऊन इतकी बेइज्जत झाली असती कीं, कित्येक वर्षे त्याचा परिणाम त्याला भोगावा लागला असता. निकालाची बातमी मिळतांच लाहोरमध्यें लाला लजपतराय यांच्या स्वागताकरितां झालेली सर्व तयारी तेथल्यातेथें थांबून सर्व शहरानें मुतकी पोषाक परिधान केला. ह्यावरून ह्या खटल्याचें राजकीय महत्व सहज लक्षांत येईल. ह्यामुळें सरकारची ज्यास्तीच बेइज्जत झाली आहे. कारण जेव्हां महत्वाचे राजकीय प्रश्न उद्भवतात अगर गोऱ्या जातीच्या हिताचा प्रश्न असतो त्या वेळेस इंग्रजी राज्यांत न्याय नसतो अशी लोकांची समजूत होईल; मग ती बरोबर असो अगर चुकीची असो.

हें भयंकर संकट टाळण्याचा एकच उपाय आहे. मनुष्यप्राण्याचें व त्यांतल्यात्यांत हिंदी मनुष्याचें अंतःकरण दयेनें तात्काल द्रवतें. चळवळीची अगर अर्जाची वाट न पाहतां, पंजाब अगर वरिष्ठ सरकार फांशीच्या शिक्षा तावडतोब रद्द करून शक्य तर अर्जदारांना त्याच वेळेला मोकळे करील अशी मला आशा आहे.

दोन महत्वाच्या कारणांकरितां असें करणें अत्यंत आवश्यक आहे. पहिलें कारण, लोकांचा उडालेला विश्वास पुन्हां संपादन करणें व दुसरें कारण, बादशाही जाहीरनामा शब्दशः खरा ठरविणें. ज्यांच्या मुक्ततेपासून शांतताभंग होण्याची भीति नाहीं, अशा राजकीय कैद्यांना मुक्त करण्याची त्या उदार जाहीरनाम्याची आज्ञा आहे. २१ अर्जदारांना मोकळें केल्यास समाजाला कसलाहि धोका आहे असें नाहीं व त्यांनीं कोणताहि गुन्हा केलेला नव्हता. त्यांच्यापैकीं बहुतेक सन्माननीय नागरिक समजले जात असत. त्यांच्यापैकीं कोणीहि गुप्त कटांत सामील असल्याचें बाहेर आलेलें नाहीं. जर त्यांनीं कांहीं गुन्हे केले असले तर ते विकारवश होऊन व अत्यंत चीड येणाऱ्या परिस्थितींत केले असतील. शिवाय मार्शल लॉ कोर्टांनीं दिलेल्या बहुतेक निकालांना पुराव्याचा आधार नाहीं, अशी लोकांची समजूत झालेली आहे. प्रत्यक्ष गुन्हा करीत असतांना पकडलेल्या लोकांना ज्या सरकारनें सोडून देण्याइतका चांगूलपणा दाखविला, तें सरकार त्या अर्जदारांना मुक्त करून प्रजेचें प्रेम संपादन करण्याला मागें घेणार नाहीं, अशी मला आहे. विजयानंतर दाखविलेलें औदार्य फारच परिणामकारक होतें. हीं अपिलें रद्द करून घेण्यांत सरकारचा विजय झाला आहे असें लोकांना वाटत आहे

धैर्य सोडूं नका अशी पंजाबी मित्रांना माझी सविनय विनंति आहे. वाटेल त्या आपत्तींना तोंड देण्याला आपण आपली तयारी केली पाहिजे. जर झालेल्या शिक्षा योग्य असतील, दोषी ठरलेल्या लोकांनीं जर खून केले असतील अगर खुनाला उत्तेजन दिलें असेल, तर त्यांना शिक्षा व्हावयाला नको काय ? उलट जरी आपल्या ठाम समजुतीप्रमाणें त्यांपैकीं बहुतेकांनीं त्यांच्या माथीं मारलेले गुन्हे केले नसतील तरी स्वतःची उन्नति करूं इच्छिणारांच्या नशिबीं जें असतें तें भोगण्याला त्यांनीं तयार व्हावयाला नको काय ? जर श्रेष्ठ पद मिळवावयाचें तर स्वार्थत्याग करावयाला नको काय ? स्वार्थत्यागाशिवाय कोणतेंहि राष्ट्र वर येऊं शकत नाहीं. स्वार्थत्यागाची व निर्दोषतेची जोड होऊं शकते, मात्र पाप आणि स्वार्थत्याग एके ठिकाणीं राहणें शक्य नाहीं.

—मार्च ३१ १९२०

# प्रश्नाला प्रश्न

खिलाफत प्रश्न आज अत्यंत महत्वाचा प्रश्न झाला आहे. तो सर्व साम्राज्याचा प्रश्न होऊन बसला आहे. इंग्लंडच्या भिक्षूंनी व मुसलमान पुढाऱ्यांनी दोघांनी मिळून हा प्रश्न सर्वांच्या तोंडीं केला आहे. इंग्लिश भिक्षूंनी केलेल्या आव्हानाचा मुसलमान पुढाऱ्यांनीं स्वीकार केला आहे.

सुधारणा वगैरे प्रश्नांना खिलाफतच्या प्रश्नानें अ दीं मागें टाकलें आहे हे हिंदु पुढारी ध्यानांत घेतील, असा मला भरंवसा आहे. धर्मग्रंथांचा आधार बाजूला ठेवून जर मुसलमानांची मागणी अन्यायी असती तर त्याला पाठिंबा देण्याला एकाद्याचें मन कचरलें असतें; परंतु न्यायाच्या मागणीला जेव्हां धर्मग्रंथांचा आधार मिळतो तेव्हां प्रश्नच रहात नाहीं.

मुसलमानांची मागणी थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे:— तुर्की साम्राज्यांतील मुसलमानेतर जातींच्या रक्षणाची पूर्ण तरतूद करून, युरोपांतील सर्व तुर्की मुलूख तुर्क लोकांच्या ताब्यांत रहावा आणि मुसलमानी पवित्र स्थळें सुलतानाच्या ताब्यांत राहून त्याची अरबस्थानावर मुसलमानी पंच ठरवतील त्याप्रमाणे सत्ता रहावी. मात्र अरब लोकांची इच्छा असल्यास त्यांना स्वराज्य देण्यांत यावे. लॉईड जॉर्जनीं आपल्या वचनात हीच गोष्ट कबूल केली आहे व लार्ड हार्डिजचा असेंच करण्याचा विचार होता. तुर्की प्रांत हिसकावून घेण्याकरितां मुसलमान सैनिक लढले नसते. खलिफाची अरबस्थानावरील सत्ता नाहीशी करणें म्हणजे खिलाफतचे तुकडे करण्यासारखेंच आहे. युद्धापूर्वी जें तुर्की साम्राज्य होतें तेंच जरूर ते फेरफार करून तुर्कस्थानला परत देणें, हाच हा प्रश्न सोडवण्याचा एक मार्ग आहे. तुर्कस्थानाला शिक्षा करावी म्हणून त्याचे प्रांत हिसकावून घेणें म्हणजे नुसती सोटेशाही आहे. विजयाच्या वेळीं इंग्लंडनें अगर दोस्त सरकारनें अत्यंत न्यायी राहिलें पाहिजे. तुर्क लोकांची सत्ता नामशेष करणें हें नुसतें अन्यायाचें आहे; एवढेंच नव्हे तर दिलेल्या वचनांचा तो भंगच होय. दक्षिण आफ्रिकेंतील सत्याग्रह-चळवळीच्या बाबतींत लॉर्ड हार्डिंजनीं घालून दिलेलें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून व्हाईसरायांनीं धैर्यानें सध्यांच्या चळवळीचें धुरीणत्व पत्करावें व आपल्या पूर्वीच्या व्हाइसरायाप्रमाणें सध्यांच्या चळवळीला योग्य वळण द्यावें. कारण जर ह्या चळवळीला योग्य पुढारी मिळणार नाहींत व विचारापेक्षां विकारावरच ही चळवळ करण्यांत येईल, तर कदाचित् त्यापासून भयंकर परिणाम होतील.

परंतु सध्यांची चळवळ व्हाईसरायापेक्षा हिंदु व मुसलमानांच्या हातांत असून विशेषतः तिची जबाबदारी मुसलमान पुढाऱ्यांवर आहे. आतांच मुसलमान लोक अधीर झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. ह्या अधीरपणाचें अविचारांत केव्हां रूपांतर होईल याचा नेम नाहीं; व अविचाराच्या पुढील पायरी अत्याचार ही होय. आणि अत्याचार करणें म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखें आहे, अशी प्रत्ये काची जर मला खात्री करितां येईल तर फार बरें होईल.

समजा, दोस्त सरकारनें अथवा इंग्लंडनें मुसलमानांच्या मागण्या मान्य केल्या नाहींत, तर मि. मॉंटेग्यु व मि. लॉईड जॉर्ज यांच्याशिवाय दुसरा कोणीहि दाता मला दिसत नाहीं. मि. लॉईड जॉर्ज अजून स्पष्ट बोलत नाहींत ही गोष्ट खरी; परंतु त्यांना आपल्या वचनाच्या जोरावर मुसलमानांना न्याय मिळवून देतां येईल. पण आपण नेहमीं वाईट धरून चालावें व चांगल्या करितां प्रयत्न करीत असावें. हा प्रयत्न कसा करावयाचा हाच प्रश्न आहे. आपण काय काय करतां कामा नये हें अगदीं स्पष्ट आहे;

(१) विचार, आचार, व भाषा यांमध्यें बिलकूल अविचार असतां कामा नये

(२) सूड घेण्याच्या उद्देशानें आपण ब्रिटिश मालावर बहिष्कार घालतां कामा नये. माझ्या मतें "बहिष्कार" हा अत्याचाराचा भाग आहे. शिवाय जरी तो अवश्य असला तरी अगदीं अव्यवहार्य आहे.

(३) आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत आपण थांबतां कामा नये.

(४) इजिप्तच्या प्रश्नासारखे प्रश्न आपण खिलाफत प्रश्नामध्यें मिसळतां कामा नये.

आतां आपणांस काय करतां येईल तें पाहूं. मार्च १९ तारखेस सर्व व्यवहार बंद ठेवून आपल्या कमीत कमी मागण्या एका ठरावाच्या रूपानें मुक्रर करणें ही पहिली गोष्ट होय. मात्र हरताळ अगदीं स्वखुषीनें झाला पाहिजे. नोकरांनीं आपलें काम धन्याच्या परवानगीशिवाय सोडूं नये. गुप्त पोलीस कधीं कधीं पुष्कळ वेळां अत्याच्यारास मदत करतात असें मला अनेकवार सांगण्यांत आलें आहे; पण माझा त्यावर विश्वास नाहीं. परंतु हें जरी खरें धरलें तरी आपल्या शिस्तीनें ही गोष्ट अशक्य केली पाहिजे. खालच्या लोकांना ताब्यांत ठेवणें, त्यांना योग्य मार्ग दाखविणें व त्यांना शिस्त लावणें ह्यावर आपला जय अवलंबून आहे.

जर मागण्या मान्य करण्यांत आल्या नाहींत तर काय केलें पाहिजे

ह्यावद्दल थोडक्यांत विचार करूं. गुप्त अगर उघड अत्याचार हें युद्ध आहे; परंतु हें अव्यवहार्य आहे ह्या एकाच मुद्द्यावर त्याला वाजूस सारलें पाहिजे. तसें करणें वाईट आहे असें जर सत्य सिद्ध करतां आलें तर आपल्या कायदेशीर मागण्या पुष्कळच लवकर आपणास मिळवितां येतील. जी व्यक्ति अगर जें राष्ट्र अत्याचाराला बाजूला सारते ती व्यक्ति अथवा तें राष्ट्र आपल्या ठिकाणीं अप्रतिहत शक्ति निर्माण करतें; परंतु मी आज एकाच मुद्द्यावर अत्याचाराच्या विरुद्ध आहे. तो मुद्दा म्हटला म्हणजे त्याची निष्फलता हा होय. म्हणून "असहकारिता" हा एकच मार्ग आपणांस उरला आहे. हा उपाय जितका शुद्ध तितकाच परिणामकारक आहे; पण त्याला अत्याचाराचा विटाळहि होतां कामा नये. ज्या वेळेस सहकारिता म्हणजे आपली अवनति अथवा आपला धार्मिक ऱ्हास अशी स्थिति होते तेव्हां असहकारिता करणें आपलें कर्तव्य बनतें. मुसलमानांच्या धार्मिक हक्कांची इंग्लंडनें केलेली पायमल्ली आम्ही मुकाट्यानें सहन करावी अशी इंग्लंडनें अपेक्षा करणें व्यर्थ आहे. म्हणून आपण खालून व वरून अशी दुहेरी सुरवात केली पाहिजे. जे मानाच्या अगर लोभाच्या सरकारी नोकऱ्यांवर आहेत त्यांनीं त्या नोकऱ्या सोडल्या पाहिजेत, जे कनिष्ठ दर्जाच्या सरकारी नोकरीवर आहेत त्यांनीं तसेंच केलें पाहिजे. खाजगी नोकरीस असहकारिता लागू नाहीं. जे असहकारितेचें अवलंबन करणार नाहींत त्यांना सामाजिक वहिष्काराची धमकी देणें मला कबूल नाहीं, असहकारिता म्हणजे स्वखुषीनें संबंध तोडणें. देशांत पसरलेल्या असंतोषाची ही परिक्षा आहे. शिपायांना लष्करी नोकरी सोडण्याचा उपदेश करणें अकालीं आहे, ती शेवटची पायरी आहे, पहिली नव्हे. जेव्हां व्हाईसराय, स्टेट सेक्रेटरी व मुख्य प्रधान ह्यांच्याविषयींची आशा समूळ नष्ट होईल तेव्हांच ही पायरी चढण्याचा आपणास अधिकार पोहोंचेल; शिवाय असहकारितेंतील प्रत्येक पाऊल आपणास पूर्ण विचाराअंतीं टाकलें पाहिजे, अत्यंत आणिबाणीच्या प्रसंगीं आपणांस संयमन करतां येईल अशा खबरदारीनें आपण पुढें चाललें पाहिजे.

जोंपर्यंत मुसलमान लोक अत्याचाराचा मार्ग पत्करूं इच्छित नाहींत अशी माझी खात्री आहे व जोंपर्यंत ते सरळ मार्गानें चळवळ करीत आहेत तोंपर्यंत मी मुसलमान लोकांशी त्यांच्या लढ्यांत पूर्णपणें सहकारिता करीन. ज्या पळाला प्रत्यक्ष अत्याचार केला जाईल अथवा तसा सल्ला दिला जाईल त्या पळाला मी प्रत्येक हिंदूशीं, इतकेंच काय पण प्रत्येक

मनुष्याशी सहकारिता करण्याचें बंद करीन. जर निश्चयास सौजन्याची जोड दिली जाईल तर विजय खात्रीनें मिळेल. जर क्रोध, द्वेष, दुर्वासना, अविचार व शेवटीं अत्याचार ह्यांचें साम्राज्य होईल तर कार्यनाश खात्रीनें होईलच होईल व जरी मी एकाकी असलों तरी प्राणाची पर्वा न करितां मी त्याचा विरोध करीन. —मार्च १०–१९२०

---

# एप्रिल ६ व १३

एप्रिल महिन्याची सहावी तारीख आपण विसरणें शक्य नाहीं. ह्या दिवशीं देशांत एक नवीन जीवनशक्ति उत्पन्न झाली. त्याचप्रमाणें एप्रिल १३ वी तारीखहि आपण विसरणें शक्य नाहीं. ह्या दिवशीं निष्पाप लोकांचें रक्त सांडलें व पंजाब सर्व हिंदुस्थानाला तीर्थ होऊन बसला! एप्रिल ६ ला सत्याग्रहाचा जन्म झाला. सत्याग्रहांतील निःशस्त्र प्रतिकाराच्या भागाबद्दल कोणाचा मतभेद असूं शकेल; परंतु त्यांतील सत्य व प्रेम अगर अहिंसा ह्या मुख्य तत्वाबद्दल कोणाचाही मतभेद असणें शक्य नाहीं. सत्याला जर अहिंसेचा जोड मिळेल तर सबंध जग तुमच्या पायावर लोटांगण घालीत येईल. सत्याग्रहाचा उद्देश राजकीय म्हणजे राष्ट्रीय जीवनक्रमांत सत्य व क्षमा ह्यांचा प्रवेश करविणें हा आहे. कोणी सत्याग्रहाची शपथ घेवो अगर न घेवो लोकांमध्यें सत्याग्रहाचें तत्व शिरलें आहे. निदान पंजाबांत असतांना मला जे हजारों पंजाबी भेटले त्यांचा मला तसा अनुभव आला.

एप्रिल ६ ला हिंदुमुस्लिम एकीचा नवीन भरभक्कम पाया घातला गेला. एप्रिल ६ नेंच ज्या वृत्तीनें रौलेटकानू पास करण्यांत आला ती वृत्ति बदलली व रौलेटकानू मृतवत् करून टाकला एप्रिल १३ नें तो भयंकर प्रसंग पाहिला; परंतु त्या प्रसंगीं हिंदु मुसलमानांच्या रक्ताचे पाट एकाच प्रवाहांत वाहून हिंदुमुसलमानांच्या एकीवर शिक्का झाला, हें साजरें कसें करावयाचें ? ज्यांची हे दिवस साजरे करण्याची इच्छा असेल त्यांनीं त्या दिवशीं व्रतस्थ राहून, चोवीस तास अन्नवर्ज करून ईशप्रार्थना करण्यांत काळ घालवावा अशी माझी त्यांना सूचना आहे. सर्व देशभर सायंकाळीं सात वाजतां सभा भरविण्यांत येऊन रौलेट कायदा रद्द होण्याबद्दल प्रार्थना करण्यांत याव्या व जोंपर्यंत हा कायदा रद्द होणार नाहीं तोंपर्यंत देशांत शांतता नांदणें शक्य नाहीं, असें जाहीर करण्यांत यावें. तो कायदा अस्तित्वात असून नसल्यासारखाच आहे, तो रद्द झालाच पाहिजे.

सुधारणेच्या पूर्वी जर तो रद्द झाला तर सरकारचा दृष्टिकोन बदलल्याचें तें एक लक्षण होईल.

तारीख १३ एप्रिललाहि व्रतस्थ राहून प्रार्थना करण्यांत याव्यात. त्या दिवशीं क्रोध व द्वेष यांना थारा देऊं नये. जे निर्दोष लोक त्यां दिवशीं मेले त्यांचें स्मरण आपल्याला ठेवावयाचे आहे; त्या प्रसंगीं दिसून आलेल्या दुष्टपणाची आठवण आपल्याला आणावयाची नाहीं. सूड घेण्याच्या तयारीनें नव्हे तर स्वार्थत्याग करण्याच्या तयारीनें राष्ट्र उदयाला येईल. त्या दिवशीं लोकांनीं केलेल्या अत्याचारांचें स्मरण करून देशानें पश्चात्तापाच्या धर्मानें शुद्ध व्हावें, ह्या आठवड्यांत सर्व देशभर ठराव पास करण्यांत येऊन ब्रिटिश व हिंदुस्थानसरकारला अशा भयंकर प्रसंगांची पुनरावृत्ति होणार नाहीं अशी कायदेशीर व्यवस्था करावी अशी विनंति करण्यांत यावी; प्रत्यक्ष आचरणानें प्रत्येक व्यक्तीनें सत्याग्रहाचे व हिंदु-मुस्लीम एकीचे व स्वदेशीचे तत्व आपल्या अंतःकरणांत बिंबवावें, हिंदु-मुसलमानांची एकी दृढ करण्याकरितां शुक्रवारीं १२ तारखेला सायंकाळीं ७ वाजतां हिंदु-मुसलमानांच्या एकत्र सभा भरविण्यांत याव्यात. व ह्या सभेंतून खिलाफत प्रश्नाचा निकाल मुसलमानांच्या मनाप्रमाणें लागावा अशा अर्थाचे ठराव पास करावेत.

अशारीतीनें हा राष्ट्रीय आठवडा आत्मशुद्धीचा, आत्मपरीक्षेचा, स्वार्थत्यागाचा, शिस्तीचा व राष्ट्रीयकल्पनांच्या चिंतनाचा असावा. भाषेंत सुद्धां द्वेष अगर अत्याचार असूं नयेत. पूर्ण निर्भयता व निश्चय असावा.

—मार्च १० १९२०

# त्रयमूर्तींचा अवतार !

अलहाबादचा 'लीडर' व 'यंग इंडिया' यांचे दोन मार्ग झाले आहेत. 'लीडर' बद्दल मला इतका आदर वाटतो कीं, त्याचीं मतें मला ग्राह्य व्हावीत म्हणून मी शक्य ती खटपट करितों; परंतु इतके प्रयत्न केले तरी त्यांत मला यश येत नाहीं. ह्याचें ताजें उदाहरण म्हटलें म्हणजे बहिष्कार व असहकारिता ह्यांच्यामध्यें लीडरनें उडविलेला गोंधळ हें होय. माझा अर्थ स्पष्ट असून त्यांत कांहींहि विसंगतपणा नाहीं असें मला वाटत होतें. बहिष्कार ही शिक्षा असून त्यांत सुडाची भावना मुख्य आहे. ब्रिटीश मालावर बहिष्कार घालणें ह्याचा अर्थ, जरी जपानी मालापेक्षां ब्रिटीश माल चांगला असला तरी तो मीं घेतां कामा नये. कारण काय तर ब्रिटिश-

मंज्यांनी जो माझ्यावर अन्याय केला आहे अगर कांहीं इंग्रज गृहस्थांनीं खिलाफतसंबंधानें बोलतांना जी बेजबाबदार व उर्मट भाषा वापरली आहे त्याबद्दल इंग्लिश लोकांवर मला सूड घ्यावयाचा आहे. अशा परिस्थितींत ज्या बहिष्काराचा जन्म झाला तो अत्याचारांचाच एक भाग आहे, असें मी समजतों.

असहकारिता याहून अगदीं भिन्न आहे. जें सरकार अन्याय करतें त्या सरकाराशीं सहकारिता मी करीन तर त्या अन्यायाचा वांटेकरी मी होतों. कारण माझ्या सहकारितेमुळें सरकारला अन्याय करणें शक्य होतें. शिक्षा करावी म्हणून नव्हे किंवा सूड घ्यावा म्हणून नव्हे तर अन्यायाची जबाबदारी माझ्या माथीं येऊं नये अशी माझी इच्छा आहे म्हणून सरकारशी असलेला सर्व संबंध तोडणें माझें कर्तव्य आहे. इतकेंच काय पण तें सरकार जरी मी अगदीं बंद पाडलें तरी सुद्धा तें मान्य होईल. हत्ती व गाढव ह्यांमध्यें जितकें साम्य आहे तितकेंच बहिष्कार व असहकारितेमध्यें आहे, हें अगदीं मला स्पष्ट समजतें.

मीं अत्याचारांचा निषेध करावा व हरताळ मान्य करावा ही गोष्ट ‘ लीडर ’ ला अयुक्तिक दिसतें; मला तसें विलकूल वाटत नाहीं. कारण हरताळाचा शेवट खात्रीनें अत्याचारांत झाला पाहिजे, ही गोष्ट मला कबूल नाहीं. मार्गांत धोके आहेत म्हणून योग्य ती गोष्ट केव्हांहि करण्याचें टाळतां येत नाहीं. दोस्तराष्ट्रांनीं विरुद्ध निकाल दिल्यावरहि मुसलमान लोकांना शांत रहाणें शक्य आहे, व कांहीं निश्चित व जोरदार चळवळ करण्याचें कारण नाहीं, असें ‘ लीडर ’ ला वाटतें म्हणून ही सर्व अडचण. ह्या प्रश्नाचा हटकून उत्तम निकाल लावील अशी अत्याचारविरहित चळवळ न मिळाल्यास या प्रकरणाचें रूपांतर खात्रीनें अत्याचारांत होईल असें माझें ठाम मत आहे. कोणतीहि जोरदार चळवळ कदाचित अत्याचाराला जागा देईल; परंतु त्याचा अर्थ लोक आपला गैरसमजूत करून घेतील अगर त्यापासून वाईट परिणाम होईल म्हणून योग्य ती गोष्ट करण्यास आपण भितां कामा नये. मनुष्याला जें करितां येण्यासारखें आहे तें एवढेंच कीं चुका व गैरसमज होऊं नये म्हणून शक्य ती खबरदारी घेतल्यावर परमेश्वरावर विश्वास ठेवून मार्ग चालूं लागणें. खिलाफतच्या बाबतींत अत्याचार टाळणें जर कशानें शक्य असेल तर फक्त तें ह्या एका मार्गानेंच टाळणें शक्य आहे. ह्या कारणास्तव सर्व मतांचे हिंदु ह्या चळवळींत सामील होतील अशी मला आशा आहे. जर हिंदु जोमानें एकमतानें व एकनिश्चयानें या

चळवळींत पडतील तर मुसलमानांच्या अंतःकरणांत धैर्याचा व आशेचा उदय होईल. अनागत्य अगर उपेक्षा आशेला खग्रास ग्रहण लावून निराशेचें साम्राज्य सुरू करील.

सत्याग्रहाला जो विरोध करण्यांत येतो त्याबद्दल हेंच सांगतां येईल. आज घटकेला सत्याग्रहाचें तत्व योग्य तऱ्हेनें आचरण्याला मी एकटाच पात्र आहे असें मला अजून वाटतें. परंतु असें आहे म्हणून जर मी त्या तत्वाचा प्रयोग करण्यास थांबलों तर सत्याग्रहाचा प्रसार केव्हांच होणार नाहीं. सत्याग्रहांतील निःशस्त्र प्रतिकाराच्या भागापासून अपाय होण्याचा संभव आहे. हरताळ नवीन शस्त्र नसून तो सत्याग्रहांत अंतर्भूत होईल अगर होणार नाहीं. त्याचप्रमाणें असहकारिता म्हणजे आवश्यक सत्याग्रहच असेंहि नाहीं. ज्या वेळेस नामदार मदनमोहन मालवीयांनीं आपल्या वरीष्ठ कायदे कौन्सिलांतील सभासदाच्या जागेचा राजीनामा दिला अगर सर रविंद्रनाथ टागोरनीं 'सर' की परत घेण्यास सांगितलें त्यावेळेस ते दोघेहि सत्याग्रही नव्हते. अर्थात जर असहकारिता सर्व देशभर पसरेल तर संकट ओढवण्याचा संभव आहे. परंतु हें सूर्यप्रकाशाइतकें सत्य आहे. मुख्य गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, खिलाफत प्रश्न हा मुसल्मानांचा धार्मिक प्रश्न आहे व त्याचा योग्य निकाल लाविल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. जोंपर्यंत मुसलमान बंधु अत्याचाराला प्रवृत्त झाले नाहींत तोंपर्यंत त्यांच्याकरितां आपलें सर्वस्व खर्ची घालणें हिंदूंचें कर्तव्य आहे.

हिंदु, ख्रिश्चन, पार्शी, ज्यू जे जे म्हणून भारत आपली माता समजतात त्यांनीं मुसलमानांना पूर्ण पाठिंबा दिला व अत्याचार न करितां हा प्रश्न सोडवण्याचे खात्रीलायक मार्ग सुचविले, तरच मुसलमान लोक शांत राहतील.

—मार्च १७,१९६०

---

# हिंसा विरुद्ध अहिंसा

खिलाफत–दिवस उत्तम रीतीनें पार पडला. सत्याग्रहाचा, सत्य व अहिंसा ह्यांचा, त्या दिवशीं पूर्ण विजय झाला. १९ तारखेचा हरताळ

लोकांनीं अपूर्व आपखुषीनें पाळला होता. त्याबद्दलची चळवळ १९ तारखेच्या अगोदर झाली होती. गिरणींतील मजुरांना ह्यांत सामील होण्याला विनंति न करण्यांत, कमीटीनें आश्चर्यजनक संयमनशक्ति दाखविली आहे. कमिटीनें ह्या दिवशीं जी चोख व्यवस्था ठेविली व आपखुषीच्या तत्वाला जी मान्यता दिली, तिची करावी तितकी स्तुति कमीच आहे. १९ तारखेप्रमाणें जर लोक यापुढें शिस्त व संयमनशक्ति दाखवितील व तितक्याच प्रमाणांत ह्या गुणाला स्वार्थत्यागाची जोड देतील, तर खिलाफतसंबंधाच्या आपल्या इच्छा फलद्रूप होण्याला कोणतीहि अडचण पडणार नाहीं. मुसलमानी समाजांतील धर्मवेड लोक अशा प्रसंगीं, सबंध दिवस मोकळे असतां शांतता राखतील अशी कल्पनाहि एक वर्षापूर्वी कोणाला करतां आली नसती; परंतु ईशचिंतन म्हणजे निरुद्योगिता नव्हे. कोणी भांडूं नये, रागावूं नये व सत्याचा जय व्हावा; ईश्वराची अशी प्रार्थना करावी; सर्वांना विनंति करण्यांत आली होती. सर्वच करीतहि होते असें नव्हे, परंतु वातावरण एकंदरीनें ईशस्तवनानें पवित्र झालें होतें. मनावर युद्धाची लालसा व क्रोध ह्यांपेक्षां पावित्र्याचाच जास्त पगडा होता. व अशा रीतीनें हरताळाचा दिवस रोजच्याप्रमाणें शांतपणें पार पडला. मुंबापुरींतील ४०,००० लोकांची सभा हा एक प्रेक्षणीय देखावा होता. वक्त्यांचीं भाषणें शांतपणें श्रवण करीत असलेल्या हजारों लोकांच्या मुखावर निश्चयाचें तेज झळकत होतें. टाळ्यांची अगर इतर कसलीहि गडबड ऐकूं येत नव्हती. आमच्या सभेत आधुनिक गोंधळ, गडबड व अव्यवस्थितपणा ह्यांच्या ऐवजीं आपची प्राचीन शांतता, स्तब्धता व व्यवस्थितपणा आणल्याबद्दल सभा भरविणारे स्तुतीला फार पात्र आहे. पहिले दुर्गुण अत्याचाराला प्रवृत्त करतात तर दुसरे गुण सत्याग्रही बनवतात. हरताळचा व त्या जंगी सभेचा संदेश हिंसा नसून अहिंसा आहे. अधिकारी आपला गैरसमज करून घेणार नाहींत अशी मला आशा आहे, ह्या सर्व प्रसंगाचें व ठरावांचें खरें स्वारस्य काय आहे हें अधिकाऱ्यांनीं नीट समजावून घ्यावें. ज्यांचें ह्या देशावर अगर साम्राज्यावर खरें प्रेम असेल त्यांना ह्या ठरावाला अपवाद घेणें शक्य नाहीं, असें माझ्या अल्पबुद्धीला वाटतें. ह्या चळवळीच्या प्रगतीवरून अधिकारी लोकांची प्रवृत्ति लक्षांत घेतील अशी मला आशा आहे. आमच्यामध्यें जी अनुकरणीय सहिष्णुता, आत्मनिग्रह व व्यवस्थितपणा उत्पन्न होत आहे त्याचा अधिकाऱ्यांवर योग्य परिणाम होऊन ते, जरी देशांत पूर्ण शांतता नांदत आहे तरी तिच्या पाठीमागें नकारार्थी उत्तराचा स्वीकार न करण्याचा ठाम निश्चय आहे, असें वरिष्ठ

सरकारला कळवतील अशी माझी खात्री आहे. सरकार गेल्या एप्रिल-मधील पाप कर्म पुन्हां करणार नाहीं व दडपशाहीच्या जोरावर नवीन जन्माला आलेलें तेज दडपून टाकण्याची व्यर्थ आशा करणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. हें नूतन तेज कायम राहील तें सहन करील; परंतु अप्रतिष्ठा, मनोभंग व पराजय सहन करणार नाहीं.

लिबरल लीगसारख्या सन्माननीय संस्थेनें इतक्या उतावीळपणानें हरताळाचा निषेध करण्यास उद्युक्त व्हावें हि खेदाची गोष्ट आहे. समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे व त्याच्यापुढें नैराश्यदरी आँपसरून आहे, अशा समाजाला आपल्या दुःखालाबाहेर वाट देण्याला कांहीं तरी व्यवस्थित मार्ग पाहिजे ही गोष्ट कोणालाहि पटेल. आपल्याला जें कांहीं वाटतें तें बोलण्याला अगर लिहिण्याला आपण पूर्वी भीत होतों म्हणूनच आपल्या विचारांची खेचाखेंच होई. व लोकमतांचे त्याच्यावर घाव न बसल्यामुळें स्वच्छ हवेच्या अभावीं त्यांना कीड लागे, ह्यामुळेंच आपल्या इकडे अराजक चळवळ सुरू झाली. परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत कीं, तसल्या त्या काळांतून आपण पार पडलों आहोंत. आज आपण बिनधोक उघड वाटेल तें बोलतों व लिहितों. लिबरल लीगच्या संस्थनीं व त्यांच्याच विचारसरणीच्या इतर मंडळींनीं ही गोष्ट लक्षांत घेऊन कातर दक्षतेपेक्षां धाडसी वृत्ति केव्हांहि श्रेष्ठ आहे ही गोष्ट त्यांनीं मान्य करावी अशी माझी त्यांना विनंति आहे. नित्यदिन ज्या असंख्य शक्ति जन्माला येत आहेत त्यांचा राष्ट्र उन्नतावस्थेला आणण्याकरितां उपयोग करून घेण्याची त्यांची इच्छा असेल व नूतनजन्माच्या (बालकाच्या) गर्भवेदना सहन करण्यांत जर त्यांना अभिमान वाटत असेल, तर त्यांनीं बदलणाऱ्या काळाकडे दुर्लक्ष करतां कामा नये; पुढें येणाऱ्या नवीन लाटेला मागें ढकलतां कामा नये; तरुण पिढीच्या आकांक्षेवर व उत्साहावर विरजण घालतां कामा नये; त्यांनीं ह्या तरुण उत्साही, स्वार्थत्यागी व धाडसी पक्षाचे पुढारी झालें पाहिजे. त्याला सहानुभूति दाखवा, त्याच्या मनांतील महत्वाकांक्षा ओळखा, त्याला वळण द्या. तो विचारी आहे, त्याला पवित्र आत्मा आहे; करून तर पहा कीं, देशाकरितां वाटेल तेथें उडी घालण्याला तयार असा पक्ष तुमच्या जवळ आहे; परंतु आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे, आपल्या गरजा शांतपणें ऐकून घेण्याला जुनी मंडळी तयार नाहींत व आपल्याला मदत करण्याला कोणी राजी नाहीं अशी जर ह्या पक्षाची समजूत झाली, तर मात्र तो निराशेच्या फेऱ्यांत सांपडून जिवावर उदार होईल. व मग

त्याचा काय भयंकर परिणाम होईल, हें सांगतां येत नाहीं. हिंदुस्थानला सत्याग्रही बनविण्याला सांप्रतसारखा योग्यकाळ ह्यापूर्वी कधीं आलेला मला स्मरत नाहीं. सत्याग्रह म्हणजे आवश्यक कायदे मोडणेंच नसून तो सत्य व अहिंसा हीं ज्यांचीं घटक आहेत असा धर्म आहे. ह्या ठिकाणीं पराजय कधींहि नाहीं व प्रमाद झाल्यास तो करणारालाच दुःखदायक होतो.

—२४ मार्च १९२०

---

# सत्याग्रहसप्ताह

उपवास व प्रार्थना हीं पवित्र राष्ट्रीय आठवड्यांतील मुख्य अंगें म्हणून मीं योजिलीं आहेत. आपल्या राष्ट्रीय जीवनाचा विकास होण्याकरितां या दोन्ही साधनांची किती जरूरी आहे यासंबंधानें बऱ्याच वेळां मीं बोललों आहें; परंतु या प्रार्थनेच्या बाबतींत एका स्नेह्याला लिहीत असतांना टेनिसची एक सुंदर कविता मला आठवली. यंग इंडियाच्या वाचकांना ती कविता मी सादर करीत आहें, कारण यदाकदाचित् या कवितेमुळेंहि प्रार्थनेंत कितो शक्ति सांठवून ठेवलेली असते हें त्यांना कळून येईल, असा मला संभव वाटतो.

More things are wrought by prayer
Than this world dreams of Wherefore let thy voice
Rise like a fountain for me night and day
For what are men better than sheep or goats
That nourish a blind life within the bain
If knowing God, they lift not hands of prayer
Both for themselves and those who call them friends
For so the whole round earth is every way
Bound by gold chains about the fact of God

या जगांतील लोकांच्या स्वप्नींहि यावयाच्या नाहींत अशा गोष्टी प्रार्थनेच्या सामर्थ्यावर घडून येतात, अशा आशयाचा अनुवाद वरील कवितारत्नांत टेनिसननें केला आहे. हिंदुस्थानांत प्रवास करीत असतांना सर्व धर्मांच्या लोकांशीं मिसळण्याचा मला प्रसंग आला. हजारों स्त्रिया व शेकडों

विद्यार्थी यांच्याशीं बोलण्याचा मला योग आला. राष्ट्रापुढें असलेल्या अनेक प्रश्नांसंबंधानें मीं त्यांच्याशीं वाटाघाट केली; पण ही चर्चा मी कोणत्या भावनेनें केली हें मात्र मी सांगू शकत नाहीं. आपल्या राष्ट्राच्या परिस्थितीसंबंधानें योग्य जाणीव लोकांना झालेली नाहीं, असें मला आढळून आलें. आपल्या परिस्थितीच्या जाणिवेची साक्ष बुद्धीला पटण्यास जरूर तें शिक्षण आमच्या लोकांना मिळालेलें नाहीं, आणि आमच्या लोकांत जरूर ती शिस्त, स्वार्थत्यागाची भावना, विनयशीलता वगैरे राष्ट्राच्या खऱ्या प्रगतीस आवश्यक असलेले गुण उपवास व प्रार्थना यांच्यामुळेंच उत्पन्न होतील, असें म्हणण्यास मला कोणतीच हरकत वाटत नाहीं. म्हणून देशांतील लाखो लोक मनापासून प्रार्थना करून व उपवास करून या सत्याग्रहसप्ताहास प्रारंभ करतील अशी मला आशा आहे.

सत्याग्रहांतील कायदे मोडण्याच्या निःशस्त्र प्रतिकारावर जोर देण्याचा या आठवड्यांत माझा विचार नाहीं: सत्य व अहिंसा या तत्वांचें आपण चिंतन करावें व तत्वांच्या ठायीं असलेलें सामर्थ्य आपल्या आंगीं बाणून घ्यावें असें माझें सांगणें आहे. सत्य व अहिंसा या सनातन तत्वानुसार आपली आयुष्याची राहणी निश्चित केल्यास कायदे मोडण्याच्या किंवा दुसऱ्या कोणत्याहि प्रतिकाराची कांस धरण्याचें आपल्याला कारण पडणार नाहीं. सत्य रक्षणाकरितां प्रतिपक्षाविरुद्ध जेव्हां कांहीं थोड्या लोकांना तोंड द्यावयाचें असतें त्यावेळींच कायदे मोडण्याचा प्रतिकार अंगिकारावा लागतो. कायदे मोडून सत्यरक्षण करण्याचा ज्यावेळीं प्रसंग येतो त्यावेळीं सत्य ह्मणजे काय व या सत्यरक्षणाच्या कार्यांत हिंसेच्या रुपानें होणारा अनर्थ कसा टाळावा हें समजणें कठीण जातें. जात, धर्म, पक्ष वगैरे भेदाभेद बाजूला ठेवून सर्वांशीं सहकारिता करावयाच्या राष्ट्रोन्नतीस वाहिलेल्या या आठवड्यांत कायदे मोडून निःशस्त्र प्रतिकार करण्याचा उपदेश करणें कितपत श्रेयस्कर होईल, यासंबंधानें मतभेद असण्याचा संभव आहे.

उपवास व प्रार्थना याखेरीज ता० ६ व ता० १३ रोजीं जालियांवाला स्मारकाकरितां आपल्याला फंड जमा करावयाचा आहे. प्रत्येक प्रांतांत, प्रत्येक जिल्ह्यांत प्रत्येक शहरांत व प्रत्येक गांवांत यासंबंधानें पूर्ण संघटनात्मक चळवळ होईल, असा मला भरंवसा आहे. त्याचप्रमाणें या आठवड्यांत ठरलेल्या वेळीं रौलेट कायदा, खिलाफत प्रश्न व जालियांवाला प्रकरण यासंबंधानें तीन वेगवेगळे ठराव करावयाचे आहेत.

रौलेट कायदा रद्द झाल्याशिवाय देशांत शांतता नांदणार नाहीं. खिलाफत प्रकरणाचा निकाल हिंदी मुसलमानांच्या मनोभावनेनुरुप करण्यांत आला नाहीं, तर प्रत्येक हिंदी मनुष्य सरकारशीं सहकारिता करण्याचें नाकारील आणि अमृतसर येथें झालेल्या अत्याचाराबद्दल ज. डायर वगैरेंना कॉंग्रेस सबकमिटीनें सुचविलेल्या शिक्षा याव्या अशा आशयाचे हे तीन ठराव आहेत. —३१ मार्च १९२०

# पंजाबमधील शिक्षा

कॉंग्रेस पंजाब-सबकमिटीनें नेमलेल्या कमिशनरांनीं ना. व्हॉईसरॉयांच्या अंगीं स्वतः विचार करण्याची शक्ति नाहीं, असा त्यांच्यावर आरोप ठेवला आहे. फांशीच्या पांच शिक्षांपैकीं दोन शिक्षा कमी करण्याचें व्हॉईसरॉय यांनीं नाकारलें, हीच गोष्ट व्हाईसरॉयांवरील हा आरोप सिद्ध करण्यास पुरेशी आहे. प्रिव्हि कौन्सिलनें अपील घेण्याचें नाकारल्यानें अपराध्यांचा गुन्हा शाबित होत नाहीं; परंतु उलट लष्करी कायद्याच्या न्यायासनासमोर झालेली चौकशी जर रद्द केली गेली असती तर मात्र या लोकांचा निरपराधीपणा शाबित झाला असता. बादशाही जाहीरनाम्यावर पंजाब सरकारनें जें भाष्य केलें आहे त्या भाष्याच्या कक्षेंतच हे अपराध येत आहेत. अमृतसर येथें झालेले खून, खुनी लोक व त्यांना बळी पडलेले लोक यांच्यामधील झालेल्या गोष्टी लढ्यामुळें झालेल्या नाहींत. हे अपराध भयंकर असले तरी ते शुद्ध राजकीय स्वरूपाचे व मनःक्षोभामुळें घडून आलेले आहेत. याशिवाय या खुनाबद्दल व जाळपोळीबद्दल पूर्ण मोबदला घेण्यांत आला आहेच. अशा परिस्थितींत फांशीच्या शिक्षा कमी केल्या पाहिजेत असें सामान्यतः कोणाचीहि मनोदेवता सांगेल. शिक्षा देण्यांत आलेले लोक निरपराधी आहेत व त्यांची न्याय्य चौकशी झालेली नाहीं, असा लोकांचा समज आहे. या शिक्षेची अम्मलबजावणी इतकी लांबविली आहे कीं, आजच्या परिस्थितींत या लोकांना फांशी दिल्यानें हिंदी लोकांना एक मोठा धक्का बसल्याखेरीज राहणार नाहीं. अक्कल असलेला कोणताहि व्हाईसरॉय या फांशीच्या शिक्षा कमी केल्या असल्याचें जाहीर करता; पण लॉर्ड चेल्म्सफर्ड साहेबांनीं तसें केलें नाहीं त्यांच्या दृष्टीनें या अपराध्यांपैकीं कांहीं लोक फांशी गेल्याशिवाय न्यायदेवता तुष्ट होणार नाहीं असें उघड दिसतें. त्यांना लोकमताची कांहीं किंमत वाटत नाहीं.

व्हाईसरॉय किंवा मि. मॉंटेग्यू या शिक्षा कमी करतील अशी आम्हांला अद्याप आशा आहे.

परंतु दुर्दैवानें सरकारनें जर या बाबतींच चूक केली, त्यानें या शिक्षा मलांत आणल्या, तर लोक सुद्धां त्याचप्रमाणें रागाच्या व दुःखाच्या पाश्यांत सांपडून अशाच चुका करण्यास प्रवृत्त होतील. जगांतील ष्ट्रांच्या मंडळांत आपल्या मताला महत्व प्राप्त होईल, असें आमचें राष्ट्र ोण्यापूर्वी अशा प्रकारेच शेकडोंच काय पण हजारों खून झाले तरी आपलें चेत्त समत्वाच्या पायरीवरून खालीं ढळूं न देण्याची तयारी आपण केली पाहिजे; म्हणून या बाबतींत ज्यांचा ज्यांचा संबंध आला असेल ते लोक हताश होण्यापेक्षां फांशी म्हणजे आयुष्यांतील एक सामान्य गोष्ट आहे असें ते मानतील अशी मला आशा आहे. —एप्रिल ७, १९२०

---

# नवा अंक

आज बारा महिने इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांमध्यें खिलाफत प्रश्नावर जोराची चळवळ सुरू आहे. प्रथम येथल्यापेक्षां इंग्लंडमध्येंच जास्त पद्धतशीर चळवळ करण्यांत आली. इंग्लंडांत असलेल्या मुसलमान पुढाऱ्यांनीं इस्लामला प्राणभूत असलेल्या प्रश्नासंबंधानें मुसलमान लोकांचें मत एकत्र करून शांतता-परिषदेच्या पुढें मांडलें. इंग्लिश लोकांपुढें व त्याचप्रमाणें ब्रिटिश प्रधानापुढें त्यांनीं आपली बाजू मांडली. ह्या प्रयत्नांची निष्फलता व पॅरिसमध्यें घडत असलेल्या गोष्टी यांनीं हिंदुस्थानचे डोळे उघडले. गुप्त तहांतील स्वार्थी हितसंबंधाच्या ओझ्यांनीं सर्व दोस्त राष्ट्रें दडपलीं गेलीं आहेत, असें हिंदुस्थानांतील मुसलमान पुढाऱ्यांच्या लक्षांत आलें. त्यांनीं तावडतोब शिष्टमंडळ तयार केलें व मुसलमानांच्या कमींत कमी मागण्या प्रसिद्ध करण्यांत आल्या. शिष्टमंडळांतील पहिली तुकडी इंग्लंडास तावडतोब रवाना झाली. खिलाफत शिष्टमंडळानें लिबरल पक्षाच्या मुख्य मुख्य पुढाऱ्यांची मुलाखत घेतली. आपलें म्हणणें काय आहे हें त्यांनीं मुख्य प्रधानाच्या कानावर घातलें. ह्या मुलाखतींतून काय निष्पन्न झालें तें आपणां सर्वांस विदितच आहे. नुसत्या खासगी मुलाखती घेऊनच शिष्टमंडळ थांबलें नाहीं. एसेक्स सभागृहांत त्यांनीं एक जंगी सभा २३ मार्च रोजीं भरविली; बरेच इंग्लिश लोक हजर होते. या सभेचा श्रोत्यांवर फार चांगला परिणाम झाला अशी बातमी आहे.

खिलाफत प्रश्नाचा निकाल लावणें चार शिष्टांवर अवलंबून आहे. ह्यांत इटली-चे प्रधान सिनॉरनिट्टी हे एक आहेत. त्यांनी केलेल्या भाषणावरून व त्यांनी दिलेल्या चेंबरच्या उत्तरावरून इतालीला तुर्कस्थान अगर एशियामायनरांत कसलाहि मुलूख नको, असें स्पष्ट होत आहे. मुसलमानांच्या धार्मिक वृत्ति उद्दीपित करणें चूक आहे, असें त्यांनी जाहीर केलें आहे; पण अमेरिकेंतून अशुभ वातमी येत आहे. तुर्की तहाबद्दल दोस्त सरकारनें पाठविलेल्या खलित्याला अमेरिकेंतून जें उत्तर मिळालें आहे त्यांत कॉन्स्टॅटिनोपलचा टापू वगळून पूर्व थ्रेस ग्रीसला द्यावा पण आड्रिआनोपल आणि कर्केलिश आणि आजूबाजूचा मुलूख बल्गेरियाला देण्यांत यावा; आर्मेनियन लोकांच्या कायदेशीर मागण्या मान्य होतील व विशेषतः त्यांना समुद्राला वाट मिळेल अशा तऱ्हेनें आर्मेनियाची सरहद्द ठरविण्यांत यावी, ट्रिबिझॉन्ड आर्मेनियाला देण्यांत यावा व मेसापोटेमिया, अरबस्तान, पॅलेस्टाइन, सीरिया व बेटें ह्यांची विल्हेवाट लावण्याचें तुर्कस्थाननें दोस्त राष्ट्रांवर सोपवावें, असें लिहिलें आहे. ह्याहीपेक्षां असमाधानकारक वातमी म्हटली म्हणजे अमेरिकन आर्मेनियन कमिशनचा रिपोर्ट हा होय. त्यांत म्हटलें आहेः—पूर्वेचा प्रश्न सोडविण्याला एकाद्या राष्ट्राला कॉन्स्टॅन्टिनोपल सुद्धां मॅन्डेट देणें हा एकच मार्ग आहे ह्या दोन तारा वाचल्या म्हणजे शिष्टमंडळानें अमेरिकेस जाण्याचें ठरविलें हें सुज्ञपणाचें झालें हें प्रत्येक मनुष्य कबूल करील. आर्मेनियन कत्तलीच्या सर्व इतिहासाचें मंथन करण्याकरितां एक आंतर राष्ट्रीय कमिशन नेमण्यांत यावें व त्यावर हिंदी मुसलमानांचे योग्य प्रतिनिधी असावेत अशी मुसलमानांची मागणी आहे. एकाच बाजूचा पुरावा पुढें आल्यामुळें हा इतिहास विपर्यासाचा व घोटाळ्याचा आहे अशी त्यांची ओरड आहे. ह्या कमिशनची चौकशी पुरी होईपर्यंत आर्मेनियानें वाट पहावी अशीहि मुसलमान लोकांची मागणी आहे स्वयंनिर्णय तत्वाचें जन्मदाते प्रेसिडेंट विल्सन यांनी आपल्या चौदा रत्नांपैकीं बारावें रत्न कसें चुरडलें आहे व माऊंटव्हर्नानवरील भाषणाला त्यांनी कसा हरताळ फांसला आहे हें मुसलमान लोक सहज सिद्ध करूं शकतील.

जरी दोस्त सरकारचे प्रतिनिधी मुसलमान लोकांच्या मागण्यांतील न्यायीपणा नाकबूल करीत आहेत, तरी सर्वसाधारण ख्रिश्चन लोकांबद्दल आमची अद्यापि निराशा झाली नाहीं. कोणी ऐको वा न ऐको; आपली बाजू शक्य तितक्या लोकांपुढें मांडण्याचा मुसलमान लोकांनी निश्चय केला आहे, असें स्पष्ट दिसतें. हा दांडगा प्रयत्न शक्य तितके

सनदशीर उपाय करून पहावयाचे अशा हेतूनें करावयाचा, असें मुसलमान लोकांनीं ठरविलें आहे.

पुढें मागें द्वेषाला जागा राहूं नये म्हणून, मुसलमान पुढारी प्रथम-पासून आपलीं मतें जाहीर करीत आहेत. जर मुसलमान लोकांच्या न्याय्य मागण्या मान्य करण्यांत येणार नाहींत, तर पुढें काय करावयाचें हें मुसलमान लोकांनीं स्पष्टपणें जाहीर केलें आहे. सरकारशीं सहकारिता करण्याचें बंद करणें ही गोष्ट कठीण आहे हें खरें; व जर ही गोष्ट टाळतां आली असती तर मुसलमान लोकांनीं ती टाळलीहि असती. परंतु शेवटीं निरुपाय होऊन त्यांना आपला मार्ग आंखावा लागला. पदव्यांचा त्याग हा या चळवळीचा जणू काय पायाच आहे. ह्या ठिकाणीं खिलाफत चळवळीचा नवीन अंक सुरू झाला आहे. हा आणीबाणीचा प्रश्न लक्षांत घेऊन ख्रिश्चन राष्ट्रें ख्रिश्चन धर्मास लाजविणारी आपली करणी बंद करतील अशी आम्ही मनःपूर्वक इच्छा करतों. --१४ एप्रिल १९२०

---

# मी खिलाफत चळवळींत कां पडलों ?

( म. गांधींना एका इंग्रज मित्राकडून पत्र आलें होतें. त्यांत मानवी जातीच्या हिताकडे दुर्लक्ष करून, तुर्कांच्या जुलमी सत्तेचें आयुष्य वाढविण्याला महात्माजी मदत करीत आहेत, असा त्यांच्यावर आरोप केला होता. महात्माजी ह्या पत्राला उत्तर देत आहेत. )

मी माझ्या मित्राला उत्तर पाठविलें आहे; परंतु त्यांत नमूद केलेले विचार माझ्या इंग्रज मित्रांपैकीं पुष्कळांचे असण्याचा संभव आहे व त्यांच्या माझ्या मैत्रीमध्यें बिघाड येऊं नये व माझ्याविषयींचा त्यांचा आदर मी गमावूं नये अशी माझी इच्छा असल्यामुळे, खिलाफत प्रश्नावरील माझीं मतें जितकीं स्पष्टपणें जनतेपुढें मला मांडतां येतील तितकीं मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे. एखाद्या बेजबाबदार वर्तमानपत्रापासून सार्वजनिक मनुष्याला किती भीति असते ह्याचा हें पत्र उत्तम दाखला आहे. टाइम्सनें प्रसिद्ध केलेला रिपोर्ट मी वाचला नाहीं; परंतु ह्या रिपोर्टाच्या वाचनावरून मी अनावस्थेच्या साम्राज्याचा सहाय्यक आहे व मी आपली नैतिक जबाबदारी झुगारून दिली आहे अशी माझ्या मित्राची समजूत झालेली दिसते.

जी नैतिक जबाबदारी मी झुगारून दिली आहे असा माझ्या मित्राचा माझ्यावर आरोप आहे, त्या नैतिक जबाबदारीनेंच खिलाफत प्रश्न मला हातांत घ्यावयला लावलें आहे. ह्याच जबाबदारीनें मला मुसलमान लोकांशीं पूर्णपणें एकरूप केलें आहे. हिंदु-मुसलमानांच्या एकीला मी अनुकूल आहें व तिला मदत करीत आहे हें अक्षरशः खरें: पण तुर्की साम्राज्याचा भंग करण्यांत इंग्लंदला व दोस्त राष्ट्रांना घोटाळ्यांत आणण्याच्या हेतूनें मात्र खास नव्हे सरकारला अगर दुसऱ्या कोणाला घोटाळ्यांत आणणें हें कृत्य माझ्या धर्माविरुद्ध आहे. परंतु ह्याचा अर्थ माझ्या कांहीं कृत्यांनीं कदाचित् सरकार घोटाळ्यांत येणार नाहीं, असा मात्र नव्हे. अन्यायी मनुष्याला त्याच्या अन्यायी कृत्यांत मदत करण्याचें नाकारून, जेव्हां मी अन्यायाला विरोध करतों तेव्हां जर कोणाचा घोटाळा झाला तर त्याचा जबाबदार मी नाहीं. खिलाफत प्रश्नाच्या बाबतींत वचनभंगाला सहाय्यक होण्याचें मी कबूल करीत नाहीं. मि. लॉईड जॉर्जच्या वचनांत हिंदु-मुसलमानांची सगळी मागणी गोंवली असून जेव्हां त्याला धार्मिक ग्रंथाचा आधार मिळतो तेव्हां तर त्याला उत्तरच नाहीं. शिवाय माझा एका प्रचलित अराजकतेशीं संबंध आहे किंवा 'मानव जातीच्या हिताला अन्यायकारक अशा तुर्की सरकारचा जुलूम कायम करणाऱ्या चळवळीला मी मदत करीत आहे' हीं विधानें साफ खोटीं आहेत. तुर्की जुलूम कायम ठेवावा असा आग्रह मुसलमानांच्या मागणींत कोठेंहि केलेला नाहीं. उलट तुर्की साम्राज्यांतील अल्पसंख्याक मुसलमानेतर जातींच्या संरक्षणाची पूर्ण खबरदारी घेतली जावी, हें तत्व मुसलमान लोकांनीं मान्य केलें आहे. आर्मीनिया व सिरिया ह्या दोन देशांतील परिस्थितीला अराजकता कितपत म्हणतां येईल व त्याबद्दल तुर्की सरकारला कितपत जबाबदार धरतां येईल हें मला माहीत नाहीं, ह्या देशांतून येणाऱ्या बातम्यांत फार अतिशयोक्ति असावी व आज जी अव्यवस्था ह्या देशांत माजली आहे त्याबद्दल कांहीं अंशानें युरोपियन राष्ट्रेंच जबाबदार आहेत असें मला वाटतें. परंतु तुर्की सत्ता बंद पाडणें अगर तुर्की साम्राज्याचे तुकडे पाडणें अगर तें कमकुवत करणें, ह्यापेक्षां दुसऱ्या उपायांनीं दोस्त राष्ट्रांना ही अराजकता सहज नाहींशी करितां येईल. दोस्त सरकारावर हा कांहीं नवा प्रसंग नाहीं. जर तुर्कस्थानची विभागणी करावयाची होती, तर तसें युद्धारंभीं जाहीर करावयाचें होतें. मग वचनभंग हा प्रश्नच उत्पन्न झाला नसता. आज कोणाहि हिंदी-मुस-

समानाला ब्रिटिश प्रधानाच्या वचनाची किंमत वाटत नाहीं. त्याच्या मतें तुर्कस्थानाविरुद्धची ही ओरड इस्लामच्या विरुद्ध ख्रिश्चन धर्मांची चढाई आहे. इंग्लंड यांतले पुढारी आहे. "इंग्लंडपेक्षां फ्रेंच सरकारची व लोकांचीच शिष्टमंडळाला जास्त सहानुभूति आहे' ही महमदअल्लींची तार हें मत जास्तच दृढ करीत आहे.

जर हिंदी मुसलमानांचा पक्ष सत्पक्ष असेल व धार्मिक ग्रंथाचा त्यांना आधार असेल, व तोहि आहे असें मला वाटतें, तर हिंदू लोकांनीं त्यांना शक्य ती मदत न करणें म्हणजे भ्याड बंधुद्रोह आहे; व ह्यापुढें मुसलमान लोकांनीं त्यांना माननीय मानावें असा त्यांचा अधिकार राहणार नाहीं. धर्माज्ञेप्रमाणें खिलाफत कायम राखण्याकरितां मुसलमानांना जर समाज-सेवक या नात्यानें मी मदत करणार नाहीं, तर मी माझ्या जागेला अपात्र ठरेन. मुसलमानांना मदत करण्यांत मी साम्राज्याचीच सेवा करीत आहे: कारण त्यांच्या मतांना पद्धतशीर स्वरूप देण्याकरितां मुसलमानांना मदत केल्यानेंच चळवळ अगदीं व्यवस्थितपणें चालू शकते; इतकेंच काय पण विजयी होऊं शकते. —२८ एप्रिल १९२०

---

# असहकारिता

टाईम्स ऑफ इंडियामधील एक लेखक, त्या अजब दैनिकाचा संपादक व मिसेस बेझंट ह्या तिघांनीं आपापल्या पद्धतीनें असहकारितेचा निषेध केला आहे. ह्या तिघांच्या लेखनांतील दोन मुख्य मुद्द्यांना उत्तर देण्याचा माझा विचार आहे. असहकारितेच्या चळवळींत अत्याचार टाळणें अशक्य नसलें तरी कठीण आहे, असें ह्या लेखकांचें म्हणणें आहे. अत्याचाराला अगोदरच सुरवात झाली अशी टाइम्स ऑफ इंडियानें ओरड सुरू केली आहे. पुरावा काय? तर दिल्लीमध्यें व कलकत्यामध्यें लोकांना वाळींत टाकण्यास सुरवात झाली आहे. ह्या चळवळींत सामाजिक बहिष्कार सर्वतोपरि टाकणें शक्य नाहीं, अशी मला भीति वाटते. सत्याग्रह—चळवळीच्या सुरवातीला दक्षिण आफ्रिकेंत ज्या लोकांनीं माघार घेतली त्यांच्यावर समाजांनीं बहिष्कार टाकल्याचें मला स्मरतें. सामाजिक बहिष्कार अत्याचारी अगर निरुपद्रवी रहाणें हें तो ज्या पद्धतीनें अमलांत येईल तिच्यावर अवलंबून आहे. जो पाद्री स्वतःच्या मानापेक्षां पदवीची किंमत ज्यास्त समजतो त्याच्या देवळांत प्रार्थना करण्याचें जर लोकांनीं नाकारलें तर त्यांत वावगें काय

आहे ? अपमान, अपयश व व्यंजोक्ति ह्या उपायांनीं जर एखाद्या व्यक्तीचें जीवित असह्य केलें तर मात्र सामाजिक बहिष्कार अत्याचारी होईल. असहकारितेच्या चळवळींत पडणारे लोक जर अधीर व सुडाच्या इच्छेनें प्रेरित होतील तर अत्याचार होण्याची खरी भीति आहे. लोकांना कर न देण्याचा अगर शिपायांना हत्यारें खालीं ठेवण्याचा सल्ला जर एकदम देण्यांत येईल तर तसें होण्याचा संभव आहे; परंतु मला ह्यापासून दुष्परिणाम होतील असें वाटत नाहीं. ह्याचें अगदीं सबळ कारण म्हटलें म्हणजे प्रत्येक जबाबदार मुसलमान गृहस्थास असहकारितेची चळवळ विजयी होण्याला अत्याचाराचा तिला स्पर्शीहि होतां कामा नये, ह्याची पूर्ण जाणीव आहे. दुसरा मुद्दा असा आहे कीं, जे लोक नोकरी सोडतील ते लोक उपाशी मरतील. तसें होणें शक्य आहे; परंतु ती फार लांबची गोष्ट आहे. कारण जे एकदम नोकरी सोडल्यामुळें घरीं बसतील त्यांची कमिटी योग्य ती तरतूद करील. ह्या प्रश्नाचा पुढील एका अंकांत सविस्तरपणें विचार करून जर हिंदुमुसलमानांच्या धार्मिक समजुती मानावयाच्या असतील तर असहकारितेशिवाय दुसरा मार्गच उरला नाहीं, हें दाखविण्याचा माझा विचार आहे. —२८एप्रील १९२०

---

# असहकारयोग

लोकांना असहकारयोगाबद्दल वाटत असलेल्या शंकांचें व भीतीचें निरसन करण्याकरितां उत्तम मार्ग म्हटला म्हणजे असहकारयोगाची पद्धतशीर मांडणी करणें हा होय. असहकारयोगाचा सर्व कार्यक्रम एकदम अमलांत आणण्याचा आमचा विचार आहे अशी प्रतिपक्षानें आपली समजूत करून घेतली आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, ह्या कार्यक्रमाचे निश्चित असे क्रमशः चार भाग करण्यांत आले आहेत. पहिल्या भागांत पदव्या व मानाच्या जागा सोडून देणें ह्या गोष्टी येतात. एवढें करून जर काम भागलें नाहीं तर दुसरा भाग अमलांत आणण्यांत येईल; परंतु ह्या भागाची अंमलबजावणी करण्याकरतां पूर्वतयारी करावी लागेल. जोंपर्यंत सरकारी नोकराला स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबाचें स्वतंत्र रीतीनें पोट भरण्याचें सामर्थ्य येणार नाहीं किंवा खिलाफत कमिटीला त्याची व्यवस्था लावतां येणार नाहीं तोंपर्यंत खात्रीनें एकाहि सरकारी नोकराला नोकरी

सोडण्याविषयीं सांगण्यांत येणार नाहीं. सर्वच खात्यांतील नोकरांना आपल्या नोकऱ्या एकाच वेळेला सोडून देण्यास सांगितलें जाणार नाहीं व एकाहि सरकारी नोकरावर सरकारी संबंध सोडण्याबद्दल बळजबरी करण्यांत येणार नाहीं, एकाहि खाजगी नोकराला नोकरी सोड असे सांगण्यांत येणार नाहीं; कारण ही चळवळ इंग्रज ज्ञातीविरुद्ध नाहीं. ती सरकारविरुद्धहि नाहीं. अन्यायाचें-वचनभंग-धर्मछलाचे वांटेकरी होऊं नये म्हणून हिंदुस्थान सरकारशीं सहकारिता करण्याचें बंद करावयाचें आहे. खिलाफत कमिटीच्या एखाद्या सभासदानें एखाद्या सरकारी नोकरावर बलात्कार केल्यास अगर अत्याचाराला मदत केल्यास त्या चळवळीला धक्का बसेल, हें अगदीं साहजिक आहे. जर लोकांची पुरेशी मदत मिळाली तर दुसऱ्या भागानें कार्यसिद्धि झालीच पाहिजे: कारण कोणतेंहि सरकार व विशेषतः हिंदुस्थान सरकार लोकांनीं त्याची नोकरी करण्याचें नाकारल्यास एक पळहि जिवंत राहणें शक्य नाहीं. पोलिस व लष्करी लोकांनीं-तिसरा भाग-नोकरी सोडण्याचें फार दूरचें कार्य आहे: परंतु आपलें वर्तन शुद्ध व निष्कपट असावें व त्याबद्दल कोणालाहि शंका घेतां येऊं नये अशी आमची इच्छा आहे. दैववशात जरूर पडल्यास जी गोष्ट करण्याचा आमच्या मनाचा हेतु आहे ती सरकारापासून अगर लोकांपासून चोरून ठेवावी अशी आमची इच्छा नव्हती. कर देण्याचें बंद करणें हा कार्यक्रमांतील चौथा भाग अगदींच दूरचा आहे. सामान्यपणें कर न देण्याची चळवळ करणें अत्यंत धोक्याचें आहे. त्या गोष्टीची ह्या चळवळीच्या चालकांना जाणीव आहे. त्या भागांत भावड्या लोकांचा व पोलिसांचा संबंध येण्याचा संभव आहे. लोक अत्याचार करणार नाहींत अशी खात्री झाल्याशिवाय चालक ह्या भागाच्या अंमलबजावणीस सुरवात करणार नाहींत.

असहकारितेचा मार्ग संकटमय नाहीं असें नाहीं, हें मीं कबूल केलें आहे: परंतु असहकारिता करण्यापासून अत्याचार होण्याची जी भीति आहे त्यापेक्षां आणीबाणीच्या प्रसंगीं स्वस्थ बसल्यानें ओढवणाऱ्या संकटाची भीति कितीतरी पटीनें ज्यास्त आहे. कांहीं न करणें म्हणजेच अत्याचाराला खात्रीनें आमंत्रण देण्यासारखें आहे.

असहकारितेचा निषेध करणारे ठराव पास करणें अगर लेख लिहिणें फार सोपें आहे: परंतु अन्यायाची चीड येऊच अनावर झालेल्या लोकांचा क्रोध आवरणें सोपें काम नाहीं. खुर्चीवर बसून असहकारितेविरुद्ध बडबड

करणाऱ्या लोकांना माझें असें सांगणें आहे कीं, त्यांनीं खुर्ची सोडून जरा लोकांत मिसळावें, त्यांच्या मनोवृत्ती समजावून घ्याव्यात, व मग छाती झाली तर असहकारितेविरुद्ध लेख लिहावेत. माझ्याप्रमाणें त्यांनाहि आढळून येईल कीं, लोकांच्या गाऱ्हाण्यांची खात्रीनें दाद लागेल अशा रीतीनें त्यांच्या मनोविकारांना वाट देणें हा एकच अत्याचार टाळण्याचा मार्ग आहे. असहकारिता हा एकच मार्ग मला सांपडला. तो तर्कशास्त्राला धरून असून निरुपद्रवी आहे. जें सरकार आपलें ऐकत नाहीं त्याला मदत करण्याचें नाकारणें हा प्रत्येक प्रजाजनाचा जन्मसिद्ध हक्क आहे.

वाटेल ते हाल सोसण्याला लोक तयार होण्याइतकें जर लोकांचें दुःख खरें व खोल असेल तरच असहकारितेची चळवळ फक्त आपखुषीच्या तत्वावर विजयी होऊं शकेल. जर मुसलमानांच्या धार्मिक समजुतींना जबर धक्का बसला असेल, व जर हिंदु लोकांना मुसलमान बंधूंविषयीं शेजार प्रेम वाटत असेल तर ते दोघेहि आपला हेतु साध्य करण्याकरितां वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास मागें पहाणार नाहींत. असहकारिता फलदायी होईल एवढेंच नव्हे तर ती मुसलमानांची आपल्या धर्माविषयींच्या कळकळीची व हिंदु लोकांच्या मुसलमानांच्या मैत्रीची पारख होईल.

खिलाफत चळवळींत मी सामील होऊं नये असा माझ्या मित्रांचा एक मुद्दा आहे. माझ्यासारख्या इंग्लिशांच्या मित्राला, ब्रिटिश राज्यघटनेच्या चहात्याला ज्यांचें अंतःकरण इंग्लिशांच्या द्वेषानें आज भरून गेलें आहे अशा लोकांशीं दोस्ती करणें शोभत नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे. आज सामान्य मुसलमानांच्या अंतःकरणांत इंग्लिशाविषयीं प्रेम वसत नाहीं ही गोष्ट मला मोठ्या दुःखानें कबूल करावी लागते. इंग्लिश लोकांनीं आपलें व्रत पाळलें नाहीं असें मला सकारण वाटतें. परंतु मी जितका इंग्लिशांचा मित्र आहे तितकाच माझ्या मुसलमान बंधूचाहि पण आहे. शिवाय ते माझे देशबंधु असल्यामुळें इंग्लीशापेक्षां त्यांचा माझ्यावर ज्यास्त हक्क आहे. इंग्लिश लोकांना दुखविल्याशिवाय इतकेंच काय पण कोणाहि मानवी प्राण्याला दुखविल्याशिवाय माझ्या देशबंधूंची सेवा करण्याची वांव माझा वैयक्तिक धर्म मला देतो. जें माझ्या सख्या भावाला करण्याला मी तयार नाहीं तें मी इंग्लिश मनुष्यालाहि करणार नाहीं. कोणी मला राज्य देऊं केलें तरी मी त्याला इजा करणार नाहीं; परंतु आवश्यक वाटल्यास मी त्याच्याशीं सहकारिता करण्याचें बंद करीन; मी माझ्या प्रत्यक्ष भावाशीं असहकारिता केली होती. वस्तुतः अन्यायाचा

वांटेकरी होण्याचें नाकारल्यानें मी साम्राज्याची सेवा करीत आहे. बोअर युद्धाच्या वेळीं विल्यमासिडर्ना स्वतः इंग्लिश गृहस्थ असतांहि त्यांनीं इंग्लिश सैन्याचा पराभव व्हावा अशी ईश्वराची प्रार्थना केली. कारण आपल्या राष्ट्राचा असत्पक्ष आहे असें त्याला वाटत होतें. सध्यांच्या मुख्य मंत्र्यांनीं वरील युद्धाला विरोध करण्याकरितां आपला जीव धोक्यांत घातला; व युद्धाच्या कामांत आपल्या सरकारला अडथळे आणण्याकरितां शक्य ते प्रयत्न केले. मुसलमान समाजांतील पुष्कळ लोक ब्रिटिशांचे आज मित्र नाहींत हें माहित असूनहि जर मी मुसलमानांचा पक्ष उचलला असेल तर इंग्लिशांचा मित्र ह्या नात्यानेंच उचला आहे. न्याय मिळवाबा व निश्चयाला स्वार्थत्यागाची जोड दिल्यास कोणत्याहि गाऱ्हाण्याची दाद ब्रिटिश राज्यघटनेंत लागलीच पाहिजे हें सिद्ध करण्याचा माझा उद्देश आहे सत्याग्रहाच्या जोरावर विरुद्ध पक्ष बलिष्ठ असला तरी न्याय मिळवावा, इतर सर्व मार्गापेक्षां हा सत्याग्रहाचा मार्ग श्रेष्ठ आहे असें सिद्ध करून दाखवावें, हिंदु व मुसलमानामध्यें एकी करून देशांत शांतता स्थापावी, ब्रिटिश लोकांबद्दल व ब्रिटिश राज्यघटनेबद्दल लोकांना वाटत असलेला द्वेष काढून, त्याजागीं प्रेमाचा वृक्ष लावावा हे माझे मुसलमानाशीं सख्य करण्यांत उद्देश आहेत. माझे हेतू कदाचित् सफल होणार नाहींत. प्रयत्न करणें माझ्या हातांत आहे, यश देणें परमेश्वराच्या स्वाधीन आहे; परंतु माझे हेतु स्तुत्य आहेत हें कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. हिंदु मुसलमानांचें ओझें हलकें करण्याकरितां हिंदु व इंग्लिश लोकांनीं अंतःकरणपूर्वक मदत करावी अशी माझी विनंति आहे. हें खात्रीनें धर्मयुद्ध आहे. व्हाईसरॉय साहेब, स्टेट सेक्रेटरी, बिकानेरचे महाराज व लार्ड सिंह ह्यांनीं ह्या म्हणण्याला पुष्टि दिली आहे ही पुष्टि खरी करून दाखविण्याची वेळ आली आहे. ज्या लोकांचा सत्पक्ष आहे ते नुसता निषेध करून स्वस्थ बसत नाहींत. सत्याकरतां ते प्राणाची आहुति देतात. मुसलमानासारखें धर्माभिमानी लोक या परीक्षेंत उतरणार नाहींत काय ?

—५ मे १९२०

# साधूहि नव्हे व राजकारणीहि नव्हे !

" मि. गांधी हे साधु पुरुष म्हणून प्रसिद्ध आहेत परंतु त्यांच्या अंतःकरणांतील राजकारणविषयक आकांक्षा ह्या सत्पुरुषाला शोभणाऱ्य

मनोभावनांवरहि ताण करतात व ही गोष्ट गांधींच्या हरताळ पाडण्याच्या धोरणानें सिद्ध झाली आहे " अशा आशयाचा " ईस्ट ॲन्ड वेस्ट " या मासिकाच्या एप्रिल महिन्याच्या अंकांतील एक उतारा महात्मा गांधींच्या-कडे एका स्नेह्यानें पाठविला: त्याला उत्तर देतांना महात्माजी लिहितात:-

मी हा उतारा सर्वच्या सर्वच दिला आहे. माझ्यासंबंधानें किंवा माझ्या मार्गासंबंधानें कोणी टीका केली असतां, त्यामुळें मी एकादी चूक कबूल करून गप्प बसत आहे किंवा ज्या तत्वासंबंधानें टीका करण्यांत आली त्या तत्वाची अंमलबजावणी टीकाकाराकडे लक्ष न देतां तशीच चालू ठेवली आहे अशी परिस्थिति नसेल तर असल्या टीकांकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, असा माझा नियम आहे; परंतु हा उतारा विचारांत घेण्यास दुहेरी कारण झालें आहे. या टीकेला उत्तर देऊन मला प्रिय असलेल्या तत्वाचें मला अधिक स्पष्टीकरण करतां येईल; इतकेंच नव्हे तर त्याबरोबरच ज्या गृहस्थांनीं ही टीका केली आहे त्यांच्यासंबंधाचा माझ्या मनांत असलेला आदरहि मला व्यक्त करतां येईल. मी एक साधु पुरुष असावें अशी अट-कळ असतांना माझ्यांत राजकारणी पुरुषाचे गुण दिसत आहेत याबद्दल टीकाकारांना खेद वाटत आहे. 'साधू' ( सेंट ) हा शब्द हल्लींच्या व्यवहारांतून काढून टाकावा, असें माझें मत आहे. हा शब्द अत्यंत पवित्र असून कोणत्याहि माणसाच्या, विशेषतः माझ्यासारख्या माणसाच्या बाब-तींत तरी इतक्या सहजासहजीं त्याचा उपयोग करणें गैरशिस्त आहे. सत्यशोधनाच्या मार्गांतील मी एक गरीब वाटाड्या आहे, अशी माझ्या संबंधानें माझी कल्पना आहे. माझ्या कार्य क्षेत्राची मर्यादा किती आहे हें मी जाणतों. माझ्याहातून चुकाहि होतात. आणि या चुका माझ्यामुळें झाल्या असें मला कळल्यावर त्य कबूल करण्यासहि मी मागेंपुढें पहात नाहीं. एकाद्या शास्त्रज्ञाप्रमाणें मनुष्याच्या जीवनक्रमांतील कांहीं भिन्न भिन्न सनातन तत्वासंबंधानें मी प्रयोग करून पहात आहे, असें मोकळ्या मनानें सांगण्यास मला कांहीं वाटत नाहीं. तथापि मी ज्या मार्गाचा अवलंब केला आहे त्यांत शास्त्रशुद्ध बिनचूकपणा आहे हें दाखविण्याइतका पुरावा मजपाशीं नाहीं, व अर्वाचीन शास्त्र ज्यांची अपेक्षा करते अशाप्रकारचे माझ्या प्रयोगामुळें झालेले कांहींतरी प्रत्यक्ष परिणाम मला दाखवितां येत नाहींत. यामुळें मी तशाप्रकारचा एक शास्त्रज्ञ आहे असा अभिमानहि मी बाळगीत नाहीं; परंतु मी साधु नाहीं असें म्हटल्यानें माझ्या टीकाकारांच्या आशा नष्ट

होतात असें दिसत असलें तरी माझ्यांतील राजकारणी गुणांनां मी ठरविलेला एकहि निश्चय कधींहि हाणून पाडला नाहीं एवढें सांगितलें, म्हणजे माझ्या या वर्तनासंबंधानें त्यांना जो खेद होत आहे तो नाहींसा होईल; पण मी राजकारणांत कां भाग घ्यावा असें कोणाला वाटत असेल तर त्यांचें कारण एवढेंच कीं, या राजकारणाचें एकाद्या सर्पाप्रमाणें आमच्या भोंवतीं वेटाळें असून कोणी कितीहि प्रयत्न केला तरी त्यांतून त्याला बाहेर पडणें शक्य नाहीं. म्हणूनच या सर्पाबरोबर दोन हात करण्याची माझी इच्छा आहे. यशःप्राप्ती होवो या न होवो या सर्पाबरोबर १८९४ पासून जाणूनबुजून मी झुंजत आहे. आणि यापूर्वींहि मला समजूं लागल्यापासून न कळत कां होईना या सर्पाशीं मी झगडत होतों असें मला आतां कळून चुकलें आहे. अगदीं स्वार्थबुद्धीनें कां होईना माझ्या भोंवतीं चाललेल्या या वादळांत शांत मनानें राहावें अशी माझी इच्छा असून, राजकारणांत धार्मिक भावनांचा समावेश करून तो इच्छा कशी काय सफल होते याचा प्रयोग माझ्यावर व माझ्या कांहीं मित्रावर मी करून पहात आहे. धर्मासंबंधानें माझी काय कल्पना आहे हें मी सांगतों. सर्व धर्मांत हिंदु धर्म खात्रीनें श्रेष्ठ आहे; पण मी ज्या धर्मासंबंधानें विचार करतों तो धर्म हिंदु धर्म नसून त्याच्याहून श्रेष्ठतम आहे; तो धर्म मनुष्याचा सहज स्वभावहि वदलून टाकतो, अंतःकरणांत सांठविलेल्या सत्य तत्वाशीं मनुष्याची तो एकतानता करतो व मनुष्याची अंतर्बाह्य शुद्धि केव्हांहि बिघडूं देत नाहीं. मनुष्यस्वभावांतलि तें सनातन तत्व आहे. या तत्वाचें प्रकाशन करण्याकरितां कितीहि किंमत द्यावी लागली तरी ती पुरी पडणार नाहीं. हें तत्व हातीं लागेपर्यंत, या तत्वाच्या कर्त्याची ओळख पटेपर्यंत आणि या कर्त्याशीं स्वतःचें तादात्म्य होईपर्यंत आत्म्याची तळमळ नाहींशी होणार नाहीं.

धर्मभावनेच्या या पायरीवर उभे राहून मीं हरताळ पाडण्याचें ठरविलें. साक्षरतेमुळें हिंदुस्थानास आत्मत्वाची जाणीव होणार नाहीं किंवा हिंदुस्थानांतील शहाणे लोक एकत्र येणार नाहींत, हेंच मला या हरताळानें दाखवावयाचें होतें. या हरताळामुळें ता. ६ एप्रिल १९१९ रोजीं यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें सर्व हिंदुस्थानांत आत्मज्ञानाचा प्रकाश पडला, आणि जर आपल्या अन्यायी कृत्यांचा जाणीव असलेल्या सरकाराच्या कानांत सैतानानें भीतीचा मंत्र फुंकला

नसता, ता. १० एप्रील रोजीं लोकांच्या या कार्यांत सरकारनें अडथळा आणला नसता व विश्वासाच्या अत्यंताभावामुळें सरकारविरुद्ध क्षुब्ध झालेल्या लोकांना चेतविलें नसतें, तर हिंदुस्थानची कल्पनेबाहेर उन्नति झाली असती. देशांतील बहुजन समाजानें खऱ्या धार्मिक भावनेनें प्रेरित होऊन हें हरताळाचें कार्य हातीं घेतलें असतें; इतकेंच नव्हे तर राजकीय आपल्या देशांतील चळवळींतील निरनिराळ्या चढत्या पायऱ्या चढण्याच्या रोखठोक उपायास या हरताळामुळें प्रारंभ झाला असता. या रोखठोक उपयाच्या बाबतींतच माझ्या टीकाकाराचा माझ्याशीं विरोध आहे. यामुळें देशांत एकी घडवून आणण्याचें कार्य होणार नाहीं, असें त्याचें म्हणणें आहे. रोखठोक उपयाची कांस धरल्याशिवाय जगांत कोणतेंहि कार्य सिद्धीस गेलेलें नाहीं. निःशस्त्रप्रतिकार या शब्दाचा मी त्याग केला; कारण तो शब्द माझ्या मनांतील भावना व्यक्त करण्यास पुरेसा नसून दुर्बळाचें हें एक शस्त्र आहे, असाहि त्याचा अर्थ केला जातो. दक्षिण आफ्रिकेंतील या रोखठोक उपयाचा इतका उत्कृष्ट परिणाम झाला कीं, ज. स्मटस् यांनाहि त्यानें ताळ्यावर आणलें. १९०६ सालीं हिंदी लोकांच्या आकांक्षांचे ज. स्मटस हे कट्टे विरोधी होते. युनियनसरकारच्या कायदे बुकांतील एक अपमानास्पद कलम उशीरानें कां होईना पण तें काढून टाकण्यांत त्यांना अभिमान वाटला; पण १९०९ सालीं याच बाबतींत लॉर्ड मोर्ले यांच्याशीं भाषण करतांना ट्रान्सवालच्या कायदेमंडळानें दोनदां पास केलेलें हें कलम रद्द करणें द. आफ्रिकेला कधींहि सहन होणार नाहीं, असें त्यांनीं बोलून दाखविलें होतें; परंतु यापेक्षांहि पुढें जाऊन बोलावयाचें म्हणजे या आठ वर्षे चाललेल्या रोखठोक उपायामुळें कोणामध्येंहि द्वेषभाव उत्पन्न झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर ज. स्मटसविरुद्ध जोरानें लढत चालविलेल्या त्याच हिंदी लोकांनीं त्यांच्याच निशाणाखालीं जमा होऊन १९१५ सालीं पूर्व आफ्रिकेंत जर्मनांशीं लढाई केली. चंपारण्यांत पिढ्यानपिढ्या चालू असलेलें गाऱ्हाणें या रोखठोक उपयामुळेंच यशस्वी झालें. दुर्बलतेमुळें संतापानें जळजळत असतांना आपल्यावरील एकादें संकट नाहींसें झालेलें पाहून एकाद्याला आनंद वाटेल; पण ही गोष्ट एकी घडवून आणण्यास उपयोगी पडत नाहीं, इतकेंच नव्हे तर हा दुर्बल पक्ष संकट नाहींसें झालें तरी असंतुष्ट व क्षुब्धच राहतो व संधि आली असती त्याच्या मनोवृत्तींचा स्फोट झाल्याखेरीज राहत नाहीं. दुर्बल पक्षाची कड घेऊन, अचूक, निश्चयात्मक व निर्दोष मार्गाची दिशा त्याला दाखवून मनगटाच्या सामर्थ्याची पर्वा न

वाळगण्याइतकें मनःसामर्थ्य मी त्यांच्यांत उत्पन्न करतों. हा झगडा चालविण्याइतकें सामर्थ्य आपल्यांत आहे, असें त्याला वाटूं लागतें, आत्मविश्वासाचें बळ त्याच्या आंगीं येतें व या झगड्यांत यश मिळविण्याचा उपाय आपल्याच हातीं आहे, असें त्याला वाटूं लागतें. यामुळेंत्याच्या मनांतील सुडाची भावना नष्ट होते आणि जो अन्याय नाहींसा करण्याबद्दल त्याचा प्रयत्न चाललेला होता तो त्याचा पयत्न यशस्वी झालेला पाहून, समाधान वृत्तीनें राहण्याचें शिक्षण त्याला आपोआप मिळतें.

जालियांवाला बागेचें स्मारक करण्याच्या कामीं याच उद्देशानें मी प्रवृत्त झालों आहें; ईस्ट ॲन्ड वेस्टमधील लेखकानें माझ्या ध्यानींमनींहि नाहीं असा उद्देश हें स्मारक करण्यांत आहे, असें माझ्या माथीं मारलें आहे. जालियांवाला बागेंत झालेल्या गोळीबाराचें मी स्मारक करूं इच्छितों असें या लेखकाचें म्हणणें आहे या कृष्णकृत्याचें स्मरण लोकांना कायमचें रहावें अशी कल्पनाहि माझ्या मनांत येणें शक्य नाहीं. आम्ही आमचें स्वराज्य प्राप्त करून घेण्यापूर्वी असल्या शोचनीय प्रसंगांची पुनरावृत्ति होईल असें वाटतें म्हणूनच या कत्तलींत बळी पडलेल्या निरपराधी लोकांचें स्मारक करून त्या प्रसंगाकारितां राष्ट्राच्या मनाची तयारी मला करावयाची आहे. विधवांना व पोरक्या मुलांना मदत दिली गेली आहे व दिली जातहि आहे; पण आपण कशाकारितां मृत्युमुखीं पडलों याची कल्पनाहि नसलेल्या लोकांच्या आत्म्यांचें समाधान, या निरपराधी लोकांच्या रक्तानें पवित्र झालेली जमीन आपण विकत घेतली नाहीं व त्यांचें योग्य स्मारक त्या ठिकाणीं उभारलें नाहीं तर आम्ही करूं शकणार नाहीं. या दुष्कृत्याचें स्मरण करून देण्याकरितां या स्मारकाचा उपयोग होणार नाहीं; तर जुलमी म्हणवून घेऊन मरण्यापेक्षां जुलमाला बळी पडलेलें निःशस्त्र व दुबळे म्हणून मरणें फार बरें अशीच विचारसरणी राष्ट्रांत उत्पन्न करण्याकारितां या स्मारकाचा उपयोग होईल. निरपराधी लोकांना मरतांना आम्ही पाहिलें: पण कृतघ्नपणानें त्यांचें स्मारक करण्याचें आम्ही नाकारलें नाहीं. हें स्मारक केल्यानें आम्ही जिवंत कां राहिलों याची सबब तरी सांगतां येईल, असें मिसेस जिना यांनीं या फंडाला मदत करतांना उद्गार काढले ते अगदीं खरे आहेत. एकंदरींत ज्या भावनेनें हें स्मारक उभारलें जाईल त्यावरूनच तें कां उभारलें गेलें याचा उद्देश निर्णित केला जाईल.

कोणत्या व्यापक तत्वाच्या आधारावर बुद्ध व ख्राइस्ट यांनीं आपल्या धर्माची उभारणा केली ? बुद्धानें प्रत्यक्ष शत्रूच्या गोटांत शिरून

निर्भयपणानें लढाई मारली व उद्धत झालेल्या धर्मगुरूंना आपल्या चरणाप्राशीं नमावयास लावलें. ख्राइस्टनें जेरुस्लेम येथील मंदिरांतून पैशाची देवघेव करणारांना हांकून लावलें आणि ढोंगी लोकांना परमेश्वरी क्षोभाच्या होमांत बळी दिले. हे दोघेहि सत्पुरुष संकटाला प्रत्यक्ष तोंड देण्याच्या तत्वाचे कट्टे पुरस्कर्ते होते; परंतु बुद्ध व ख्राइस्ट यांनीं कुमार्गी लोकांना ताळ्यावर आणले तरी आपल्या कृत्याच्या मागें प्रेमाचा व अलोट शांतीचा पाठिंबा असल्याचें सिद्ध केलें. आपल्या शत्रूंविरुद्ध त्यांनीं आपलें बोटहि उचललें नाहीं; परंतु ज्या सत्याच्या रक्षणाकरिता ते जिवंत राहिले तें सत्यतत्व सोडून देण्यापेक्षां आपण स्वतःच बळी जाण्याचें त्यांनीं आनंदानें पत्करलें. धर्मगुरूंना नमविण्याचें कार्य प्रेमाच्या शक्तीवर आपल्याला करतां येत नाहीं असें दिसून आलें असतें तर बुद्धानें या धर्मगुरूंना विरोध करण्याच्या कामीं मरण आलें असतें तरी तें त्यानें पत्करलें असतें. एक सबंध साम्राज्याच्या साम्राज्य विरुद्ध असतांना त्याच्या शक्तीला न जुमानतां कंटकमय मुकुट डोक्यावर चढवून घेऊन क्रॉसवर ख्राइस्टनें आपलें प्राणोत्क्रमण होऊं दिलें. आणि अहिंसामूलक विरोधाचें निशाण मी उभारण्यांत माझ्या ज्या दोन धर्मोपदेशकांचा उल्लेख केला आहे त्यांच्याच पाउलांवर विनीत अंतःकरणानें पाउलें टाकण्यापेक्षां मी दुसरें कांहीं करीत नाहीं, असें मला वाटतें.

शेवटीं या लेखकानें मी लहान लहान संघ बनवीत आहे याबद्दलच तक्रार करून, सर्व जगाचें ऐक्य घडवून आणण्याचें मोठें कार्य मी आंगावर घ्यावें अशी इच्छा त्यानें प्रकट केली आहे. या लेखकापेक्षांहि विश्वबंधुत्वाच्या तत्वाचा मी जास्त चहाता आहे, असें त्याला मी सांगितलें होतें. मी त्यावेळीं जें बोललों त्याचप्रमाणें अद्यापहि चालण्यास मी तयार आहे; असे लहान संघ एकत्र केल्याखेरीज सर्व जगाचें ऐक्य साधण्यास मी कधींहि समर्थ होणार नाहीं. आमच्या शेजारीं असणाऱ्या राष्ट्रांचा पिच्छा पुरविण्याचें आम्हां सोडून दिलें तर यापुढें आमच्याकडून कोणत्याहि मदतीची अपेक्षा न करतां सर्व जग शांततेनें नांदूं लागेल असें टॉलस्टॉय एकदां म्हणाले होते. आणि आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यावर झडप घालण्याचें बंद करून त्यांना मदत करण्याचें आम्ही पत्करलें तर अशा रीतीनें एकत्र झालेल्या संघाचें वर्तुळ वाढत जाऊन शेवटीं तें इतकें मोठें होईल कीं, सर्व जगाला व्यापून टाकल्याशिवाय तें राहणार नाहीं; शिवाय हें कार्य करण्याचा प्रयत्न एकाच माणसानें करावा किंवा न ाच

माणसाला त्यांत यश संपादन करतां येईल असेंहि नाहीं, " यथा पिंडे तथा ब्रह्मांडे " हें वचन एका अज्ञान ऋषीनें ज्या कित्येक युगांपूर्वी उच्चारलें त्यावेळीं तें जितकें खरें होतें तितकेंच तें आजहि खरें आहे.

—१२ मे १९२०

---

# खिलाफत

खिलाफतीच्या प्रश्नासंबंधानें ग्रेटब्रिटनमधील एका चांगल्या दर्जाच्या इंग्रज गृहस्थानें हिंदुस्थानांतील आपल्या एका स्नेह्यास पाठविलेल्या पत्राचा उतारा उद्धृत करून, त्यास उत्तर देतांना महात्मा गांधी लिहितात कीं:—

हें पत्र फारच नमुनेदार, प्रामाणिक बुद्धीनें लिहिलेलें व मुद्देसूद असें आहे; परंतु या पत्रांत लेखकानें जें धोरण प्रदर्शित केलें आहे त्याची उभारणी अपुऱ्या व खोट्या माहितीवरून केलेली आहे आणि या अशा अनवस्थेमुळें ब्रिटिश लोकांपुढें असलेल्या बऱ्याच कार्याचा नाश झाला आहे. अलीकडल्या वर्तमानपत्रांतून आढळून येणाऱ्या वरकरणीपणा, एकदेशीपणा चुकीची माहिती व अप्रामाणिकपणा ह्या गोष्टी फक्त न्याय मिळावा हें पाहणाऱ्या प्रामाणिक मनुष्याचा सुद्धां बुद्धिभेद केल्याशिवाय रहित नाहीत. कोणत्याहि बाबतींत आपापले हितसंबंध रक्षण करणाऱ्या लोकांचे गट असून बऱ्या वाईट कोणत्याहि साधनांनीं आपले हेतू सिद्धीस नेण्याचा त्यांचा धंदाच असतो. आणि न्याय्य बाजू उचलून धरूं इच्छिणारा कितीहि प्रामाणिक इंग्रज असला तरी परस्पर विरुद्ध मतें व निरनिराळ्या प्रकारच्या त्रोटक हकिकती वाचून, बऱ्याच न्यायाच्या ऐवजीं अन्यायाच्या बाजूनें मदत करण्याकडे त्याचें पर्यवसान होतें.

या पत्राच्या लेखकानें कांहीं काल्पनिक गृहीत कृत्यें धरून त्यावर आपली निश्चित अनुमानांची इमारत उभी केली आहे. मुसलमानांचा प्रश्न त्याला ज्या रीतीनें समजला आहे त्या दृष्टीनें त्यानें तो प्रश्न कुचकामाचा आहे, असें चांगल्या रीतीनें दाखवलें आहे. हिंदुस्थानांत या प्रश्नासंबंधानें खऱ्याखुऱ्या हकीकती लपवून ठेवून, भलत्यासलत्या कंड्या उठविणें तितकें सोपें नसल्यामुळें हिंदी मुसलमानांचा या बाबतींतील पक्ष न्यायाचा आहे, असें हिंदुस्थानासंबंधानें सहानुभूति बाळगणार

गृहस्थहि कबूल करतात; परंतु या बाबतींत हिंदुस्थान सरकार व मिस्टर मॉंटेग्यू यांनीं आपल्याकडून शक्य तितका प्रयत्न करून पाहिला आहे, असें ते म्हणतात. आणि जर आतां इस्लामी धर्माच्या विरुद्ध या प्रश्नाचा निकाल लागला तर हिंदी मुसलमानांनीं त्या निकालाखालीं अपरिहार्य म्हणून मान वांकवावी असें त्यांचें म्हणणें आहे. सर्व जबाबदार लोकांची मनें पूर्वग्रहदूषित झालीं नसतीं तर अशा प्रकारची ही आश्चर्यकारक परिस्थितीच उत्पन्न झाली नसती.

या लेखकानें ज्या कल्पनेनें या प्रश्नाचा विचार केला आहे त्याची आतां छाननी करूं. अरब लोक विरुद्ध असतांहि त्यांच्यावर तुर्कांची सत्ता स्थापली गेली पाहिजे, असें हिंदी मुसलमानांना वाटत आहे. हिंदी लोक स्वयंनिर्णयाप्रमाणें आपल्या देशाचा कारभार चालला पाहिजे असें म्हणतात तर अरब लोकहि हा स्वयंनिर्णयाचा हक्क मागत असतील तर या खोट्या धर्मभावना पुढें करून त्यांच्या या हक्कांत ढवळाढवळ करणें इष्ट नाहीं, असें तर्कशास्त्र या लेखकानें लढविलें आहे. आतां खरी गोष्ट अशी आहे कीं, कोणताहि मुसलमान अरबांच्या मनाविरुद्ध अरबस्थानांत तुर्कांची सत्ता स्थापन व्हावी असें म्हणत नाहीं; उलटपक्षीं अरबांच्या स्वराज्याला विरोध करण्याचा आपला मुळींच उद्देश नाहीं, असें ते म्हणत आहेत. अरबांना पूर्ण स्वराज्याचे हक्क मिळून तुर्कांची साम्राज्य सत्ता अरबस्थानांवर रहावी, असेंच त्यांचें म्हणणें आहे. इस्लामाच्या पवित्र क्षेत्रांवर खलीफाची सत्ता रहावी एवढेंच त्यांना पाहिजे आहे. दुसऱ्या शब्दांत बोलायचें म्हणजे लॉइड जॉर्ज साहेबांनीं जे खात्रीलायक अभिवचन दिलें होतें, व ज्या अभिवचनावर विश्वासून दोस्तांच्या बाजूनें लढून मुसलमान शिपायांनीं आपलें रक्त रणांगणावर सांडलें, तें अभिवचन पूर्ण करा, यापेक्षां हिंदी मुसलमानांना जास्त कांहीं नको आहे. जी गोष्ट मुळीं अस्तित्वांतच नव्हती त्याच्यावर हें तर्कशास्त्र रचलें असल्यामुळें तें मपशेल तोंडघशीं पडतें यांत शंका नाहीं. ब्रिटिशांचीं अभिवचनें, शुद्ध न्यायबुद्धि व ध[illegible] या तीन्ही तत्वांचा यांत समावेश झाला आहे; म्हणून
या [illegible] सर्वस्व वाहिलें आहे. शुद्ध न्यायबुद्धीविरुद्ध अंधश्रद्धा
व [illegible] बल खाईल याची मला कल्पना आहे. असें झालें तर
ध[illegible] विरोध करीन व न्यायाकरितां लढत राहीन. ही अभि-
[illegible] च्या बाबतींतहि माझा आग्रह नाहीं; कारण गुप्त तह
[illegible] न्यायीपणाचे हेतू पूर्ण करण्याकरितां अप्रामाणिकपणानें

अशीं अभिवचनें दिलीं जातात याचा अनुभव इंग्लंडलाहि ... जें राष्ट्र आपल्या पवित्र न्यायबुद्धीबद्दल अभिमान बाळगतें ... बाबतींत विरोध करणें केवळ कायदेशीरच नसून आवश्यक ...

हिंदुस्थान स्वतंत्र असतें तर त्यानें या बाबतींत कसें ... या काल्पनिक परिस्थितीचा विचार करणें मला आवश्यक ... आणि असा विचार करणें अनवश्यकहि आहे; कारण ज्या ... हिंदी मुसलमान अर्थात् हिंदी लोक लढत आहेत तें कार्य ... न्यायाचें असून ब्रिटिश लोकांनीं या कार्याला अंतःकरणपूर्वक ... अशी त्यांची मागणी आहे. या कार्यांत केवळ सहानुभूति दाखवून ... वयाचें नाहीं, असें सुचवून ठेवण्यास मला कोणतीहि हरकत वाटत नाहीं. या बाबतींत पण न्याय मिळेल एवढा जबरदस्त पाठिंबा मिळाला पाहिजे असें हें कार्य आहे.

—१२ मे १९२०.

# हिंदुस्थान सरकार दोषी आहे!

[ महात्माजींनीं आपल्या एका मित्राला पत्र पाठवून आपल्या असहकारितेवरील विचाराविषयीं त्याचें मत विचारलें होतें. महात्माजींच्या विनंतीला मान देऊन त्यांच्या मित्रानें जें उत्तर पाठविलें, त्यांत असहकारितेची चळवळ सरकाराविरुद्ध नाहीं ह्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं व सध्यांची चळवळ हिंदुस्थान सरकाराविरुद्ध आहे ती चूक आहे, कारण त्याचा कांहींहि दोष नाहीं असे दोन मुद्दे उपस्थित केले होते. त्याचप्रमाणें जरा आणखी वाट पहावी व नंतर हिंदी लोकांच्या मागण्या मान्य न झाल्यास वाटेल ती कायदेशीर चळवळ करावी अशी सूचना केली होती.]

मी मोठ्या आनंदानें वरील पत्र यंग इंडियांत प्रसिद्ध करीत आहे व त्याला जाहीर रीत्या उत्तर देण्याचे आव्हानाचाहि मी स्वीकार करतों; कारण माझ्या इंग्लिश मित्राप्रमाणें इतर पुष्कळ लोकांनाहि ह्या अडचणी भासतात. साधारणपणें कार्यनाश जो होतो तो प्रतिपक्षानें व्यवस्थित विरोध केल्यामुळें होत नाहीं, तर पूर्ण विचारांतीं एखादें कार्य हातीं घेण्याला जे उत्सुक असतात अशा लोकांना प्रतिपक्षांनीं आपल्या बाजूला वळवून घेतल्यामुळें होतो. अशा लोकांशीं वादविवाद करण्यानें मनुष्याला

... विकाराचें संयमन करता येतें, स्वतःच्या मनांतील दोष सुधा... वेळा त्यांचे दोष दाखवून त्यांना आपल्या बाजूला ... प्रश्न विशेषतः कठीण आहे; त्याच्यावर इतर ... आहेत; ह्यामुळें पुष्कळांना त्याबद्दल आपलें निश्चित ... ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्या बाबतींत कांहीं तरी ...ची जरूरी उत्पन्न झाल्यामुळें हा प्रश्न जास्तच गुंता... आहे.

...ची चळवळ सरकारविरुद्ध नाहीं ह्या माझ्या विधानाला ... हरकत घेतली आहे. कारण त्याच्या मतें सरकारी नोकरी करण्याचें नाकारणें अगर त्याला कर देण्याचें नाकारणें सरकारविरुद्ध आहे. मला हें मत पसंत नाहीं. जर आपला व आपल्या मालकाचा मूलतत्त्वांतच मत-भेद झाला व अशा मालकाशीं सहकारिता करण्यानें जर आपण अन्यायाला कारणीभूत होणार असलों, तर अशा मालकाची नोकरी करण्याचें नाकारणें हें आपलें कर्तव्य आहे असें मला वाटतें. व्यवहारांत नित्य ह्या गोष्टी घडतात. ज्या वेळेला प्रल्हादानें वडिलांच्या ईश्वरनिंदेला संमति देण्याचें नाकारलें तेव्हा त्यानें वडिलांची आज्ञा मोडली कीं नाहीं? वेळेला हेतू-वरून कर्माचा गौरव होत नाहीं काय? सामान्यपणें सरकाराशीं संबंध तोडण्यानें सरकारचा राज्यकारभाराचा गाडा जागच्या जागीं थांबेल हें माझ्या मित्राचें म्हणणें सर्वस्वीं बरोबर नाहीं; पण अशा प्रकारची असहकारिता त्यापुढें अन्याय करणें अशक्य करील ही गोष्ट मात्र खरी आहे.

माझ्या मित्राचें असें म्हणणें आहे कीं, खिलाफतच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारनें त्याला जितकें करणें शक्य होतें तितकें केलें आहे; परंतु माझ्या मतें त्यांना जितकी खटपट करण्याजोगी होती व अजूनहि करता येणें शक्य आहे, त्याच्या अर्धी सुद्धां खटपट त्यानें केलेली नाहीं. लोकमत इतकें तीव्र असतां कोणत्याहि सरकारला नुसता निषेध केला म्हणजे आपली इतिकर्तव्यता संपली, असें समजून भागणार नाहीं. भुकेनें प्राण जात असलेल्या मनुष्याला नुसत्या कोरड्या सहानुभूतीचा काय उपयोग? भाकरी मिळाली तर ठीक; नाहीं तर तो मरणार. अशा आणी-बाणीच्या प्रसंगीं कोठून तरी भाकरीचा तुकडा मिळविण्याकरतां हातपाय हलविले पाहिजेत. आज देशांतील चळवळीचें धुरीणत्व आपल्याकडे घेऊन ब्रिटिश प्रधानानें दिलेलें वचन पूर्ण केलेंच पाहिजे अशी निकराची मागणी

हिंदुस्थान सरकारला ब्रिटिश सरकाराशीं करतां येईल. लॉईड जॉर्जनीं निर्लज्जपण केलेल्या विश्वासघाताचा निषेध म्हणून हिंदुस्थान सरकारनें राजिनामा दिला आहे काय? हिंदुस्थान सरकार गुप्त खलित्याचा कां आश्रय घेत आहे? इतका घोर प्रसंग नव्हता हि लॉर्ड हार्डिजनीं सरकारी रिवाजाचा खून करून जाहीर रीतीनें दक्षिण आफ्रिकेंतील निःशस्त्र प्रति-काराच्या चळवळीबद्दल सहानुभूति प्रकट केली व देशांत जी क्रोधाची लाट उसळली होती तिला आंवरून धरलें. असें करण्यांत दक्षिण आफ्रिकेच्या प्रधान मंडळाचा, इंग्लंदमधील त्यांच्या कांहीं जातभाईंचा जो त्यांच्यावर रोष झाला त्याची त्यांनीं बिलकूल पर्वा केली नाहीं. मुसलमानांचें म्हणणें काय आहे हें वर कळवून त्यावर जोर देण्यापलीकडे हिंदुस्थान सरकारनें कांहीच केलेलें नाहीं. हें करणें म्हणजे कांहींच न करण्यासारखें होतें नव्हे काय? हेंहि केलें नसतें तर त्याचा छीः थूः झाल्याशिवाय राहतें काय? अशा आणीबाणीच्या प्रसंगीं हिंदुस्थान सरकारनें शक्य तितकें करीत करावें अशी मुसलमानांची अपेक्षा नसून, त्यानें जास्तींत जास्त करावें अशी आशा आहे. अगदीं क्षुल्लक कारणाकरतां व्हाइसरॉयांनीं आपल्या जागेचे राजिनामे दिले आहेत; मानभंग झाला म्हणून एका ले. गव्हर्नरनें राजिनामा दिलेल्याला फार काळ लोटलेला नाहीं. लाखों मुसलमानांना जो प्रश्न प्राणाहूनहि प्यार आहे अशा पवित्र खिलाफतीवर संकट असतांना माझ्या इंग्लिश मित्रानें व प्रत्येक इंग्लिश मनुष्यानें, प्रत्येक हिंदूनें मग तो नेमस्त असो अगर जहाल असो, मुसलमानांना मदत करून हिंदुस्थान सरकारला आपलें कर्तव्य करावयाला लावावें.

सक्त असहकारितेपासून अत्याचार होतील, असा पुष्कळांनीं गवगवा केला आहे. जर असहकारितेचा मार्ग सुचविला गेला नसता तर मुसलमान लोक निराशेला केव्हांच बळी पडले असते. असहकारितेपासून धोका नाहीं असें माझें म्हणणें नाहीं. असहकारिता निघाली नसती तर अत्याचार खात्रीनें झाले असते, असहकारिता निघाली आहे तेव्हां कदाचित अत्या-चार होतील. जर इंग्लीश, हिंदू व इतर लोक त्या चळवळीला संमति देणार नाहींत तर अत्याचार होण्याचा संभव जास्त वाढेल. माझ्या मित्रानें जी सूचना केली आहे ती मुसलमान लोक पाळतच आहेत. जरी तुर्कस्थानच्या तहाशीं काय लिहिलें आहे तें त्यांना अगोदरच समजलें आहे, तरी ते तहाच्या अटी प्रत्यक्ष जाहीर होण्याची वाट पाहत आहेत. असहकारितेचें शस्त्र हातीं घेण्यापूर्वी तहांत योग्य फेरफार घडवून आणण्याकरतां शक्य

ते इतर उपाय योजून पाहण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे. हिंदुस्थान सरकार मुसलमानांशीं सक्रिय सहकारिता करील असा जोंपर्यंत आशेचा अगदीं बारीक किरण असेल तोंपर्यंत असहकारितेची चळवळ सुरू करण्यांत येणार नाहीं. मात्र ब्रिटिश वचनाविरुद्ध तहाच्या अटी आहेत, असें आढळून आल्यास त्यांत योग्य ते फेरफार घडवून आणण्याइतकी ती सहकारिता पुरेशी असली पाहिजे; परंतु हे सर्व प्रयत्न फसले तर ज्यांना आपला धर्म प्राणाहून प्रिय आहे अशा स्वाभिमानी मुसलमान लोकांना असहकारितेचा मार्ग अवलंबून ब्रिटिश व हिंदुस्थान सरकारच्या पापाचे भागिदार न होणें, यापेक्षां काय कमी करतां येण्यासारखें आहे? व जर इंग्लिश व हिंदु लोकांना मुसलमानांच्या मैत्रीची चाड असेल व मुसलमानांची बाजू न्यायाची आहे ही गोष्ट जर त्यांना कबूल असेल तर त्यांना मुसलमान लोकांना शब्दानीं व कृतीनें मनापासून मदत करण्याशिवाय काय गत्यंतर आहे?

—१९ मे १९२०

---

# वचनभंग

चातकाप्रमाणें डोळे लागलेल्या तहाच्या अटी अखेर प्रसिद्ध झाल्या. सुप्रीम कौन्सिलाला, ब्रिटिश प्रजाजनांना त्या अटी लज्जास्पद आहेत, असें माझ्या अल्पबुद्धीला वाटतें. खिश्चन धर्माबद्दल मला अत्यंत आदर वाटतो. त्यामुळें माझें म्हणणें जरा थोडें धारिष्ट्याचें असलें तरी त्या अटी खिस्तनीतीला हरताळ फांसणाऱ्या आहेत, असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. अंतःकलहानें मेटाकुटीला आलेला व छिन्नविछिन्न झालेला तुर्कस्थान कदाचित् त्या अटीपुढें मान वांकवील, त्याचप्रमाणें कदाचित् हिंदु मुसलमान कातर होऊन स्वस्थ बसतील. कठोरता असहिष्णुता व अनास्था ह्यामुळें कदाचित हिंदु लोक आपल्या मुसलमान बंधूंला संकट काळीं मदत करणार नाहींत; परंतु मुख्य प्रधानाच्या उदात्त वचनाचा उन्मत्तपणें भंग करण्यांत आला ही गोष्ट यावत् चंद्रदिवाकरौ राहील ही गोष्ट निर्विवाद आहे. प्रे. विल्सनच्या १४ मुद्द्याबद्दल मी कांहीं बोलूं इच्छित नाहीं. कारण जादूच्या खेळाप्रमाणें त्या जगाला एका दिवसांत विसर पडलेला दिसतो. हिंदुस्थान

सरकारनें आपल्या खलित्यांत ह्या अटींचें समर्थन करावें, १९१८ च्या जानेवारी ५ तारखेला मि. लॉइड जॉर्जनीं दिलेलें वचन पूर्ण करण्यांत आलें आहे असा आग्रह धरावा. यद्यपि त्या अटींत असलेल्या दोषाबद्दल दिलगिरी प्रदर्शित करावी व त्याचबरोबर जणू काय हिंदुमुसलमानांचा मानभंग करण्याकरितां त्यांनीं ह्या अटी मुकाट्यानें मान्य कराव्यात अशी विनंती करावी, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ह्या सर्वांतील दांभिकपणा इतका उघड आहे कीं, तो झांकण्याचा कितीहि प्रयत्न केला तरी कोणीहि फसणार नाहीं. त्यापेक्षां मि. लॉइड जॉर्जनीं वचन देण्यात चूक केली अशी जर खलित्यांत स्पष्ट कबुली असती तर ज्यास्त शोभलें असतें. वचन पूर्ण केलें आहे असा आग्रह धरणें म्हणजे वचनभंगानें आलेल्या चिडींत भर घालण्यासारखें आहे. "खिलाफत प्रश्न मुसलमानाचा आहे व त्याच्या व्यवस्थेंत हात घालावा अशी सरकारची बिलकूल इच्छा नाहीं" असें व्हाइसरायांनीं म्हणण्यांत काय अर्थ आहे? एकीकडे खलिफाच्या राज्याचे निर्दयतेनें तुकडे तुकडे करण्यांत येत आहेत, मुसलमानी पवित्र स्थळांवरील त्याचा ताबा निर्लज्जपणें त्याच्याकडून हिसकावून घेतला जात आहे. प्रत्यक्ष खिलफाला त्याच्या राजप्रासादांत बाहुलें बनविण्यांत येत आहे. राजप्रासाद कसला? त्याला तुरुंग म्हणजेच ज्यास्त शोभेल! 'तहाच्या कांहीं अटी सर्व मुसलमानांची मनें दुखवतील' अशी व्हाइसरॉयसाहेबांना भीति वाटते ह्यांत कांहींच नवल नाहीं.

हिंदी मुसलमानांना धैर्यवान सहानुभूतीचा संदेश पाठवून त्यांनीं मुसमान: लोकांचा अपमान कां करावा? अशा अन्यायी तहाच्या अटी वाचून त्यांना उत्तेजन मिळणार कीं, 'साम्राज्याच्या अडचणीच्या वेळीं' बादशहाच्या विनंतींतील उदारपणें दिलेल्या उत्तराचें स्मरण करण्यानें त्याला उत्तेजन मिळणार? ज्या उच्च तत्वाकरतां दोस्त राष्ट्रें लढलीं त्या तत्वाचा विजय झाला अशी भाषा बोलणें व्हाइसरॉयसाहेबांना शोभत नाहीं. खरोखर ज्याला फार्स हेंच नांव सार्थ होईल अशा ह्या तहाच्या अटी जर कायम राहिल्या तर त्या मनुष्याच्या उन्मत्तपणाचें व अन्यायाचें कायमचें स्मारक होतील. विजयश्रीनें पाठ फिरविली म्हणून एखाद्या शूर व उदार जातीला चिरडून टाकण्याचा झालेला प्रयत्न हा मानवत्वाचा विजय नसून निर्दयतेचें प्रदर्शन आहे. महायुद्धापूर्वी जर इंग्लंडनें तुर्कस्थानावर फार उपकार केले असतील, तर इंग्लंडनें तुर्कस्थानाल

चिरडून टाकण्याच्या प्रयत्नाचा मोठा वांटा उचलून आपल्या पापाचे पूर्ण प्रायश्चित्त घेतलें आहे ! इंग्लंड व तुर्कस्थानमधील मैत्रीच्या खुरटलेल्या रोपट्याला ह्या तहाचें जल मिळून लवकरच त्याचा सुंदर वृक्ष होईल आणि नूतन आशेनें व बलानें तेजःपुंज झालेला तुर्कस्थान भविष्य काळीं जगांत इस्लामी धर्माचा आधारस्तंभ होऊन राहील, असा विश्वास आहे. व्हाइसरॉयस हेबांची गर्वोक्ति खरोखर असह्य आहे. व्हाइसराय आपल्या खलित्याच्या शेवटीं निर्लज्जपणें म्हणतात "हा विचार ह्या अटी शांत चित्तानें व धैर्यानें मान्य करण्याला तुम्हाला शक्ति देईल व तुमच्या कित्येक मागील पिढ्यांप्रमाणें तुम्ही बादशहाविषयींची तुमची राजनिष्ठा उज्ज्वल व अढळ ठेवाल अशी मला आशा आहे" जर मुसलमानांची राजनिष्ठा अढळ राहील तर ती हिंदुस्थानसरकारनें आजपर्यंत मुसलमान लोकांनीं अराजनिष्ठ होण्याला शक्य तितकी कमी जागा दिली आहे म्हणून नव्हे, तर मुसलमान लोकांना सत्पक्षापासून उत्पन्न होणाऱ्या बलाची जाणीव आहे म्हणून; हें व्हाइसरॉयसाहेबांनीं लक्षांत वाळगावें. मुसलमान लोक जर राजनिष्ठ राहतील तर त्याचें कारण सत्तेच्या मदानें वचन देणें व मोडणें हे दोनहि सारखेच लेखणाऱ्या प्रधानाच्या अमदानींत जरी इंग्लंड भ्रष्ट झालें तरी त्याच्याकडून न्याय मिळविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत आहे अशी जाणीव मुसलमानांत आहे हे होय.

परंतु जरी तहाच्या अटींत अगर व्हाइसरायाच्या संदेशांत हिंदु व मुसलमान लोकांच्या अंतःकरणांत विश्वास अगर आशा उत्पन्न करण्यासारखें कांहिं नाहीं ही गोष्ट मी कबूल करतों, तरी निराशेला अगर क्रोधाला वाव पडण्याला कारण नाहीं असें मी म्हणतों. आत्मसंयमन करून शक्ति एकत्रित केली व जरी ते असहाय असले तरी परमेश्वरावर हवाला ठेवून न्याय मिळेपर्यंत दुप्पट जोरानें लढा सुरू ठेवण्याला मुसलमान लोकांना ही उत्तम संधि आहे. जर हिंदू व मुसलमान एकमतानें वागतील व मानव जातीवर ह्या तहानें होत असलेल्या अन्यायाला वाटेकरी होणार नाहींत तर ते लवकर ह्या तहांत योग्य ते फेरफार घडवून आणतील व जगांत नसली तरी निदान साम्राज्यांत अक्षय शांतता स्थापन केल्यानें श्रेय मिळवितील. हा लढा उग्र, निकराचा व कदाचित् दीर्घ होण्याचा संभव आहे परंतु त्याच्या मुळाशीं असलेलें तत्व इतकें उच्च आहे कीं, त्याकरतां करावा तितका स्वार्थत्याग थोडा आहे. मुसलमान व हिंदु लोकांची ही परीक्षेची वेळ आहे. खिलाफतचा अपमान हा स्वतःचा अपमान असें

मुसलमान लोकांना वाटतें काय ? जर वाटत असेल तर आत्मसंयमन, अहिंसा व असहकारयोग हे धर्म पाळण्याला ते तयार आहेत काय ? त्याकरतां ऐहिक सुखाची राखरांगोळी करण्याला त्यांची तयारी आहे काय ? मुसलमान लोकांच्या आपत्तीचें वाटेकरी होण्याइतकें हिंदु लोकांना मुसलमान बंधूबद्दल प्रेम वाटतें काय ? हा तह नव्हे तर ह्या प्रश्नांचें उत्तरच अखेर खिलाफतीचें नशीब ठरवील.

——१९ मे १९२०

---

# खिलाफत

मी पुढें काय करावें ह्याबद्दल सार्वजनिक टीका, खाजगी सल्ला निनांवी पत्रें ह्यांचा माझ्यावर नुसता वर्षाव होत आहे. मी तावडतोब असहकारितेचा सर्व कार्यक्रम अमलांत आणीत नाहीं म्हणून कांहीं लोक अगदीं अधीर झाले आहेत. देशाचें तारूं तुफानात ढकलून मी भयंकर नुकसान करीत आहे, असा कांहीं माझ्यावर आरोप करीत आहेत. प्रत्ये-काला उत्तर देणें कठीण आहे म्हणून मी मुख्य मुख्य मुद्दयांचा विचार करून त्यांना उत्तर देण्याचा माझ्या शक्तिनुसार प्रयत्न करीत आहें. ज्यांना मी ह्यापूर्वीच उत्तर दिलें आहे त्याहूनहि मुद्दे निराळे आहेत.

( १ ) तुर्कांची मागणी अन्यायाची व अनीतीची आहे; तेव्हां माझ्या-सारखा सत्यवादी त्याला दुजोरा कसा देतो.

( २ ) जरी मागणी तात्विक दृष्टया बरोबर असली तरी तुर्क लोक कमालीचे अपात्र, दुबळ व क्रूर आहेत. तेव्हां ते मदतीला पात्र नाहींत.

( ३ ) आपण म्हणतां तितकें देण्याला तुर्कस्थान पात्र आहे असें धरून चाललें तरी हिंदुस्थानाला आंतर राष्ट्रीय तत्यांत कां ओढतां ?

( ४ ) ह्या भानगडींत पडण्याचें हिंदी-मुसलमानांना कारण नाहीं. जर त्यांना त्या बाबतींत कांहीं महत्वाकांक्षा असेलें तर त्यांनीं त्या दिशेनें प्रयत्न करून पाहिला आहे. पण त्यांना त्यांत अपयश आलें आहे. तेव्हां त्यांनीं आतां स्वस्थ बसावें. जर ही धार्मिक बाब असेल तर त्याचा हिन्दु लोकांच्या मनावर कांहींहि परिणाम होणे शक्य नाहीं व कांहीं झालें तरी हिन्दु लोकांना मुसलमानांचें ख्रिश्चनविरूद्ध चाललेलें धार्मिक युद्ध आपलें समजतां येत नाहीं.

( ५ ) कांहीं झालें तरी मी असहकारितेचा इतक्या तीव्र स्वरूपांत उपदेश करूं नये. असहकारिता म्हणजे बंड आहे. मग तें कितीहि हिंस्रशांत असो.

( ६ ) देशांत निद्रितावस्थेंत असलेली अत्याचार प्रवृत्ति एकदा जागी झाली कीं, ती ताब्यांत ठेवणें एका व्यक्तीच्या सामर्थ्याच्या बाहेर आहे. ही गोष्ट माझ्या गेल्या वर्षांच्या अनुभवानें मला समजावयास पाहिजे.

( ७ ) लोक ही चळवळ नेटानें करणें शक्य नाहीं म्हणून असहकारिता निरुपयोगी आहे व अपयश आल्यास जी निराशा पसरेल ती सध्यांच्या आशावादित्वापेक्षां फारच भयंकर असेल.

( ८ )असहकारितेचे चळवळीनें सुधारणासह सर्व व्यवहार बंद पडतील आणि अशा रीतीनें देशाची पिछेहाट होईल

( ९ ) माझे हेतू कितीहि सात्विक असले तरी मुसलमान लोक सुडाच्या इच्छेनें प्रेरित झाले आहेत.

मी क्रमशः प्रत्येक मुद्द्याला उत्तर देण्याचा प्रयत्न करितोः—

( १ ) माझ्या मतें तुर्कांची मागणी अनीतीची अगर अन्यायाची नाहीं; एवढेंच नव्हे तर जें माझें आहे तें माझ्याजवळ राहिलें पाहिजे हा एकच मुद्दा घतला तरी तो अगदीं यथान्याय आहे. साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळेल अशी पूर्ण खबरदारी घेण्यांत यावी असें मुसलमानांनीं आपल्या खालत्यांत स्पष्ट जाहीर केलें आहे

( २ )तुर्क लोक दुर्बल, अपात्र व क्रूर आहेत असें मला वाटत नाहीं. ते अव्यवस्थित आहेत व त्यांच्यांत चांगले पुढारी नाहींत ही गोष्ट मला कबूल आहे आजपर्यंत त्यांना संख्येनें व बलानें श्रेष्ठ अशा शत्रूशीं लढावें लागलें आहे ज्यांच्यापासून रक्षता हिसकावून घ्यावयाचा ते दुर्बल अपात्र व क्रूर आहेत असा नेहमींच भ्रम करण्यांत येतो तुर्क लोकांनीं कत्तली केल्या अशी जी तक्रार आहे त्याची चौकशी करण्याकरितां कमिशन नेमा अशी मागणी करण्यांत आली होती; परंतु ती मान्य करण्यांत आलेली नाहीं. कांहीं असलें तरी ह्यापुढें जुलूम होणार नाहीं अशी खबरदारी घेतां येईल.

( ३ ) मीं पूर्वींच सांगितलें आहे कीं, जर मला हिंदु-मुसलमानांबद्दल कळकळ वाटत नसती तर जितका आस्ट्रियन अगर पोलिस लोकांबद्दल मी आज बेफिकीर आहे तितकाच तुर्क लोकांबद्दल असतों. मी हिंदु असल्यामुळें इतर हिंदी रहिवाशांच्या दुःखांचा व संकटांचा मला वांटेकरी

झालें पाहिजे. मुसलमान माझे भाऊ आहेत. तेव्हां जर त्यांचा सत्पक्ष असेल तर माझ्या शक्त्यनुसार संकटसमयीं त्यांना मदत करणें माझें कर्तव्य आहे.

(४) हिंदूंनीं मुसलमानांना किती मदत करावी, हा प्रत्येकाच्या मनाचा व मताचा प्रश्न आहे. सत्याकरितां माझ्या मुसलमान बंधूंबरोबर मी शक्य तितके कष्ट सहन करणें युक्त आहे. आणि म्हणून जोंपर्यंत माझ्या मुसलमान बंधूंचीं साधनें ध्येयाइतकींच सात्विक व पवित्र आहेत तोंपर्यंत मी त्यांची संगत सोडणार नाहीं. खिलाफत हा धार्मिक प्रश्न आहे हें माझ्या मुसलमान बंधूंचें म्हणणें मला मान्य केलें पाहिजे. ह्याचा अर्थ जरूर तर प्राणाची आहुति दिली पाहिजे.

(५) असहकारिता हें बंड आहे असें मला वाटत नाहीं; कारण त्यांत अत्याचार नाहीं. एका दृष्टीनें सरकारी योजनेला केलेला कोणताहि विरोध बंडच समजलें पाहिजे. ह्या दृष्टीनें सत्पक्षाकरितां बंड करणें हें कर्तव्य आहे. विरोधाचें प्रमाण अन्यायावर अवलंबून राहील.

(६) जरी हिंदुस्थानच्या कांहीं भागांत लोक मार्गभ्रष्ट झाले तरी सामान्यपणें सर्व देश शांत होता. सत्याग्रहानें देशाचें अतिशय कल्याण केलें व जेथे अत्याचार झाले त्यांच्या मुळाशीं प्रत्यक्ष स्थानिक कारणेंच होतीं, असा माझा गेल्या वर्षाचा अनुभव आहे. त्याचबरोबर लोकांनीं जे अत्याचार केले व देशांतील कांहीं भागांत जी अत्याचारवृत्ति दृष्टोत्पत्तीस पडली ती पडावयास नको होती, ही गोष्ट केव्हांहि कबूल केली पाहिजे. गेल्या वर्षीं माझा अंदाज चुकला ही गोष्ट मीं पुष्कळ वेळां कबूल केली आहे; परंतु जो कटु अनुभव मला मिळाला त्यामुळें सत्याग्रहावरील माझा विश्वास रतिभरहि कमी झाला नाहीं. व हिंदुस्थान ह्या अमोल शस्त्राच्या साहाय्यानेंच विजय मिळवील असेंच माझें अजूनहि ठाम मत आहे. एकदां झालेली चूक फिरून होऊं नये म्हणून मनुष्याला घेतां येणें शक्य तितकी खबरदारी घेण्यांत आली आहे; कदाचित् पुढें अत्याचार होतील म्हणून शक्य तितकी तरतूद करून ठेवल्यावर, पुढें दिसणाऱ्या सरळ मार्गावरून पाय मागें घेण्याला मी तयार नाहीं. माझें म्हणणें जास्त स्पष्ट केलें पाहिजे. अधिकारी नाखूष होतील म्हणून कोणताहि सत्याग्रही कर्तव्यापासून च्युत होणें शक्य नाहीं. जरूर पडल्यास मी लाखो लोकांचा बळी देईन; मात्र ते संतोषानें आत्मदान करणारे, निर्दोषी, व पवित्र लोक पाहिजेत. सत्याग्रहाच्या चळवळींत लोकांच्या

प्रमादाचा प्रश्न असतो. जे बलवान् व सत्ताधीश आहेत ते चूक करणार, उन्मत्त होणार, व जेव्हां जशास तसें या न्यायानें त्याचा लोक मोबदला देणार नाहींत तेव्हांच लोकांचा विजय झाला असें समजावें. अधिकाऱ्यांचे अत्याचार संतोषानें व शांतपणें सहन केले पाहिजेत; मात्र त्यां या अन्यायी हुकुमाला मान वांकवितां कामा नये. आपल्या प्रिय माणसाप्रमाणेंच प्रत्येक इंग्रजाचा व सहकारी अधिकाऱ्याचा प्राण पवित्र मानणें ही यशाची गुरुकिल्ली आहे. आज ४० वर्षांच्या हरतऱ्हेच्या अनुभवानें मीं एक गोष्ट शिकलों आहे ती ही कीं, जगांत प्राणाइतकी कोणतीहि वस्तु प्यार नाहीं. ज्या पळाला हिंदुस्थानांतील इंग्लिश लोकांना जरी आपण मूठभर लोक असलों तरी आपल्या केंसालाहि धक्का लागणार नाहीं अशी खात्री वाटेल. त्याच पळाला हिंदुस्थानविषयींची इंग्लिश मनुष्याची दृष्टि पार बदलेल; व इंग्लिश लोकांच्या शस्त्रांना गंज चढूं लागेल; मात्र आपल्याजवळ अजब शस्त्रें आहेत म्हणून नव्हे, तर हिंदी लोक अन्यायी मनुष्याचाहि प्राण पवित्र समजतात अशी खात्री पटल्यामुळें इंग्लिश लोकांना आपले प्राण सुरक्षित आहेत असें वाटलें पाहिजे ही गोष्ट घडून येण्याला दीर्घ काल लागेल; परंतु मला त्याचें महत्व वाटत नाहीं. जें ज्ञान झालें त्याप्रमाणें वागणें एवढें माझें काम आहे. आणि ह्या कार्यांत मला लोक येऊन मिळतात ही विशेष गोष्ट समजली पाहिजे. असहकारितेच्या तत्वाचा निरंतर उपदेश केल्यामुळें व त्याची व्यवहार्यता लोकांना पटवून दिल्यानें खिलाफत प्रकरणामुळें देशांत निःसंशय जे अत्याचार झाले असते ते मीं बंद केले आहेत, अशी खाजगी संभाषणांतून मीं इंग्लीश लोकांची खात्री करून दिली आहे.

(७) धार्मिकदृष्ट्या विचार केल्यास हा मुद्दा फोल आहे. जर लोक असहकारितेच्या चळवळीला पाठिंबा देणार नाहींत तर मी लोकांची कींव करीन; परंतु त्याचा अर्थ धर्मप्रवर्तकांनीं सुधारणा करूं नयेत असा होत नाहीं. त्याचा अर्थ मी एवढाच घेईन कीं, लोकांना आज जी थोडी आशा वाटत आहे तिच्या मुळाशीं बल अगर ज्ञान नसून अज्ञान व अंधविश्वास आहे. जर लोक असहकारितेची चळवळ मनापासून करतील तर देशांतील सुधारणा वगैरे सर्व व्यवहार बंद पडतील ही गोष्ट खरी; परंतु त्यामुळें देशाची प्रगति खुंटेल हा त्यापासून काढलेला उपसिद्धांत मात्र मला कबूल नाहीं. उलट असहकारिता हें इतकें शक्तिमान व पवित्र साधन आहे कीं, जर त्याचा नीट रीतीनें उपयोग केला तर प्रथम [illegible]वर

स्वर्ग नांदूं लागेल. नंतर बाकीचे सर्व आपोआप प्राप्त होईल. शिस्त-संयमन, सहकारिता, अहिंसा, संघटित प्रयत्न व इतर गुण, जे राष्ट्राला नुसतें बलाढ्य करितात एवढेंच नव्हे तर त्याला थोर बनवितात, त्या गुणांची किंमत लोकांना समजून येईल.

( ८ ) माझ्या मुसलमान बंधूंपेक्षां मी ज्यास्त पवित्र आहे, असें म्हणण्याचा मला अधिकार नाहीं; परंतु त्यांचा अहिंसाधर्मावर पूर्ण विश्वास नाहीं ही गोष्ट मी कबूल करतों. तें दुबळांचे शस्त्र आहे असें त्यांना वाटतें. आज अत्याचारविरहित असहकारिता ही एकच गोष्ट त्यांना शक्य आहे हें ते जाणतात. जर त्यांच्यांपैकीं कांहींजणांना अत्याचार करून यश खात्रीनें मिळेल असें वाटेल तर ते अत्याचार करतील; परंतु ही गोष्ट अशक्य आहे अशी त्यांची खात्री झाली आहे. म्हणून ते असहकारिता फक्त कर्तव्य म्हणून करीत नाहींत. त्यांत सुडाचीहि पण इच्छा आहे. उलट मी ज्याप्रमाणें यापूर्वी पुष्कळ वेळां माझ्या कुटुंबांतील माणसाशीं असहकारिता केली आहे त्याचप्रमाणें आज सरकारशीं असहकारिता करीत आहें. ब्रिटिश राज्यघटनेबद्दल मला फार आदर वाटतो. माझें इंग्लिश लोकांशीं शत्रुत्व नाहीं. एवढेंच नव्हे तर इंग्लिश लोकांत असे पुष्कळ गुण आहेत कीं, त्याबद्दल मला त्यांचा हेवा वाटतो. इंग्रजामध्यें पुष्कळ लोक माझे मित्र आहेत. कोणालाहि आपला शत्रू समजणें हें माझ्या धर्माविरुद्ध आहे. त्याच भावनेनें मी मुसलमान लोकांकडे पाहतों. त्यांच्या बाजूला सत्य व धर्म आहे असें मला वाटतें. म्हणून जरी त्यांच्या व माझ्या दृष्टीमध्यें फरक आहे तरी माझ्याशीं सहकारिता करून एकवेळ माझ्यावर शस्त्राचा प्रयोग करून पहा, असें मी त्यांना सांगतों. कारण जरी दृष्टि दूषित असली तरी पवित्र शस्त्रापासून चांगला परिणाम झाल्यावांचून राहणार नाहीं अशी माझी खात्री आहे. प्रसंगाला उचित म्हणून जरी सत्य भाषण केलें तरी त्याचा चांगला परिणाम झालाच पाहिजे. —२ जून १९२०

---

# तपश्चर्या

कोणतेंहि राष्ट्र तपश्चर्येच्या दिव्यांतून गेल्याशिवाय उन्नतदशेला येत नाहीं. मुलानें जगावें म्हणून माता दुःख भोगते. बी भूमींत नष्ट झाल्याशिवाय शेतांत धान्य उगवत नाहीं, हा सृष्टीचा नियम आहे. हा त्रिकाला-

बाधित नियम पाळल्याशिवाय हिंदुस्थानची गुलामगिरींतून मुक्तता होईल काय ?

जर माझ्या सल्लागारांचें म्हणणें खरें असेल तर उद्योग केल्यावांचून हिंदुस्थान श्रेष्ठ पदाला चढला पाहिजे. त्यांचें सर्व लक्ष १९१९ या एप्रिल-मधील प्रकारांची पुनरावृत्ति कशी टळेल ह्याकडे ला॰लें आहे. पुष्कळ लोकांना क्लेश भोगावे लागतील म्हणून असहकारितेचें त्यांना भय वाटतें. जर हँपडनें असाच विचार केला असता तर त्यानें (शिपमनी) कर देण्याचें नाकारलें नसतें; किंवा वॅट टायलरनें बंडाचें निशाण उभारलें नसतें. दुःख किती भोगावें लागेल ह्याचा विचार न करता आपलें कर्तव्य करणाऱ्या पुरुषांच्या चरित्रांनीं इंग्लिश व फ्रेंच इतिहास अलंकृत झाले आहेत. आपल्या कृतीनें अशिक्षित लोकांना अज्ञानमूलक कष्ट सोसावे लागतील ह्याचा विचार करण्यांत त्यांनीं वेळ घालविला नाहीं. आपणच आपल्या इतिहासाला निराळें वळण लावण्याची कां अपेक्षा करावी? जर इच्छा असेल तर आपल्या पूर्वजांच्या चुकांनीं आपण शहाणपणं शिकणें आपल्याला शक्य आहे. तपश्चर्या ही आपल्या आयुष्याची अपरिहार्य अवस्था असल्यामुळें, त्याशिवाय आपलें चालणें शक्य नाहीं. आपण अत्याचार टाळले तरच आपण शहाणपण शिकलों असें होणार आहे. ह्यामुळें आपल्या प्रगतीची गति वाढेल व आपल्या दुःखांत पावित्र्य येईल. सिनफेनर्सप्रमाणें मनगटाच्या जोरावर शत्रूला आपलें म्हणणें ऐकण्याला आपल्याला भाग पाडतां येईल; परंतु अधीर होऊन तसें करूं नका. त्याचप्रमाणें गेल्या वर्षी हरताळच्या प्रसंगीं आपल्यापैकीं कांहींजणांनीं केलें त्याप्रमाणें आपल्या शेतकऱ्याला धमक्या देऊन त्याला आपल्या मागें येण्याला भाग पाडूं नका. आपल्या तपश्चर्येवरून आपली प्रगति ठरवावयाची आहे. ज्या प्रमाणांत तपश्चर्येला पावित्र्याची जोड मिळेल त्या प्रमाणांत प्रगतीची गति ज्यास्त असा नियम आहे. आणि म्हणूनच जीझस आपल्या आत्मदानानें सर्व जगाला दुःखापासून मुक्त करूं शकला. सत्याचा शोध लावतांना आपल्या शेजाऱ्यांना किती दुःख सोसावें लागत आहे व तें ते स्वपषीनें सहन करीत आहेत कीं नाखुषीनें सहन करीत आहेत ह्याचा त्यानें कधींहि विचार केला नाहीं. हरिश्चंद्राच्या आत्मत्यागानें सत्याचें राज्य पुन्हां स्थापन केलें. आपण सिंहासनाचा त्याग केल्यास प्रजेला पीडा पोहोंचेल हें त्याला माहीत असलें पाहिजे; परंतु त्यानें तिकडे लक्ष दिलें नाहीं. कारण त्याला सत्यव्रत पाळावयाचें होतें. आपल्या लोकांनीं केलेल्या इंग्रजांचे खुनाबद्दल व जाळपोळी-

बद्दल मला जितकें वाईट वाटतें तितकें ज्ञालियांवाला बागेबद्दल वाटत नाहीं, हें मीं मागें अनेक वेळा सांगितलेंच आहे. अमृतसरच्या छळानें लोकांचें इतकें लक्ष वेधलें कीं, लाहोरच्या अमानुप कृत्याकडे लोकांचें जावें तितकें लक्ष गेलें नाहीं. लाहोरला लोकांना नष्टवीर्य करण्याचा जाणुनबुजून प्रयत्न करण्यांत आला; परंतु आत्मोद्धार होईपर्यंत आपल्याला असे अनेक छळ भोसावे लागतील. आत्मदान करण्याला आपण खुपीनें तयार होऊं व त्यांतच आनंद मानूं. लाहोरच्या लोकांचे जितके अपमान करण्यांत आले त्या मानानें त्यांच्या हातून प्रमाद कांहींच झाले नव्हते. त्यांच्यावर होणाऱ्या जुलमांचा प्रतिकार करण्याचें जें धैर्य त्यांनीं दाखविलें ते चिरडून टाकण्याचा अधिकाऱ्यांनीं दुष्ट निश्चय केला होता. आणि हा सर्व परिणाम माझ्या सत्याग्रह चळवळीचाच, असें जर मला कोणी सांगेल तर त्याला माझें एकच उत्तर आहे कीं, माझ्या कुडींत जोंपर्यंत प्राण आहे तोंपर्यंत मी सत्याग्रहाचाच उपदेश करीत राहीन. लोकांना सांगेन कीं, सर ओडवायर-सारख्या अधिकाऱ्याच्या उमटपणाला तोंड देण्याचा प्रसंग आला, तर माल विकला जाईल ह्या नुसत्या धमकावणीला भिऊन दुकानें उघडूं नका; तर त्या नराधमाला काय वाटेल तें करूं द्या, फक्त आपला आत्मा त्याला विकूं नका. आपले पूर्वींचे ऋषिवर्य आत्मतेज वाढावें म्हणून शरीराला कष्ट देत. उद्देश हा कीं, दुष्ट लोकांनीं शरीराचे हाल मांडले तरी त्यानें ते आनंदानें सहन करावेत; पण दुष्टांची इच्छा मान्य करूं नये. आपल्या प्राचीन ज्ञानाचें पुनरुज्जिवन करावें, युरोपनें केलेल्या चुका आपण करूं नयेत अशी जर हिंदुस्तानांतील लोकांची इच्छा असेल, युरोपचा सर्व नाश करणारें दानवांचें राज्य जाऊन देवांचें राज्य पृथ्वी तलावर सुरू व्हावें अशी जर त्यांची इच्छा असेल तर आर्य पुरुषांनीं व स्त्रियांनीं नुसत्या शब्दांना भुलूं नये. जे हाल ज्या अपेक्षा पुढें भोगाव्या लागतील त्यांच्या भेसूर कल्पनेनें भेदरून जाऊं नये; परंतु सांप्रतकाळीं युरोपमध्यें काय चाललें आहे तिकडे लक्ष द्यावें व ज्याप्रमाणें युरोप भयंकर दिव्यांतून बाहेर निघाला आहे त्याप्रमाणें आपल्यालाहि अशा दिव्यांतून गेलें पाहिजे अशी पक्की खुणगांठ बांधून, त्याकरितां तयार व्हावें; मात्र युरोपप्रमाणें आपण इतरांना दुःख देऊं नये. जर्मनीला युरोपवर सत्ता गाजविण्याची महत्वाकांक्षा होती व दोस्त सरकारांना जर्मनीला चिरडून तेंच करावयाचें होतें. फक्त जर्मनी मरावा, असें इतर युरोपमध्यें विशेष कांहीं नाहीं. जर्मनी इतकेंच आपण क्रूर कपटी, लोभी व स्वार्थी आहोंत, असें दोस्त सरकारनें आपल्या कृतीनें

जगाला दाखविलें आहे. कदाचित मुश्कील वेळां दोस्त सरकारची दांभिक प्रतारणा तरी जर्मनीनें टाळली असती: लोकांना जे हाल सोसावे लागले याविषयीं माझा अंदाज चुकला नाहीं, तर सत्याग्रहाचे स्वास्थ्य मनांत बरोबर न बिंबल्यामुळें त्यांनीं जे अत्याचार केले त्यावद्दल माझा अंदाज चुकला. तपश्चर्येच्या नियमाच्या दृष्टीनें असहकारितेचा अर्थ काय आहे? जें सरकार आपल्या इच्छेविरुद्ध आपल्यावर राज्य करीत आहे त्याच्याशीं असलेला संबंध तोडण्यानें जो नफा अगर जें नुकसान होईल तें आपण खुषीनें व आनंदानें सहन केलें पाहिजे. अन्यायी सरकारच्या अंमलाखालीं संपत्ति व अधिकार हें पाप असून दारिद्र्य हा सद्‌गुण आहे! थोरो म्हणतो: सुरवातीला आपल्या हातून दोष घडतील, विनाकारण हाल सोसावे लागतील; परंतु ह्या सर्व गोष्टी संबंधीं राष्ट्र सत्वहीन होण्यापेक्षां शेकडोंपटीनें बऱ्या आहेत. पाप्यांना आपल्या कर्मांची जाणीव होऊन अन्यायाचे परिमार्जन होईपर्यंत आम्हाला वाट पाहत बसतां कामा नये. आपल्याला अगर इतरांना कष्ट सोसावे लागतील ह्या भीतीनें आपण पापाचे वांटेकरी होतां कामा नये. आपण प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें अन्याय करणारास कसलेंही साहाय्य करण्याचें बंद करून पाप नाहीसें केलें पाहिजे.

जर बाप अन्याय करील तर त्याच्या घराचा त्याग करणें, मुलांचें कर्तव्य आहे. जर शाळा मास्तर अनीतीच्या पायावर शाळा चालवतील तर त्या शाळेवर बहिष्कार घालणें विद्यार्थ्यांचें आद्य कर्तव्य होय. एकादा संस्थेचा अध्यक्ष जर दुराचारी असेल तर त्या संस्थेच्या सभासदांनीं ती संस्था सोडून त्या दुराचाराचा आपणाला विटाळहि होऊं देतां कामा नये. ह्याच न्यायानें जर सरकार अन्याय करील तर प्रजेनें त्याच्याशीं असलेला संबंध तोडला पाहिजे. प्रत्येक गोष्टींत शारीरिक व मानासिक यातना आहेत; परंतु यातनेशिवाय स्वातंत्र्य नाहीं ! —१६ जून १९२०

---

# व्हॉईसरॉयास पत्र

महाराज,

युद्धाच्या अगदीं सुरवातीपासून, हिंदी व्हालंटियर अॅम्ब्यूलन्स कोअर तयार करीत असतांनाच जेव्हां तुर्कस्थाननें जर्मनीच्या बाजूनें लढण्याचें ठरविलें त्यावेळेस लंडनमधील मुसलमानी समाजांत किती भयंकर खळ-

१६३१

चळ उडाली. हें मीं पाहिलें आहे. १९१५ च्या जानेवारीमध्यें हिंदुस्थानांत परत आल्यावर ज्या ज्या मुसलमानांची व माझी गांठ पडली त्यांच्या-मध्येंहि तितकीच चिंता व उत्कटता मला दिसली; गुप्त तहांची वातमी जेव्हां बाहेर पडली तेव्हां तर त्यांच्या चिंतेला सीमाच राहिली नाहीं. सरकारी सद्धेतूवद्दल त्यांचीं मनें साशंक झालीं व मुसलमानी समाजावर नैराश्याचें साम्राज्य पसरलें! अशा वेळेलाहि निराश न होतां आपल्या शंका व आशा पद्धतशीर रीतीनें सरकारला सांगा, असा मीं आपल्या मुसलमान मित्रांना सल्ला दिला. गेल्या पांच वर्षांत हिंदी मुसलमानांनीं आपल्या मनो-वृत्तींचें आश्चर्यकारक संयमन केलें आहे, ही गोष्ट कोणीहि कबूल करील; त्याचप्रमाणें मुसलमान पुढाऱ्यांनीं आपल्यांतील उच्छृंखल लोकांना यशस्वी रीतीनें पूर्ण ताब्यांत ठेवलें आहे, हेंहि पण प्रत्येकाला कबूल करावें लागेल.

तहाच्या अटी व आपण त्यांचें केलेलें समर्थन ह्यांनीं मुसलमानांच्या मनाला जबर धक्का बसला असून, त्याचे परिणाम नाहींसे होणें फार कठीण जाईल. ह्या अटींमुळें प्रधान मंडळांनीं दिलेल्या वचनांला हरताळ फांसण्यांत आला असून, मुसलमानांचीं मनें दुखविलीं आहेत. मी व माझे मुसलमान बंधू ह्यांच्यामध्यें पूर्ण सलोखा नांदावा अशी माझी इच्छा असल्याकारणानें, अशा संकटसमयीं जर मीं माझ्या मुसलमान बंधूंच्या पाठीशीं उभा राहणार नाहीं तर मी भारतमातेचा खरा सुपुत्रच नव्हे. त्यांचा सत्पक्ष आहे असें माझ्या अल्पबुद्धीला वाटतें. जर त्यांच्या धार्मिक मतांना धाब्यावर बसवावयाचें नसेल तर, तुर्कस्थानला शिक्षा करतां कामा नये असें त्यांचें म्हणणें आहे. आपल्या खलीफाला शिक्षा व्हावी म्हणून अगर त्याचे प्रांत छिनले जावेत म्हणून कांहीं मुसलमान शिपायांनीं आपले प्राण धारातीर्थीं ठेवले नाहींत. गेलीं पांच वर्षें मुसलमान लोकांची मागणी एकच आहे. साम्राज्याचा राजनिष्ठ प्रजाजन या नात्यानें, मुसलमानांच्या धर्मावर जे भयंकर अत्याचार करण्यांत आले आहेत त्यांना विरोध करणें माझें कर्तव्य आहे. मुसलमान व हिंदु अशा दोघांचाहि ब्रिटिश न्यायावरील व शाळांवरील विश्वास उडाला आहे. हंटर कमिटीचा मेजॉरटी रिपोर्ट, आपला खलिता, मि. मॉंटेग्यूंनीं त्याला दिलेलें उत्तर ह्यांनीं तर आगींत तेलच ओतलें आहे.

अशा परिस्थितींत माझ्यासारख्या मनुष्यानें एक तर निराशेनें [illegible] शा राज्याशीं असलेला आपला संबंध तोडला पाहिजे; किंवा [illegible] हे

राज्यघटनेपेक्षां इंग्लिश राज्यघटना श्रेष्ठ आहे असा जर माझा अजूनहि विश्वास असेल तर झालेल्या अन्यायाचें परिमार्जन होईल व उडालेला विश्वास परत बसेल असे उपाय मी योजिले पाहिजेत. ह्या श्रेष्ठपणावरील माझा विश्वास अजून उडालेला नाहीं व जर आम्ही जरूर ते कष्ट सोसण्याची आपली तयारी दाखवूं तर अजूनहि कसेंहि करून न्याय मिळेल अशी मला आशा आहे. जे स्वतःला मदत करितात त्यांनाच फक्त ही राज्यघटना मदत करिते अशी माझी समजूत आहे. दुर्बलांचें ती रक्षण करीत नाहीं असें मला वाटतें. वीर पुरुषाला आपलें शौर्य राखण्याला व वाढविण्याला ती पूर्ण स्वातंत्र्य देतें. दुर्बलाची तेथें डाळ शिजत नाहीं.

ब्रिटिश राज्यघटनेवर माझा विश्वास आहे आणि म्हणूनच मी माझ्या मुसलमान बंधूंना, जोंपर्यंत ब्रिटिश प्रधानांनीं दिलेल्या वचनाला अनुसरून व हिंदी मुसलमानांच्या मनोवृत्ती लक्षांत घेऊन तुर्की तहांत फेरफार केले नाहींत तोंपर्यंत सरकारशीं असलेला आपला संबंध तोडावयास सांगितलें आहे व हिंदूंनीं त्यांच्याशीं सहकारिता करावी अशी माझी इच्छा आहे.

प्रत्यक्ष ब्रिटिश प्रधानांनीं जरी अन्याय केला नसला तरी ज्यांत त्यांचें अंग आहे त्या अन्यायाबद्दल आपली पूर्ण नापसंती प्रदर्शित करण्याचें मुसलमान लोकांना तीनच मार्ग उरले होते.

(१) अत्याचार

(२) हिजरात

(३) असहकारिता

असा एक काळ होता कीं, ज्या वेळेस धीट परंतु अविचारी मुसलमानांनीं अत्याचाराचा मार्ग पत्करला असतां, हें आपल्याला माहीत आहे. हिजरातीचे वेड अजूनहि पूर्णपणें गेलेलें नाहीं. पुष्कळ वादविवाद करून अत्याचारवाल्यांना त्यांच्या मार्गापासून मी परावृत्त केलें आहे, असें मी आपल्याला सांगतो. अर्थात नैतिक दृष्ट्या नव्हे तर शक्याशक्यतेच्या दृष्टीनेंच मी त्यांना पराङ्मुख करूं शकलों, ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. नैतिक [illegible] सी प्रयत्नच केला नाहीं. ह्याचा तात्पुरता परिणाम तरी अत्याचार [illegible]यांत आला आहे. हिजरातवाल्यांच्या मार्गांत जरी अडचणी [illegible] आहेत तरी तो पक्ष अगदींच स्वस्थ बसलेला नाहीं. जर अशा [illegible] लोकांना कष्टाचा परंतु खात्रीचा, रोखठोक उपायाचा मार्ग दाखवि[illegible] आला नसता तर केव्हांना केव्हां तरी अत्याचाराचा स्फोट झालाच [illegible]कारितेचा कांहीं एक उपयोग झाला नसता असें मला वाटतें.

अशा रोखठोक उपायाचा ओजस्वी व सनदशीर मार्ग म्हटला म्हणजे असहकारिता होय. जो राजा अनीतीनें राज्य करीत असेल त्याला मदत करण्याचें नाकारणें हा प्रजेचा हक्क अनादिकालापासून चालत आलेला आहे.

खालच्या लोकांनीं असहकारिता करणें अत्यंत धोक्याचे आहे, ही गोष्ट मी कबूल करतों; परंतु अशा आणीबाणीच्या प्रसंगीं खडतर मार्ग पतकरल्याशिवाय मनांतील प्रबल कामना पूर्ण होणें शक्य नाहीं. आतां संकटें सोसण्याला तयार न होणें म्हणजे अनावस्थेला व बेबंदशाहीला आमंत्रण करण्यासारखें आहे.

परंतु अजूनहि असहकारिता टाळणें शक्य आहे. आपल्या प्रसिद्ध पूर्वाधिकाऱ्यांनीं दाक्षिण आफ्रिकेंतील चळवळीचें धुरीणत्व पत्करलें त्याप्रमाणें आपणहि ह्या चळवळीमध्यें पुढाकार घ्यावा अशी मुसलमानांनीं आपल्याला विनंति केलीच आहे. परंतु तसें करण्याची जर आपल्याला बुद्धि झाली नाहीं व आम्हांला असहकारितेशिवाय दुसरा उपायच राहिला नाहीं तर निदान आपण मला व माझ्या सल्ल्याप्रमाणें वागणाऱ्या लोकांना आम्ही कर्तव्य बुद्धीनें प्रेरित झालों आहोंत एवढें तरी श्रेय द्या.

—ता. ३० जून १९२०

---

# मुसलमानांची युद्धाची तयारी!

धिम्मेपणानें परंतु निश्चयानें मुसलमान लोक भावी युद्धाची तयारी करीत आहेत. विरुद्ध बाजू बलानें त्यांच्यापेक्षां फारच श्रेष्ठ आहे ही गोष्ट खरी; परंतु पैगंबराच्या शत्रूंइतकी ती खास श्रेष्ठ नाहीं. पैगंबरानें आपला प्राण कितीतरी वेळां धोक्यांत घातला नव्हता काय? पण त्याची परमेश्वरावरील निष्ठा अढळ होती. जिकडे सत्य तिकडे परमेश्वर, असा त्याचा पूर्ण विश्वास असल्यामुळें तो अगदीं निश्चितपणानें परमेश्वराच्या शत्रूंशीं लढण्याकरितां जाई. पैगंबरच्या मनांत परमेश्वराबद्दलची जी श्रद्धा होती व त्याची जितकी स्वार्थत्यागाची तयारी होती, त्याच्या निम्म्यानें जरी मुसलमान श्रद्धावान व स्वार्थत्यागी बनतील तर त्यांचें बल लवकरच प्रतिपक्षाच्या बरोबरीचें होईल व अल्पावधींत तुर्कस्थानचें तुकडे करणाऱ्यांचा नाश करील. अपहारबुद्धीनें दोस्त राष्ट्रें स्वतःचाच नाश करण्याला

प्रश्न ... ला आहेत. फ्रान्सच्या मार्गांत नित्य नव्या नव्या अडचणी उत्पन्न हो ... त. अन्यायानें मिळविलेला माल पचवितां पचवितां ग्रीस बेजार झा ... हे. मेसापोटेमियांत इंग्लंदची हड्डी नरम होत आहे. मासूलचें ते ... सापोटेयियांत विनाकारण पेटविलेल्या आगीचा भडका करून इंग्लं ... शरीर भाजतें कीं काय अशी भीति पडली आहे. हिंदी शिपायाला पा ... अरबांच्या पायांची आग मस्तकाला जात आहे. मला हें वाचून अ ... वाटत नाहीं. अरब लोक कडवे व शूर आहेत. मेसापोटेमियांत हिंदी शि... र्नी कां यावें हें त्यांना समजत नाहीं. असहकारितेचें काय वाटेल तें होवो. एकाहि हिंदी गृहस्थानें लष्करी अगर मुलकी कसल्याहि नोकरीवर मेसापोटेमियांत जाऊं नये अशी माझी इच्छा आहे. आपण स्वतः विचार करण्याला शिकलें पाहिजे व कोणतीहि नोकरी पतकरण्यापूर्वी त्या नोकरीमुळें आपण अन्यायाला निमित्तकारण होणार नाहीं अशी खात्री करून घेतली पाहिजे. खिलाफत प्रश्न बाजूला ठेवला तरी मेसापोटेमिया आपल्या ताब्यांत ठेवण्याचा इंग्लंडला कसलाहि न्याय्य व नैतिक अधिकार पोहोंचत नाहीं. दिवसाढवळ्या चाललेल्या दरवड्यांत ब्रिटिश सरकारला मदत न करणें व राजनिष्ठ राहणें ह्याचा कांहींएक संबंध नाहीं. जर आपण मेसापोटेमियांत लष्करी अगर मुलकी नोकरी पतकरीत असूं तर ती फक्त उदरंभरणार्थ आहों; परंतु त्या योगानें अन्यायाचा पैसा खात आहों कीं काय, याचा आपण विचार केला पाहिजे.

असहकारितेचें नांव काढतांच पुष्कळ लोकांची जी गाळण उडते ती पाहून मला आश्चर्य वाटतें. असहकारितेइतका खात्रीचा, सरळ, निरुपद्रवी व परिणामकारक असा दुसरा मार्गच उरला नाहींत. सावधगिरीनें काम केल्यास त्यापासून कांहींहि अनिष्ट परिणाम होणार नाहीं. ह्या चळवळीला उग्र स्वरूप प्राप्त होणें लोकांच्या स्वार्थत्यागावर अवलंबून राहील.

असहकारितेला अनुकूल वातावरण तयार करणें ही पहिली गोष्ट होय. अधर्म करण्यांत आम्ही तुमच्याशीं सहकारिता करणार नाहीं असें सरकारला साफ बजावणें हा प्रत्येक शहाण्या प्रजाजनाचा अधिकार आहे. दास्यवृत्ति, दुर्बलता व आत्मविश्वासाचा अभाव हे आमचे दुर्गुण आम्हांला ह्या असहकारितेसारख्या शस्त्राबद्दल साशंक करीत आहेत. अगदीं भयंकर जुलमी राज्यपद्धतीसुद्धां प्रजेच्या संमतीशिवाय एक पळहि टिकूं शकत नाहीं. जुलमी राज्यांत बलात्कारानें प्रजेपासून ही संमति घेतली जाते. जुलमी राज्याच्या शक्तीची भीति प्रजाजनास वाटेनाशी होतांच तें राज्य

बलहीन होतें; परंतु ब्रिटिश राज्य कोठेंहि व केव्हांहि सर्वस्वी मनगटाच्या जोरावर चालत नाहीं. प्रजेला संतुष्ट ठेवण्याचा तें प्रामाणिक प्रयत्न करतें. परंतु प्रजेची संमति जबरीनें मिळविण्याला तें वाटेल ते उपाय योजण्याला मागेंपुढें पाहात नाहीं. आपण त्यांच्या राज्याला संमति द्यावी म्हणून तें आपल्याला पदव्या, पदकें, नोकऱ्या वगैरे लांच देतें. आपल्या नोकरांना श्रीमंत होण्याच्या वाटा तें स्वसामर्थ्यावर खुल्या करून देतें; परंतु हें सर्व करून जर इच्छित हेतु सफल झाला नाहीं तर सोट्याचा उपयोग करण्याला तें कचरत नाहीं. हीच गोष्ट सर ओड्वायरनें पंजावांत केली व जरूर वाटल्यास प्रत्येक इंग्रज अधिकारी तसें करील. म्हणून जर आपण अतिलोभ धरला नाहीं व ज्याच्यापासून देशाला कवडीचाहि लाभ नाहीं अशा पदव्यांकरितां प्राण सोडण्याचें बंद केलें तर आपण अर्धी लढाई जिंकली, असें समजण्याला हरकत नाहीं.

जरी तुर्की तहामध्यें फेरफार झाले तरी ते असहकारितेच्या प्रभावानें झाले असें म्हणता येणार नाहीं, असें पुष्कळ लोक मला वारंवार सांगतात. तुर्की तहांतील फेरफारापेक्षांहि असहकारितेच्या चळवळीपुढें एक उच्च ध्येय आहे असें ह्या लोकांना बजावण्याची मी परवानगी घेतों. जरी ह्या तहांत फेरबदल करण्यांत मला यश आलें नाहीं तरी दुसऱ्याच्या वस्तूबद्दल अभिलाष धरणाऱ्या सरकारशीं सहकारिता करणें मला बंद केलें पाहिजे. जर असहकारितेची चळवळ मी शेवटपर्यंत नेऊं शकलों, तर हिंदुस्थान तरी सोडला पाहिजे नाहीं तर तुर्कस्थानचा मुलूख तरी सोडला पाहिजे अशा पेंचांत सरकार सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. असा प्रसंग येतांच सध्यांचे अधर्मी मंत्री दूर करून जे हल्लींचा तुर्की तह समुद्रांत फेंकून देतील व जे इंग्लंडला व तुर्कस्थानाला भूषणास्पद आणि हिंदुस्थानला मान्य होईल असा नवीन तह करतील, असे मंत्री इंग्लंड नेमील इतका इंग्लंदवर माझा विश्वास आहे. असें उच्च ध्येय साधण्याकरतां जो निश्चय व स्वार्थत्याग पाहिजे तो हिंदी लोकांत नाहीं, असें कित्येकांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानच्या अंगांत हे गुण आज नाहींत; पण आज नाहींत म्हणून आपण ते उत्पन्न करणार नाहीं काय? ही गोष्ट करणें जरूर नाहीं काय? असलें थोर कार्य करण्याकरितां आपण करूं तो स्वार्थत्याग थोडाच होणार आहे.

—३० जून १०२०

# मुस्लीम खलित्यावरील टीकेला उत्तर

खिलाफत सेंट्रल कमेटीनें व्हाइसरायांना पाठविलेल्या खलित्यावर व त्याला जोडलेल्या माझ्या पत्रावर अँग्लो-इंडियन वर्तमानपत्रांनीं कडक टीका केली आहे. सर्वसाधारणपणें समतोलपणा राखणाऱ्या 'टाइम्स ऑफ इंडिया'नें मुस्लीम खलित्यांतील कांहीं विधानांना हरकत घेतली असून जर तुर्की तहांतील अटी दुरुस्त केल्या जाणार नाहींत तर व्हाइसरॉयांनीं आपल्या जागेचा राजीनामा द्यावा, ह्या माझ्या सूचनेवर टीका करण्यांत आपल्या अग्रलेखाचा एक प्यारा खर्ची घातला आहे. ब्रिटिश साम्राज्यानें तुर्कस्थानाशीं असलेलें जुनें वैर कां विसरूं नये हें टाइम्सकारांना समजत नाहीं. खलित्यांत त्याची वाजवी कारणें उत्तम रीतीनें मांडली आहेत. तुर्कस्थानाशीं व्यवहार करतांना ब्रिटिश सरकारनें जोंपर्यंत हिंदी मुसलमानांच्या मागण्या न्याय्य व योग्य आहेत तोंपर्यंत त्यांना मान दिलाच पाहिजे, असें हिंदी मुसलमानांचें म्हणणें आहे. जर सात कोटि मुसलमान साम्राज्याचे भागीदार आहेत तर तुर्कस्थानाला शिक्षा न देण्याची त्यांची इच्छा पुरवावयास नको काय ? तुर्कस्थानानें युद्ध सुरू असतां जी कृत्यें केलीं त्याची रडकथा गात बसणें मुद्द्याला सोडून आहे. इतर पराजित राष्ट्रांपेक्षां तुर्कस्थानाला काय ज्यास्त शिक्षा झाली, असा टाइम्सचा सवाल आहे. ही गोष्ट सिद्ध करण्याला कांहीं पुरावा पाहिजे असें मला वाटत नव्हतें. जर्मनी, ऑस्ट्रिया अगर हंगेरी ह्यांपैकीं एकालाहि तुर्कस्थान इतकें वाईट रीतीनें वागविण्यांत आलेलें नाहीं. तुर्की साम्राज्य एवढें विस्तृत. परंतु आज राजधानी व तिच्या आसपासचा थोडा मुलूख ह्याशिवाय तुर्कांच्या हातीं कांहींहि उरलेलें नाहीं. ह्यांत सुलतानावर उपमर्द करण्यांत आला आहे आणि अवशिष्ट राज्यावर इतक्या अपमानास्पद शर्ती लादण्यांत आल्या आहेत कीं कोणीहि स्वाभिमानी पुरुष, मग राजाचें नांवच नको, त्यांत राहूं इच्छिणार नाहीं. तुर्कस्थान दोस्त सरकारांना कां येऊन मिळाला नाहीं ह्या कारणाचा विचार करण्यांत आलेला नाहीं ह्या एका गोष्टीवर टाइम्सकारांची सर्व भिस्त आहे; परंतु त्याबद्दल आश्चर्य करण्यासारखें कांहींच नाहीं. दोस्त सरकारच्या बाजूला रशिया होता ही एकच गोष्ट दोस्त राष्ट्रांच्या सद्धेतूबद्दल साशंक रहाण्यास तुर्कस्थानाला पुरेशी होती. रशिया दारावर लाथ मारीत असतां

तुर्कस्थाननें दोस्त सरकारची बाजू उचलून धरणें ही गोष्ट सहन न येण्यासारखी नव्हती; परंतु खुद्द इंग्लंडविषयींहि साशंक राहण्यास तुर्कस्थानला कारण होतें. बल्गेरियन युद्धामध्यें इंग्लंडनें [illegible] केलें नव्हतें, ही गोष्ट तुर्कस्थान विसरणें शक्य नव्हतें, इटालीशी युद्ध सुरू असतांनाहि इंग्लंड तुर्कस्थानच्या सहाय्याला धावून आला नव्हता. तरी सुद्धां तुर्कस्थाननें केली ही गोष्ट वाईटच केली. हिंदु-मुसलमानांमध्यें उत्पन्न झालेली जागृति व तुर्कस्थानला मदत करण्याची त्यांची तत्परता ह्या दोन गोष्टींचा विचार करून तुर्कस्थाननें इंग्लंडविषयीं निर्धास्त राहून दोस्त राष्ट्रांची बाजू उचलून धरावयास पाहिजे होती. परंतु हें सगळं शिळ्या कढीला ऊत आणण्याप्रमाणें आहे. तुर्कस्थानानें चूक केली व त्याबद्दल त्याला शिक्षाहि झाली आहे; परंतु ह्यापुढें त्याचा मानभंग करण्याचा प्रयत्न करणं म्हणजे हिंदी मुसलमानांच्या भावनांबद्दल अज्ञान दाखविण्यासारखें आहे. इंग्लंडला मुसलमानांच्या राज्यनिष्ठेची गरज असेल तर इंग्लंडनें तसें करूं नये.

तुर्की तहांत स्वयंनिर्णयाचें तत्व ततोतंत पाळण्यांत आलें आहे असें टाईम्सनें प्रतिपादन करणें म्हणजे आपल्या वाचकांच्या डोळ्यांत धडधडीत धूळ टाकण्याप्रमाणें आहे. आड्रियानोपल व थ्रेस ग्रीसला देण्यांत आलें तें स्वयंनिर्णयाच्या तत्वावरच काय? स्मर्ना जो ग्रीसला देण्यांत आला तो कोणत्या तत्वावर? थ्रेस व स्मर्नाच्या रहिवाशांनीं आपल्याला ग्रीसचे गुलाम व्हावयाचें आहे अशी इच्छा प्रगट केल्याचें कोठें ऐकिवांत नाहीं! आरब लोकांचीं लावण्यांत आलेली व्यवस्था त्यांना मान्य आहे ह्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यांत मी तयार नाहीं. हेदनचा राजा कोण आहे? अमीर फैजल्ल कोठून प्रकट झाला? अरब लोकांनीं ह्यांना आपले राजे निवडले काय? इंग्लंडनें घेतलेले मॅंडेट अरब लोकांना पसंत आहे काय? स्वयंनिर्णयाच्या तत्वाचा खून करण्यांत आला आहे. अरबस्थान, थ्रेस स्मर्ना ह्या देशाच्या लोकांना अमलांत आलेली व्यवस्था बिलकूल मान्य नाहीं अशीं चिन्हें आतांपासूनच दृग्गोचर होऊं लागलीं आहेत. कदाचित त्यांना तुर्की अंमल आवडत नसेल; परंतु सध्यांची व्यवस्था तर त्यांनीं अगदींच पसंत नाहीं. ह्या लोकांना आपल्याला जशा हव्या तशा अटी तुर्कस्थानाकडून कबुल करून घेतां आल्या अवत्या; परंतु आतां ह्या लोकांना दोस्तसरकारच्या व विशेषतः इंग्लंडच्या राक्षसी सत्तेच्या जोरावर चिरडून टाकण्यांत येईल. तुर्की साम्राज्य कायम ठेवून, सुराज्यव्यस्थेबद्दल जरूर

ती खबरदारी घेणें हा इंग्लंदपुढें सरळमार्ग होता; परंतु इंग्लंदच्या मुख्य मंत्र्यानें हा सरळ मार्ग न धरतां गुप्त तह, कपट व दांभिक पळवाटांनीं भरलेला कुटील मार्ग पत्करला.

ह्या विकट परिस्थितींतून बाहेर पडण्याला इंग्लंदला अजूनहि मार्ग आहे. हिंदुस्थानला बरोबरीच्या नात्यानें वागवावें व मुसलमानांच्या खऱ्या प्रतिनिधींना अरबस्थानांत व तुर्की साम्राज्यांतील इतर भागांत पाठवून त्यांच्या सल्ल्यानें अशी व्यवस्था लावावी कीं, ज्यामुळें तुर्कस्थानाला खालीं पहाण्याची पाळी येणार नाहीं. हिंदू-मुसलमानांचें समाधान होऊन तुर्की साम्राज्यांतील निरनिराळया जातींना स्वयंनिर्णयाचें तत्व लागू करणें, हाच तो मार्ग होय. कानडा, आस्ट्रेलिया, अगर दक्षिण आफ्रिका यांचा जर हा प्रश्न असता तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्याची लॉईड जॉर्जची छातीच झाली नसती. साम्राज्यांतून फुटून बाहेर पडण्याची त्यांच्या अंगांत शक्ति आहे. हिंदुस्थानजवळ ती नाहीं. जर हिंदुस्थानच्या मताला कवडीचीहि किंमत द्यावयाची नाहीं तर त्याला भागीदार म्हणून त्याचा अपमान तरी करूं नका.

[ जी बाजू टाईम्स ऑफ इंडियानें पत्करली आहे ती विचारा अंतीं सोडून न्याय मिळविणें हेंच ज्या चळवळीचें ध्येय तिला येऊन त्यानें मिळावें अशी माझी त्याला विनंति आहे. जर प्रधानमंडळ हिंदी लोकांच्या पवित्र भावनांना मान देण्यास तयार नसेल तर लॉर्ड चेम्सफर्ड यांना जें अगदीं कमींत कमी करतां येण्यासारखें आहे, तें म्हणजे आपल्या जागेचा राजिनामा देणें हा होय. व्हाईसरॉय या नात्यानें बादशहाच्या प्रधानमंडळाच्या निकालाविरुद्ध लार्ड चेम्सफर्डना जातां येत नाहीं ही गोष्ट खरी; परंतु अनीतिमूलक निकाल स्वतःच्या मनाविरुद्ध अमलांत आणण्याची वरून आज्ञा झाल्यास आपल्या जागेचा राजिनामा देण्यास त्यांना कायद्यानें परवानगी ठेवली आहे. तुर्की तहांतील अटी अनीतिमूलक असून हिंदी लोकांच्या अंतःकरणांत खळबळ उडवून देणाऱ्या आहेत. ]

—जून ता. ७।१९२०

# कौन्सिलवरील बहिष्कार ?

कौन्सिलवर बहिष्कार टाकण्याच्या बाबतींत पं. रामभुजदत्त चौधरी हे ल ला लजपतरायांच्या विरुद्ध आहेत; मद्रास प्रांतात दुमत झालें असून राष्ट्रीय पक्षाचे बहुतेक पुढारी ह्या बहिष्काराच्या विरुद्ध आहेत; 'मराठ्यानें' एका मुद्देसूद अग्रलेखांत ह्या बहिष्काराच्या विरुद्ध आपलें मत दिलें आहे. विरुद्ध पक्षाकडून मुख्यत्वेंकरून दोन कारणें पुढें आणण्यांत येतात. ( १ ) जर राष्ट्रीय पक्ष बाहेर राहील तर नेमस्त पक्ष आंत घुसेल, ( २ ) ज्याअर्थी ह्या कायदे-कौन्सिलमध्यें जाऊनच आपली प्रगति झाली आहे, त्याअर्थी लोकप्रतिनिधींना व्यापक अधिकार मिळाले असल्याकारणानें ह्यापुढें जास्त प्रगति होण्याचा संभव आहे.

राष्ट्रीय पक्षासारख्या लोकप्रिय पक्षाला पहिलें कारण पुढें आणणें मुळीं शोभतच नाहीं. जर कौन्सिलमध्यें जाण्यापासून तोटा आहे तर नेमस्त कौन्सिलमध्यें जातात ह्याचें वैषम्य राष्ट्रीय पक्षाला कां वाटावें ? नेमस्त पक्ष ऐकत नाहीं म्हणून राष्ट्रीय पक्षानें स्वतःच्या पायांवर धोंडा पाडून घेण्यास तयार व्हावें हे योग्य होईल काय ? किंवा सर्व पक्ष एकमतानें कौन्सिलांवर बहिष्कार घालतील तरच नुकसान होण्याचें थांबेल, असा कांहीं नाहीं मुद्दा आहे काय ? हा मुद्दा पुढें आणणें म्हणजे बहिष्कार तत्वाविषयीं अज्ञान प्रकट करण्यासारखें आहे. आपल्याला एकादी संस्था आवडत नाहीं म्हणून आपण तिच्यावर बहिष्कार टाकतों; किंवा त्या संस्थेच्या चालकांशीं सहकारिता करावी अशी आपली इच्छा नसते म्हणून आपण तिच्यावर बहिष्कार टाकतों. कौन्सिलच्या बाबतींत दुसरी गोष्ट मुख्य आहे. कौन्सिलमध्यें जाण्यांत सरकारला अडवणें हें जरी आपलें ध्येय असलें तरी एका अर्थी त्यांत आपण सरकारशीं सहकारिताच करतों असें मला वाटतें. बहुतेक संस्था व विशेषतः ब्रिटिश कायदे कौन्सिल अडणुकांवरच पोसलें जातें. आयरिश सभासदांच्या पद्धतशीर अडवणुकीच्या धोरणाचा कॉमन्स सभेवर काडी-चाहि परिणाम झाला नाही. ज्याच्याकरतां आयरिश लोक भांडत होतें तें स्वराज्य त्यांना मिळालें नाहीं. 'महाराष्ट्राचें' असें म्हणणें आहे कीं, विरोध करणें ही सक्रिय व आपण होऊन हल्ला चढविणारी असहकारिता होईल. माझ्या मतें असें म्हणणें म्हणजे स्वतःच्या तत्वावर स्वतःचा विश्वास नाहीं, असें जाहीर करण्यासारखें आहे. राष्ट्रीय पक्षानें कौन्सिल-

वर बहिष्कार टाकणें ही गोष्ट इंग्लिश काय अगर नमस्त काय दोघांचीहि मनें अस्वस्थ करून टाकील अशी माझी खात्री आहे. आज आपण प्रत्यक्ष कुस्तीला उभे आहोंत. आपल्या मतदारांपैकीं निम्याहून अधिक मतदारांची इच्छा आपण कौन्सिलमध्यें जाऊं नये अशी आहे. असें जर नेमस्तपक्षाच्या एखाद्या उमेदवाराला दिसून आलें तर तो कौन्सिलमध्यें जाण्याची खटपट करील काय? त्यानें तसें करणें माझ्या मतें बेसनदशीर होईल. कारण तो त्या मतदारसंघाचा प्रतिनिधि होऊं शकणार नाहीं. बहिष्कार घालण्यापूर्वी लोकांस कडक शिस्त लावणें व जोराची चळवळ करणें हें माझें ध्येय आहे. व माझ्या या बहिष्कार तत्वाची उभारणी खुद्द मतदारच अर्धवट बहिष्कारापेक्षां पूर्ण बहिष्कार पसंत करतील ह्या समजुतीवर केलेली आहे. लोकांनाच अशा प्रकारचा बहिष्कार नको आहे असें धरून चालल्यास, ज्याचा त्याच्यावर विश्वास आहे त्यांनीं विरोधापेक्षां बहिष्कार कसा श्रेष्ठ आहे हें लोकांना समजावून देणें त्यांचें कर्तव्य आहे. कौन्सिलमध्यें जाणें म्हणजे बहुमतापुढें मान वांकविण्यास रखें आहे व ही सहकारिता आहे. जर आपल्याला सरकारचा राज्यकारभार बंद पाडावयाचा आहे तर आपण आपलें सर्व वजन व शक्ति सरकारच्या विरुद्ध खर्च केलें पाहिजे. जोंपर्यंत पंजाब व खिलाफतीच्या बाबतींत आपल्याला न्याय मिळणार नाहीं तोंपर्यंत तसें करण्याचा आपला निश्चय दृढ झाला पाहिजे. कारण हीं कौन्सिलें लोकमतदर्शक नाहींत; एवढेंच नव्हे तर त्यांत आपल्या इच्छेला बिलकल मान दिला जात नाहीं. जेव्हां तत्वाचा प्रश्न असतो तेव्हां ही गोष्ट ध्यानांत घेणें अत्यंत जरूर आहे. जो दिवाण मुळीं नोकरी करण्याचेंच पत्करतो तो नापसंती दर्शवून नोकरी करणाऱ्या दिवाणापेक्षां पुष्कळ बरा. नुसती नाखुषी दाखविण्यानें परिस्थिति अगदीं असह्य झाली आहे, असें दिसत नाहीं. सरकारनें उत्पन्न केलेली परिस्थिति इतकी असहाय्य झाली आहे कीं, स्वाभिमानी मनुष्याला असहकारितेशिवाय–पूर्ण बहिष्कार–दुसरा मार्गच राहिलेला नाहीं. लार्ड मिल्नरच्या कौन्सिलमध्यें जनरल बोथा यांनी रहाण्याचें साफ नाकारलें, कारण ज्या रीतीनें लार्ड मिल्नर यांनीं बोअर लोकांना वागविलें ती रीत त्यांना बिलकुल मान्य नव्हती शेवटीं जनरल बोथाचाच विजय झाला. कारण सबंध ट्रान्सवाल त्यांच्या पाठीशीं होता. राजकीय दृष्टीनें विचार केल्यास सर्व देशानें बहिष्काराचें तत्व मान्य करण्यावर विजय अवलंबून आहे. धार्मिक दृष्ट्या स्वतःला मान्य

असलेल्या तत्वाप्रमाणें त्या व्यक्तीनें वर्तन करतांच तो विजय झाला. एका व्यक्तीची ही कृति म्हणजे राष्ट्रीय विजयाचें लक्षण आहे; कारण ती कृति इतरांना मार्गदर्शक होते.

दुसरा मुद्दा असा आहे कीं, नव्या कौन्सिलमध्यें शिरून आपण आपला हेतु साध्य करूं. कारण काय तर जुन्या कौन्सिलापासून आपला अगदींच फायदा झाला नाहीं असें नाहीं. याचें उत्तर असें आहे कीं, त्यावेळेस असा आणीबाणीचा प्रसंग आला नव्हता. इंग्लिश लोकांच्या न्यायप्रियतेवरील व प्रामाणिकपणावरील आपला विश्वास उडाला नव्हता. कौन्सिलवरील बहिष्कार आपण शेवटास नेऊं असा आत्मविश्वास आमच्यांत त्यावेळेस आला नव्हता; अगर त्या गोष्टीचा आपण आज ज्या दृष्टीनें विचार करीत आहों त्या दृष्टीनें पूर्वी केला नसावा. कदाचित आज मितीला सर्वच करणें अस्तित्वांत असतील. कालानुसार मार्ग व पद्धती बदललात हें आपण विसरतां कामा नये व यावरोबर आपण शहाणे झालें पाहिजे, बाल्यावस्थेंत जें अन्न आपल्याला पोषक झालें तें तारुण्यावस्थेंत होईल असें नाहीं. —१४ जुलई १९२०

---

# राष्ट्राचा संदेश

खिलाफत परिषदेपुढें डॉ. सप्रूंनीं मुसलमानावर आलेल्या संकटाबद्दल सहानुभूति दाखविणारें जोरदार भाषण केलें; तथापि असहकारितेच्या चळवळीपासून पराङ्मुख होण्याबद्दल त्यांनीं मुसलमानांना उपदेश केला, असहकारितेच्या ऐवजीं दुसरा उपाय आपल्याला सुचवितां येत नाहीं ही गोष्ट त्यांनीं स्पष्टपणें कबूल केली; परंतु दुसरा उपाय असो अगर नसो असहकारिता मात्र रोग बरा करण्याऐवजीं वाढवील, हें त्यांचें ठाम मत आहे. हिंदी न्यायाधीशांना आपल्या जागा सोडण्याला प्रार्थना करण्यापूर्वी अशिक्षित मुसलमानबंधूंना विनंति करण्यांत मुसलमान लोक आपल्या शिरावर मोठी जबाबदारी घेत आहेत, असें डॉ. सप्रूंचें म्हणणे आहे. डॉ. सप्रूंचे या म्हणण्यांत अर्थ आहे, ही गोष्ट मला कबूल आहे. अशिक्षित लोकांच्या हातांत हें असहकारितेचें शस्त्र पडल्यास देशांत अनवस्था माजून देशावर आपत्ती ओढवेल अशी डॉक्टर मजकुरांना मनांतून भीति वाटत असावी. माझ्या मतें कोणत्याही प्रकारच्या असहकारितेपासून थोडा तरी फायदा झालाच

पाहिजे. व्हाईसरॉयाच्या देवडीवरील मनुष्य जर, महाराज, ज्या सरकारानें माझ्या राष्ट्राचा अपमान केला त्या सरकारची नोकरी करणें मला शक्य नाहीं, असें म्हणून आपल्या जागेचा राजिनामा देईल तर त्याची किंमत, सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध दिलेल्या जाड्या व्याख्यानापेक्षां किती तरी ज्यास्त आहे. तथापि जोंपर्यंत देशांतील बऱ्या लोकांचीं मनें वळविलीं नाहींत तोंपर्यंत गरीब लोकांकडे जाणें चुकीचें आहे. आणि ज्या प्रमाणें जरूर पडल्यास अशा अन्यायी सरकारशीं असलेला आपला संबंध तोड असें मी सरकारी पहारेवाल्यास सांगेन, त्याचप्रमाणें पंजाब व खिलाफत प्रकरणाविरुद्ध देशांत जी चळवळ सुरू झालेली आहे तिला येऊन मिळा अशी न्यायाधीशांना आणि कौन्सिलरांना मी विनंति करीन. ह्या दोन्ही गोष्टींचा राष्ट्राच्या मानापमानाशीं निकट संबंध आहे. ह्या लोकांनीं ज्या ह्या नोकऱ्या धरल्या त्या द्रव्याच्या अगर कीर्तीच्या लालसेनें नव्हे; तर देशाची सेवा आपल्या हातून घडावी म्हणून, असें मला वाटतें. कारण आतांपेक्षा पूर्वींच त्यांची प्राप्ति ज्यास्त होती कीर्तीकरितां त्यांनीं जागा पतकारिल्या असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण कीर्तीसाठीं मानाचा बळी देण्यास कोणीहि तयार होणार नाहीं. आज जर ते सरकारी नोकरींत असतील तर हातून देशसेवा घडावी हा एकच त्यांचा हेतु असला पाहिजे. ज्या वेळेस प्रजेचा सरकारावर विश्वास असतो, ज्यावेळेस सरकाराची राज्यपद्धति लोकमतदर्शक असते त्यावेळेस न्यायाधीश अगर मुलकी अमलदार देशाची सेवा करूं शकतात; परंतु ज्यावेळेस सरकार लोकमतदर्शक नसतें अगर अप्रामणिक व जुलमी बनतें, त्या वेळेस न्यायाधीश व मुलकी अंमलदार सरकारच्या नोकरींत राहून अप्रामाणिकपणाचे व जुलमाचे साधन बनतात. अशा वेळेस ह्या उच्च दर्जाच्या नोकरांना अगदीं कमींत कमी जर एखादी गोष्ट करतां येण्यासारखी असेल तर असल्या अप्रामाणिक व जुलमी सरकारशीं असलेला आपला संबंध तोडणें ही होय. न्यायाधीश म्हणतील कीं, त्यांचा धंदा राजकारणापेक्षां श्रेष्ठ आहे. ही गोष्ट खरी आहे व नेहमीं असावी. परंतु हें तत्व जोंपर्यंत सरकार एकंदरीनें लोकांच्या हिताकरितां असते व निदान बहुमतप्रदर्शक असते तापर्यंत खरें असते. राजकारणांत मिसळावयाचें नाहीं म्हणजे कोणत्याही विविक्षित पक्षाला जाऊन मिळावयाचें नाही. परंतु ज्या वेळेस देशांतील सर्वत्र लोक एक ध्येयाचे झाले, सबंध देशाची न्यायाची याचना निष्फळ ठरली त्या वेळेस तो प्रश्न एखाद्या विविक्षित पक्षाच्या हातीं मुळीं रहातच नाहीं. जगावें कीं मरावें

असा हा प्रश्न आहे. अशा आणिबाणीच्या प्रसंगीं गैरशिस्त वर्तन करणाऱ्या लोकमताला धाब्यावर बसविण्याऱ्या सरकारची नोकरी करण्याचें नाकारणें हें प्रत्येक रहिवाशाचें कर्तव्य बनतें. न्यायाधीश जर प्रजेचें नोकर असतील तर अशा वेळेस प्रजेच्या मताप्रमाणें वागणें यांना भाग आहे.

प्रतिपक्षाचें असें म्हणणें पडलें कीं, ज्या जागा मिळण्याकरितां आजपर्यंत अविश्रांत श्रम केलें त्या जागांवर बहिष्कार टाकून काय फायदा मिळणार? ह्या जागा आजपर्यंत झगडा केल्यामुळें मिळाल्या ही गोष्ट मला कबूल आहे. ह्या जागांच्या मदतीनें आपल्याला देशसेवा करावयास सांपडतें, म्हणून आपण याला महत्व देतों. त्या मिळविण्याकरितां आपल्याला श्रम करावे लागले म्हणून नव्हे ही गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. अर्थात ज्या क्षणाला त्यांच्या अंगच्या ह्या गुणाचा लोप होतो त्याच क्षणाला त्या कवडी मोल होतात. प्रथमारंभीं त्यांच्याकरितां आपल्याला श्रम करावे लागले म्हणून आपण त्यास किंमत देत होतों. परंतु आजच्यासारख्या स्थितींत त्या अपायकारक ठरतात. उच्च नोकरींत असलेल्या माझ्या देशबांधवांना माझी अशी विनंति आहे कीं, त्यांनीं जर आपल्या नोकरीचा राजिनामा दिला तर हा लढा तावडतोब मिटेलः व खालच्या वर्गाच्या लोकांनीं असहकारितेचा मार्ग पतकरण्यापासून कदाचित् येणाऱ्या संकटाची भीति दूर केल्याचें श्रेयहि त्यांना मिळेल, जर पदव्यावाले पदव्या सोडतील; केवळ सन्मान म्हणून सरकारी हुद्यावर असलेले गृहस्थ आपल्या जागेचा त्याग करतील, उच्च नोकरींतील लोक आपल्या नोकऱ्यांवर पाणी सोडतील व कायदेशीर कौन्सिलचे सभासद कायदे मंडळावर बहिष्कार टाकतील तर सरकार चटकन शुद्धीवर येईल व लोकांच्या मागण्या मान्य करील, लोकांची इतकी तयारी झाली असतां जर सरकार लोकमताला जुमानणार नाहीं तर त्याला लष्करी अम्मल पुकारून सोटेशाहीच सुरु करावी लागेल. आज जग इतकें पुढें गेलें आहे कीं, नधास्त पणें अशी सोटेशाही सुरू करण्याची इंग्लंडची प्राज्ञा नाहीं, मी सांगितलेल्या गोष्ट जर लोक करतील तर आज पर्यंत जगांत कधीं झाली नाहीं अशी राज्यक्रांती मुकाट्यानें घडून येईल असहकारितेच्या सामर्थ्य चा एकदा खात्री पटलीं कीं, सर्व प्रकारचा रक्तपात अगर अत्याचार बंद झालाच म्हणून समजावें.

एकाद्या राष्ट्रानें असहकारितेसारखें जालीम शस्त्र हातांत घेण्यास तशीच भयंकर परिस्थिति असावी लागेत. 'न भूतो न भविष्यति, असा आज

इस्लामाचा अपमान झाला आहे. इस्लामानें आज आत्मरक्षणाकरितां तयार झालें पाहिजे, नाहींतर यावत् चंद्रदिवाकरौ नसले तरी एकशतक तरी मृतप्राय होऊन पडलें पाहिजे, जालियांवालाबाग कत्तल व तिच्या नंतर झालेले रानटी अत्याचार हंटर कमिटीची सारवासारव, हिंदुस्तान सरकारचा खलिता, व्हाइसराय व सर ओडवायर यांना शाबासकी देणारें मि. मॉंटेग्यचें पत्र, लष्करीअमलांत ज्या अधिकाऱ्यानें पंजाबची धूळधाण करून टाकिली त्या अधिकाऱ्यांना वडतर्फ करण्याचें नाकारणें ह्यापेक्षा जास्त भयंकर अन्याय जगांत होऊं शकतील अशी मला कल्पना सुद्धां करतां येत नाहीं, हिंदुस्थानाला जर कांहीं अब्रूची चाड असेल तर सर्व ऐहिक सुखाची आहुति देऊन त्यानें ह्या अन्यायाची भरपाई करून घेतली पाहिजे. हिंदुस्थान तसें करणार नाहीं तर ह्यानें आपला आत्मा कवडीच्या मोलानें विकला असें होईल.

—जून ३०. १९२०

# मि. मॉंटेग्यू व खिलाफत चळवळ

दिवसेंदिवस खिलाफतची चळवळ वाढत जात आहे ही गोष्ट मि. मॉंटेग्यूंना खपूं नये हें साहजिक आहे. कॉमन्ससभेमध्यें विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना मि. मॉंटेग्यूंनीं उत्तर दिलें कीं, जरी मी ( गांधी ) गतकालीं देशाची मोठी सेवा बजाविली आहे, तरी सध्यांच्या माझ्या चळवळीकडे दुर्लक्ष करितां येत नाहीं. व सत्याग्रहाच्या चळवलीच्या वेळीं जितकी कृपा मला दाखविण्यांत आली तितकी ह्या वेळेस दाखविली जाईल अशी मी अपेक्षा करूं नये, त्यांचा हिंदुस्थान सरकारावर व प्रांतिक सरकारावर पूर्ण विश्वास असून त्यांचें त्या चळवळीकडे पूर्ण लक्ष आहे. व जी परिस्थिति उत्पन्न होईल तिला तोंड देण्याला हिंदुस्थान सरकारला पूर्ण अधिकार देण्यांत आले आहेत.

कांहीं ठिकाणीं मि. मॉंटेग्यूंचें हें उत्तर धमकावणीवजा समजलें जात आहे. कांहींच्या मतें या भाषणानें जरूर पडल्यास देशांत सोटेशाही सुरू करण्यास हिंदुस्थान सरकारला स्टेट सेक्रेटरीनें पूर्ण मुभा दिली आहे. लोकांच्या इच्छेप्रमाणें राज्य चालविण्याच्या मि. मॉंटेग्यूंच्या जाहीर ध्येयाला त्यांचें वरील धोरण विसंगत दिसतें, जर हंटर कमिटीचा निकाल खरा असेल व गेल्या सालच्या दंग्याचें कारण मी असेन तर खरोखर

मला अत्यंत दयेनें वागविण्यांत आलें यांत शंका नाहीं. गेल्या सालच्या माझ्या चळवळीपेक्षां सध्यांच्या ह्या माझ्या चळवळीपासून साम्राज्याला ज्यास्त धोका आहे, ही गोष्ट मला कबूल केली पाहिजे. असहकारितेची चळवळ सत्याग्रहाच्या चळवळीपेक्षां जास्त निरुपद्रवी आहे. परंतु परिणामीं ती सत्याग्रहापेक्षां सरकारला जास्त घातक आहे. सरकार या नाड्या इतक्या बंद पाडावयाच्या कीं, न्याय देणें त्याला भागच पडावें हा असहकारितेच्या चळवळीचा हेतु आहे. असहकारितेची चळवळ शेवटपर्यंत नेली तर सरकारचा कारभार सर्वस्वीं बंद पाडण्याचें सामर्थ्य ह्या चळवळींत आहे. माझ्या एका मित्रानें मी १२४ 'अ' कलमाखालीं येत नाहीं काय, असा एकदां मला प्रश्न केला. जरी या गोष्टीचा मी फारसा विचार केला नव्हता तरी बहुतेक त्या कलमाच्या तडाख्यांत मी सांपडेन व मी निर्दोषी आहे असें मला म्हणतां येणार नाहीं, कारण, ह्या सरकाराबद्दल मला बिलकूल प्रेम वाटत नाहीं, ही गोष्ट मला प्रांजलपणें कबूल केली पाहिजे. ह्या सरकाराबद्दल असंतोष उत्पन्न व्हावा, याच हेतूनें मी व्याख्यानें देतों. उद्देश हा कीं, ज्या सरकारवरील आपला विश्वास उडाला व ज्याच्याबद्दल आपल्याला आदर वाटत नाहीं अशा सरकाराला मदत करण्याला अगर त्याच्याशीं सहकारिता करण्याला लोकांना लाज वाटावी.

हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार त्यांना मी बिलकुल वेगवेगळीं समजत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारचें खिलाफतीचें धोरण मान्य केलें आहे तर पंजाबच्या बाबतींत शूर जातींना नामर्द करणारें व त्यांच्यावर जूलुम करणारें हिंदुस्थान सरकारचें धोरण ब्रिटिश सरकारनें उचलून धरलें आहे. इंग्लिश लोकांनीं वचनभंग करून विनाकारण सात कोट मुसलमानांच्या धर्मभावना दुखविल्या आहेत. पंजाब सरकारच्या मगरूर अम्मलदारांनीं निरोंषी स्त्रीपुरुषांचा अपमान केला आहे. प्रजेवर झालेल्या अन्यायाचें परिमार्जन झालें नाहीं इतकेंच नव्हे तर ज्या अधिकाऱ्यांनीं निर्दयतेनें प्रजेचा अमानुष छळ केला ते अधिकारी अजून ह्या सरकारच्या नोकरींत आहेत. अमृतसरला माझी सर्व तपश्चर्या घालून सरकारशीं सहकारिता करा व बादशहाच्या जाहीरनाम्यांत व्यक्त केलेल्या इच्छांना मान द्या, असा जो मी लोकांना आग्रह केला, त्याचें कारण खरोखरच नवीन युगाला प्रारंभ झाला असून आजपर्यंत राज्यकर्त्यांना प्रजेबद्दल वाटत असलेली भीति व अविश्वास जाऊन त्या ठिकाणीं आदर व विश्वास नांदूं लागेल अशी माझी प्रामाणिक समजूत होती. मुसलमानांच्या धर्मसमजुतींना

५

मान देण्यांत येऊन पंजाबांत अत्याचार करणाऱ्या अंमलदारांना वडतर्फ केलें जाईल, व जें सरकार लोकांना त्यांच्या अपराधांबद्दल शासन करण्यास सदैव तत्पर असतें तें स्वतःच्या नोकरांनाहि त्यांच्या अपराधाबद्दल शिक्षा करण्यास मागें पहाणार नाहीं, अशी प्रजेची वालंबाल खात्री करून दिली जाईल असें मला मनापासून वाटत होतें. साम्राज्याचे सभ्यांचे प्रतिनिधी अप्रामाणिक व पापापुण्याचा विचार न करणारे झालेले पाहून, माझ्या आश्चर्याला व खेदाला सीमा राहिली नाहीं. लोकमताबद्दल यत्किंचितहि आदर वसत नसून हिंदु लोकांच्या अब्रूला ते कवडीचीहि किंमत देत नाहींत. ज्या सरकाराजवळ इतके दुष्ट नोकर आहेत त्या सरकाराबद्दल माझ्या अंतःकरणांत प्रेम राहणें शक्य नाहीं. मोकळें राहून होणाऱ्या अन्यायाला साक्षी रहाणें मला अपमानास्पद वाटतें. सरकारचें आयुष्य संपुष्टांत आणण्याचा जर मी आग्रह धरला तर मला बंदींत टाकण्याची मि. मॉटेग्युनीं दिलेली धमकी यथायोग्य आहे. जर माझी चळवळ यशस्वी झाली तर त्याचा परिणाम सभ्यांचें सरकार नाहींसे होण्यांत च होणार आहे. मला जें वाईट वाटतें तें हेंच कीं, माझी मागची सेवा जर मि. मॉटेग्यूना मान्य आहे तर माझ्यासारखा हितचिंतक इतका बेताणनाला सरकार तसेंच भयंकर बिघडलें असलें पाहिजे. ही गोष्ट त्यांच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. मला धमकी देण्यापेक्षां खिलाफत व पंजाबच्या बाबतींत झालेला अन्याय दूर करणें ज्यास्त योग्य झालें असतें. इतकेंच काय पण माझी पूर्ण खात्री आहे कीं, अशा अन्यायी सरकाराबद्दल असंतोष वाढविण्यानेंच मी साम्राज्याची जास्त सेवा केली आहे, असें भावी इतिहासकार कबूल करतील.

ज्या लोकांना माझें कार्य पसंत आहे त्यांचा कर्तव्याचा मार्ग सरळ आहे. माझें स्वातंत्र्य हरण करणें जरूर आहे असें समजून जर सरकार मला बंदींत टाकील, तर त्याबद्दल त्या लोकांनीं राग मानतां कामा नये. देशाच्या कायद्याप्रमाणें जर ही बंदी असेल तर त्याला विरोध करण्याचा त्या देशाच्या रहिवाशाला अधिकार नाहीं. मग अशा रहिवाशाबद्दल सहानुभूति वाटत असलेल्या लोकांना तर तो नाहींच नाहीं. माझ्या बाबतींत सहानुभूतीचा प्रश्नच उद्भवत नाहीं. कारण असलें सरकार [illegible] करावें म्हणून मी जाणून बुजून प्रयत्न करीत आहे. तेव्हां माझ्या बंदीवासाचा दिवस आनंदाचा असला पाहिजे. त्याच दिवशीं माझ्या कार्याला यश येऊं लागलें आहे, असें मी समजेन. मी ज्या कार्याकरितां बंदिवासांत गेलों तें कार्य माझ्या अनुयायांनीं माझ्या मागें नेटानें चालविलें

पाहिजे. मला तुरुंगांत घालण्यांत असहकारितेची चळवळ बेकायदेशीर भासवावी हाच सरकारचा हेतु असला पाहिजे. मला पकडल्यानंतर जर असहकारितेची चळवळ तशीच जोरानें पुढें चालेल तर सरकारला एकंदर लोकांना तुरुंगांत टाकावें लागेल, नाहीं तर लोकांची सहकारिता संपादन करण्याकरितां लोकांच्या मागण्या कबूल कराव्या लागतील, हें उघडच आहे. जर लोक कोणत्याहि निमित्तानें अन्यायाला प्रवृत्त होतील तर त्याचा भयंकर अनिष्ट परिणाम होईल. म्हणून या मोहिमेंत मला अगर दुसऱ्या कोणाला पकडल्यास लोकांनीं शांतता राखली पाहिजे; तरच यशःप्राप्ति होईल. एका हातानें सरकारच्या आयुष्यावर घाला आणावयाचा, व दुसऱ्या हातानें आत्मसंरक्षणाकरितां सरकारनें केलेल्या आत्मप्रयत्नाला विरोध करावयाचा हें विसंगत आहे.

---

# आगस्ट १ ली

आगस्टची पहिली तारीख उजाडण्यापूर्वी तुर्कस्तानच्या तहांत योग्य ते फेरफार करण्याचें वचन बादशहाचे मंत्री देतील व त्यामुळें असहकारितेची चळवळ बंद ठेवावी लागेल असा संभव फारच कमी आहे. हिंदुस्थानच्या इतिहासांत गेल्या वर्षाच्या एप्रील महिन्याची सहावी तारीख जितकी महत्वाची समजली जाईल तितकीच चालू वर्षाच्या आगस्ट महिन्याची पहिली तारीख समजली जाईल. एप्रील ६ ला रौलेट कानूची स्मशानयात्रा निघाली. सत्याग्रहाच्या चळवळीपुढें रौलेट कायदा जिवंत राहील अशी कोणाला शंकासुद्धा नाहीं. सत्याग्रहाची चळवळ तात्पुरती बंद ठेवण्यांत आली आहे; कायमची केव्हांहि सोडून देण्यांत आलेली नाहीं. जी शक्ति असल्या जुलमी सरकाराला पंजाब व खिलाफतच्या बाबतींत न्याय देण्याला भाग पाडील तीच शक्ति रौलेट कायदा रद्द करील ही गोष्ट प्रत्येक मनुष्य जाणून आहे.

गेल्या वर्षी झालेल्या प्रकारामुळें पुष्कळ लोकांना असहकारितेच्या चळवळीची भीति वाटते. लोक अत्याचार करतील व त्याचा परिणाम गेल्या वर्षाप्रमाणें सरकार फिरून सूडाच्या इच्छेनें प्रेरित होऊन पंजाब प्रकरणाची पुनरावृत्ति करील अशी त्यांना भीति वाटते. ह्या भयंकर सुडा[illegible] [illegible] दुसरा सूड कोठेंहि आढळत नाहीं. मला जितके लोकां[illegible] [illegible] वईट वाटतें तितकें सरकारच्या रागाबद्दल वाटत नाहीं. पहिली गोष्ट सर्व राष्ट्राला राग जड

त्याची निदर्शक आहे; दुसरी थोड्याश्या मंडळीला ( कार्पोरेशन ) रोग झाल्याचें दर्शविते. अर्थात एका लहान मंडळाचा रोग बरा करण्यापेक्षां सबंध राष्ट्राचा रोग बरा करणें फार कठीण काम आहे. ज्या सरकारनें राज्य करण्याला स्वतःला अपात्र करून घेतलें आहे त्याला उखडून टाकणें लाखों लोकांचें वेड काढून टाकण्यापेक्षां ज्यास्त सोपें आहे. परंतु सरकार अगर लोक अथवा दोघेंहि चुका करतील म्हणून मोठ्या चळवळी बंद ठेवतां येत नाहींत. अपयश व चुकाच आपल्याला शहाणपण शिकवितात व आपला फायदा करितात. जो खरा सेनापती असतो तो लहान लहान पराभव झाले म्हणून मुख्य लढाई करण्याला मागें घेत नाहीं. असहकारितेची चळवळ आपण ह्याच विश्वासानें व आशेनें हातीं घेतली पाहिजे. मागीलप्रमाणें या चळवळीची प्राणप्रतिष्ठा व्रतस्थ राहून, ईशप्रार्थना करून करावयाची आहे; ह्या चळवळीचें धार्मिक स्वरूप अशानेंच धारण होणार आहे.

समाजामध्यें सुयंत्रितपणा, शिस्त व सहकारिता उत्पन्न करणें व कार्यकारणामध्यें प्रेम वाढविणें असें महत् कार्य असहकारितेच्या चळवळीला करावयाचें आहे. असहकारिता परिणामकारक होणें संघटित प्रयत्नावर अवलंबून आहे. पंजाबच्या दौऱ्यांत सभेला जमलेल्या हजारों लोकांनीं माझी खात्री पटवून दिली आहे की, सरकारशीं असलेला संबंध तोडावा अशी लोकांची इच्छा आहे; परंतु तो कसा तोडावा हें त्यांना समजलें पाहिजे. बहुतेक लोकांना राज्यकारभाराच्या गुंतागुंतीची कल्पना नसते. अप्रत्यक्षपणें प्रत्येक रहिवाशी प्रचलित राज्यपद्धतीला पुष्कळ तऱ्हेनें मदत करीत असतो; त्याची त्यांना जाणीवच होत नाहीं. अशा रीतीनें प्रत्येक मनुष्य सरकारच्या प्रत्येक कृत्याबद्दल जबाबदार बनतो. जोंपर्यंत सरकारचा कारभार असह्य झाला नाहीं तोंपर्यंत त्याला मदत करणें बरोबर आहे; परंतु ज्या वेळेस तो कारभार त्याचें व त्याचें देशाचें नुकसान करतो त्या वेळेस अशा सरकारला होत असलेली मदत बंद करणें हें त्याचें कर्तव्य आहे.

परंतु ही गोष्ट सुव्यवस्थितपणें कशी करावी हें प्रत्येक रहिवाशाला माहीत नसते. क्रोधापासून अव्यवस्थितपणा उत्पन्न होतो तर शहाण्या विरोधापासून निर्भीतीचा जन्म होतो. अर्थात् विजयाचें पहिलें साधन चळवळीला अत्याचाराचा विटाळहि होऊं देतां कामा नये. सरकारच्या प्रतिनिधींवर अगर असहकारितेचें तत्व मान्य न करणाऱ्या म्हणजे सरकारच्या मदतनिसांवर अत्याचार करणें म्हणजे प्रत्येक वेळेला आपल्या

चळवळीची पिछेहाट करण्यासारखें आहे. त्यामुळें असहकारितेची चळवळ बंद पडून विनाकारण निर्दोषी माणसाचा बळी घेतला जाईल अशी स्थिति असल्यामुळें शक्य तितक्या अल्पकाळांत आपल्या चळवळीला यश पाहिजे असें ज्या असहकारयोग्याला वाटतें त्यानें आपल्या आसपास शांतता ठेवणें आद्य कर्तव्य समजलें पाहिजे.

असहकारितेच्या चळवळीपासून लोकांना पराङ्मुख करण्याकरितां सर नारायण चंदावरकर व त्यांचे मित्र यांनीं जें पत्रक प्रसिद्ध केलें आहे तें मी अगदीं काळजीपूर्वक वाचलें आहे. ह्या पत्रकांत असहकारितेविरुद्ध एकादा विचारणीय मुद्दा मिळेल अशी मला आशा होती; परंतु मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं, त्यांत न कळत मुख्य धर्माचा व इतिहासाचा अर्थभेद केलेला मात्र मला आढळून आला. आर्य धर्मास व आर्य संस्कृतीस असहकारिता अमान्य आहे, एवढेंच नव्हे तर ज्या ज्या धर्मानें मनुष्यजातीचें पोषण होऊन तिची उन्नती होते त्या त्या धर्मास असहकारिता नापसंत आहे असें ह्या पत्रिकेंत म्हटलें आहे. असुरी व दैवी शक्ति यांच्या लढ्यांत दैवी शक्तीस गीता असहकारितेचा उपदेश करते असें माझें म्हणणें आहे. जर गीतेचा सरळ अर्थ घेतला तर सत्याच्या बाजूनें लढणाऱ्या अर्जुनाला अन्यायी कौरवांशीं शेवटपर्यंत लढण्याची गीतेची आज्ञा आहे. 'सत्यानें असत्याचा संगत टाकावी' असा तुळशीदासाचा उपदेश आहे. पारशी धर्म म्हणजे आरमझद व आहरात ह्यांच्यामध्यें चालणारें अक्षय द्वंद्व होय. ह्यांच्यामध्यें समेट केव्हांहि होत नाहीं. बायबलामध्यें असहकारितेची चेष्टा केली आहे असें म्हणणें म्हणजे सत्याग्रहामधला जो राजा त्या येशूच्या अवताराचें स्वारस्य समजलें नाहीं अशी कबूली देण्यासारखें आहे. येशूनें सादूसी व फारशी ह्यांच्या सत्तेशीं कधींहि तडजोड केली नाहीं व सत्याकरितां आइबापांची व मुलांची ताटातूट करण्याला मागें पाहिलें नाहीं. आणि पैगंबरानें काय केलें? जोंपर्यंत स्वतःच्या प्राणावर संकट आलें नव्हतें तोंपर्यंत पैगंबरानें मक्केमध्यें जोराची असहकारिता केली व ज्या वेळेला आपण व आपले अनुयायी प्राणाला आंचवू अशी खात्री पटली त्या वेळेला त्यानें मक्केचा त्याग केला. जशी न्यायी मनुष्याशीं व राजाशीं सहकारिता करा अशी प्रत्येक धर्माची आज्ञा आहे, त्याचप्रमाणें प्रत्येक अन्यायी माणसाशीं व राजाशीं असहकारिता करा अशीहि पण प्रत्येक धर्माची शिकवणूक आहे. इतकेंच काय पण बहुतेक धर्मग्रंथ असहकारितेच्याहि पुढें गेले आहेत. अन्यायाला नामर्दपणानें मान वांकविण्यापेक्षां शस्त्रांनीं त्याचा प्रतिकार करावा असें त्यांनीं सांगि-

तलें आहे. ज्या हिंदुधर्माबद्दल पत्रकांत इतकी वाच्यता केली आहे तो हिंदुधर्म असहकारिता करणें हेंच कर्तव्य सांगतो. प्रल्हादानें आपल्या पित्याचा त्याग केला, मिराबाईनें आपल्या पतीला सोडलें, बिभीषणानें आपल्या राक्षस भावावर बहिष्कार घातला असहकारितेच्या ऐहिक स्वरूपाबद्दल लिहितांना पत्रकार म्हणतात, असहकारितेच्या चळवळीला यश येऊन तिच्यापासून फायदा झाला आहे असें जगाच्या इतिहासांत कोठेंहि उदाहरण नाहीं.

अगदीं अलीकडचे व पूर्ण यशस्वी असें असहकारितेचें उदाहरण म्हटलें म्हणजे जनरल बोथाचें होय. त्यांनीं लॉर्ड मिल्नरच्या सुधारलेल्या कौन्सिलावर बहिष्कार घालून आपल्या देशाला उत्कृष्ट राज्यपद्धती मिळविली. रशियाच्या इखोबूर्नी असहकारिता केली व जरी हे मूठभर लोक होते तरी त्यांच्या दुःखांचा सुधारलेल्या जगावर इतका परिणाम झाला कीं, कॅनेडियन लोकांनीं त्यांना आपल्या देशांत आश्रय दिला व आज हे लोक तेथें सुखी आहेत.

लहान लहान राज्यांत धन्याच्या जुलुमास कंटाळून रयतेनें धन्यावर बहिष्कार टाकला व त्याला वठणीवर आणलें, अशीं उदाहरणें हिंदुस्थानच्या इतिहासांत किती तरी सांपडतील. सुव्यवस्थित रीतीनें चालविलेल्या असहकारितेच्या चळवळीला अपयश आल्याचा दाखला इतिहासांत कोठेंहि मिळत नाहीं, हें मला माहीत आहे. आतापर्यंत मी अत्याचार-विरहित असहकारितेचे दाखले दिले आहेत. अत्याचारमिश्र असहकारितेचे ऐतिहासिक दाखले देऊन वाचकांचा अपमान करावा असें मला वाटत नाहीं; परंतु असल्या प्रकारची असहकारिता यशस्वी झाल्याचीं जशीं उदाहरणें आहेत तशीं तीं अपयशस्वी झाल्याचींहि उदाहरणें आहेत, ही गोष्ट कबूल करणें मला जरूर आहे. ह्या गोष्टीची मला जाणीव आहे म्हणूनच मी अत्याचारविरहित असहकारिता देशापुढें ठेविली आहे. जर समाधानकारक रीतीनें तिची अमलबजावणी होईल तर यश खात्रीनें ठेवलेलें आहे. व जरी ह्या प्रकारच्या असहकारितेला लोक येऊन मिळाले नाहींत तरी त्यापासून अपाय नाहीं. समजा कीं, एका मनुष्यानें आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन असहकारिता केली तर त्याचें नुकसान न होतां फायदाच होईल, हें ह्या चळवळीचें धार्मिक अंग झालें. राजकीय दृष्ट्या परिणामकारक होण्याला ह्या चळवळीला सर्वांचा पाठिंबा मिळाला पाहिजे. त्वेषाच्या भरांत अगर इतर कारणानें लोकांनीं अत्याचाराला

प्रवृत्त होण्याशिवाय असहकारितेपासून कसलाहि अनिष्ट परिणाम होण्याची मला भीति वाटत नाहीं. सर्व जातीला नामर्द करण्यापेक्षां अत्याचार मला हजार पटींनीं पुरवला.

---

# कांग्रेस व असहकारिता

ज्या ना. पंडित मालविजयींबद्दल मला अत्यंत आदर आहे व ज्यांना मी 'धर्मात्मा' ह्या नांवानें संबोधितों, त्या पंडितजींनीं कांग्रेस निकाल देईपर्यंत मी असहकारितेची चळवळ सुरू करूं नये अशी जाहीर आणि खाजगी रीतीनें मला विनंति केली आहे. मराठा पत्राचेंहि असेंच मत आहे. अशा लोकांपासून आलेल्या विनंतीचा मीं विचार केला; परंतु खेदाची गोष्ट ही कीं, त्या मान्य कराव्यात असें माझी मनोदेवता मला सांगत नाहीं. पंडितजींना आनंद देण्याकरतां मी वाटेल तें करीन व वाटेल तें देईन. माझ्या कार्याला त्यांची संमति व आशीर्वाद मिळावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. परंतु असहकारिता कमिटीनें आंखून दिलेला असहकारितेचा मार्ग सोडूं नये अशी माझी मनोदेवता सांगते. आपल्या आयुष्यांत असे कांहीं प्रसंग येतात कीं, त्या प्रसंगीं जरी आपल्याला आपले मित्र बरोबर नेतां आले नाहींत तरी आपण पुढें गेलेंच पाहिजे. ज्यावेळेला दोन कर्तव्यांबद्दल अंतःकरणांत अनिश्चितपणा उत्पन्न होतो, त्यावेळेला सदसद्विवेक बुद्धीचाच निकाल शेवटचा मानला पाहिजे.

लवकरच कॉंग्रेसची बैठक भरेल व असहकारितेच्या चळवळीचा सर्व बाजूनें विचार करून ती आपलें मत देईल हें माझी चळवळ बंद ठेवण्याच्या विनंतीचें कारण दिलें जातें. तेव्हां कॉंग्रेसच्या निकालाची वाट पहाणें चांगलें असें पंडितजींचें म्हणणें. ज्या गोष्टीबद्दल स्वतःच्या मनांत कोणतीहि शंका नाहीं ती गोष्ट करण्यापूर्वी कॉंग्रेसचा सल्ला घेणें हें कॉंग्रेसवाल्याचें कर्तव्य आहे असें मला वाटत नाहीं. ह्याच्या उलट वर्तन करणें आत्मघातकीपणाचें आहे.

कॉंग्रेस ही राष्ट्राचें मत प्रदर्शित करणारी संस्था आहे. ज्याच्याजवळ कांहीं कार्यक्रम आहे व तो अमलांत यावा अशी इच्छा आहे व ज्याला लोकमत जागृत करावयाचें आहे त्याला साहाजिकच कॉंग्रेसनें त्याच्यावर वादविवाद करून आपलें मत द्यावें अशी अपेक्षा असते; परंतु जेव्हां एखाद्याची एखाद्या धोरणावर अगर कार्यावर पूर्ण श्रद्धा असते तेव्हां त्यानें

कॉंग्रेसच्या निकालाची वाट पाहणें मूर्खपणाचें आहे. उलटपक्षीं सर्व राष्ट्रानें त्याचा स्वीकार करावा म्हणून त्याप्रमाणें वागणें व त्याचें कर्तव्य जगाच्या निदर्शनाला आणून देणें हें त्याचें कर्तव्य आहे. ज्या वेळेला कॉंग्रेसचें धोरण माझ्या सदसद्विवेक बुद्धीच्या विरुद्ध नाहीं, त्या वेळेला तें अमलांत आणणें माझें काम आहे; परंतु जर माझ्या बाजूला अत्यल्प मत असेल तर मी कॉंग्रेसच्या नांवाखालीं आपलें काम करणार नाहीं; कॉंग्रेसच्या मताविरुद्ध कॉंग्रेसवाल्यांना वागतांच येत नाहीं असा अर्थ नव्हे. जर तो विरुद्ध वर्तन करील तर तें स्वतःच्या जबाबदारीवर व कॉंग्रेस आपल्या बाजूची नाहीं, हें पूर्ण ध्यानांत ठेवून करील.

प्रत्येक कांग्रेसवाल्याला अगर प्रत्येक संस्थेला आपलीं स्वतःचीं मतें जाहीर करण्याचा अधिकार आहे, नव्हे कांहीं वेळेला तसें नुसतें जाहीर न करतां त्याप्रमाणें वागणें व कांग्रेसच्या आधीं आघाडी मारणें, हेंच त्याचें कर्तव्य आहे. खरोखर देशसेवा करण्याचा हाच उत्तम मार्ग आहे. पूर्ण विचारांअंतीं ठरलेल्या गोष्टी सुरु करून आपण कांग्रेससारख्या चर्चात्मक सभेला देशाचें मत काय आहे हें ओळखून आपलें मत देण्याला विषय देतों. अमुक एक विषयांवर आपल्यापैकीं कांहींजणांचीं ठाम मतें असल्याशिवाय कांग्रेसला राष्ट्राचें मत काय आहे, हें निश्चितपणें जाहीर करतां येणें शक्य नाहीं. जर प्रत्येकजण डळमळीत राहील तर कांग्रेसलाहि गुळमुळीत राहावें लागेल. प्रत्येक संस्थेच्या सभासदांचे तीन वर्ग पडतात. ज्यांचे एकाद्या विषयावर अनुकूल मत आहे असा एक वर्ग; ज्यांचें प्रतिकूल मत आहे असा दुसरा वर्ग व तिसरा असा एक वर्ग असतो कीं, त्याचें निश्चित असें कांहींच मत नसतें. ह्या तिसऱ्या परंतु मोठ्या वर्गाला कांग्रेस मार्गदर्शक बनते. असहकारितेवरील माझीं मतें निश्चित ( ठाम ) आहेत. जर मिळालेल्या सुधारणांपासून खरोखर कांहीं कार्य व्हावें असें आपणाला वाटत असेल तर आपल्याला सध्यांचें घाणेरडें व कोंदट वातावरण बदलून, त्यीं ठिकाणीं शुद्ध, निर्मल व उत्तेजित करणारें वातावरण तयार केलें पाहिजे; खिलाफत व पंजाबच्या बाबतींत न्याय देण्याला सरकारला भाग पाडलें पाहिजे. असत्याच्या व दांडगाईच्या जोरावर ह्या दोन प्रकरणांतील अन्यायाचें समर्थन करण्यांत आलें आहे. सरकारशीं सहकारिता करण्यापूर्वी सरकारला पवित्र करणें हें राष्ट्राचें पाहिलें कर्तव्य आहे. विरोधी धोरण सुद्ध जेथें परस्परांबद्दल आदर व विश्वास आहे तेथेंच शक्य आहे. हल्लींच्या सरकारला आपल्याबद्दल अगर आपल्या मताबद्दल कसलाहि आदर नाहीं;

अशा स्थितींत सहकारिता करणें गुन्हा आहे. अशीं माझीं मतें असल्यामुळें कांग्रेसला मत देण्याला भूमिका तयार करून कांग्रेसला व देशाला असहकारिता आचरणांत आणण्याला लावलें तरच मी देशाची व कांग्रेसची सेवा करूं शकेन.

मी असहकारितेची चळवळ बंद ठेवणें म्हणजे मुसलमान बंधूंशीं मित्रद्रोह करण्यासारखें आहे. त्यांना त्यांच्या धर्माची आज्ञा पाळवयाची आहे. दिलेलीं वचनें मोडून व नीतीचे सर्व कायदे धाब्यावर बसवून ब्रिटिश मंत्र्यांनीं मुसलमान लोकांच्या धर्मसमजुतींना दुखविलें आहे. मुसलमान लोकांना कांहीं तरी केलेंच पाहिजे. त्यांना कांग्रेसच्या निकालाची वाट पाहतां येत नाहीं. कांग्रेसनें त्यांच्या कार्याला संमति द्यावी व त्यांच्या दुखाःचे व जबाबदारीचे वाटेकरी व्हावें अशी फक्त त्यांची अपेक्षा आहे. कांग्रेस आपलें धोरण ठरवीपर्यंत त्यांना थांबतां येत नाहीं; किंवा कांग्रेसनें विरुद्ध मत दिल्यास त्यांना त्यांचा मार्ग तो चुकीचा आहे असें ठरेपर्यंत बदलतां येणार नाहीं. खिलाफत हा त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचा प्रश्न आहे व जेथें सदसद्विवेकबुद्धीचा प्रश्न आहे तेथें बहुमताचें म्हणणें मान्य केलें पाहिजे, असें म्हणतां येणार नाहीं.

---

# तरवार

या पाशवी शक्तीच्या युगांत तरवारीच्या सामर्थ्यांत विश्वास न ठेवणारा एकादा मनुष्य असेल अशी कल्पना करणें सुद्धां अशक्य आहे. जरी लोकांनीं अत्याचार केले तरी असहकारितेची चळवळ बंद करूं नका असा सल्ला देणारीं निनांवीं पत्रें मला येतात. दुसरे कांहीं लोक मी गुप्तपणें बंड करण्याच्या बेतांत असलों पाहिजे असें गृहीत धरून, उघडपणें बंडाचें निशाण उभारण्याचा सुदीन केव्हां उगवणार, असा मला प्रश्न करतात. उघड अगर गुप्त दंगेधोपे केल्याशिवाय इंग्लिश लोक शरण येणार नाहींत, अशी माझी समजूत घालण्याचा ते प्रयत्न करतात. कांहीं असेहि हरीचे लाल आहेत कीं, त्यांचा मी पक्का लुच्चा मनुष्य आहे अशी बालंबाल खात्री झाली आहे. व माझा इतराइतकाच अत्याचारावर विश्वास आहे, त्याबद्दल त्यांना तिळमात्र संशय नाहीं. शेंकडा नव्वद लोकांवर तरवारीचा इतका पगडा बसला आहे व असहकारयोग यशस्वी

होणें सर्वतोपरी अत्याचारविरहित चळवळीवर अवलंबून असल्यामुळें व बरेच लोकांना माझे विचार मार्गदर्शक होणार असल्यामुळें ते जनतेपुढें सरळ स्पष्टपणें मांडणें जरूर आहे. भीरुता व अत्याचार ह्यांच्यामध्यें निवड करावयाची असेल तर मी अत्याचार पतकरीन असें मला वाटतें. १९०८ मध्यें तुम यावर हल्ला होऊन प्राणावर बेतलें होतें तेव्हां जर मी हजर असतों तर मी तुमच्या मतें काय करावयास पाहिजे होतें ? नामर्दासारखें पळून जावयाचें कीं माझ्या शक्तीचा उपयोग करून तुमचें रक्षण करावयाचें ? असा माझ्या मुलानें प्रश्न केला. मी उत्तर दिलें, अवश्य दांडगाई ( हाताचा उपयोग ) करून माझें रक्षण करणें तुझं कर्तव्य होतें. ह्याच तत्वावर मी बोअर युद्धांत झुलुबंडांत व गेल्या युद्धांत काम केलें; आणि ह्याच तत्वावावर ज्यांचा शस्त्रावर विश्वास आहे त्यांना लष्करी शिक्षण द्यावें असें मी प्रतिपादन करतों. स्वतःचा झालेला अपमान सहन करून जगण्यापेक्षां देशाच्या अब्रूचें रक्षण करण्याकरतां हिंदी लोकांनीं हातीं शस्त्र घेतलेलें मला चालेल.

परंतु अहिंसा अत्याचारापेक्षां अनंतपटीनें श्रेष्ठ आहे. शिक्षा करण्यापेक्षां क्षमा करणें जास्त थोरपणाचें आहे. " क्षमा वीरस्य भूषणम् " शक्ती असून क्षमा केली तर ती क्षमा! बलहीन क्षमेला अर्थच नाहीं. ज्यावेळेस मांजर उंदराचें तुकडें तुकडे करतें त्यावेळेस उंदरानं मांजराला क्षमा करणें हास्यास्पद आहे. ज. डायर व त्यांच्या इतर साथीदारांना योग्य ती शिक्षा करा अशी लोक मागणी करतात, त्याचें महत्व मला समजतें शक्य असतें तर ह्या लोकांनीं ज. डायरचे तुकडे तुकडे केले असते; परंतु भरतखंड इतका असहाय्य आहे. असें मला वाटत नाहीं. फक्त हिंदुस्थानाच्या व माझ्या शक्तींचा यापेक्षां चांगल्या कार्याकडे उपयोग करावा अशी माझी इच्छा आहे.

लोकांनीं माझ्या मताबद्दल गैरसमज करून घेऊं नये. शारीरिक बळ खरी शक्ति नव्हे तर दुर्दम इच्छा हीच खरी शक्ति. नुसत्या शारीरिक बलाचा विचार केला तर सर्वसाधारण झुलु मनुष्य इंग्रज मनुष्यापेक्षां केव्हांहि श्रेष्ठ भासतो. पण इंग्रज मुलगा दृष्टीस पडतांच तो पलायन करतो कारण इंग्रज मुलाच्या हातांतील पिस्तूल पाहून ह्याचें भीतीनें अंग कापूं लागतें. मृत्यूचें त्याला भय वाटतें व जरी त्याचें शरीर लठ्ठ असतें तरी तो दुर्बल होतो. जर आपण विचार केला तर ३० कोटी हिंदी लोकांना एक लाख इंग्रज मनुष्यांना भिण्याचें कांहीं कारण नाहीं, असें आपल्या लक्षात

येईल. जो धैर्यानें क्षमा करतो त्याला आत्मबलाची पूर्ण जाणीव असते जी क्षमा म्हणून क्षमा केली असते तिच्या जाणीवेनेपासून आच रसामर्थ्य आपल्यांत उत्पन्न होतें. मग एकाद्या डायरची अगर फ्रँक जॉनसनची भारतमातेकडे वाकड्या नजरेनें पहाण्याची छाती काय! माझ्या म्हणण्याची सत्यता आज घटकेला आपल्याला पटवतां येत नाहीं ह्याबद्दल मला कांहींच वाटत नाहीं. आपल्याला इतकें कामानें चिरडलें आहे कीं, आपल्याला राग न येणें अगर सुडाची इच्छा आपल्याला उत्पन्न न होणें अशक्य आहे; परंतु शिक्षा करण्याच्या हक्कावर जर हिंदुस्थान पाणी सोडील तर त्यापासून त्याचा जास्त फायदा होईल, असें म्हटल्याशिवाय माझ्यानें रहावत नाहीं. ह्यापेक्षां उच्च कार्य आपल्याला करावयाचें आहे. जगाला श्रेष्ठ मार्ग दाखवून द्यावयाचा आहे.

मी नुसता कल्पनासृष्टींत भराऱ्या मारणारा मनुष्य नाहीं. अहिंसाधर्म फक्त ऋषींचा व स्वतःचा नाहीं. जो सर्वसाधारण मनुष्यकरताहि आहे. हिंसा जसी पशुचा धर्म तसा हिंसा हा मानवी धर्म. पशु–योनीमध्यें आत्म्याची जाणीव नसते; फक्त शरीरबलाची असते. मानव योनी सर्वांत श्रेष्ठ असल्यामुळें त्यानें श्रेष्ठ कायदा पाळला पाहिजे. त्यानें आत्मीय सामर्थ्याला महत्व दिलें पाहिजे.

म्हणून हिंदुस्थानापुढें आत्माहुतीचा प्राचीन धर्म ठेवण्याचें मी ठरविलें आहे. कारण सत्याग्रह व त्याच्या शाखा आणि असहकारिता ही सर्वस्वीं निरनिराळी नांवें आहेत. ज्या ऋषींनीं असल्या जगांत अहिंसा धर्म स्थापला ते न्यूटनपेक्षां जास्त बुद्धिमान होते. ते स्वत; विलिंग्टनपेक्षां श्रेष्ठ प्रतीचे योद्धे होते. शस्त्राचा उपयोग करण्याची पात्रता अंगीं असून त्यांनीं त्याचें वैयर्थ्य जाणलें, व जगाला अहिंसा धर्म पावला तर मुक्ति मिळेल असा उपदेश केला. सामर्थ्य असून अहिंसा धर्म पाळणें म्हणजे जाणून बुजून कष्ट सहन करण्यासारखें आहे. दुष्टाच्या इच्छेला दुर्बलतेनें मान देणें असा त्याचा अर्थ होत नाहीं; उलट दुष्टाच्या इच्छेला आत्मतेजानें विरोध करण्यासारखें तें आहे. आत्मशक्तीच्या बलावर एकाद्या बलाढ्य साम्राज्याच्या आसुरी सामर्थ्याला आंवरून धरून स्वतःच्या मनाचें, धर्माचें व आत्म्याचें रक्षण करणें व अशा साम्राज्याचा नाश करणें अगर उद्धार करणें सुद्धां एका व्यक्तिला शक्य आहे. हिंदुस्थान दुर्बल आहे म्हणून अहिंसा धर्म पाळा असा उपदेश मी करीत नाहीं, हें वाचकांच्या लक्षांत आलेच असेल; हिंदुस्थानला जाणीव आहे म्हणूनच त्यानें हिंसा करूं नये असें माझें म्हणणें आहे.

समर्थ्याची जाणीव होण्याला तरवारीच्या शिक्षणाचीच जरूरी नाहीं. आपल्याला त्याची जरूरी कां लागते? तर आपण नुस्ते मांसाचे गोळे आहोंत अशी आपण आपली समजूत करून घेतली आहे म्हणून. जो अविनाशी आहे व कसल्याहि शारीरिक दुर्बलतेवर विजय मिळवून सर्व जगाला भारी होईल असा आत्मा आहे ही जाणीव हिंदुस्थानांत उत्पन्न व्हावी अशी माझी इच्छा आहे. आपल्या वानर सैन्यासह रामासारखा एक मानव समुद्र ओलांडून लंकेच्या किनारीं लंकापति जो दशानन त्याच्यापुढें दंड थोपटून उभा राहतो, त्याचें स्वारस्य काय? आसुरी शक्तीवर दैवी शक्तीचा हा विजय नाहीं काय? तथापि मी व्यावहारिक मनुष्य असल्यामुळें राजकारणाशी असलेला हा धर्माचा संबंध हिंदुस्थान ओळखीपर्यंत मी वाट पाहूं इच्छित नाहीं. आपण दुर्बल आहों असें हिंदुस्थानला वाटते इंग्लिश लोकांच्या मशिन तोफा, विमानें, टँक्स आपल्याला जिंकूं शकतील असें हिंदुस्थानला वाटतें. ह्या दुर्बलतेमुळें हिंदुस्थान असहकारिता पतकरतो. तरी त्याचा परिणाम एकच झाला पाहिजे. जर पुष्कळ लोक आपल्या नोकऱ्या सोडतील तर राष्ट्रीय स्वयंसेवक ह्या नात्यानें ते तीच कामगिरी करतील अशी माझी खात्री आहे. भाडोत्री म्हणून नव्हे तर आपल्या देशबांधवांच्या स्वातंत्र्याचे व प्राणाचे रक्षणकर्ते म्हणून असहकारितेची चळवळ आत्मचेष्ट एकीकरण करणारी चळवळ आहे. जर सरकारी शाळा ओस पडतील तर राष्ट्रीय शाळा आपोआप निर्माण होतील अशी माझी खात्री आहे. जर वकील एकमतानें कोर्टावर बहिष्कार टाकतील तर ते लवाद कोर्टें स्थापन करतील व लोकांना आपले खाजगी तंटे मिटविण्याची, अपराध्याला शिक्षा देण्याची अविलंबी व अल्पखर्चाची सोय होईल. मार्गांतील अडचणींची खिलाफत कमिटीला पूर्ण जाणीव असून त्या अडचणींना तोंड देण्याची ती व्यवस्था करीत आहे, हें येथें सांगण्याला मला हरकत दिसत नाहीं. मुलकी नोकऱ्या सोडण्यांत फारशी सार्वजनिक अडचण उत्पन्न होणार नाहीं, कारण मित्रांच्या मदतीनें अगर अन्य उपायानें स्वतःच्या कुटुंबाचे योगक्षेम चालविण्याची तजवीज झाल्याशिवाय कोणीहि नोकर आपली नोकरी सोडणार नाहीं. माझ्या मतें जो शाळेंतून मुलें काढण्याच्या विरुद्ध आहे त्याला असहकारितेचें स्वारस्यसच समजलें नाहीं असें म्हणणें भाग आहे. सरकार आपलाच पैसा शिक्षणाला खर्च करतें ही गोष्ट खरी; परंतु ज्या वेळेस शिक्षण देणारें सरकार आचारभ्रष्ट होतें त्यावेळेस

सरकारशीं सहकारिता केल्यास आपणहि आचारभ्रष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं, ज्यावेळेस विद्यार्थी शाळा व कॉलेजें सोडतील त्यावेळेस आपणहि आपल्या जागेचा राजीनामा देणें जरूर आहे ही गोष्ट शिक्षकांच्या ध्यानांत येणार नाहीं ही गोष्ट मला शक्य दितस नाहीं. परंतु जरी शिक्षकांनीं तसें केलें नाहीं असें धरून चाललें तरी जेथें मानापमानाचा व धर्माचा प्रश्न आहे तेथें पैशाला किंमत देतां येत नाहीं.

कौन्सिलवरील बहिष्काराच्या बाबतींत नेमस्त अगर इतर लोकांनीं कौन्सिलमध्यें जाणें ही गोष्ट फार महत्वाची नाहीं. प्रश्न एवढाच आहे कीं, ज्यांचा असहकारितेवर विश्वास आहे त्यांनीं कौन्सिलमध्यें जातां कामा नये. एके ठिकाणीं सहकारिता व दुसऱ्या ठिकाणीं असहकारिता करणें ह्या गोष्टी विसंगत आहेत. स्वतः कौन्सिलर राहून कौन्सिलची जागा साफ ठेवणाऱ्या नोकराला तूं नोकरी सोड असें सांगतां येत नाहीं.

—१८ आगस्ट १९२०

---

# असहकारिता म्हणजे काय ?

गेल्या वर्षाच्या सत्याग्रहाच्या चळवळींत आलेल्या अनुभवानंतर लोकांना असहकारितेचा उपदेश करणें शहाणपणाचें होईल असें आपणांस वाटतें काय ? खात्रीनें वाटतें.

गेल्या वर्षापेक्षां आज परिस्थिति निराळी आहे असें आपणाला कसें वाटतें ?

पूर्वीपेक्षां लोकांत आतां ज्यास्त शिस्त आली आहे. ह्या लोक या शब्दांत मी खालच्या वर्गाच्या लोकांचासुद्धां समावेश करतों. माझ्या ठिकाठिकाणच्या प्रवासांत या लोकांचा मला पुष्कळ अनुभव आला आहे; आणि ह्या लोकांना सत्याग्रहाचें स्वा रू कळलें आहे, असें आपल्याला वाटतें ? होय.

आणि म्हणून आपण असहकारिता करा असा लोकांना आग्रह करीत आहां ?

होय. शिवाय सत्याग्रहाच्या चळवळींत येणारीं संकटें असहकारितेच्या चळवळींत येण्याचा संभव नाहीं. कारण असहकारितेच्या चळवळींत कायदा मोडण्याचा भाग नाहीं. आतांपर्यंतचा अनुभव उत्तेजनक आहे. उदाहरणार्थ,' अधिकाऱ्यांनीं त्यांच्या स्वातंत्र्याला आळा घालून त्यांना

चिडविलें असतां संभावदीच्या कायद्यासंबंधानें कमिटीनें दिलेल्या सूचना दिल्लीच्या व सिंधच्या लोकांनीं उत्तम रीतीनें पाळल्या आहेत.

जर लोकांनीं असहकारिता केली तर आपण कोणत्या उपायानें सरकारला ताळयावर आणणार ? कोणतेंहि सरकार प्रजेच्या सहकारितेशिवाय एक पळभरहि जिवंत राहूं शकत नाहीं व जर लोक प्रत्येक बाबतांत सरकारशीं असलेला आपला संबंध एकदम तोडतील तर सरकाराचें काम बंद पडेल असें मला वाटतें. व ही गोष्ट प्रत्येकाला कबूल करावी लागेल

परंतु हें सर्व ' जर तर ' वर अवलंबून नाहीं काय ? होय आहे.

मग ह्या ' जर तर ' वर आपण विजय कसा मिळवणार ? माझ्या चळवळींत उपयुक्ततेला जागा नाहीं. जर खिलाफतीची चळवळ खरोखर समाजाच्या खालच्या पायरीपर्यंत जाऊन पोंहोचली असेल तर लोक असहकारितेच्या चळवळीला येऊन मिळण्याबद्दल मला शंका नाहीं.

जी गोष्ट पुढें होणार तीच आपण आज आहे असें गृहीत धरून चालला आहां ? तसें नाहीं. मला जी माहिती मिळाली आहे त्यावरून खिलाफत अन्याय प्रत्येक मुसलमान गृहस्थाच्या अंतःकरणाला झोंबला आहे. अशी माझी खात्री आहे. असहकारितेची चळवळ यशस्वी करण्यासाठीं जितका स्वार्थत्याग करावयास पाहिजे तितका करण्याइतकी तयारी ह्यांची झाली आहे किंवा नाहीं हेंच मात्र पहाणें आहे. असहकारितेच्या चळवळींत मुसलमान लोक आपल्या पाठीशीं आहेत अशी आपली अनुभवानें खात्री झाली आहे, असाच आपल्या म्हणण्याचा अर्थ काय ? होय.

आपली असहकारितेची चळवळ सरकारशीं असलेला सर्व संबंध तोडील असा आपल्याला भरंवसा आहे काय ? नाहीं. व तसें व्हावें अशी माझी इच्छाहि नाहीं. पंजाब व खिलाफतच्या बाबतींत लोकमत किती तीव्र आहे व त्याचप्रमाणें ह्या दोन बाबतींत जितके प्रयत्न करतां येण्यासारखे होते तितके हिंदुस्थानसरकारानें व ब्रिटिश सरकारानें केलेले नाहींत; ह्याबद्दल लोक असंतुष्ट आहेत, ही गोष्ट सरकारला स्पष्टपणें कळावी हा माझ्या सध्यांच्या असहकारितेच्या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

झालेल्या अन्यायाबद्दल मुसलमान लोकांना कितीहि वाईट वाटत असलें तरी आपली असहकारितेची चळ[illegible] पुष्कळ मुसलमान लोक आहेत. ही गोष्ट अजून आपल्या लक्षांत येत नाहीं [illegible]

ही गोष्ट माझ्या लक्षांत आली आहे; परंतु [illegible] मान्य करणाऱ्यांच्या मानानें फारच कमी आहे. आपल्या [illegible] विनंतीला

देऊन पदव्या सोडण्याला अगर कौन्सिलावर बहिष्कार टाकण्याला फार से लोक पुढें आलेले नाहींत, ही गोष्ट आपण अशा लोकांच्या मनोधैर्यावर वाजवीपेक्षां जास्त विश्वास ठेवीत आहां हें सिद्ध करीत नाहीं काय? मला तसें वाटत नाहीं. कारण ही चळवळ नुकतीच सुरू झाली आहे. व आमचे लोक नेहमीं सावध व आस्ते अशा प्रकारें कामाला सुरवात करणारे असतात. शिवाय असहकारितेच्या चळवळीच्या पहिल्या भागाचा संबंध समाजांतील वरच्या दर्जाच्या लोकांशीं येतो व हे जरी वजनदार लोक आहेत, तरी संख्येनें अल्प आहेत.

घरच्या वर्गाच्या लोकांनीं आपल्या विनंतीला चांगला मान दिला आहे असें आपणाला वाटतें काय?

मला सध्यां कांहींच सांगतां येत नाहीं; या महिन्याच्या अखेरीला मला बरोबर उत्तर देतां येईल.

असहकारिता व कौन्सिलावर बहिष्कार न घालणें ह्या दोन गोष्टी आपल्याला सुसंगत दिसतात काय? नाहीं. कारण जो मनुष्य असहकारितेचें तत्व मान्य करितो त्याला कौन्सिलकरतां उभे राहतां येत नाहीं. असहकारिता हें आपलें साध्य आहे कीं साधन आहे? जर साधन असेल तर मग आपलें साध्य कोणतें? सध्याचें तें साधन आहे. आज सरकार जें अन्यायी झालें आहे, त्याला न्यायी करणें हें साध्य आहे. न्यायी सरकारशीं सहकारिता करणें हे जसें कर्तव्य, तसेंच अन्यायी सरकारशीं असहकारिता करणें हें कर्तव्य आहे.

कौन्सिलामध्यें जाऊन सरकारी धोरणाला विरोध करणें अगर राजनिष्ठेची शपथ घेण्याचें नाकारणें, हें आपल्या असहकारितेशीं सुसंगत दिसतें काय? नाहीं. असहकारिता ज्याला बरोबर समजली असेल तो वरील गोष्टी असहकारितेच्या तत्वांना विसंगत आहेत, असेंच म्हणेल.

सिनफिनिझम व असहकारिता ह्यांमध्यें फरक आहे. असहकारयोगाची अशी उभारणी केली आहे कीं, अत्याचार करून त्याचा अभ्यास करणें अवश्य आहे. परंतु ज्या पक्षाचा अत्याचाराच्या मार्गावरच विश्वास आहे त्यास एक वेळ ही विग्रहसंग्रामरहित असहकारिता करून पहा, असें माझें सांगणें आहे. आनुषंगिक दोषामुळें ती [illegible] होणार नाहीं, लोकांचा तिला पाठिंबा मिळणार नाहीं तर ती कदाचित निरुपयोगी ठरेल. तीच वेळ [illegible] अपमान ज्यांना कदापिहि सहन करणें अशक्य [illegible] देशभक्तांना आपला क्रोध

प्रगट करण्याची जरूरी भासेल ते अत्याचाराला प्रवृत्त होतील. स्वतःची व देशाची अन्यायापासून मुक्तता करण्याऐवजीं ते आपला नाश करून घेतील असें मला वाटतें. जर हिंदुस्थान शस्त्र हातीं घेईल तर कदाचित अल्पकालपर्यंत जय होईल; परंतु त्यापासून मला हिंदुस्थानाबद्दल अभिमान वाटण्याचें बंद होईल. जें कांहीं मजजवळ आहे तें सर्व हिंदुस्थानचें आहे म्हणून मला त्याच्या भविष्यतेबद्दल काळजी वाटते. हिंदुस्थानाला जगाला कांहीं शिकवावयाचें आहे; त्यानें युरोपचे अंधपणानें अनुकरण करितां कामा नये. हिंदुस्थान आपल्या हातांत शस्त्र घेईल तो पळ माझ्या परीक्षेचा येईल. त्या परीक्षेला मी उतरेन अशी मला आशा आहे. माझ्या धर्माला देशाच्या चतुःसीमांची आडकाठी नाहीं. जर माझी त्याच्यावर श्रद्धा असेल तर हिंदुस्थानावरील माझें प्रेम त्यापुढें दुय्यम प्रतीचें ठरेल. माझें आयुष्य भारतमातेच्या सेवेला अर्पण केलेलें आहे. अहिंसा हाच धर्म. ह्या तत्वावर ही सेवा मी करणार आहें. कारण हिंदु धर्माचें तेंच सार आहे. मध्यंतरीं ज्यांचा माझ्यावर विश्वास नाहीं त्यांना माझी कळकळीची अशी विनंति आहे कीं, त्यांनीं मला अत्याचार हवे आहेत ह्या समजुतीनें लोकांना अत्याचारास प्रवृत्त करून नुकत्याच सुरू झालेल्या शांततेच्या युद्धांत बिघाड करूं नये. खिन्नता पाप आहे म्हणून मला ती आवडत नाहीं अत्याचारविरहित असहकारिता त्यांनीं एकदां आचरून पहावी; म्हणजे माझ्याजवळ गुप्त असें कांहीं नाहीं अशी त्यांची खात्री पटेल.

—११ आगष्ट १९२०

---

# न्यायकोर्टें व शिक्षणसंस्था

असहकारिता कमिटीनें वकिलांनीं कोर्टांवर व पालकांनीं अगर विद्यार्थ्यांनीं शिक्षणसंस्थांवर बहिष्कार टाकणें ह्या गोष्टींचा आपल्या कार्यक्रमांत समावेश केला आहे. कोर्टांवर व शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घाला असा उपदेश केल्याबद्दल लोकांना जर माझ्या कामागिरीबद्दल व सद्धेतूबद्दल खात्री नसती तर त्यांनीं मला वेड्याचे इस्पितळांत टाकलें असतें. माझ्या वेडालाहि कांहीं अर्थ आहे हें लोकांनीं लक्षांत ठेवावें. सरकार कोर्टांच्या मदतीनें आपली सत्ता स्थापन करिते, व शाळेच्या मद-

तीनें आपली सत्ता स्थापन करतें; व शाळांच्या मदतीनें आपल्याला जरूर ते कारकून व इतर नोकर तयार करतें, हें लक्षांत येण्याला फारसें डोकें खाजविण्याची जरूरी नाहीं. जेव्हां सरकार सर्वसाधारणपणें न्यायी असतें त्या वेळेस ह्या संस्था हितकारक असतात; परंतु ज्या वेळेस सरकार अन्यायी बनतें त्या वेळेस त्या प्राण घेणारे सांपळे ( death-traps ) होतात.

## वकील

माझे असहकारितेवरील विचार अलाहाबादच्या लीडरनें जितक्या निग्रहानें ( धैर्यानें ) व मुद्देसूदपणानें खोडून टाकण्याचा प्रयत्न केला आहे तितका दुसऱ्या कोणत्याहि वृत्तपत्रानें केलेला नाहीं. १९०८ मध्यें प्रसिद्ध झालेल्या माझ्या ' इंडियन होमरूल ' नांवाच्या पुस्तकांत वकिलावर जे विचार मीं प्रकट केले आहेत त्यांची त्यानें टर उडविली आहे. त्या वेळेचे माझे विचार अजूनहि कायम आहेत; आणि जर वेळ मिळाला तर ' यंग इंडियांत ' तेच विचार ज्यास्त विस्तृत रीतीनें प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे; परंतु ह्या घटकेला मी तसें करूं इच्छित नाहीं, कारण वकिलांनीं वकिली सोडावी ह्या माझ्या आजच्या मुद्द्याशीं त्या माझ्या व्यक्तिविषयक विचारांचा कांहीं संबंध नाहीं. राष्ट्राच्या असहकारितेच्या चळवळीसाठीं वकिलांनीं वकिली बंद करणें जरूर आहे, असें माझें म्हणणें आहे. कदाचित् समाजांतील दुसरा कोणताहि वर्ग वकिलाइतकी सरकारशीं सहकारिता करीत नाहीं. वकील प्रजेला कायदा समजावून देऊन सरकारची सत्ता उचलून धरतात; ह्याच कारणामुळें त्यांना कोर्टाचे अधिकारी असें म्हणतात. जर आजपर्यंत सरकारशीं कोणी निकरानें लढले असेल तर ते वकील, असें म्हणतात. अल्पांशानें ही गोष्ट खरी आहे; परंतु तेवढ्यानें त्यांच्या धंद्यांत जो अनुषंगिक दोष आहे तो नाहींसा होत नाहीं. ज्या वेळेस सबंध राष्ट्र सरकारच्या नाड्या बंद करूं इच्छितें, त्या वेळेस राष्ट्रकार्याला हातभार लावावा अशी जर वकिलांची इच्छा असेल, तर त्यांनीं वकिली सोडली पाहिजे. टीकाकार म्हणतात, जर मीं तयार केलेल्या खड्यांत वकील लोक पडतील तर औषधांवांचून खोकला जावा त्याप्रमाणें सरकारचें आयतेंच काम होईल. मला हें खरें वाटत नाहीं. जें साध्या काळांत ( ordi-

nary times ) खरें असतं, तें गडबडीच्या काळीं खरें नसतें. शांततेच्या काळीं वकिलांनी राज्यकारभारावर केलेली कडक टीका सरकारला आवडणार नाहीं ही गोष्ट खरी; परंतु अशा भयंकर प्रसंगीं कोर्टाच्या द्वारें मिळणारी एकाहि वकिलाची मदत गमावण्याला सरकार कधींहि तयार होणार नाहीं. शिवाय माझ्या कार्यक्रमांत वकिली सोडणें म्हणजे स्वस्थ बसणें नव्हे; वकिली बंद करून वकिलांनीं घरीं आराम करीत बसावयाचें नाहीं. ते आपल्या अशीलांना कोर्टावर बहिष्कार टाका असा उपदेश करतील, अशी माझी अपेक्षा आहे. तंटे मिटाविण्याकरतां ते लवादकोर्टें स्थापन करतील. जे लोक अन्यायी सरकारला ताळ्यावर आणण्याला निघाले त्यांना परपस्परांशीं तंटे करण्यास अवकाश नसतो, ही गोष्ट वकिलांनीं आपल्या अशीलांना समजावून दिली पाहिजे. गेल्या युद्धांत इंग्लंडमध्यें पुष्कळ वकिलांनीं आपली वकिली बंद ठेवली होती, हें पुष्कळ वाचकांना माहीत नसेल. आपली वकिली सोडून फुरसतीच्या वेळीं राष्ट्रकार्य करण्याऐवजीं ते वकील राष्ट्राचे सबंध दिवस काम करणारे नोकर बनले. राजकारण म्हणजे खेळ नव्हे. हिंदुस्थानांत राजकारणाला करमणुकीच्या खेळापेक्षां ज्यास्त महत्त्व दिलें जात नाहीं, ह्याबद्दल मि. गोखले खेद प्रदर्शित करीत. सात्विक वृत्तीच्या हुशार व रात्रंदिवस श्रम करणाऱ्या नोकरशाहीशीं आजपर्यंत राष्ट्राला ज्या लढाया लढाव्या लागल्या, त्यांत राष्ट्राच्या वतीनें फक्त हौशी योद्धेच पुढें आल्यामुळें, राष्ट्राचें किती नुकसान झालें आहे ह्याची लोकांना कल्पना नाहीं.

विरुद्ध पक्षाचा दुसरा मुद्दा असा आहे कीं, जर वकील आपला धंदा सोडतील तर उपाशी मरतील. सिंहासारख्या वकिलांना ही गोष्ट लागू नाहीं. हे लोक केव्हां केव्हां युरोपला जाण्याकरतां अगर इतर कांहीं कारणामुळें वकिली बंद ठेवतात. ज्या वकिलांना त्यांच्या धंद्यांत जेमतेम पोटापुरतेंच मिळतें ते जर प्रामाणिक लोक असतील, तर स्थानिक खिलाफत कमिट्या त्यांना पोटापुरतें देतील व त्यांनीं देशसेवा करावी.

जर मुसलमान वकील आपला धंदा सोडतील तर त्यांची वकिली हिंदू लोक पकडतील, असें कित्येकांचें म्हणणें आहे. जरी स्वतः वकिली सोडली नाहीं तरी

निदान हिंदू वकील आपल्या मुसलमान व्यवसायबंधूंच्या अशीलांना हात न लावण्याइतकें औदार्य दाखवतील अशी मला आशा आहे. स्वार्थत्यागामध्यें जर हिंदू लोक आमच्या खांद्याला खांदा लावून उभे राहतील तरच हें युद्ध आम्ही चालवूं शकूं, असें म्हणणारा एकहि धर्माभिमानी मुसलमान सांपडणार नाहीं अशी माझी खात्री आहे. ह्या वेळीं जर हिंदू आपलें कर्तव्य बजावतील तर तें त्यांना भूषणास्पद आहे व त्यापासून दोन्हीहि जातींचें कल्याण होईल. हिंदू लोक येऊन मिळोत अगर न मिळोत मुसलमानांना पुढें हें गेलेंच पाहिजे. जर मुसलमानांच्यापुढें मरावें कीं जगावें, असा प्रश्न येऊन पडला आहे तर त्यांच्या मनाला स्वार्थी कल्पनेचा विटाळहि होतां कामा नये. स्वतःच्या अब्रूवर, त्यांतल्या त्यांत धर्मावर संकट आलें असतां करावा तितका स्वार्थत्याग कमीच होणार आहे. ज्यांना असह्य झालें असेल तेच सर्वस्वावर लाथ मारतील. जुलमाचा रामराम खरा स्वार्थत्याग नव्हे ! तो फार वेळ टिकणार नाहीं. ज्या चळवळींत घोड्यावर राऊत चढवलेले फार त्या चळवळीला रंगरूप येणें शक्य नाहीं तुर्की तहाच्या अटी म्हणजे स्वतःचा झालेला अपमान, असें जेव्हां प्रत्येक मुसलमानाला वाटूं लागेल त्या वेळेस खिलाफत चळवळीच्या तुफानांत इंग्रज सरकारचें तारूं सुरक्षित राहणें कठिण आहे. ज्या वेळेस स्वतःचें खाजगी भांडण असतें त्या वेळेस दुसऱ्याच्या मदतीची अगर स्वार्थत्यागाची कोणीहि वाट पहात नाहीं. तो मदतीची अपेक्षा करतो ही गोष्ट खरी; परंतु मदत मिळो अगर न मिळो अन्यायाबरोबर सुरू झालेलें आपलें युद्ध तो थांबवीत नाहीं. जर त्याची बाजू न्यायाची असेल तर त्याला मदत मिळालीच पाहिजे, असा ईश्वरी कायदा आहे. अनाथांचा वाली परमेश्वर आहे. ज्या वेळेला पांच पांडव सती द्रौपदीला मदत करण्याला असमर्थ होते त्या वेळेला श्रीकृष्णानें तिच्या मदतीला धांवत जाऊन तिची लाज राखली. निराश्रित झाला असतां महंमदाला परमेश्वरानें मदत केली !

## शाळा

आपल्या मुलांचें शिक्षण तात्पुरतें बंद ठेवण्याइतकें धैर्य जर आपल्या अंगीं नसेल तर ह्या युद्धांत जय मिळविण्याची आपली पात्रताच नाहीं, असें मला वाटतें.

मान व देणग्या यांचा आपल्याला त्याग करावयाचा आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, कोणतेंहि सरकार दिलेल्या आंदळ्याबद्दल कोहळा घेतल्याशिवाय सोडीत नाहीं. जें सरकार आपल्या देणग्यांची खैरात करील तें मूर्ख व दिवाळखोर सरकार असलें पाहिजे. जें सरकार लोकमताप्रमाणें चालतें त्या सरकाराकडून अल्पमान मिळविण्याकरतां आपण आपला प्राण खर्ची घालण्यास तयार असतों. लोकमताला धाब्यावर बसविणाऱ्या सरकारची जहागीर आपल्या गुलामगिरीचें व अपमानाचें चिन्ह आहे; ह्या दृष्टीनें विचार केल्यास एक पळभरहि न थांबतां शाळा सोडून दिल्या पाहिजेत.

असहकारितेचा सर्व कार्यक्रम आपल्या दुःखांचा पाडा मोजण्याचें यंत्र आहे, असें मला वाटतें. आपलें दुःख अंतःकरणापासून आहे काय ? हालअपेष्टा सोसण्याची आपली तयारी आहे काय ? पदव्यावाले लोक आपल्याला फारसे येऊन मिळतील अशी अपेक्षा आपण करूं नये, असें सांगण्यांत येतें; कारण देशाच्या चळवळींत ते आजपर्यंत कधींहि पडलेले नाहींत, व ह्या पदव्यांना त्यांनीं इतकी जबर किंमत दिली आहे कीं, त्यांच्यावर पाणी सोडण्यास ते सहजासहजीं तयार होणार नाहींत. प्रतिपक्षाचा हाच मुद्दा घेऊन मी असें विचारतों कीं, लहान मुलांच्या पालकांबद्दल व कॉलेजांतील प्रौढ विद्यार्थ्यांबद्दल काय ? पदवीवाल्याप्रमाणें त्यांचा सरकारशीं इतका निकट संबंध कधींहि आलेला नाहीं. शिक्षणसंस्थावर बहिष्कार टाकण्याइतकें त्यांना पंजाबाबद्दल वाईट वाटतें कीं वाटत नाहीं ?

परंतु शाळा ओस पाडण्यांत कांहीं स्वार्थत्याग नाहीं, असा माझा मुद्दा आहे. सरकारी मदतीशिवाय आपल्या शिक्षण संस्था न चालवितां येण्याइतके जर आपण दुबळे असलों, तर असहकारितेची चळवळ करण्याला अगदींच नालायक असलों पाहिजे. प्रत्येक खेड्यानें आपल्या मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. मला सरकारच्या तोंडाकडे पाहणं बिलकूल योग्य दिसत नाहीं. जर देशांत खरी जागृति झाली असेल, तर शिक्षणसंस्था एक दिवससुद्धां बंद ठेवाव्या लागणार नाहींत. जे मास्तर आज सरकारी शाळा चालवीत आहेत ते जर आपल्या जागेचा राजिनामा देण्याइतका चांगुलपणा दाखवतील, तर त्यांना राष्ट्रीय शाळा आपल्या ताब्यांत घेऊन आपल्याला पाहिजेल त्या प्रकारचें शिक्षण मुलांना देतां

येईल; व अशा रीतीनें बहुतेक मुलांना सरकारी कारकून बनविण्याच्या पापा-पासून ते मुक्त होतील. ह्या बाबतींत अलिगड कॉलेज इतरांना मार्गदर्शक होईल अशी मला आशा आहे. शाळा रिकाम्या पडल्यास त्याचा नैतिक परिणाम भयंकर होईल. हिंदू पालक व विद्यार्थी आपल्या मुसलमानबंधूंचें अनु-करण करण्यास मागें घेणार नाहींत, ह्याबद्दल मला बिलकूल शंका नाही.

पालकांनीं व विद्यार्थ्यांनीं पुस्तकी विद्या धर्मापुढें तुच्छ लेखावी ह्यापेक्षां आणखी उच्च त शिक्षण कोणतें ? म्हणून यदाकदाचित् जीं मुलें शाळांतून काढून घेण्यांत येतील त्यांच्या शिक्षणाची तावडतोब व्यवस्था न झाल्यास, ज्या कारणांकरतां त्यांनीं सरकारी शाळा सोडल्या त्या कारणांचा प्रसार करण्याकरतां, स्वयंसेवक ह्या नात्यानें त्यांनीं काम केल्यास त्यांना उत्तम प्रकारचें शिक्षण मिळेल. कारण वकिलांप्रमाणेंच विद्यार्थ्यांनींहि स्वस्थ बसतां कामा नये. शाळेवर बहिष्कार टाकलेला विद्यार्थी यथाशक्ति ह्या चळवळीला मदत करील अशी आशा करण्यास हरकत नाही. —११ आगस्ट १९२०

---

# आणखी कांहीं आक्षेपांना उत्तर

स्वदेशमित्र हें मद्रासच्या वजनदार तामिली दैनिकांपैकीं एक दैनिक आहे. त्याचा वाचकवर्ग मोठा आहे. त्यांत प्रसिद्ध होणाऱ्या लेखांचा नीट विचार करणें जरूर आहे. ह्या पत्राच्या संपादकानें असहकारितेच्या चळवळींत येणाऱ्या कांहीं अडचणी दाखविल्या आहेत. ह्या लेखांत माझ्या शक्तीप्रमाणें त्यांना उत्तर देण्याचा मीं विचार केला आहे. असहकारितेचे शेवटचे दोन हप्ते मीं आपल्या कार्यक्रमांतून वगळले आहेत, अशी बातमी कोठून बाहेर पडली कोणास ठाऊक ! मीं जें काय म्हटलें आहे तें असें आहे कीं, तें अमलांत आणण्याचा काळ अजून दूर आहे. मी अजूनहि तेंच म्हणतों. असहकारितेचा सर्वच कार्यक्रम बिकट आहे हें मी कबूल करतों; पण शेवटचे दोन भाग, व विशेषतः शेवटचा तर फारच भयंकर आहे. असहकारितेच्या चळवळीचा कार्यक्रम अशा रीतीनें ठरविण्यांत आला आहे कीं, शक्य तितका त्यांत धोका येऊं नये. शस्त्रें खालीं ठेवणें अगर कर न देणें अशा गोष्टी, दंगेधोपे न करतां, करण्याइतकी लोकांची

मनें तयार झालीं आहेत, अशी कमिटीची खात्री झाल्याशिवाय वरील गोष्टी करण्यास सुरवात करण्यांत येणार नाहीं. वरील दोन गोष्टी शांतपणें करण्या-इतकी लोकांना शिस्त लागेल अशी मला बळकट आशा आहे. आपल्या इच्छेपुढें जुलमी सरकारला मान वांकविण्याला भाग पाडण्याकरितां अत्याचार अगदीं अनवस्यक आहे; व असहकारितेनें आपला हेतु खात्रीनें सफल होईल अशी लोकांची एकदां खात्री झाली कीं, प्रतिकृति म्हणूनसुद्धां ते अत्याचाराचा मनानेंहि विचार करणार नाहींत. अजूनपर्यंत लोकांना आपण शिस्तीनें व एकजुटीनें कार्य करण्याला शिकविलेंच नाहीं. जर आपल्याला स्वराज्य हवें आहे तर तसा प्रयत्न करणें जरूर आहे. माझ्या मतें सध्यांची वेळ शुभ आहे. प्रत्येक हिंदी मनुष्याला पंजाबचा अपमान म्हणजे आपला अपमान असें वाटत आहे; व प्रत्येक मुसलमानाला खिलाफत अन्यायाची चीड आलेली आहे. लोकांमध्यें संलग्नशील व पद्धतशीर चळवळी करण्याला सध्यांचें वातावरण अनुकूल आहे.

लोकमताबद्दल बोलावयाचें तर कर देण्याचें बंद करण्याच व वरील लोकमत फार मोठ्या प्रमाणावर अनुकूल होईल, हें वरील संपादकाचें म्हणणें मला कबूल आहे; परंतु जोंपर्यंत लोकांना त्यांच्या जमिनी विकल्या गेल्या तरी शांतता पाळण्याचें शिक्षण दिलेलें नाहीं, तोंपर्यंत कर न देण्याची चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरू करणें धोक्याचें आह.

जोंपर्यंत चोर दरोडेखोरापासून आत्मरक्षण करण्याची शक्ति आपल्या अंगांत आली नाहीं, तोंपर्यंत लष्कर व पोलीस खात्यांवर एकदम बाहिष्कार टाकण्यापासून अनर्थ होईल, हीहि गोष्ट मला कबूल आहे. ज्या वेळेला लष्कर व पोलिस खात्यांवर मोठ्या प्रमाणावर बहिष्कार टाकण्याची आमची तयारी होईल त्या वेळेस आत्मरक्षण करण्याची पात्रता आमच्या अंगांत आली असेल, असें मला वाटतें. जर सैनिक व पोलीस देशभक्तीनें प्रेरित होऊन आपल्या नोकऱ्या सोडतील तर राष्ट्रीय स्वयंसेवक ह्या नात्यानें तें तीच कामगिरी करतील अशी माझी खात्री आहे. भाडोत्री म्हणून नव्हे, तर आपल्या देशबांधवांच्या स्वातंत्र्याचे व प्राणाचे रक्षणकर्ते म्हणून. असहकारितेची चळवळ आत्मचेष्टा एकीकरण करणारी चळवळ आहे. जर सरकारी शाळा ओस पडतील तर राष्ट्रीय शाळा आपोआप निर्माण

होतील अशी माझी खात्री आहे. जर वकील एकमतानें कोर्टावर बहिष्कार टाकतील तर ते लवादकोर्टें स्थापन करतील व लोकांना आपले खासगी तंटे मिटविण्याची व अपराध्याला शिक्षा देण्याची अविलंबी व अल्पखर्चाची सोय होईल. आपल्या मार्गांतील अडचणींची खिलाफत कमिटीला पूर्ण जाणीव असून. त्या अडचणींना तोंड देण्याची ती व्यवस्था करीत आहे, हें येथें सांगण्याला मला हरकत दिसत नाहीं. मुलकी नोकऱ्या सोडण्यास फारशी सार्वजनिक अडचण उत्पन्न होणार नाहीं. कारण मित्रांच्या मदतीनें अगर अन्य उपायानें स्वतःचें व स्वतःच्या कुटुंबाचें योगक्षेम चालविण्याची तजवीज झाल्याशिवाय कोणीहि आपली नोकरी सोडणार नाहीं. माझ्या मतें जो शाळेतून मुलें काढण्याच्या विरुद्ध आहे, त्याला असहकारितेचें स्वारस्यच समजलें नाहीं, असें म्हणणें भाग आहे. सरकार आपलाच पैसा शिक्षणाला खर्च करतें ही गोष्ट खरी; परंतु ज्या वेळेस शिक्षण देणारें सरकार आचारभ्रष्ट होतें, त्या वेळेस सरकारशीं सहकारिता केल्यास आपणहि आचारभ्रष्ट झाल्याशिवाय राहणार नाहीं. ज्या वेळेस विद्यार्थी शाळा व कॉलेजें सोडतील त्या वेळेस आपणहि आपल्या जागेचा राजिनामा देणें जरूर आहे, ही गोष्ट शिक्षकांच्या ध्यानांत येणार नाहीं हें मला शक्य दिसत नाहीं; परंतु जरी शिक्षकांनीं तसें केलें नाहीं असें धरून चाललें, तरी जेथें मानापमानाचा व धर्माचा प्रश्न आहे तेथें पैशाला किंमत देतां येत नाहीं.

कौन्सिलवरील बहिष्काराच्या बाबतींत नेमस्त अगर इतर लोकांनीं कौन्सिलमध्यें जाणें ही गोष्ट फार महत्त्वाची नाहीं. प्रश्न एवढाच आहे कीं, ज्यांचा असहकारितेवर विश्वास आहे त्यांनीं कौन्सिलमध्यें जातां कामा नये. एके ठिकाणीं सहकारिता व दुसऱ्या ठिकाणीं असहकारिता करणें, ह्या गोष्टी विसंगत आहेत. स्वतः कौन्सिलर राहून, कौन्सिलची जागा साफ ठेवणाऱ्या नोकराला तूं नोकरी सोड, असें सांगता येत नाहीं. —१८ आगस्ट १९२०

---

# असहकारितेला धर्माचा आधार

सर नारायण चंदावरकरांसारख्या विद्वान पुढाऱ्याशीं वाग्युद्ध खेळण्यास मी अगदीं नाइलाजास्तव तयार झालों आहे. जरी माझे विचार सर नारायण-

सारख्या पुढाऱ्यांच्या विचाराहून भिन्न असले, तरी ते सांगण्याचें कटुकर्तव्य असहकारितेचा जनक म्हणून मला करणें जरूर आहे. मलबारकडे प्रवास करीत असतां, असहकारितेविरुद्ध ह्या पुढाऱ्यांनीं काढलेल्या खलित्यावरच्या माझ्या उत्तराला सरसाहेबांनीं दिलेलें प्रत्युत्तर माझ्या वाचण्यांत आलें. हें प्रत्युत्तर वाचून माझें समाधान झालें नाहीं, ही गोष्ट मला मोठ्या दुःखानें कबूल करावी लागत आहे. ते व मी, बायबल, गीता अगर कुराण ह्यांसारखे धर्मग्रंथ अगदीं निराळ्या दृष्टीनें वाचतों किंवा त्यांचा अर्थ तरी निराळा समजतों. अहिंसा, राजकारण, धर्म ह्या शब्दांचे आम्हीं परस्पर विरुद्ध अर्थ करतों, असें दिसतें. ह्या शब्दांनीं माझ्या अंतःकरणांत कोणत्या भावना उत्पन्न होतात व मी निर-निराळ्या धर्मग्रंथांचे जे अर्थ लावतों ते स्पष्ट करण्याचा मी आपल्याकडून शक्य तो प्रयत्न करीन. अहिंसेवरील माझे विचार बदललेले नाहींत, ही पहिली गोष्ट मला सरसाहेबांना सांगितली पाहिजे. मनुष्याला सृष्टी उत्पन्न करण्याची देणगी परमेश्वरानें दिली नसल्यामुळें अगदीं बारीक जंतूसुद्धां मारण्याचा त्याला अधिकार नाहीं, हे माझें मत अजूनहि कायम आहे. सृष्टिकर्त्या परमेश्वरालाच संहार करण्याचा अधिकार आहे. नुसता कोणालाहि उपद्रव दिला नाहीं म्हणजे अहिंसाधर्म पावला, असें होत नाहीं; तर दुष्टांवर प्रेम करून त्याचें कल्याण करणें हें सुद्धां अहिंसेंत येतें, ही गोष्ट मला कबूल आहे; परंतु त्याचा अर्थ दुष्टाला दुष्कृत्यास मदत करणें अगर त्याच्याकडे कानाडोळा करून तें सहन करणें असा मात्र नव्हे; उलट प्रेम दुष्टांशीं आपला संबंध तोडून त्याला विरोध करण्याला सांगतें; मग त्याला शारीरिक इजा झाली तरी चालेल. जर माझा मुलगा वाईट वर्तन करीत असेल तर त्याचा कड घेऊन मी अनीतीला मदत करणार नाहीं. उलट माझें त्याच्यावरील प्रेम मला असें सांगतें कीं, त्याला कोणत्याहि प्रकारची मदत मीं देतां कामा नये; मग त्यांत त्याला मरण आलें तरी चालेल; व तेंच प्रेम पश्चात्तापानें होरपळून तो परत आल्यावर त्याला आलिंगन देण्याला मला सांगत; परंतु बलात्कारानें मी माझ्या मुलाला सुधारण्याचा प्रयत्न करणार नाहीं. 'उधळा मुलगा' ह्या गोष्टीचें हेंच तात्पर्य आहे, असें मला वाटतें.

असहकारिता म्हणजे निष्क्रियावस्था नव्हे. ती तीव्र (नितांत) सक्रियावस्था आहे. शारीरिक विरोधापेक्षां अगर अत्याचारापेक्षांहि ती प्रखर आहे. मी असहका-

रितेचा जो अर्थ समजतों त्याप्रमाणें ती अत्याचार–विरहित असली पाहिजे. तिला असहिष्णुता, असूया व द्वेष यांचा विटाळहि होतां कामा नये. जनरल डायरच्या उपयोगीं पडून निर्दोष माणसांचा खून करण्यांत त्याच्याशीं सहकारिता करणें पाप आहे, हें सिद्धच होतें; परंतु जर त्याला रोगापासून पीडा होत असेल तर त्याची शुश्रूषा करून त्याला बरें करणें, हें माझें काम आहे. ह्या ठिकाणीं मला सरसाहबांचा सहकारितेचा अर्थ मान्य नाहीं. ह्या सरकारशीं त्याला त्याच्या कुपथावरून विन्मुख करण्याकरतां मी हजारदां सहकारिता करीन; परंतु त्याच्या पापांत भर घालण्याकरतां त्याच्याशीं एक पळहि सहकारिता करणार नाहीं. जर अशा सरकारची पदवी मीं धारण केली, त्याची नोकरी केली, अगर त्याच्या कोर्टांना व शाळांना मदत केली, तर मी परमेश्वराच्या घरीं दोषी ठरेन. जालियांवाला बागेच्या रक्तानें माखलेल्या हातांतून स्वर्ग मिळविण्यापेक्षां मला भिकाऱ्याचें परळ पतकरलें. ज्यांनीं माझ्या सात कोट मुसलमान बंधूंच्या धार्मिक समजुतींना विनाकारण दुखविलें आहे त्यांच्यापासून मधुर भाषा ऐकण्याऐवजीं त्यांचें तुरुंगाचें आमंत्रण पुरविलें. सरसाहेब जो गीतेचा अर्थ करतात त्याहून निखालस विरुद्ध अर्थ मी करतों. सत्कार्यार्थ बळजोरीचा अवलंब करावा असें गीता शिकविते, ही गोष्ट मला मान्य नाहीं. गीता म्हणजे आपल्या अंतः-करणांत २४ तास चाललेल्या द्वंद्वाचें चित्र आहे. एक ऐतिहासिक प्रसंग घेऊन परमेश्वरानें, प्राणाची पर्वा न करतां आपलें कर्तव्य करा, असा तद्द्वारें उपदेश केला आहे. कर्मण्येवाधिकारस्ते माफलेषु कदाचन–फलाची आशा न धरतां कर्म करा–असें गीतेचें सांगणें आहे. कारण मनुष्यप्राणी इतका दुर्बल आहे कीं, स्वतःच्या कर्माशिवाय इतरांच्या कर्मक्रियेवर त्याचा ताबा नसतो. ज्ञान व अज्ञान यांमधील भेद गीता दाखविते.

जीसस् धुरंधर राजकारणी पुरूष होता, असें माझ्या अल्प बुद्धीला वाटतें. जें सीझरचें होतें तें त्यानें सीझरला दिलें. द्यावयाला जें योग्य तेंच त्याने त्याला दिलें. तो नेहमीं सीझरला टाळीत असे व त्याच्या मायेला तो कधींहि बळी पडला नाहीं, असें सांगतात. पात्रांच्या ( भिक्षूंच्या ) शब्दानें भुलून जाऊं नका हें लोकांना शिकविणें, हेंच त्या वेळचें राजकारण होतें; कारण त्या वेळेला भिक्षुकच समाजाला वळण लावीत. जीससनें लोकांवर नजर ठेवून त्यांना

सुमार्गाला लावलें. रुश्यांचें सरकार असें आहे कीं, त्याचा आपल्या आयुष्यांतील प्रत्येक गोष्टीशीं संबंध येतो. आपल्या प्राणावरच तें गदा आणतें; म्हणून राष्ट्राचें कल्याण व्हावें अशी जर आपली इच्छा असेल तर आपण जसा धर्म पाळतो त्याप्रमाणें आपल्या राज्यकर्त्यांला नीतिकायदे पाळावयास लावलें पाहिजे. जनरल डायरनें आपल्या अमानुष कत्तलीनें ' नैतिक परिणाम ' केला ही गोष्ट खरी. जे असहकारितेची चळवळ करीत आहेत त्यांना आत्मसंयमन, स्वार्थत्याग व पवित्रता ह्यांच्या मदतीनें 'नैतिक परिणाम' करण्याची आशा आहे. जनरल डायरची कत्तल व असहकारितेची चळवळ ह्याबद्दल एकाच शब्दानें सरसाहेबांना बोलतांना पाहून मला आश्चर्य वाटतें. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ समजावून घेण्याची मीं आपल्याकडून शिकस्त केली; परंतु त्यांत मला यश आलें नाहीं, ही गोष्ट मला दुःखानें कबूल केली पाहिजे. --२५आगस्ट१९२९

---

# असहकारितेचें अंतरंग

मि. पिटरसनकडून आलेलें विचारपरिप्लुत पत्र यंग इंडियाच्या वाचकांनीं लक्षपूर्वक वाचावें, अशी मी त्यांना विनंति करितों. मि. पिटरसन बरेच वर्षांपासून हिंदुस्तानांत रहात असून, हिंदुस्तानच्या परिस्थितीचा त्यांनीं लक्षपूर्वक अभ्यास केला आहे. आपला मिशनशीं असलेला संबंध तोडून त्या स्वतःला राष्ट्रीय शिक्षणाला सर्वस्वीं वाहून घेणार आहेत. पत्र खासगी होतें; परंतु त्यांत असलेल्या विचारांचें महत्त्व लक्षांत घेऊन मीं तें छापण्याला त्यांची परवानगी मागितली व ती त्यांनीं मोठ्या आनंदानें दिली. हें पत्र प्रसिद्ध करण्यांत माझा मुख्य हेतु हा आहे कीं, तें असहकारितेची चळवळ ख्रिश्चनविरुद्ध नाहीं, इंग्रजांविरुद्ध नाहीं, युरोपिअनाविरुद्ध नाहीं हें सिद्ध करण्याला मला मदत करील. असहकारिता हें दोन धर्मांमधील द्वंद्व आहे. ज्ञान व अज्ञान यांमधील तो झगडा आहे.

आज युरोप परमेश्वराचा अगर ख्रिश्चन धर्माचा शब्द मानीत नसून, सैतानाचा शब्द झेलीत आहे अशी माझी खात्री झाली आहे. व सैतान जेव्हां परमेश्वराचें ढोंग करितो तेव्हां त्याचें काम चांगलेंच फावतें. युरोप नुसता नांवाला ख्रिश्चन

आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, युरोप आज पैशाला आपलें दैवत मानूं लागलें आहे. उंट एखादे वेळीं सुईच्या भोंकांतून पार होऊं शकेल; परंतु श्रीमंत मनुष्याला स्वर्गप्राप्ति होणें शक्य नाहीं असें ज्या येशूचें वचन, त्या येशूचे अनुयायी मात्र आज आपली नैतिक प्रगति ऐहिक संपत्तीनें वाढवूं लागले आहेत. इंग्लंडचें खुद्द राष्ट्रगीतच ख्रिश्चन धर्माला बट्टा लावणारें आहे. ज्या जीसस्नें शत्रूवर स्वतःइतकेंच प्रेम करा असा उपदेश केला, त्यानें आपल्या शत्रूबद्दल " इंग्लंडच्या शत्रूचें वाटोळें कर व त्याचे सर्व बेत हाणून पाड " असें गीत गायिलें नसतें. ज्या रसायन शास्त्राच्या वाढीबद्दल इतकी प्रौढी मारण्यांत येते, त्या शास्त्रानें युरोपच्या नैतिक उन्नतीला काडीचीहि मदत केली नाहीं, असें आपलें पूर्ण विचाराअंतीं ठाम मत झालें आहे, असें डॉ. वॅल्स्टननें आपल्या शेवटच्या पुस्तकांत नमूद करून ठेवलें आहे. आज ज्या सुधारणेनें सर्व युरोपला वेड लावलें आहे त्या सुधारणेचें राक्षसी स्वरूप गेल्या महायुद्धांत जगाच्या चांगलेंच निदर्शनास आलें आहे. सद्गुणाच्या नांवाखालीं विजयी राष्ट्रांनीं सर्व नीतिनिर्बंध पायाखालीं तुडविले आहेत. असत्य भाषण करणे पाप आहे, ही गोष्ट त्यांच्या खिसगणतींत नाहीं. जे जे अत्याचार तिकडे झाले ते सर्व ऐहिक सुखाकरितां झाले; धर्माकरितां अगर सत्याकरितां एकहि झाला नाहीं; परंतु जे हिंदु व मुसलमान आज सरकारशीं झगडत आहेत, त्यांना धर्म आहे, त्याचप्रमाणें ज्ञानहि आहे. एवढेंच काय पण ज्या खुनांचा एवढा बभ्रा करण्यांत आला आहे, त्यांच्या मुळाशीं धर्मवेडच होतें. धर्मवेड काढून टाकणें जितकें जरूर आहे, तितकेंच जे पैशाकरितां धर्मावर पाणी सोडण्याला तयार होतात त्यांचें धार्मिक थोतांड चव्हाट्यावर आणणें हें सुद्धां जरूर आहे. अडाणी मनुष्याचें धर्मवेड नाहींसें करणें हें धर्मलंडाचा लुच्चेपणा ( लंडपणा ) काढून टाकण्यापेक्षां किती तरी सोपें आहे.

हा व्यक्तीवर अगर देशावर आरोप नाहीं, हजारों युरोपियन परिस्थितीला न जुमानतां वर येत आहेत. मी युरोपच्या पुढाऱ्यांमध्यें दिसून येणाऱ्या प्रवृत्तीबद्दल लिहीत आहे. इंग्लंड आपल्या पुढाऱ्यांकडून हिंदी लोकांच्या धार्मिक व राष्ट्रीय भावना उर्मटपणें पायाखालीं तुडवीत आहे. स्वयंनिर्णयाच्या नांवाखालीं इंग्लंड मेसापोटेमियांतील तेलाच्या खाणी लुटीत आहे. फ्रान्स

आपल्या पुढाऱ्यांच्या मदतीनें रानटी लोकांना शिपाई बनवीत आहे, व मँडेटरी राष्ट्राच्या कर्तव्याला हरताळ फांसून सीरियन लोकांमधील पौरुषत्व नष्ट करीत आहेत. प्रे. विल्सननें आपले चौदा मुद्द समुद्रास्तृप्यंतु केले आहेत.

अत्याचारविरहित असहकारितेच्या मदतीस या असुरी शक्तींचा पाडाव करण्याकरितां हिंदुस्थान तयार झाला आहे. इस्लामचा मान हीच त्याची सुशिक्षितता व हिंदुस्थानचा मान हाच सर्व दुर्बल राष्ट्रांचा मान

——८ सप्टेंबर १९२०

---

# एका वर्षांत स्वराज्य !

असहकारितेची चळवळ जर लोक नेटानें करतील तर स्वराज्य एक वर्षांत मिळेल, असें कलकत्ता कांग्रेसमध्यें मीं म्हटलें होतें; त्याची पुष्कळांनीं टवाळी केली आहे. कांहींनीं मी घातलेल्या अटींकडे दुर्लक्ष केलें आहे व एका वर्षांत स्वराज्य मिळणें अशक्य एवढीच गोष्ट घेऊन हंसण्याला सुरवात केली आहे. दुसऱ्या मंडळींनीं सर्व जोर ' जर ' वर दिला आहे. व नुसत्या ' जर ' वरच मुद्द खरे असें धरून चालावयाचें असेल तर आकाशांतील चंद्रसुद्धां मनुष्य मिळवूं शकेल, हें सिद्ध करतां येईल असें त्यांचें म्हणणें आहे; तथापि माझ्या मुद्द्याला कांहीं आधार आहे. जर माझी अट पाळण्यांत येणार नाहीं तर स्वराज्य मिळणें अशक्य आहे, असें विधान करण्याचें मी धारिष्ट करतों. इंग्लिश लोकांच्या मदतीशिवाय आपण राहूं शकूं अशी परिस्थिति म्हणजे स्वराज्य. जर ती भागीदारी असेल तर ती आपखुषीवर राहील. आपण इंग्लिश लोकांच्या बरोबरीचे आहोंत असें आपल्याला वाटूं लागल्याशिवाय खरें स्वराज्य होणें शक्य नाहीं. स्वतःचें रक्षण करणें, हिंदु-मुसलमानांत शांतता राखणें, शिक्षण, आपल्याला रोज व्यवहारांत लागणाऱ्या गोष्टी तयार करणें, इतकेंच काय पण आमचे धार्मिक तंटे मिटविणें ह्या सर्व गोष्टींकरितां आपण इंग्लिश लोकांवर अवलंबून आहोंत, असें आपल्याला वाटतें. देशी संस्थानिकांचीं संस्थानें व लक्षाधिशांचे लाख इंग्रजसरकारच्या मर्जीवर अवलंबून आहेत. आपला परावलंबीपणा इंग्रजांना पूर्ण माहित आहे म्हणून तर सर हालंदसारखे इंग्रज असहकारितावाद्यांची चेष्टा करितात. स्वराज्य मिळविणें म्हणजे दुर्बलतेला

हद्दपार करणें होय. मेंढरांच्या कळपांत वाढलेल्या सिंहाला ज्याप्रमाणें आपलें स्वरूप ओळखण्याला फार कठीण गेलें त्याचप्रमाणें आपली ही दुर्बलता घालविणें फार दुर्घट काम आहे. टॉलस्टॉयच्या शब्दांत बोलावयाचें, म्हणजे मनुष्याला पुष्कळ वेळां आपल्या सत्यस्वरूपाची भुरळ पडते. यामुळें पुष्कळ वेळां आपण असहाय्य आहोंत अशी भावना आपल्यामध्यें उत्पन्न होते. त्यांतून इंग्लिश लोक आपल्याला वर काढतील अशी अपेक्षा करणें मूर्खपणाचें आहे. उलट शिक्षणानें आस्ते आस्ते तुम्ही स्वराज्याला पात्र व्हाल, अशा बेसूर नादानें ते आपलें कान बधिर करून टाकीत असतात. जर आपण कौन्सिलावर बहिष्कार टाकूं तर स्वराज्याचा ओनामा शिकण्याची नामी संधि आपण व्यर्थ दवडूं, असा टाइम्सचा आपल्याला उपदेश आहे. टाइम्सकाराप्रमाणें पुष्कळ लोकांनाहि तसेंच वाटतें अशी माझी खात्री आहे. टाइम्सनें पुढील धडधडीत खोटें विधान केलें आहे. " कौन्सिलवरील बहिष्कार उठविण्याचें जेव्हां इजिप्शियन लोकांनीं कबूल केलें तेव्हांच मिल्नर–कमिशननें त्यांचें म्हणणें ऐकलें." माझ्या मतें स्वराज्याला जें शिक्षण आपल्याला पाहिजे तें सर्व जगाच्या विरुद्ध आत्मरक्षण करण्याचें सामर्थ्य व आमच्या इच्छेप्रमाणें, मग त्यांत दोष असले तरी चालतील, राहण्याचें पूर्ण स्वातंत्र्य हें होय. स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं. अफगाण लोकांची राज्यपद्धति वाईट असेल; परंतु तें स्वराज्य आहे. मला त्यांचा हेवा वाटतो. रक्ताच्या नद्या वाहवूनच जपानी लोक स्वराज्याचा धडा शिकले. इंग्लिश लोकांना हांकलून देण्याचें आपल्या मनगटांत सामर्थ्य असतें तर आपण त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ ठरलों असतों. व जरी आपल्याला कौन्सिलमध्यें बरोबर वादविवाद करतां आला नसता, एखादें जबाबदारीचें काम चोख रीतीनें करतां आलें नसतें तरी आपण स्वराज्याला पात्र आहोंत, असें समजण्यांत आलें असतें. पाश्चिमात्य देशांत पात्रता मोजण्याचें पाशवी शक्ति हें एकच माप आहे. जर्मनीचा पराभव झाला तो त्याची बाजू खोटी होती म्हणून असें नव्हे, तर दोस्त सरकारचें सामर्थ्य जर्मनीच्या सामर्थ्यापेक्षां श्रेष्ठ ठरलें म्हणून. तेव्हां एकतर हिंदुस्तानला युद्धकला शिकली पाहिजे, किंवा स्वतःचा स्वार्थत्यागाचा व शिस्तीचा, असहकारितेचा मार्ग पतकरिला पाहिजे. इंग्लंड हिंदुस्तानला युद्धकला शिकविण्याला केव्हांहि तयार होणार नाहीं. एक

लाख गोऱ्या लोकांनीं ३३ कोटी हिंदी लोकांवर राज्य करावें ही गोष्ट जितकी आश्चर्यजनक तितकीच अपमानास्पद आहे. त्यांत त्यांचा मनगटाचा जोर अल्पांशानें त्यांच्या उपयोगी पडतो ही गोष्ट खरी; परंतु मुख्यत्वेंकरून हजारों प्रकारांनीं मिळविलेली आपली सहकारिताच त्यांना आमच्यावर राज्य करण्याला उपयोगी पडते. कालावरोबर आपल्याला ज्यास्त दुर्बल व परावलंबी करणें हेंहि त्यांचें ध्येय असतें. स्वातंत्र्य–हिरा फेंकून देऊन त्याऐवजीं सुधारलेलीं कौन्सिलें, न्यायकोर्टें, व गव्हर्नरी ह्यासारख्या गारगोट्या पदरांत घेऊं नका. राष्ट्राला निस्तेज करण्याचीं हीं साधनें आहेत. नुसत्या मनगटाच्या जोरावर आपल्यावर राज्य करणें इंग्लिश लोकांना शक्य नाहीं, आणि म्हणून प्रामाणिक अगर अप्रामाणिक हा विचार न करतां लागेल त्या साधनांचा उपयोग करून ते सत्ता चालवितात. साम्राज्य वाढीची लालसा तृप्त करण्याकरितां त्यांना हिंदुस्तानचा पैसा व माणसें हवीं आहेत. हा पैसा हीं व माणसें पुरविण्याचें आपण नाकारलें कीं, आपण आपलें स्वराज्याचें ध्येय गांठलेंच व त्याचबरोबर आपण खरीखुरी माणसें झालों असें समजा.

वरिष्ठ कायदेकौन्सिलच्या शेवटच्या अंकानें आपल्या अपमानाच्या विषाचा पेला तंतोतंत काठापर्यंत भरला. पंजाब प्रकरणावरील आपले ठराव मि. शास्त्र्यांना कौन्सिलमध्यें आणतां आले नाहींत. जालियांवाला बागेमधील कत्तलीनें झालेल्या शेंकडों अनाथ माणसांना फक्त १२५० रु.; पण लोकांनीं विकारवश होऊन केलेल्या अत्याचारामुळें अनाथ झालेल्या मूठभर इंग्रजांना लाखों रुपये मिळतात ! ज्यांनीं प्रत्यक्ष आपल्या धन्याचा अपराध केला, त्या अधिकाऱ्यांना फक्त काठ्याचा मार देण्यांत येतो व तेवढ्यानें सरकारचें समाधान होतें. जरहिंदी लोकांच्या अंगांत कांहीं पाणी असतें, तर जखमेंत मीठ भरण्याचा हा प्रयत्न त्यांनीं केला नसता.

मी इंग्रजांना दोष देत नाहीं. त्यांच्या जागीं जर आपण असतों तर आपणहि तें ज्या साधनांचा उपयोग करीत आहेत, त्याच साधनांचा उपयोग केला असता. सोटेशाही व लबाडी हीं बलवानांचीं नव्हेत, तर दुर्बलांचीं शस्त्रें आहेत. इंग्रज लोक संख्येनें कमजोर आहेत; परंतु आम्ही पुष्कळ असूनहि दुर्बल आहोंत. ह्याचा परिणाम प्रत्येकजण दुसऱ्याला खालीं खालीं खेंचण्यांत होत आहे. हिंदुस्तानांत राहिल्यानें इंग्लिश लोक शील गमावतात, तर इंग्लिश लोकांच्या सहवा-

सानें हिंदी लोक धैर्याला व पौरुषत्वाला पारखे होतात हा नेहमींचा अनुभव आहे. हा शक्तिपात दोनहि देशांचा व त्याचबरोबर सर्व जगाची हानि करणारा आहे; परंतु जर हिंदी लोक आपली स्वतःची काळजी घेतील तर इंग्रज व इतर जग आपापली काळजी घेतील. जगाच्या प्रगतींत भर घालण्याचें आपलें कार्य उत्तम रीतीनें करण्याला आपल्या घराची प्रथम आपण डागडुजी केली पाहिजे.

लष्करी शिक्षणाचा प्रश्न सध्यां आपल्यापुढे नाहीं. मी ह्यापुढेंहि एक पाऊल जातों. हिंदुस्तानचा जन्म जगाला निराळाच धडा घालून देण्याकरितां आहे, असा माझा विश्वास आहे. फक्त आत्मशुद्धीनें हिंदुस्तानला आपलें कार्य करतां येईल असें जगाला दाखविणें हिंदुस्तानच्या सामर्थ्याबाहेर नाहीं. ही गोष्ट एक असहकारितेनेंच करतां येईल. ज्यांनीं सहकारिता सुरू केली तेच जर सरकारशीं असलेला संबंध तोडूं लागतील तरच असहकारिता शक्य आहे. सरकारी शाळा, सरकारी कोर्टं व सरकारी कौन्सिलें ह्या त्रयमूर्तीच्या मायेचा पाश जर आपण तोडूं शकूं, व आपलें शिक्षण आपण चालवूं, आपले तंटे आपण मिटवूं, सरकारच्या कायद्याबद्दल उदास राहूं तरच आपण आपला राज्यकारभार पाहण्याला तयार झालों; आणि नंतर सरकारच्या मुलकी अगर लष्करी नोकरांना नोकरी सोडण्याची अगर लोकांना कर न देण्याला सांगण्याची आपली तयारी झाली, असें समजलें पाहिजे. आपल्या मुलांना शाळेंतून अगर कॉलेजांतून काढून राष्ट्रीय शाळा स्थापणें, वकिलांनीं कोर्टांवर बहिष्कार घालून जरूर तितके पोटाला घेऊन राष्ट्रसेवेला तन, मन व धन अर्पण करणें व कौन्सिलावर बहिष्कार टाकून प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष सरकारला मदत न करणें,ह्या गोष्टींची अपेक्षा करणें अगदीं अव्यवहार्य आहे काय ? असहकारितेची चळवळ हा ब्रिटिश पाशवी शक्तीच्या वरील सोनेरी मुलामा धुऊन टाकून तिला नागडी करणें व नुसत्या मनगटाच्या जोरावर हिंदुस्थान राखणें एक पळहि शक्य नाहीं अशी जगाची खात्री करून देण्याचा प्रयत्न आहे.

परंतु मीं घातलेल्या तीन अटी जोंपर्यंत घातल्या गेल्या नाहींत तोंपर्यंत स्वराज्य असणें शक्य नाहीं, ही गोष्ट मला स्पष्ट सांगितली पाहिजे. कॉलेजच्या डिग्र्या पाहिजेत, जे तंटे पांच मिनिटांत मिटवितां येतील त्यांच्याकरितां

अशिलांकडून हजारों रुपये घ्यावयास पाहिजेत, कौन्सिलमध्यें कालाचा अपव्यय करण्यांत आनंद मानावयाला पाहिजे आणि स्वराज्यहि पाहिजे ! ह्या मायेच्या मुख्य पाशाचा तर अजून विचार करावयाचाच आहे. आणि तो स्वदेशी होय. जर आपण स्वदेशीला हद्दपार केली नसती तर आज जी आमची अवनत स्थिति झाली आहे ती खास झाली नसती. जर आर्थिक गुलामगिरीच्या शृंखला तोडावयाच्या असतील तर आपला कपडा आपण तयार केला पाहिजे; आणि ह्या घटकेला सूत काढून हातमागावर विणूनच तो तयार केला पाहिजे.

ह्या सर्वांचा अर्थ शिस्त, देहविस्मृति, स्वार्थत्याग, कार्याची आवड, आत्मविश्वास व धैर्य पाहिजे. हे गुण जर आपण लोकांमध्यें एक वर्षांत आणले व लोकमत तयार केलें तर स्वराज्य एक वर्षांत खात्रीनें मिळेल. लोकांमध्यें राहोच; पण पुढाऱ्यांच्या अंगांत सुद्धां हे गुण नाहींत असें जर मला कोणी सांगेल तर मग आपल्याला स्वराज्य मिळणार नाहीं व इंग्लिश लोकांना दोष देण्याल आपल्याला अधिकार पोहोंचणार नाहीं. आपला उद्धार करणें सर्वतोपरी आपल्या वर अवलंबून आहे. —सप्टेंबर १९२०

# शाळा व कॉलेजें यांचा मोह

सरकारी अगर सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शाळा व कॉलेजें यांवर बहिष्कार टाकण्याच्या कलमाविरुद्ध सभेंतून व लेखांतून कडक टीका केली जात आहे. ही बहिष्काराची चळवळ म्हणे खोडसाळ, अपायकारक व देशहितविघातक आहे. पं. मदनमोहन मालवीय तिच्या कट्या शत्रूंपैकीं एक आहेत.

या बाबतींत माझ्या हातून कांहीं प्रमाद होत आहे कीं काय, हें शोधून काढण्याची मीं आपल्याकडून शिकस्त केली; परंतु उलट माझें या विषयावरील मत दृढ झालें आहे. ज्याप्रमाणें कितीहि उत्तम दूध असलें तरीहि त्यांत विषाचा थेंब घातला असल्यास आपण घेणार नाहीं त्याचप्रमाणें मिळणारें शिक्षण कितीहि उच्च प्रतीचें असलें तरी तें असल्या सरकारच्या शिक्षणसंस्थांतून घेणें पाप आहे.

कांहीं लोकांना ह्या म्हणण्याची सत्यता सहज पटते, व कांहीं मोठमोठ्या

लोकांना सुद्धां ती न पटून ते तिचा निषेध करितात, असें कां ? असा प्रश्न मी आपल्या मनाला वारंवार करितों. या प्रश्नाला माझें मन मला असें उत्तर देतें कीं, पहिल्या प्रकारच्या लोकांना सध्यांची राज्यपद्धति जितकी वाईट आहे असें वाटतें, तितकी ती दुसऱ्या वर्गांतील लोकांना वाटत नाहीं. सरळ भाषेंत बोलावयाचें म्हणजे कांहीं लोकांना पंजाब व खिलाफतप्रकरणाचा अर्थच समजला नाहीं. हे अत्याचार, सध्यांच्या सरकारचें धोरण एकंदरीनें राष्ट्रविघातक आहे ही गोष्ट, निर्विवाद सिद्ध करतात असें या लोकांना इतरांप्रमाणें वाटत नाहीं. असें विधान करणें मोठें जबाबदारीचें काम आहे, ही गोष्ट मी कबूल करतों. माझ्याप्रमाणें मालवीयांना अगर शास्त्र्यांना पंजाबच्या अन्यायाबद्दल चीड येत नाहीं अशी नुसती कल्पना करणें सुद्धां अशक्य आहे; तथापि माझ्या म्हणण्याचा अर्थ अगदीं तोच आहे. ज्या शाळेमध्यें त्यांच्या मुलांची उन्नति होण्याऐवजीं अवनति होण्याचाच संभव आहे, अशा शाळेंत हे लोक आपलीं मुलें घालणार नाहींत अशी माझी खात्री आहे. ज्यानें आपलें सर्वस्व हिरावून घेतलें आहे अशा दरवडेखोराची जी शाळा आहे, अगर ज्या शाळेवर त्यांचा ताबा अगर वजन आहे, अशा शाळेंत ही मंडळी आपलीं मुलें घालणार नाहींत, हीहि पण माझी खात्री आहे. सरकारी शाळेंत जाण्यानें देशांतील मुलें अधोगतीला जातात असें मला वाटतें. ज्या सरकारनें जाणून बुजून राष्ट्राचा मानभंग केला आहे व त्या सरकारचा ज्या शाळांशीं संबंध आहे, अशा शाळांतून लोकांनीं आपली मुलें काढून घेतलींच पाहिजेत. अशा शाळांतून मिळणारें शिक्षण अधोगतीच्या डोंगरावरून घसरत असलेल्या तरुण पिढीला अल्प प्रमाणांत कांहीं वेळ कदाचित् थोपवून धरूं शकेल; परंतु परिस्थितीला न जुमानतां, कांहीं लोक त्याच शिक्षणांतून वर आले म्हणून, सर्व तरुण पिढीला ह्या शाळांत घालून अधोगतीला नेऊन पोंहोचाविणें बरोबर होणार नाहीं. मी सांगतों त्या रीतीनें सरकारी शाळा दूषित झाल्या आहेत ही गोष्ट राष्ट्राच्या पुढाऱ्यांच्या ध्यानांत येत नाहीं, हें अगदीं उघड आहे.

ह्या शाळांत जे दोष आहेत असें आज सांगण्यांत येतें तेच दोष पंजाबचे अत्याचार व खिलाफतचा वचनभंग होण्यापूर्वींहि होते व आपण ते सहन करीत

होतों, असें ह्यावर उत्तर देण्यांत येईल. पूर्वीपेक्षां आज ह्या संस्थांत फरक झाला नाहीं, ही गोष्ट मला कबूल आहे; परंतु पंजाबची सोटेशाही व खिलाफतचा विश्वासघात ह्या दोन गोष्टींनीं सरकाराविषयींच्या माझ्या विचारांत क्रांति केली आहे. सरकारच्या अनुषंगिक दुष्टतेच्या अज्ञानामुळें, सध्यांच्या राज्यपद्धती-विरुद्ध शाळेवर बहिष्कार टाकण्यापर्यंत माझी मजल गेली नव्हती; आणि ह्याच कारणामुळें शाळेवरील बहिष्काराला जे लोक विरोध करतात त्यांना पंजाब व खिलाफत अन्यायांबद्दल माझ्या इतकें वाटत नसावें अशी मला भीति वाटते

हिंदुस्थानचे विद्यार्थी व विद्यार्थींनी जर त्यांना पंजाबमधील भयंकर अत्याचार म्हणजे स्वतःचा अपमान वाटत असेल, व जर त्यांना खिलाफतच्या अन्यायाचा खोल अर्थ समजला असेल, तर एक पळाचाहि विलंब न करतां सरकारी शाळा अगर कॉलेजें ओस पाडतील अशी माझी खात्री आहे. अशा रीतीनें शाळा सोडण्यांत त्यांना एका पळांत जें नैतिक शिक्षण मिळेल त्यानें अल्पकाल मुलकी शिक्षण न मिळाल्यानें होणारें नुकसान सहज भरून निघेल. ज्या दिवशीं मुलें व मुली शाळा ओस पाडतील त्या दिवशीं स्वराज्याच्या मार्गावर आपलें एक पाऊल खास पुढें पडलें, असें समजण्याला कांहीं हरकत नाहीं. त्या दिवशीं शाळा व कॉलेजें ह्याबद्दल वाटत असलेला मोह नष्ट झाला ! सरकारी सल्ला, पैसा वगैरे न घेतां आपल्याला आपल्या शिक्षणसंस्था चालवितां येणार नाहींत काय? हल्लींच्या शिक्षणसंस्थांवर बहिष्कार घालणें म्हणजे मार्गांत पर्वतप्राय अडचणी असल्या तरी स्वतःचें शिक्षण स्वतः चालवूं शकूं, अशी जाणीव आपल्याला उत्पन्न झाल्याची साक्ष देण्यासारखें आहे.

—२९ सप्टेंबर १९२०

---

# कोर्टांचा मोह

वकिलांच्या व कोर्टांच्या फेऱ्यांत जर आपण सांपडलों नसतों, जर कोर्टांच्या जाळ्यांत आपल्याला अडकविणारे कज्जेदलाल येथें नसते, तर

आपण आज आहोत त्यापेक्षां किती तरी ज्यास्त सुखी असतों ? कोर्टांतली हवा दूषित असते अशी साक्ष कोर्टांत नेहमी जाणारे लोक खात्रीनें देतील. पैशाकरतां स्वतःच्या चारित्र्याला काळिमा लावणारे साक्षिदार दोन्हीहि पक्षाकडे असतात; परंतु ह्या कोर्टांचा सर्वांत मोठा दुर्गुण निराळाच आहे. तो म्हटला म्हणजे हीं कोर्टें सरकारची सत्ता चालवितात हा. हीं कोर्टें न्यायदेवतेचीं माहेरघरें व स्वातंत्र्याचे रखवालदार आहेत, अशी लोकांची समजूत आहे; परंतु जेव्हां तीं अनीतिमान सरकारला पाठिंबा देतात तेव्हां त्यांच्यांतील हे गुण नष्ट होतात. अशा वेळेस राष्ट्रीय देवतेचा खून करणाऱ्या कत्तलखान्याचें त्यांना स्वरूप येतें. पंजाबांतील लष्करी कोर्टें व समरी कोर्टें ह्याच मासल्याचीं होतीं. इंग्लिश न्यायदेवतेचें नग्न स्वरूप त्या वेळेस लोकांना दिसलें. सामान्यपणें ज्या वेळेस राज्यकर्ते व प्रजाजन ह्यांच्यांमध्यें न्याय देण्याचा प्रश्न असतो त्या वेळेस हीच स्थिति असते. जगांतील सर्व देशांत हा असाच व्यवहार सुरू असतो. आजपर्यंत हिंदी लोकांचे खून करण्याबद्दल कोणा युरोपियनाला ह्या कोर्टांनीं कडक शिक्षा कधीं दिली आहे काय ? इंग्लिश लोकांच्या जागीं हिंदी न्यायाधीश व हिंदी प्रोसिक्युटर आल्यास ही स्थिति बदलेल, असे कोणीं समजूं नये. इंग्रज म्हणजे दानव व हिंदी मनुष्य म्हणजे देव अशांतली गोष्ट आहे, असें कोणी समजूं नये. दोघेहि परिस्थितीला बळी पडतात. लष्करी कोर्टांत हिंदी न्यायाधीश व हिंदी प्रोसिक्युटर होतेच. मॅनियनवालाच्या स्त्रियांचा छळ करणारा जर बॉसवर्थ स्मिथ हा इंग्रज गृहस्थ होता, तर अमृतसरच्या पतिव्रतांचे मानभग करणारे अधिकारी हिंदी होते. माझा व्यक्तीवर आरोप नसून पद्धतीवर आहे. इंग्लिश मनुष्याबरोबर माझें भांडण नाहीं. मि. अँड्रूज वगैरे इंग्लिश गृहस्थ ह्या राज्यपद्धतीचें राक्षसी स्वरूप समजून येण्यापूर्वीं मला जितके प्रिय होते तितके आजहि आहेत; परंतु त्यांच्यापैकीं जर कोणी आज व्हाइसरॉय झाले तर त्यांच्यापुढें मान वांकविणें मला शक्य नाहीं. जी राज्य-पद्धति आंतूनच कुजली आहे व जी हिंदी लोकांना खालच्या दर्जाचे लेखते, तिच्या मदतीनें राज्यशकट हांकीत असतां एखाद्या व्यक्तीला पवित्र राहणें शक्य नाहीं. आपल्या राक्षसी कृत्यांचें खरें स्वरूप बाहेर दिसू नये म्हणून दुष्ट लोक नैतिक साधनांचा व धर्मग्रंथांतील वचनांचा विशेष उपयोग करतात.

जरी सर्व सरकारी जागांवर हिंदी गृहस्थांची नेमणूक झाली, परंतु राज्य-पद्धतीचें धोरण हेंच राहिलें, तरी ही राज्यपद्धति आतां इतकीच आम्हांला असह्य होईल. हें दाखविण्याकरतां थोडें विषयांतर करावें लागलें, आणि म्हणूनच लार्ड सिंहांची नेमणूक माझ्या अंतःकरणांत आनंदलहरी उठवूं शकत नाहीं. तत्त्वांत व व्यवहारांत आम्हांला समानदर्जा प्राप्त झाला पाहिजे व जरूर तर ब्रिटिश संबंध तोडण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आलें पाहिजे.

परंतु कोर्टें व वकील ह्यांकडे वळावयाचें म्हणजे जोंपर्यंत त्यांचीं नुसतीं नांवाचीं न्यायमंदिरें आम्हांला एक अजब व दैवी चीज वाटते तोंपर्यंत इच्छित दर्जा आम्हांला प्राप्त होणें शक्य नाहीं. ज्यांची सुडाची अगर स्वार्थाची इच्छा हीं कोर्टें तृप्त करतात त्यांनीं, ह्या सरकारची सत्ता कायम ठेवणें हें ह्या कोर्टांचें अंतीम ध्येय आहे, ही गोष्ट दूर दृष्टी देऊन लक्षांत घ्यावी. कोर्टें नाहींशीं झालीं तर हें सरकार एका दिवसांत नामशेष होईल. माझ्या म्हणण्या-प्रमाणें जरी सर्व हिंदी वकिलांनीं ह्या कोर्टांवर बहिष्कार घातला व कोर्टांत एकहि मुलकी खटला चालेनासा झाला तरी लोकांना ह्या कोर्टांच्या साह्यानें कबज्यांत सरकारला ठेवतां येईलच, ही गोष्ट मला कबूल आहे; परंतु मग जाणून बुजून आपण आगींत उडी घालूं. गोष्ट चमत्कारिकच, परंतु जोंपर्यंत सरकारच्या हातांतील सत्ता हळूं हळूं लोकांच्या हातांत येईल असा आपला विश्वास होता, तोंपर्यंत न्यायखात्यांत वरिष्ठ जागेवर हिंदी माणसांच्या नेमणुका आपल्याला संतोषित करीत असत; परंतु आतां ही राज्यपद्धति हळूं हळूं सुधारणें शक्य नाहीं अशी आपली ठाम समजूत झाली आहे. तेव्हां ह्यापुढें असल्या नेमणुका लोकांच्या डोळ्यांत धूळ घालणाऱ्या ह्या दृष्टीनें आपल्या मार्गांतील विघ्नेंच होत. म्हणून प्रत्येक वकील आपल्या बहिष्कारानें जितक्या प्रमाणांत कोर्टांच्या इज्जतीची हवेली पोंखरतो तितका तो राष्ट्राचा व स्वतःचा फायदा करतो.

हीं कोर्टें किती पैसा खातात ह्याकडे जावें तितकें लोकांचें लक्ष गेलेलें नाहीं. हिंदी वकील जितकी फी घेतात तितकी इंग्लंदांत सुद्धां घेत नाहींत. ज्या न्याय-

१९३९

पद्धतीपासून वकिलाला महिना पन्नास हजारांपासून लाख रुपयांपर्यंत मिळकत होऊं शकते त्या पद्धतींत कांहीं तरी भयंकर दोष असलाच पाहिजे.

—६ आक्टोबर १९२०.

---

# उपहास झाला----पुढें?

असहकारितेची चळवळ आतां उपहासापलीकडे गेली आहे हें कोणीहि कबूल करील. ह्यापुढें तिचें आदरानें स्वागत होईल कीं, दडपशाहीनें तिचा गळा दाबला जाईल, हें पाहणें आहे. उपहास हा विरोधाचा प्रशस्त व सुधारलेला मार्ग आहे. जरी भाषा उर्मट असली तरी व्हाइसरॉयसाहेबांनी केलेला उपहास अपवादात्मक नाहीं.

परंतु आतां परीक्षेची खरी वेळ आली आहे. सुधारलेल्या राष्ट्रांत जेव्हां उपहासाच्या शस्त्रानें एकादी चळवळ मारिली जात नाहीं त्या वेळेस तिला मान मिळूं लागतो. प्रतिपक्षी योग्य त्या मुद्द्यानें तिचें सांत्वन करूं पहातात व दोन्ही पक्षांतील वादविवादाला कधींहि उग्र स्वरूप येत नाहीं. दोन्ही पक्ष परस्परांना आपल्या बाजूला आणण्याचा प्रयत्न करतात, व वादविवाद करून व मुद्देसूद कारणें दाखवून अनिश्चित लोकांना आपल्या बाजूचे करून घेतात.

कौन्सिलवरील बहिष्कार जरी पूर्णपणें अमलांत आला नाहीं तरी आला तो विस्तृत प्रमाणावर टाकला जाईल ह्याबद्दल शंका नाहीं. विद्यार्थी वर्गांत खळबळ उडाली आहे. मुख्य मुख्य संस्था राष्ट्रीय बनतील. पं० मोतीलाल नेहरूंनीं लाखो रुपयांच्या वकिलीवर लाथ मारिली, हें एकच उदाहरण उपहासाला हद्दपार करून त्या ठिकाणीं आदराची प्राणप्रतिष्ठा करील. पं. नेहरूंचा हा अनुक्रम स्वार्थत्यागी लोकांना आपल्या स्थितीविषयीं मनापासून विचार करावयाला लावील. पं. मोतीलाल नेहरूसारख्या गृहस्थाला अशी गोष्ट करावी लागली ह्यावरून सध्यांच्या राज्यपद्धतीला कोठें तरी कीड लागली असली पाहिजे. हळूं हळूं विद्यार्थी असहकारिता करूं लागले आहेत. अशा परिस्थितींत असहकारितेची चळवळ मूर्खपणाची आहे, असें कधींहि म्हणतां येणार नाहीं.

एकतर सरकारला असहकारितेच्या चळवळीपासून जें जोरदार लोकमत दिसत आहे त्याच्यापुढें मान वांकविली पाहिजे; नाहीं तर दडपशाहीनें ही चळवळ चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सरकारनें सर्वच वेळेला घेतलेली कायद्याची मदत दडपशाही होत नाहीं. अत्याचाराचा उपदेश केलेल्या मनुष्यावर उघडपणें चालविलेला खटला दडपशाही नव्हे. कायद्याच्या जोरावर अत्याचार बंद करण्याचा अधिकार प्रत्येक सरकारला आहे; परंतु मि. झापर अल्लीखान व इतर दोन मौलवी यांच्याविरुद्ध सरकारनें चालविलेल्या मुकदम्यावरून, सरकार अत्याचार बंद करण्याचा अगर निवारण्याचा प्रयत्न करीत नसून, लोकमत चिरडून टाकण्याचा व असंतोषाचा पसार थांबविण्याचा प्रयत्न करीत आहे असें दिसतें. ही केवळ दडपशाही आहे. हे खटले दडपशाहीच्या आगमनाचीं चिन्हें आहेत. अजून तिनें उग्रस्वरूप धारण केलें नाहीं ही गोष्ट खरी; परंतु जर ह्या खटल्यानें काम भागलें नाहीं तर सरकार आपलें भेसुर विराट स्वरूप दाखवील, असा फार संभव आहे.

असंतोषाचा प्रसार थांबविण्याचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे असंतोषाचीं कारणें दूर करणें हा होय. ह्याचा अर्थ पंजाब व खिलाफत प्रकरणांचा लोकमतप्रमाणें निकाल लावणें हा होय. जयाच्या व सामर्थ्याच्या मदानें धुंद झालेल्या सरकारापासून पश्चात्तापाची व विजयाची अपेक्षा करणें बरोबर नाहीं.

सरकारच्या कार्यक्रमांतील दुसरा भाग, ज्या प्रमाणांत असहकारितेची चळवळ वाढत जाईल त्या प्रमाणांत जोराची दडपशाही करणें हा असेल, असें आपण धरून चाललें पाहिजे; परंतु त्या दडपशाहींतूनहि जर ही चळवळ डोकें वर काढील तर सत्याच्या विजयाचा दिवस अगदीं जवळ आहे असें समजावें. तेव्हां खटले, काळेपाण्यापर्यंतच्या शिक्षा ह्याला आपण तयार झालें पाहिजे. पुढाऱ्यांवांचून ही चळवळ चालविण्याची शक्ति आपण आपल्यांत उत्पन्न केली पाहिजे. ह्याचाच अर्थ स्वराज्याची पात्रता आणणें हा होय. ज्या अर्थीं कोणत्याहि सरकारला सर्व देश तुरुंगांत घालणें केव्हांहि अशक्य आहे, त्या अर्थीं त्याला लोकांच्या इच्छा मान्य तरी कराव्या लागतील, नाहीं तर राष्ट्राला योग्य अशा सरकाराकरितां जागा मोकळी केलीच पाहिजे.

जितेंद्रियत्व मिळविणें व चळवळ तशीच पुढें चालविणें हीं आपलीं युद्धांत जय संपादन करण्याचीं दोन मुख्य साधनें आहेत.

सरकारच्या पुढें दोन मार्ग आहेत. 'चळवळीला मान देणें अगर ती रानटी उपायांनीं चिरडून टाकणें. आपल्यापुढें दडपशाहीखालीं चिरडून जाणें अगर दडपशाहीला न जुमानतां आपलें कार्य अव्याहत पुढें चालविणें, हे दोन मार्ग आहेत. —२० आक्टोबर १९२०.

# अलिगड विद्यार्थ्यांच्या पालकांना

सभ्य गृहस्थहो,

आज जें कांहीं मी करीत आहें तें पाहून, माझे जिवलग स्नेहीसुद्धां घोटाळ्यांत पडले आहेत हें मला माहीत आहे. मी हल्लीं विद्यार्थ्यांना जो उपदेश करितों तो पाहून पुष्कळ लोक बुचकळ्यांत पडले असतील. त्याबद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. ज्या सरकारच्या अमलाखालीं आपण दडपले जात आहोंत, त्या सरकारच्या राज्यपद्धतीकडे पाहण्याची माझी दृष्टि पार बदलली आहे. आपल्या धर्मग्रंथांत वर्णन केलेल्या रावणाच्या राज्यपद्धतीसारखी ती राक्षसी राज्यपद्धति आहे. ह्या राज्यपद्धतींत जर मूलतः फरक होणार नाहीं व राज्यकर्त्यांना पूर्ण पश्चात्ताप होणार नाहीं, तर ही राज्यपद्धति नष्ट केली पाहिजे, अशी जितकी माझी खात्री झाली आहे तितकी माझ्या मित्रांची झालेली नाहीं.

जशी आपल्याला आपल्या मुलांबद्दल काळजी वाटते तशीच मलाहि वाटते. आपलीं मनें दुखवावींत अशी माझी बिलकुल इच्छा नाहीं. ह्या माझ्या बोलण्या-वर आपण विश्वास ठेवा. मला स्वतःला चार मुलें असून मी त्यांना माझ्या मतें जें उत्तम असें शिक्षण दिलें आहे. मी जितका आपल्या वडिलांचा अगदीं आज्ञाधारक पुत्र होतों तितकाच माझ्या गुरूंचा मी आज्ञाधारक शिष्य होतों. पुत्राच्या कर्तव्याची मला जाणीव आहे; परंतु परमेश्वराविषयींचें माझें कर्तव्य मी सर्वांत श्रेष्ठ समजतों; व भारतमातेच्या प्रत्येक सुपुत्रानें व सुकन्येनें परमे-

श्वराविषयींचें आपलें कर्तव्य व इतरविषयींचीं कर्तव्यें ह्यांमध्यें श्रेष्ठ कोणतें हें ठरविण्याचा काळ आज आला आहे, असें मला वाटतें. मला माझ्या देशांतील तरुण पिढीचें अंतःकरण चांगलें ओळखतें. आमच्या देशांत आपल्या उच्च शिक्षणाची दिशा ठरविण्याचें काम बहुतेक तरुण मंडळींकडेच असतें, हें मला माहीत आहे. आपल्या तरुण मुलाचें उच्च शिक्षणाविषयींचें खूळ नाहींसें करणें बापाला फार जड गेल्याचीं उदाहरणें मला माहीत आहेत. पालकांची संमति नसली तर सध्यांचीं कॉलेजें व शाळा सोडा, असा विद्यार्थ्यांना उपदेश करण्यानें मी पालकांचीं मनें दुखवीत नाहीं अशी माझी खात्री आहे. आतांपर्यंत हजारों पालकांपैकीं एकाच पालकानें माझ्याकडे तक्रार केली आहे व तोहि सरकारी नोकर आहे, हें ऐकून आपल्याला आश्चर्य वाटेल. मला विचारल्याशिवाय माझ्या मुलांनीं शाळा सोडण्याचें ठरविलें अशी ही तक्रार आहे. कोणताहि शेवटचा निश्चय करण्यापूर्वी शाळा सोडण्याबद्दल आपल्या वडिलांचा सल्ला घ्या,' असा मी विद्यार्थ्यांना उपदेश केला आहे. पुष्कळ सभांतून मी हजारों पालकांना विनंति केली आहे; परंतु सरकारी मदत घेणाऱ्या शाळा सोडणाऱ्याविरुद्ध एकाहि पालकानें तक्रार केली नाहीं. उलट त्यांनीं एक मतानें असहकारितेचा ठराव पास केला आहे. ज्या सरकारानें मुसलमान लोकांचा विश्वासघात केला व पंजाबांत अमानुष अत्याचार करून राष्ट्राचा मानभंग केला, त्या सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शिक्षणसंस्थांतून आपलीं मुलें काढून घेण्याची आवश्यकता अलिगडच्या विद्यार्थ्यांच्या पालकांना इतरांप्रमाणेंच पटली आहे, असें मी धरून चालतों.

देशाच्या तरुण पिढीच्या शिक्षणाकडे एक पळहि दुर्लक्ष होऊं नये ह्याबद्दल आपल्या इतकाच मी उत्कंठ आहे; पण त्यांच्या शिक्षणाचा झरा पवित्र असावा ह्याविषयीं मी सर्वांत जास्त उत्कंठ आहे. ज्या सरकाराबद्दल आपल्याला प्रेम वाटत नाहीं त्याच्याकडून आपल्या शिक्षणाकरितां मदत घ्यावी हें नामर्दपणाचें आहे, असें मला वाटतें. माझ्यामतें तसें करणें निंद्य व अराजनिष्ठ होईल.

जो आपल्या मुलांच्या अंतःकरणांत स्वातंत्र्याचें बीजारोपण करील अशा स्वतंत्र स्वातंत्र्यप्रिय बाण्याच्या गुरुजीपाशीं, वृक्षाच्या छायेंत अगर झोंपडींत, परंतु स्वतंत्र वातावरणांत, आपल्या मुलांनीं शिक्षण संपादन करावें हें त्यापेक्षां श्रेष्ठ

नाहीं काय ? आपल्या राष्ट्राचें भवितव्य आपल्या हातांत नसून तें आपल्या मुलांच्या हातांमध्यें आहे अशी आपली खात्री होईल तर फार बरें. ज्या गुलामगिरीनें आपल्याला पोटावर सरपटत चालवावयास लावलें त्या गुलामगिरीच्या नरकांतून आपण त्यांना मुक्त करणार नाहीं काय ? असहाय झाल्यामुळें हें गुलामगिरीचें जूं झुगारून देण्याची इच्छाशक्ति अगर शारीरिक बल आपल्यांत नसेल; परंतु आपला हा नरकवास आपल्या मुलांना भोगावा लागूं नये अशी व्यवस्था करण्याइतका सूज्ञपणा आपण दाखविणार नाहीं काय ?

स्वतंत्र पद्धतीनें शिक्षण घेण्यानें त्यांचें कांहींहि नुकसान होणें शक्य नाहीं. सरकारी विश्वविद्यालयाच्या पदव्यांची त्यांना खात्रीनें जरूरी नाहीं. सरकारी पदव्यांचा मोह आपण एकदां टाकला कीं, आपल्या मुलांच्या शिक्षणाच्या खर्चाची तरतूद करणें फारसें कठीण नाहीं. जर राष्ट्र आपली एक आठवड्याची पुंजी देईल तर शाळेंत जाणाऱ्या वयाच्या सर्व मुलांच्या शिक्षणाचा एक वर्षाचा खर्च मिळेल. जर सध्यांचे हिंदूंचे व मुसलमानांचे धार्मिक फंड घेतले तर राष्ट्राला कवडीचीहि तोशीस न लागतां शिक्षणाचा प्रश्न सुटेल. सध्यांचा हा प्रयत्न आपल्या अब्रूचें व धर्माचें रक्षण करण्याची व स्वराज्य चालविण्याची आपली पात्रता अजमावून पाहण्याकरतां आहे.

आपला

**हिंदी तरुणांचा हितचिंतक**

**मो. क. गांधी**

—३ नोव्हेंबर १९२०

---

# आपल्या मार्गांतील अडचणी

आपल्या अडचणी दोन प्रकारच्या असतात; एक यदृच्छेनें उत्पन्न झालेल्या व दुसऱ्या स्वेच्छेनें उत्पन्न झालेल्या. दुसऱ्या प्रकारच्या अडचणी फार भयंकर असतात. कारण पुष्कळ वेळां त्यांना आपण पोटाशीं धरतों व त्यामुळें त्या दूर सारण्यास आपण खुषी नसतों. उदाहरणार्थ, नुकत्याच झालेल्या मिसेस बेझंटच्या

सभेंत उडालेली गडबड आपण केली होती; व सभाबंदीच्या कायद्याच्या जाहिरनाम्यापेक्षांहि मिसेस बेझंटच्या सभेंतील गडबड वाईट आहे. सभेला झालेली बंदी आपल्यांत सामर्थ्य उत्पन्न करते. आपण केलेले दंगेधोपे आपली बाजू लंगडी करतात. मिसेस बेझंटच्या सभेंत झालेली गडबड एक प्रकारचा अत्याचारच होय. अत्याचारविरहित असहकारितेच्या मार्गापासून ती निश्चित भ्रष्टता होती. अशा गडबडीपासूनच प्रत्यक्ष अत्याचाराचा जन्म होतो.

आपल्या ह्या कृत्यानें आपल्या पवित्र कार्यावर काय भयंकर परिणाम होईल, ह्याचा गडबड करणारांनीं नीट विचार करावयास पाहिजे होता. स्वराज्याला हें अतिशय वाईट शिक्षण आहे. परस्परांचीं मतें परस्परांना कितीहि तिरस्करणीय असोत; परंतु त्याबद्दल सहिष्णुता दाखविणें हा स्वराज्याचा खरा पाया आहे. जर असहकारितावादी प्रतिपक्षाची बाजू ऐकण्याला तयार नाहींत, तर सरकार लोकमताला न विचारतां सर्व गोष्टींचा निकाल लावतें, असा आरोप ते कोणत्या तोंडानें सरकारवर करणार ? सरकारशीं असहकारिता म्हणजे लोकांशीं सहकारिता आहे. त्याशिवाय सरकारशीं असहकारिता करणें शक्य नाहीं. आपल्यांत एकवाक्यता करण्याचा आपण शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे. मात्र तसें करण्यांत आपल्या मतांत विसंगतपणा येतां कामा नये. वरील प्रकारची गडबड हा तो मार्ग नव्हे. असहकारितावाद्यांनीं सभेंत गडबड करून मिसेस बेझंटना व त्यांच्या अनुयायांना आपल्यापासून ज्यास्तच दूर लोटलें आहे. असहकारितेचा हा मोठा तोटा आहे. ह्या गडबडीनें असहकारितावाद्यांनीं एकहि नवीन मनुष्य आपल्या पक्षाकरितां मिळविला नाहीं. मिसेस बेझंटचा अपमान करण्यांत ज्या विद्यार्थ्यांनीं भाग घेतला होता त्यांनीं आपल्या आयुष्यांतील अत्यंत आणीबाणीच्या काळांत आपली बदनामी करून घेतली आहे. त्यांच्या पालकांनीं सरकारी शाळांवर बहिष्कार घालण्यापासून त्यांचें मन वळवण्याचा प्रयत्न केल्यास, स्वदेशाकरितां व स्वधर्माकरितां वडिलांची अवज्ञा करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर पडणार आहे. वडिलांची अगर इतरांची आज्ञा पाळणें हा ज्या मुलांचा व मुलींचा धर्म झाला आहे, त्यांनाच अशी अवज्ञा करण्याची परवानगी आहे. अशी अवज्ञा केली तरच तो सद्‌गुण होतो; मात्र त्यांत द्वेष, क्रोध

अगर शोक असतां कामा नये. जेव्हां ही अवज्ञा अविचाराची, उन्मत्तपणाची व दंगेखोरपणाची असते तेव्हां तो खास दुर्गण असतो. पहिल्यानें उन्नति होते व दुसऱ्यानें अवनति होते. शिवाय मि. बेझंटचे आपण ऋणी नाहीं काय ? तरुण पिढीनें कृतघ्न होणें आत्मघातकीपणाचें आहे. जरी मि. बेझंटचीं मतें आपल्याविरुद्ध असलीं तरी तीं आदरानें श्रवण करणें आपलें काम आहे. त्यांत त्यांना स्वतःचा स्वार्थ साधावयाचा नाहीं. आपण चुकत आहोंत, असें त्यांना वाटतें; आपण हिंदुस्तानची प्रगति खुंटवीत आहोंत, असें त्यांचें मत आहे. आपण मार्गभ्रष्ट झालों आहोंत असें त्यांना वाटतें, तेव्हां आपल्याला योग्य मार्गावर आणणें त्यांचें कर्तव्यकर्म आहे; व त्या सांगतील त्याचा योग्य विचार करणें आपलें काम आहे. मला असें सांगण्यांत येतें कीं, त्यांच्या सभेंतून जर त्यांना स्पष्ट विरोध करण्यांत आला नाहीं तर, आपल्या मौनवृत्तीचा भलताच फायदा घेऊन, माझ्या मताचे पुष्कळ लोक आहेत असा डांगोरा पिटीत त्या देशांत फिरतील. दंगा करणें हा एकच विरोध प्रदर्शित करण्याचा मार्ग खास नव्हे. सर्वांत उत्तम व राजमार्ग म्हटला म्हणजे त्यांच्या सभेला न जाणें हा होय. त्यांचीं मतें आपल्याला पसंत नाहींत हें माहीत असतां, त्यांच्या सभेला गर्दी करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; परंतु सभेला जाणेंच अवश्य असेल तर विरोध प्रदर्शित करण्याचा दुसरा मार्ग आहे. सभेच्या शेवटीं भाषण करणें अगर त्यांचें भाषण अगदींच असह्य झाल्यास सभेंतून मुकाट्यानें उठून जाणें. प्रतिष्ठित विरोध आत्मसामर्थ्याची साक्ष आहे. जो पक्ष अल्पसंख्याक असतो तोच गोंधळ माजवून सभा उधळतो व आपल्या अल्पमतावर पांघरूण घालूं पाहतो. ही प्रवृत्ति असहकारितेच्या चळवळीचा परिणाम नाहीं ह्याबद्दल संशय नाहीं. ही पाश्चात्य देणगी आहे. पाश्चिमात्य घाणेरडी पद्धति आपल्यांत शिरली आहे. टाळ्या व विरोधाच्या आरोळ्या अवश्य पाश्चिमात्य पद्धति आहे. अत्याचारविरहित असहकारितेच्या नव्या मार्गाबरोबर ह्या जुन्या पद्धती नाहींशा झाल्या पाहिजेत. एकाच म्यानांत दोन तरवारी राहत नाहींत. धर्म व अधर्म ह्यांच्यामध्यें जर हें युद्ध असेल व आपण धर्माच्या बाजूचे असूं, तर आपल्याला शाब्दिक अत्याचाराचा

सुद्धां त्याग करावा लागेल व आपल्या प्रतिपक्षाशीं प्रतिष्ठित मार्गांनीं वर्तन करावें लागेल. अचल धैर्य, स्वार्थत्याग, शिस्त, परमेश्वरावर विश्वास व नम्रता ह्या गुणांनींच आपण इस्लामच्या व आपल्या मातृदेशाच्या अब्रूचें रक्षण करूं व आपल्या प्रतिपक्षियांना आपले चहाते व सहकारी बनवूं.

—१० नोव्हेंबर १९२०

# अहिंसेचा विजय

असहकारितेच्या चळवळीसंबंधानें हिंदुस्तानसरकारनें जो 'कम्युनिक' काढला आहे तो त्या चळवळीचा पहिला विजयच आहे, असें समजण्याला हरकत नाहीं. असहकारिता ही बेसनदशीर चळवळ असली तरी ती अत्याचार-विरहित आहे हा तिच्यांतला विशेष धर्म लक्षांत घेऊन, सरकारनें निदान सध्यां-तरी ही चळवळ मनगटाच्या जोरावर दडपून न टाकण्याचें ठरविलें आहे. ह्या सूज्ञ निश्चयाबद्दल सरकार व प्रजा असे दोघांचेंहि आभार मानणें जरूर आहे. व ही चळवळ जर अशीच कृतीनें व शब्दानें शुद्ध राहील तर सरकारला दडपशाही करण्याला जागाच मिळणार नाहीं; एवढेंच नव्हे तर वाढत्या लोकमताला विरोध करण्याला अशक्य होईल, याबद्दल मला बिलकुल संशय नाहीं. सरकारी मदती-वर अगर आश्रयावर लाथ मारणाऱ्या स्वावलंबी कृतींचा ह्या लोकमताला पाठिंबा मिळाल्यावर तर प्रश्नच नाहीं.

परंतु जर नेमस्त पक्ष असहकारितेची चळवळ थांबवूं शकला नाहीं तर सरकार आपलें खरें स्वरूप प्रकट करील, अशी धमकी कम्युनिकमध्यें देऊन ठेवण्याला सरकारनें कमी केलेलें नाहीं ? ज्या शब्दांत ही धमकावणी दिली आहे ते मोठे मौजेचे आहेत. प्रजेचें रक्षण करण्याची अंतिम जबाबदारी सरकारावर अस-ल्यामुळें सध्यांचें धोरण सरकार किती वेळ ठेवूं शकेल, हें नेमस्त सध्यांची असहकारितेची व्यापक चळवळ आंवरून धरण्यांत जसा विजय मिळवितील त्यावर अवलंबून राहील.

ह्याचा अर्थ जर सरकारचें अस्तित्व संपुष्टांत आणण्याइतकी असहकारितेची चळवळ परिणामकारक झाली, तर विचार व न्याय ह्याला फांटा देऊन सरकार

दडपशाहीचा चाबूक हातांत घेणार. मात्र अन्यायाच्या मार्गावरील स्वतःचें एक पाऊलहि मागें घेणार नाहीं किंवा केलेल्या अपराधाबद्दल पश्चात्तापाचें प्रायश्चित घेणार नाहीं. सरकारला जी भीति वाटत आहे ती अत्याचाराबद्दल नव्हे, तर स्वतःच्या आयुष्याबद्दल, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सरकार नेमस्तांची व हिंदुस्तानची विटंबना करीत आहे. जर सरकारचा सद्धेतु असेल तर जोंपर्यंत अत्याचार होणार नाहीं तोंपर्यंत, जरी ह्या चळवळीचें ध्येय पूर्ण स्वातंत्र्य असलें व जरी तिचा परिणाम पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्यांत झाला तरी, आम्ही तिच्यांत हात घालणार नाहीं असें त्यानें स्पष्ट शब्दांत कायमचें जाहीर करून टाकावें. जर असहकारितावाद्यांनीं आपल्या चळवळीला अत्याचाराचा स्पर्शहि होऊं न देण्याची खबरदारी घेतली, तर सरकारला तसें आज नाहीं उद्यां जाहीर करावेंच लागेल ह्याबद्दल मला तिळमात्र संशय नाहीं.मात्र दुर्धर लोकमतानें नाक दाबल्यावर जर सरकार तोंड उघडील तर मग त्यांत कांहीं स्वारस्य राहणार नाहीं.

बाकीचा सर्व मजकूर सरकारच्या सांप्रदायिक धोरणाला धरूनच आहे. आत्मप्रशंसेची व असहकारितावाद्यांबद्दलच्या असत्याची त्यांत रेलचेल आहे. उदाहरणार्थ, आतांपर्यंत ज्यांच्यावर सरकारची वक्रदृष्टी फिरली आहे ते अहिंसेच्या तत्त्वापासून च्युत झाले आहेत, हें म्हणणें चुकीचें आहे. ज्यांना तुरुंगांत टाकण्यांत आलें आहे त्यांच्या भाषणांत अगर लेखांत अत्याचाराला प्रवृत्त करणारा मजकूर सरकारनें काढून दावा, असें मी त्याला आव्हान करितों. ह्या लोकांची भाषा कधीं कधीं निर्वाणीची व अतिशयोक्तीची असते; परंतु वक्त्यानें अत्याचाराचा उपदेश केल्याचें एकहि उदाहरण मला आढळलें नाहीं. ह्या वक्त्यांच्या भाषणांत असें कांहीहि नाहीं कीं, जें मी स्वतः बोललों नसतों. ज्यांना आतांपर्यंत शिक्षा झाली आहे त्यांनीं पोलिसाला व शिपायाला वश करून घेण्याचा प्रयत्न केला होता, हेंहि म्हणणें तितकेंच अनृत आहे. इतर देशाचें स्वातंत्र्य हरण करण्याकरितां सरकार तयार करीत असलेल्या भाडोत्री सैन्यांत भरती करून घेऊं नका अशी लोकांना जाहीर विनंति करणें जर गुन्हा असेल, तर गोष्ट वेगळी. हिंदुस्तान स्वराज्यमंदिराच्या पायरीवर पाय ठेवीत असतां त्याच्या भाषणस्वातंत्र्यावर व मुद्रणस्वातंत्र्यावर घाला घालण्याला बिलकुल तयार

नाहीं हें सरकारचें म्हणणें, पंजाबमधील सभाबंदीचा कायदा व असकारितावादी वृत्तपत्रांवर सरकारनें उपसलेले हत्यार साफ खोडून काढीत आहेत.

या चळवळीच्या पुढाऱ्यांबद्दल केलेलीं असत्य विधानें व त्यांना देशभक्त म्हणून मिरवून घेण्याची हौस आहे असे गृहीत धरून त्यांचा केलेला उपहास इतका क्षुद्र आहे कीं, तिकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं. आज घटकेला सरकार आम्हांला अडकवूं इच्छित नाहीं हें ऐकून अलीबंधूंच्या व माझ्या छातीवरील केवढा धोंडा खालीं झाल्यासारखें झालें आहे, ह्याची सरकारला कल्पना होणें कठीण आहे. जर आम्हांला तुरुंगांत टाकलें तर अत्याचार होण्याची भयंकर भीति आहे हें प्रत्येकाला माहीत आहे. अशी कबुली देणें अगदीं अपमानास्पद आहे, ही गोष्ट मला माहीत आहे. जर लोकांत खरोखर सामर्थ्य व आत्मविश्वास असतां तर, आम्हांस काय किंवा इतर पुढाऱ्यांना काय जरी सरकारनें तुरुंगांत टाकलें असतें तरी लोक शांत राहिले असते; परंतु जोंपर्यंत लोकांची सरकारविषयींची भीति नष्ट झाली नाहीं तोंपर्यंत ह्या दुर्दैवी देशाचे लोक आपल्या पुढाऱ्यांच्या सल्ल्याला व मदतीला आंचवतांच मूढपणें अत्याचाराला प्रवृत्त होण्याची फार भीति आहे.

आपल्या आत्मसमर्थनार्थ सरकारानें जो तिसरा मुद्दा दिला आहे, तो कमालीचा लाघवी असून बेसावध लोकांना जाळ्यांत ओढणारा आहे. सरकारनें असहकारितेचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. " एक काल्पनिक योजना कीं, जी फद्रूप झाल्यास जिकडे तिकडे अंदाधुंदी माजेल, राजकीय संकर होईल व ज्यांचे देशांत खरे हितसंबंध आहेत त्यांचा सत्यनाश होईल." ह्या एका वाक्यांत सरकारचा राक्षसी स्वभाव प्रकट झाला आहे. असहकारितेचा जर विजय झाला तर सध्यांच्या राज्यपद्धतीचा पद्धतशीर व शांत रीतीने विध्वंस होऊन तिच्या जागीं अंदाधुंदी व अनास्था न येतां पहिल्या प्रतीची राज्यव्यवस्था स्थापिली जाईल व हितसंबंधाचें रक्षण होईल; मग तो मनुष्य ह्या देशांत प्रामाणिकपणानें व्यापार करणारा युरोपिअन असला तरी चालेल, हें सरकारला समजावयाला हवें होतें. 'खरे हितसंबंध ' हे शब्द हिंदुस्तानच्या सामान्य लोकांचा जाणूनबुजून अपमान करणारे असून, श्रीमंत लोकांना

खालच्या वर्गांच्या विरुद्ध चिथावणारे आहेत. ह्या देशांत सामान्य लोकांचे हितसंबंध नाहींत काय ? फक्त ह्याच लोकांचें देशांत शांतता राहण्यांत हित नाहीं काय ? अगदीं विपरित झालें असें धरून चाललें तर श्रीमंत लोकांना देशत्याग करितां येईल ! परंतु सामान्य लोकांना ह्या अभागी व दुर्दैवी देशांत जी वीतभर जमीन असेल त्याशिवाय जगांत इतरत्र कोठेंहि थारा नाहीं.

प्रत्येक असहकारितावादी लोकांना, स्वार्थत्याग करावा, आत्मशुद्धी मिळवावी व शिस्त पाळावी असा उपदेश करीत आहे हें माहीत असतांना, लोकांच्या अज्ञानावर व पक्षपातबुद्धीवर ह्या चळवळीची सर्व उभारणी आहे, असें म्हणणें हिंदुस्तानसरकारला शोभत नाहीं. सत्याग्रहाबद्दल लोकांचा गैरसमज करणें तितकेंच खोडसाळपणाचें आहे. तो चिरस्मरणीय एप्रिल महिन्यांतील अनुभव अत्यंत कटु होता ही गोष्ट खरी; परंतु त्या महिन्यांतील सरकारी अधिकाऱ्यांचे अत्याचार लोकांच्या स्मरणांत सदैव ताजे राहतील. पंजाबांतील एका दुष्ट अधिकाऱ्यानें एक निर्दोष व पवित्र चळवळ वाटेल त्या साधनानें चिरडून टाकण्याचा कसा प्रयत्न केला ह्याचा हिंदुस्तानला आजन्म विसर पडणार नाहीं. ह्या अन्यायाबद्दल सर्व देशांत उसळलेली लाट व लोकांमध्यें दिसून येत असलेली जाज्वल्य कर्तव्यजागृति सत्याग्रहावरील आरोप साफ धुऊन काढीत आहेत.

सरकारची सर्व भिस्त आमच्या अज्ञानावर व लोभावर आहे, एवढेंच नव्हे तर आम्ही दुर्बल आहोंत ह्याची आठवण आम्हांला देण्याला सरकार विसरलें नाहीं. सरकार पुढें म्हणतें " जर असहकारितावाद्यांचा पूर्ण जय झाला तर देशांत अंदाधुंदी माजून, शिवाय परचक्रापासून हिंदुस्तानला आत्मरक्षण करतां येणार नाहीं. एका शतकाच्या व्यवस्थित प्रयत्नाचें फल, अखंड शांततेपासून व निश्चित राज्यपद्धतीपासून होणारा लाभ, सुधारणेच्या कायद्यापासून भविष्यकालीं होणारे आणखी फायदे, सांपत्तिक भरभराट, राजकीय प्रगति, ह्या सर्वांवर मूठभर सत्पथभ्रष्ट लोकांच्या बेजबाबदार लहरीकरितां लोकांनीं लाथ मारावी, असा उपदेश करण्यांत येत आहे. " वरील उद्गार अत्यंत खोडसाळपणाचे, भयंकर दिशाभूल करणारे व सरकारच्या भाषेत बोलावयाचें म्हणजे ' परम

अनीतीचे' आहेत, असें माझ्या अल्पमतीला वाटतें. हें अनुमान जर खरं असेल तर ब्रिटिश बंदुकीशिवाय हिंदुस्तान नेहमींच असाहाय्य राहणार ज्या हिंदुस्तान देशांत एक शतकापूर्वी मातृभूमीचें रक्षण करण्याकरितां लाखो वीर तयार असत ( रशिया वगळून कोणत्याहि तीन युरोपिअन राष्ट्रांपेक्षां ज्यास्त ) त्या हिंदुस्तानला ह्या भविष्यकथनापेक्षां कोणतीहि गोष्ट ज्यास्त विषण्ण, अनीतिकारक व अपमानास्पद असेल, असें माझ्या कल्पनेंतसुद्धां येत नाहीं. स्वतःच्या व्यापारी स्वार्थाकरितां ब्रिटिश सरकारनें सर्व देशाला नामर्द करून सोडलें, यापेक्षां ब्रिटिश राज्यपद्धतीला कालिमा आणणारी दुसरी कोणती गोष्ट असेल ? आमच्या विजयानें हिंदुस्तान एकदिलाचा, एकध्येयाचा, स्वाभिमानी व जगांतील सर्व आरमारी राष्ट्रांनीं वेढा दिला तरी स्वतःच्या गरजा स्वतः भागविणारा असा होईल, हें सरकारला पक्के माहीत आहे. हें नुसतें मनोराज्य असेल; परंतु ' आमच्या पूर्ण विजयाचा ' हा तंतोतंत अर्थ आहे. एका बाजूला जगांतील सर्व राष्ट्रसंघ व्यापाराच्या उद्देशानें हिंदुस्तानावर स्वारी करण्याकरितां सज्ज झालेला व दुसऱ्या बाजूला शीख, गुरखे, पुरभय्ये, मुसलमान, रजपूत व इतर शूर जाती स्वखुषीनें भरतखंडाचें संरक्षण करण्याकरितां तयार झालेल्या, असें हें द्वंद्व एकदां परमेश्वरानें पहावेंच ! हिंदुस्तानांत विचाराची व ध्येयाची अशी एकवाक्यता होणेंच शक्य नाहीं, असें जर मला कोणी सांगेल तर मग हिंदुस्तानाला स्वराज्य मिळणें कधींच शक्य नाहीं, असें माझें त्याला उत्तर आहे. हिंदुस्तानच्या आकाशांत आंगठ्याएवढा दिसणारा ढग कोणत्या क्षणाला सर्व देश जलमय करणाऱ्या मेघराजाप्रमाणें वाढेल याचा नेम नाहीं, असें कॅनिंगनें लिहून ठेविलें आहे. लोकांच्या मनांत अर्धवट जागृतावस्थेंत असलेला ब्रिटिश राज्याचा कटु अनुभव, कोणत्या ना कोणत्या वेळीं ( खडबडून जागा होऊन ) निश्चित स्वरूप घेऊन स्वार्थत्यागाची व एकीची राष्ट्रांत इतकी जाणीव उत्पन्न करील कीं, ती एक तर सरकारला पश्चात्ताप करण्याला भाग पाडून सरकारचें हृदय पार बदलील किंवा सरकारला येथून जाण्याला भाग पाडील, अशी आशा करण्याइतका माझ्या देशबांधवांवर माझा पूर्ण विश्वास आहे.

सरकारनें माझ्यावर केलेल्या आरोपाला उत्तर देण्याच्या भानगडींत पडून मी हा लेख ज्यास्त लांबवूं इच्छित नाहीं. फक्त ज्या दोन गोष्टी करण्यानें असह-

कारितेची चळवळ थांबेल, त्यांचा ह्या कम्युनीकमध्यें मुळींच उल्लेख केला नाहीं हें लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. खिलाफत-अटींमध्यें योग्य ते फेरफार व पंजाबप्रकरणाचा लोकांना समाधानकारक निकाल ह्या दोन गोष्टींबद्दल सरकारनें मौनव्रत धरिलें आहे. ह्या दोन मुद्द्यांवर जर इंग्लंड हिंदी लोकांच्या इच्छेस मान देईल तरच व तेव्हांच असहकारिता जाऊन त्या ठिकाणीं सहकारिता येईल; व ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें आमचें ध्येय आपोआपच ठरेल.

परंतु जोंपर्यंत तसें होणार नाहीं तोंपर्यंत सरकारच्या ठरावाच्या बिंडोळ्याला व दडपशाहीला न जुमानतां अत्याचारविरहित असहकारिता हाच शब्दावडंबर, प्रतारणा व गोड वचनें ह्यांचा वीट आलेल्या राष्ट्राचा धर्म राहील. —१७ नोव्हेंबर १९२०

# उपदेश

( म. गांधींना एक निनांवी पत्र आलें होतें. त्यांत असहकारितेच्या कार्यक्रमांत फक्त परदेशी माल, पोलीस व लष्कर ह्या तीन गोष्टींचाच समावेश करावा व त्याचप्रमाणें गुप्त मंडळ्या स्थापन कराव्यात, असा उपदेश केला होता. पत्र कोणा तरी बाईनें पाठविलें आहे असें भासवण्याचा प्रयत्न केला होता. )

पत्रावर तारीख नाहीं. त्याचप्रमाणें हें खात्रीनें स्त्रीनें लिहिलेलें नसावें. पत्र इतकें पुरुषी थाटाचें आहे कीं, तें लिहिण्यांत कोणत्याहि स्त्रीचा संबंध असणें शक्य नाहीं. ह्या पत्रांत वीरशालित्व भासविण्याचा प्रयत्न केला आहे त्यापेक्षां आर्यस्त्रिया असंख्य पटींनीं ज्यास्त वीरशाली आहेत. पत्र पाठविणारा मनुष्य परमेश्वराचें नांव घेतो; परंतु त्याला इंग्लिश बंदुकीची भीति वाटत आहे व म्हणूनच तो शीख व गुरख्यांच्या तलवारीचा आनंदानें उपयोग करून घेण्यास तयार आहे. असहकारितेचें तत्त्व अजून त्याच्या अंतःकरणांत बरोबर बिंबलेलें नाहीं. इंग्लिश पाशवी शक्तीच्या ऐवजीं दुसरी एकादी पाशवी शक्ति आराध्य दैवत बनविणें, हें हिंदुस्तानच्या रोगावर रामबाण औषध नव्हे, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. शिवाय तरवारीच्या जोरावरच जर प्रश्नाचा निकाल लागावयाचा असेल तर

मग फक्त शीखांची व गुरख्यांचीच तरवार कां? मग सबंध हिंदुस्तानने म्यानां-तून तरवार बाहेर काढली पाहिजे. युरोप आपल्याला हा एकच उत्तम धडा शिकवितो. पाशवी शक्तीचेंच साम्राज्य चालावयाचें असेल तर मग हिंदुस्तानच्या लाखो लोकांनीं एक तर युद्धकलेचें शिक्षण संपादन केलें पाहिजे, नाहीं तर ज्याच्या हातांत तरवार असेल, मग तो स्वदेशी असो अगर परदेशी असो, त्याचे पाय मस्तकावर धारण केले पाहिजेत. लाखो लोकांनीं 'मुकीं जनावरें' राहिलें पाहिजे. बहुजन समाजांत स्वतःच्या पदवीची व शक्तीची जाणीव उत्पन्न करणें, हें असहकारितेचें ध्येय आहे. हें एकाच गोष्टीनें साध्य होणार आहे. जर त्यांना आत्मसाक्ष होईल तर त्यांना पाशवी शक्तीचें भय बाळगण्याचें कांहीं एक कारण उरणार नाहीं.

शीख, गुरखे व हिंदुस्तानांतील इतर लष्करी जाती ह्या आम्हांला पाहिजे आहेत; पण त्या ब्रिटिश शिपायांशीं दोन हात करण्याकरतां नव्हे, तर आम्हांला गुलाम बनविण्यांत इंग्लिश शिपायांना त्यांनीं मदत करूं नये म्हणून हव्या आहेत. ब्रिटिश अंमलदाराच्या हुकमतीखालीं शिपाईगिरी करून हे आपली स्वतःची व आमची दास्यवृत्ति वाढवीत आहेत, ही गोष्ट ह्या लोकांच्या लक्षांत यावी अशी आमची इच्छा आहे. हिंदी शिपायाला अहिंसेचें स्वारस्य कळलें आहे, व पत्र पाठवणारा पक्ष काळाच्या उदरांत गडप झाला आहे अशीहि वेळ येईल.

पत्र पाठविणारा मनुष्य ज्या अर्थीं सर्व शक्ति परकीय माल, पोलिस व लष्कर ह्यांवर खर्च करण्यास सांगतो त्या अर्थीं माझें मन त्याच्याविषयीं साशंक होतें. जो वर्ग आजपर्यंत लोकांचा पुढारी म्हणून नावला आहे त्या वर्गानें स्वतः स्वार्थत्याग करण्याचा प्रश्न बाजूला सारून देशांत एकी राखण्याचा हा उपक्रम दिसतो; परंतु असहकारितेच्या युद्धांतील खरे योद्धे ह्याच वर्गांतील लोक आहेत, हें विसरतां कामा नये. कदाचित असहकारितेनें देशांत दुफळी पडल्याचा भास होण्याचा कांहीं काळ संभव आहे; परंतु आत्मशुद्धीच्या दिव्यां-तून देशभक्त पार पडल्यावर खरी एकीच स्थापन होणार आहे.

आतांपर्यंत आपण युद्धाचे सर्व डाव सूर्यप्रकाशांत खेळल्यामुळें जी इष्टफल-

प्राप्ति झाली आहे, ती मला उपदेश करणाऱ्याच्या ध्यानांत आलेली दिसत नाहीं. माझ्या मतें आजपर्यंत सध्यांप्रमाणें लोकमत कधींहि इतक्या उघड व स्पष्टपणें प्रकट करण्यांत आलें नव्हतें. १२४ अ कलमाची ( राजद्रोह ) भाषाच त्यानें पार झुगारून दिली आहे. पत्र पाठवणारा मनुष्य गुप्त मंडळयाबद्दल लिहितो; परंतु तो फार जुना उपाय आहे. प्रच्छन्नतेसारख्या अपवित्र मार्गांनीं हें राष्ट्र आपल्या श्रेष्ठ पदाला जाऊन पोहोंचणें शक्य नाहीं. आपली चळवळ अगदीं उघडपणें चालवून आपण गुप्त व अनीतिमान पोलिस खात्याची नांगी तोडून टाकली पाहिजे. ‘ मूले कुठारः ’ ही असहकारितेची शक्ति नसेल तर मग ती असहकारिताच नव्हे. असहकारितेच्या सन्मान्य व उघड मार्गानें जर आपण इंग्लिश राज्यपद्धतीच्या विषारी वृक्षाला पाणी घालण्याचेंच बंद केलें तर तो मुळासकट उलथून पडलाच पाहिजे. ज्या तोंडानें परमेश्वराची करुणा भाकावयाची त्याच तोंडानें दैत्यांच्या गुप्त मार्गाचा उपदेश करावयाचा, हें चमत्कारिक आहे.

—१ डिसेंबर १९२०.

---

# “ माझें स्वराज्य ”

माझ्या हिंदि स्वराज्याचें इंग्रजी भाषांतर वाचण्याची लॉर्ड रोनाल्डशेनें माझ्यावर कृपा केलेली दिसते. ह्या पुस्तकांत वर्णन केलेल्या स्वराज्याशीं बंगाली लोकांना कांहीं एक कर्तव्य नाहीं, असें लॉर्ड साहेबांनीं आपल्या श्रोत्यांना सांगितलें. ह्या पुस्तकांत वर्णन केलेलें स्वराज्य व कॉंग्रेसचें स्वराज्य एक नाहीं, ही दुःखाची गोष्ट आहे. कॉंग्रेसच्या स्वराज्याचा अर्थ ब्रिटिश सरकार कृपावंत होऊन जे अधिकार देतील ते, हा नसून लोकांना जें हवें तें स्वराज्य असा आहे. माझ्या मतें हें स्वराज्य बहुतकरून शिक्षण, न्यायखातें, आरमार लष्कर, पोलीस व तिजोरी ह्यांवर पूर्ण ताबा असलेली लोकप्रतिनिधींची सभा हें होईल.

जर हिंदुस्थान माझे म्हणण्याप्रमाणें वागेल तर एका वर्षांत जें स्वराज्य

मिळविण्याची मी प्रतिज्ञा करितों तें स्वराज्य म्हणजे, पंजाब व खिलापत प्रकरणाची पुनरावृत्ति न होईल व राष्ट्राला जें योग्य अगर अयोग्य दिसेल तें करण्याचा पूर्ण अख्त्यार राहील इतका अधिकार लोकांना असणें, हें होय. जबाबदार, उर्मट व सैतानी नोकरशाहीला जें योग्य वाटेल तें लोकांनीं करावें असा त्याचा अर्थ होत नाहीं. ह्या स्वराज्यांत जो माल हिंदुस्तानांत तयार होण्यासारखा आहे अशा परकीय मालावर जबर संरक्षक जकात बसविण्याचा अधिकार राष्ट्राला राहील; त्याचप्रमाणें शेजारच्या अगर दूरच्या राष्ट्रांना गुलाम करण्याकरितां एकहि हिंदी शिपाई पाठविण्याचें नाकारण्याचा अधिकार आम्हांला ह्या स्वराज्यांत राहील, ज्या वेळेस स्वतःच्या मताप्रमाणें योग्य अगर अयोग्य गोष्टी करण्याला हें राष्ट्र स्वतंत्र होईल त्याच वेळेस माझ्या कल्पनेप्रमाणें स्वराज्य होण्याची शक्यता उत्पन्न होईल.

जीं जीं मतें मीं ह्या पुस्तकांत नमूद केलीं आहेत तीं अजूनीहि कायम आहेत व वाचकांनीं तीं वाचावींत अशी मी त्यांना शिफारस करीन. आत्म्याची ओळख होणें, हेंच खरें स्वराज्य होय. ह्याचाच अर्थ मोक्ष अगर मुक्ति हा असून, हें ध्येय साध्य करण्याच्या मार्गांत डॉक्टर, वकील, आगगाड्या ह्या अडचणी आहेत. हें माझें मत बदलण्यासारखें माझ्या अवलोकनांत कांहींहि आढळलें नाहीं; परंतु सध्यांच्यासारख्या सैतानी सरकारशीं सहकारिता करण्यानें वरील ध्येय साध्य करण्याकरितां प्रयत्न करणें, हेंसुद्धां अशक्य आहे. परमेश्वराची व सैतानीची भक्ति एकाच वेळेला करणें मला शक्य नाहीं. सध्यांच्या सरकारच्या सैतानी स्वभावाचा खात्रीलायक पुरावा म्हटला म्हणजे (Lord Ronaldshe) लार्ड रोनाल्डशे सारख्या थोर मनुष्याला लोकांची दिशाभूल करणें भाग पडतें हा होय. मुख्य गोष्टीबद्दल त्यांनीं अवाक्षरहि काढिलें नाहीं. पंजाबाबद्दल त्यांनीं मौनव्रत कां पतकरलें? खिलापत प्रश्न बाजूला त्यांनीं कां ठेविला? क्षयरोग्याला मलम लावण्यानें आराम पडणें शक्य आहे काय? आज हिंदुस्तानांत जें वादळ उद्भवलें आहे त्याचें कारण सुधारणांचा अपुरेपणा हें नसून, पंजाब व खिलापत ह्यांनीं हिंदुस्तानच्या मर्मस्थानीं केलेला घाव व त्यांत मीठ भरण्याचा सरकारकडोन होत असलेला प्रयत्न हें आहे

एवढी साधी गोष्ट लार्डसाहेबांच्या ध्यानांत येत नाहीं काय ? समेट होण्यापूर्वी अंतःकरणें शुद्ध झालीं पाहिजेत, हें लार्ड साहेबांना समजत नाहीं काय !

असहकारितेपासून द्वेष वाढतो असें म्हणण्याचा हल्लीं प्रघात पडला आहे. ह्या मोहाला कर्नल वेजवुडासारखे गृहस्थ बळी पडलेले पाहून मला अत्यंत खेद होत आहे. द्वेषाला बाहेर पडण्यासाठीं योग्य मार्ग देणें, हा एकच द्वेष नाहींसा करण्याचा उपाय आहे. जोंपर्यंत जाणूनबुजून हिंदी लोकांच्या मतांचा उपहास व तिरस्कार करण्यांत येत आहे तोंपर्यंत कोणालाहि द्वेष नष्ट करणें शक्य नाहीं. निदान मला तरी शक्य नाहीं. एकीकडे हिंदी लोकांच्या पवित्र भावनांची तिरस्कारबुद्धीनें पायमल्ली करावयाची व दुसरीकडे द्वेष करूं नका असा उपदेश करावयाचा म्हणजे केवळ चेष्टा होय. हिंदुस्तान दुर्बल व असाहाय्य असल्यामुळें जें जुलमी सरकार त्याचा तिरस्कार करतें, त्याला पोटावर सरपटावयास लावतें, पतिव्रतांचा गोषा बाजूला सारतें व कोमल बालकांना दिवसांतून चार वेळां युनिअन् जॅकला सलाम करावयास लावून आपली सत्ता कबूल करण्यास लावतें अशा सरकारचा द्वेष करून, हिंदुस्तान आपली असाहाय्यता प्रगट करितो. लोकांना बलवान व आत्मविश्वासी करणें हें असहकारितेचें ध्येय आहे. द्वेषाच्या जागीं कारुण्याचें साम्राज्य स्थापन करण्याचा तो प्रयत्न आहे.

सामर्थ्यवान व आत्मविश्वासी हिंदुस्तान वॉस्वर्थ स्मिथ् व फ्रँक जॉनसन् अशा माणसांचा द्वेष करणार नाहीं. कारण त्यांना शिक्षा करण्याची शक्ति अंगांत असल्यामुळें दयेनें त्यांना क्षमा करणें हा त्याचा स्वभाव बनेल. आज त्याला अशा माणसांना शिक्षाहि करितां येत नाहीं व क्षमाहि करतां येत नाहीं, म्हणूनच हिंदुस्तान त्यांचा द्वेष करितो. जर मुसलमानांच्या अंगांत सामर्थ्य असतें तर इंग्रज लोकांचा द्वेष करण्याऐवजीं त्यांच्याशीं युद्ध करून इस्लामची पवित्र भूमि त्यांनीं हिसकावून घेतली असती. ज्या अलीबंधूंना इस्लामची अब्रू स्वतःच्या प्राणाहूनहि पवित्र आहे व इस्लामच्या अब्रूचें रक्षण करण्याकरितां स्वतःच्या प्राणांची आहुति देण्याला वाटेल त्या पळाला तयार आहेत, ते अलिबंधू जर इंग्रज लोक खिलाफतचा प्रश्न योग्य रीतीनें सोडवितील–व तो तसा

सोडविण्याची सत्ता इंग्रज लोकांपाशीं आहे-तर त्यांच्याशीं खुषीनें सहकारिता करतील.

ह्या युद्धांत कसलाहि वैयक्तिक प्रश्न नाहीं अशी माझी खात्री आहे. हिंदुस्तानच्या हिताबद्दल आपल्याला खरी कळकळ आहे असा खात्रीलायक पुरावा जर इंग्रज लोक देतील, तर हिंदुमुसलमान दोघेहि त्यांचें कल्याणच चिंततील; मग असहकारिता परमेश्वराचीच देणगी ठरेल. ती हिंदुस्तानचें अंतःकरण पवित्र व सामर्थ्यवान् करील. जो हिंदुस्तान आज दुर्बल व असाहाय्य असल्यामुळें मनुष्यजातीला ओझें होऊन बसला आहे, तोच हिंदुस्तान मग जगाचा आधारस्तंभ होईल. अप्रत्यक्षपणानें हिंदी सैनिकांनीं तुर्कस्तानचे तुकडे करण्याला मदत केली आहे व आज ते अरेबियन राष्ट्राला परतंत्र करण्यांत गुंतलेले आहे. मानवी जातीच्या हिताकरितां इंग्रज सरकारनें हिंदी सैन्याचा उपयोग केल्याचा एकहि प्रसंग मला माहित नाहीं आणि यद्यपि ( हर हर, काय हें ? )

इंग्रज लोकांना केलेल्या मदतीचा गर्वोक्तीनें उच्चार करण्यांत हिंदी संस्थानिकांना कसलाहि कमीपणा वाटत नाहीं ! ह्याच्यापेक्षां अधिक अधोगति ती कसली असणार ! —८ डिसेंबर १९२०.

---

# एक पाऊल पुढें

मि० स्टोक्स हे परमेश्वरी आज्ञेप्रमाणें वागणारे एक ख्रिश्चन गृहस्थ आहेत. हे गृहस्थ हिंदुस्थानाला आपलाच देश मानतात. कोटागिरी टेकडीवर रहाणाऱ्या पहाडी लोकांची सेवा करीत जरी ते हिंदुस्थानच्या सपाटीपासून उंच अशा स्थानीं राहतात, तरी ते हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या असहकारितेच्या चळवळीचें बारकाईनें निरीक्षण करीत आहेत. कलकत्त्याच्या 'सर्व्हंट' व इतर वर्तमानपत्रांतून त्यांचे असहकारितेवर जे तीन लेख प्रसिद्ध झाले आहेत ते बंगालमध्यें दौऱ्यावर असतां माझ्या वाचनांत आले. मि. स्टोक्स यांना असहकारितेची चळवळ मान्य आहे; परंतु ही चळवळ पूर्ण यशस्वी झाल्यास इंग्लिश लोकांना हिंदुस्थान सोडून जावें लागेल व त्या स्थितींत हिंदुस्थानची जी स्थिति

होईल त्याबद्दल त्यांना भीति वाटत आहे. वायव्यदिशेकडून अफगाण लोकांची स्वारी, हिमालयाच्या टेकड्यांवरून उतरणाऱ्या गुरख्यांची लुटालूट अशा प्रकारचें भेसूर चित्र त्यांच्या डोक्यापुढें उभें राहतें. कार्डिनल न्यूमनच्याप्रमाणें मी स्वतः फार दूर बघत नाहीं ' एक पाऊल प्रगति ' मला पुरी आहे. ही चळवळ मूलत: धार्मिक स्वरूपाची असून, प्रत्येक सात्त्विक मनुष्यानें परिणामाची क्षिति न बाळगतां पापापासून अलिप्त राहिलें पाहिजे. सत्कृत्याचा सुपरिणामच होईल अशी त्याची श्रद्धा असलीच पाहिजे; माझ्या मतें ' कर्मण्येवाऽधिकारस्ते मा फलेषु कदाचन ' ह्या गीतेंतील वचनाचा हाच अर्थ आहे. मनुष्यानें भविष्यकाळाबद्दल सचिंत राहावें अशी परमेश्वराची इच्छा नाहीं. त्यानें सत्याकरितां जरूर तर प्राणाचीहि आहुति दिली पाहिजे. सैतानाकरितां जगण्यापेक्षां परमेश्वराकरितां मरणें त्याला ज्यास्त पसंत असते. तेव्हां ज्याची मनोदेवता हे सरकार सैतानी आहे असें त्याला सांगतें त्याला त्याच्याशीं असहकारिता करण्याशिवाय दुसरें गत्यंतरच नाहीं.

तथापि इंग्रजसरकार हा देश सोडून एकदम गेल्यामुळें त्याच्यावर भयंकर आपत्ति कोसळतील असें धरूं या. पठाण अगर गुरख्यांनीं आमच्यावर स्वारी केल्यास ज्यास्त नुकसान काय होणार आहे ? सध्यांच्या राज्यपद्धतीमुळें आमची जी नैतिक व शारीरिक हानि होत आहे तिच्यापुढें ह्या लोकांचे अत्याचार खात्रीनें कमी दर्जाचे ठरतील. मि. स्टोक्स लष्करी सामर्थ्याची कल्पना आपल्या मनांतून अगदींच काढून टाकीत नाहींत. चारी दिशांनीं आलेल्या लुटारूंचा खरपूस समाचार घेण्याचें सामर्थ्य एकवटलेल्या रजपूत, शीख व मुसलमान वीरांच्या अंगांत खात्रीनें आहे. घटकाभर असें धरून चालूं कीं, बंगालच्या उपसागरांतून जपानी शिपाई, डोंगराळ प्रदेशांतून गुरखे व वायव्य प्रांतांतून अफगाण अशा तिघांनीं आम्हांवर हल्ला चढविला आहे. जर आपण त्यांना परत फिरवूं शकलों नाहीं तर आपण त्यांच्याशीं तह करूं .व योग्य संधि मिळतांच त्यांना हांकून लावूं. उघड उघड दिसणाऱ्या पापी सरकारापुढें मान वांकविण्यापेक्षां ह्यांत् ज्यास्त पौरुषत्व आहे.

परंतु जशी स्थिति प्राप्त होईल असें मला बिलकूल वाटत नाहीं. जर

अत्याचार विरहित असहकारितेचा विजय होईल व मि. स्टोक्स यांचा सिद्धांत याच प्रमेयावर उभारलेला आहे, तर इंग्रजलोक जावोत अगर राहोत, ते आपलें मित्रच राहतील व जें करावयाचें तें योग्य पद्धतीनेंच करतील. मनुष्यस्वभाव जात्या सुशील आहे असा माझा अजूनहि विश्वास आहे; मग तो मनुष्य इंग्रज असो अगर इतर कोणी असो. तेव्हां इंग्रज रात्रींच्या काळोखांत हा देश सोडून जातील असें मला वाटत नाहीं.

अफगाण व गुरखे हे पावित्र्याचा आदर न करणारे चोर व लुटारू आहेत असें मला वाटतें काय ? नाहीं. जर हिंदुस्थान आपल्या आध्यात्मिक धर्माचा फिरून अंगीकार करील तर त्याचा आमच्या आसपास राहणाऱ्या जातींवर खात्रीनें परिणाम होईल. ह्या शूर परंतु गरीब लोकांच्या सुखाविषयीं हिंदुस्थान काळजी वाहील व जरूर तर त्यांना मदतहि करील; परंतु त्या मदतीच्या मुळाशीं ह्या जातींविषयींची भीति न राहतां शेजारधर्म राहील. ज्याप्रमाणें आम्हीं इंग्रजांची वाट लावूं त्याचप्रमाणें जपानी लोकांची लावूं. कोणतीहि वस्तु स्वतःच्या देशामध्यें उत्पन्न होत असतां परकीय वस्तु वापरणें हें पाप आहे असें जेव्हां हिंदी लोक समजूं लागतील तेव्हां हिंदुस्थानावर स्वारी करण्याच्या भरीस जपान पडणार नाहीं. हिंदी लोकांना जरूर तितकें धान्य ह्या देशांत पिकतें; व थंडी, ऊन्ह ह्यांपासून शरीररक्षण करण्याकरितां अवश्य तितका कपडा ते तयार करूं शकतील. जेव्हां आपण परकीय लोकांच्या मालावर राहूं लागतो तेव्हांच आपल्यावर स्वारी करून आपल्याला जिंकण्याचा लोभ त्यांच्या मनामध्यें उत्पन्न होतो. त्यांच्या मदतीवांचून स्वावलंबी राहण्याला आपण शिकलें पाहिजे.

म्हणून अहिंसेच्या अगर हिंसेच्या अशा कोणत्याहि मार्गानें आपण विजयी होवो; माझ्यामतें मि. स्टोक्सना जितकी वाटते तितकी हिंदुस्थानची निराशाजनक स्थिति नाहीं. सध्यांच्या भ्याड व परावलंबी स्थितीपेक्षां दुसरी कोणतीहि स्थिति कमी निराशाजनक आहे. अशा स्थितींत आत्मोन्नति करण्याकरितां आपण जो अत्याचारवर्ज व सन्माननीय मार्ग ठरविला आहे तोच चालून जाणें हेंच श्रेयस्कर आहे.

—२९ डिसेंबर १९२०

# नागपूर कॉंग्रेस.

नागपूर कॉंग्रेसनें प्रतिनिधींच्या संख्येंत व विषयांच्या महत्त्वांत आजपर्यंतच्या सर्व कॉंग्रेसनां मागें टाकलें आहे. सध्यांच्या राज्यपद्धतीचा निषेध करणारी एवढी प्रचंड सभा आजपर्यंत कधींहि झाली नव्हती. नागपूर कॉंग्रेसमध्यें अध्यक्ष व पुढारी यांनीं लोकांना पुढें ओढण्यापेक्षां लोकच अध्यक्षांना व पुढाऱ्यांना पुढें खेंचीत होते हें अध्यक्षाचें वाक्य अक्षरशः खरें आहे. राजकारणाचीं सूत्रें लोकांनी आपल्या हातांत घेतलीं आहेत हें प्रत्येक पुढाऱ्याला कळून चुकलें होतें. जर पुढाऱ्यांना स्वतःच्या मताप्रमाणें वागतां आलें असतें तर त्यांनीं आपलें पाऊल इतकें लांब टाकलें नसतें.

कॉंग्रेसमध्यें ध्येयावर एक दिवस खुला व कडावयाचा वाद झाल्यावर दोन दिवस पूर्ण विचार करून कॉंग्रेसनें एकमतानें तें पास केलें. असहकारितेच्या ठरावावर एक दिवस वादविवाद होऊन अपूर्व उत्साहानें तो पास करण्यांत आला. शेवटच्या दिवशीं घटनेंतील बाकीच्या ३२ कलमांचा कॉंग्रेसमध्यें विचार झाला. लोकांकरितां मौ. महमद अल्ली यांनीं हीं कलमें खड्या आवाजांत वाचून दाखविलीं व त्यांचें शब्दशः भाषांतर केलें. देशी संस्थानांच्या अंतर्व्यवस्थेमध्यें कॉंग्रेसनें हात घालूं नये हें ८ वें कलम येतांच लोकांमध्यें विरुद्ध मतप्रदर्शक गडबड सुरू झाली, यावरून लोक पूर्ण सावधान होते हें सिद्ध होतें. देशी संस्थानांच्या प्रजेचीं नुसतीं मतें सुद्धां आपल्याला जगापुढें मांडतां येणार नाहींत असें जर कॉंग्रेसला वाटलें असतें तर तिनें ही अट पास केली नसती. ह्या संस्थानांतून 'जबाबदार राज्यपद्धति' स्थापन करणें जरूर आहे अशा अर्थाच्या पुढें आलेल्या ठरावावर भाषण करितांना मला लोकांना ८ व्या कलमाला जोडलेल्या अटीमुळें जरी कॉंग्रेसला देशी संस्थानांच्या राज्यकारभारांत प्रत्यक्ष हात घालतां येत नाहीं तरी संस्थानांतील प्रजेची गाऱ्हाणीं अगर इच्छा जगापुढें मांडण्याला त्यापासून बाध येत नाहीं ही गोष्ट नीट समजावून देण्याची संधि मिळाली. कॉंग्रेसला सरकाराला आज्ञा करण्याचा अधिकार आहे; परंतु तिची घटनाच अशी आहे कीं, देशी संस्थानाच्या बाबतींत ही गोष्ट तिला करतां येत नाहीं.

अशा रीतीनें पूर्ण विचाराअंतीं कॉंग्रेसनें तीन अत्यंत महत्वाचे ठराव पास केले. शक्य तर अजूनहि ब्रिटिश लोकांचा संबंध ठेवून परंतु जरूर तर तो तोडूनहि निर्भेळ स्वराज्य मिळविण्याचा आपला निश्चय कॉंग्रेसनें स्पष्ट शब्दांत जाहीर केला आहे. हें ध्येय साध्य करण्याचा कॉंग्रेसचा मार्ग योग्य व अत्याचारवर्ज ठरला आहे. कॉंग्रेसनें आपल्या घटनेंत महत्वाचे फेरफार केले असून प्रतिनिधींची संख्या ५०००० ला १ अशी ठरविली आहे. देशाच्या राजकारणांत भाग घेणारे लोकांचे खरे प्रतिनिधि कॉंग्रेसला यावेत अशी कॉंग्रेसनें व्यवस्था केली आहे. कलकत्ता कॉंग्रेसनें पास केलेल्या ठरावाला तिनें पुष्टि दिली असून तो ज्यास्त विस्तृत केला आहे. आहिंसेच्या तत्वावर तिनें जोर दिला असून हिंदुस्थानच्या निरनिराळया भागांत पूर्ण एकी ही स्वराज्यप्राप्तीची तिनें शर्त ठरविली आहे. ब्राह्मणब्राह्मणेतरांमधील तंटे मोडून अस्पर्शतेची देशाच्या एकीच्या वृक्षाला लागलेली कीड काढून टाकावी अशी हिंदी प्रतिनिधींनीं आपल्या पुढाऱ्यांना विनंति केली आहे. शाळेंतील विद्यार्थ्यांच्या पालकांना व वकिलांना कॉंग्रेसची आज्ञा त्यांनीं बरोबर पाळली नाहीं असें कॉंग्रेसनें बजावलें असून, त्यांनीं ती पाळण्याचे ज्यास्त प्रयत्न करावेत असें कॉंग्रेसनें सांगितलें आहे ह्यावरून जे वकील कॉंग्रेसची आज्ञा मान्य करून त्वरित वकिली तहकूब करणार नाहींत व जे पालक आपलीं मुलें सरकारी अगर निमसरकारी शाळेंत ठेवण्याचा हट्ट धरतील त्यांना सार्वजनिक आयुष्यांतून हळूं हळूं मागें सरलें पाहिजे. प्रत्येक पुरुषानें व स्त्रीनें आपल्याकडून शक्य तितकें कार्य करावें अशी देशाची आज्ञा आहे. —५ जानेवारी १९२१.

# महात्मा गांधी यांचा
# कारागृहानुभव.

मराठी भाषांतरकार श्री. शंकर दत्तात्रय देव. देशभक्त महात्मा गांधी यांनीं भारतवासीयांकरितां आफ्रिकेंत केलेल्या चळवळीबद्दल त्यांना तेथील सरकारच्या मेहेर नजरेनें अनेक वेळां मिळालेला कारागृहाचा अनुभव महात्मा गांधी यांनीं स्वतः लिहून हिंदी भाषेंत प्रसिद्ध केलेला असून त्याच्या अनेक आवृत्त्या अगदीं थोड्या वेळांत संपल्या गेल्या आहेत; यावरून या पुस्तकाबद्दल जास्त लिहिणें नको. यांत गांधींचें कारागृहांतील छायाचित्र दिलेलें आहे. किंमत ८ आणे. ट. ख. वेगळा.

प्रकाशकः—शंकर हरि मुळे, बुधवार पेठ, पुणें.

# पंजाबप्रकरण. भाग २ रा.

:o:

पंजाबप्रकरणाची कॉंग्रेस कमेटीनें केलेली चौकशी

## अत्यंत हृदयद्रावक जबान्या.

मराठी भाषांतरकार { १ वासुदेव गोविंद आपटे बी. ए. सं. आनंद
२ विष्णु अमृत ठोंबरे बी. ए. एलएल. बी.

पंजाबांतील असहाय्य देशबांधवांवर लष्करी कायद्याच्या नांवाखालीं कोणते घोर अनर्थ ओढवले याची महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेस सब कमिटीनें प्रसिद्ध केलेली खात्रीलायक हकीकत आमच्या महाराष्ट्र देशबंधूंस समजावी एवढाच, हें एक प्रकारें जोखमीचें कार्य शिरावर घेण्यांत आमचा हेतु होता. पहिल्या भागाप्रमाणें याहि भागांत चित्रें आहेत. पहिल्या भागांत कॉंग्रेस सब कमेटीनें पंजाब प्रकरणापासून काढलेला निष्कर्ष सरकारास केलेल्या न्याय्य मागण्या यांचाच विचार मुख्यतः आलेला आहे. परंतु त्या इमारतीची उभारणी ज्या पायावर करण्यांत आली तो साक्षीपुरावा हा पंजाब प्रकरणांतील अत्यंत महत्त्वाचा भाग होय. यामुळेंच पंजाबांतील अनर्थाचें सत्य स्वरूप यथार्थत्वानें समजून येणार आहे. या दृष्टीनें हाहि भाग खरेदी करण्यास महाराष्ट्रीय वाचक कसूर करणार नाहींत, अशी आम्हांस उमेद आहे. किंमत रु. १।. ट. ख. वेगळा.

१६३१

प्रकाशक—शंकर हरी मुळे,
बुधवार पेठ, पुणें.

REFBK-0001631